# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# सहकाराचा विकास

(Co-operative Development)

(शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून)

**बी. कॉम. भाग-३**

**सत्र-५ व ६**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२१
बी. कॉम. (सहकाराचा विकास) भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN-978-93-92887-15-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : व्यावसायिक अर्थशास्त्र ■**

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) डी. के. मोरे**
के. आर. पी. कन्या महाविद्यालय, उरूण-इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. एस. बी. महाडीक**
  संख्याशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. एस. एस. शेजाळ**
  गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली
- **डॉ. आर. ए. वाईंगडे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. एन. ए. पाटील**
  वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती विद्या पाटील**
  आनंदी कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स,
  गगनबावडा, जि. कोल्हापूर
- **डॉ. यु. एम. माळकर**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पलूस, जि. सांगली
- **डॉ. बी. के. माने**
  आटर्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली.
- **डॉ. व्ही. एम. कुंभार**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **श्री. उदय पोळ**
  पार्टनर, असेट इंजिनिअरिंग, अॅपेक्स टूल्स, कोल्हापूर
- **श्री. एस. डी. मगदूम**
  मु. पो. चिंचवाड, ता. करवीर, जि. कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) पी. एस. कांबळे**
  अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. ए. के. पाटील**
  एस. जी. एम. कॉलेज, कराड
- **प्रा. (डॉ.) एच. एच. भराडी**
  कर्नाटका युनिर्व्हसिटी, धारवाड (कर्नाटका स्टेट) धारवाड

# प्रस्तावना

जून २००७ या वर्षापासून शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्राने बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. त्या अनुषंगाने बी.कॉम. भाग-३ या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी 'सहकाराचा विकास' ह्या विषयाचे पुस्तक लिहिण्यात आले आहे. सहकार विषय असलेल्या तज्ज्ञांकडून या पुस्तकातील वेगवेळ्या घटकांचे लिखान करून घेतले आहे. सहकाराचा अर्थ, व्याख्या, तत्त्वे, भूमिका, भारतातील सहकारी पत पुरवठा चळवळीचे मूल्यमापन, अल्पकालीन व दीर्घकालीन पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची कार्ये, समस्या व उपाय, खुस्त्रो व बैद्यनाथन समितीच्या शिफारशी, शेती सहकारी संस्थांमध्ये खरेदी विक्री, प्रक्रिया व शेती संस्था, बिगरशेती संस्थांमध्ये ग्राहक, मजूर व गृहनिर्माण संस्था, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या विशेष अभ्यासामध्ये साखर, दुध व सहकारी संस्थांना संस्थात्मक सहाय्य करणाऱ्या संस्थांमध्ये नाबार्ड, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, सहकारी अंकेक्षणामध्ये अर्थ, व्याख्या, प्रकार, अंकेक्षकाची भूमिका व कार्य, निबंधकाची भूमिका व कार्य, अंकेक्षण पद्धतीतील उणिवा व उपाय, सहकारी शिक्षण व प्रशिक्षण, सहकार कायदे इत्यादी घटकांची मांडणी साध्या व सोप्या भाषेत आणि शास्त्रीय पद्धतीने केली आहे.

बहिःस्थ विद्यार्थ्यांना 'सहकाराचा विकास' हा विषय सुक्ष्म व सखोल पातळीवर अभ्यासता यावा यासाठी या विषयातील ८ घटकांची व त्यातील उपघटकांची मांडणी दूरशिक्षणाच्या अध्ययन पद्धतीने केली आहे. विषयाची उद्दिष्ट्ये, प्रास्ताविक, विषय विवेचन, सारांश, पारिभाषिक संज्ञा, स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे, सरावासाठी प्रश्न, क्षेत्रिय कार्य व अधिक वाचनासाठी पुस्तके देण्यात आली आहेत. त्यामुळे बहिःस्थ विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितपणे फायदा होणार आहे.

सहकार विषयघटकांची व उपघटकांची मांडणी व विवेचन बहिःस्थ विद्यार्थ्यांना चांगले आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरेल, त्यासंबंधी काही सूचना असतील तर दूरशिक्षण केंद्राकडे त्याचे स्वागत आहे. पुढील आवृत्तीत त्यानुसार बदल करून पुस्तक अधिक उपयुक्त करण्यासाठी प्रयत्न करता येतील. शिवाजी विद्यापीठ कक्षेतील विविध महाविद्यालयातील सहकारातील अभ्यासकानी घटक लिहून दिले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्या कामी मदत केलेल्या शिवाजी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व सेवकवर्ग आणि दूरशिक्षण विभागातील सर्वांना धन्यवाद!

■ **संपादक** ■

**डॉ. व्ही. एम. कुंभार**
धनंजयराव गाडगीळ वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, सातारा

**प्रा. डॉ. डी. के. मोरे**
के. आर. पी. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सहकाराचा विकास**
**बी. कॉम. भाग–३**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | घटक क्र. | |
|---|---|---|
| | सत्र–५ | सत्र–६ |
| **डॉ. एस. एस. शेजाळ**<br>जी. ए. कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली | १ | – |
| **डॉ. के. एस. पवार**<br>सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड | २ | – |
| **डॉ. आर. एफ. मुजावर**<br>एल. बी. एस. कॉलेज, सातारा | ३ | – |
| **डॉ. पी. के. टोणे**<br>दहिवडी कॉलेज, दहिवडी, जि. सातारा | ४ | – |
| **डॉ. व्ही. एम. कुंभार**<br>धनंजयराव गाडगीळ वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, सातारा | – | १ |
| **डॉ. आर. जी. कोरबू**<br>डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर | – | २ |
| **डॉ. डी. एन. वाघमारे**<br>डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | – | ३ |
| **डॉ. यू. एम. माळकर**<br>कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पलूस, जि. सांगली | – | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. व्ही. एम. कुंभार**
धनंजयराव गाडगीळ वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, सातारा

**प्रा. डॉ. डी. के. मोरे**
के. आर. पी. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–५** | |
| १ | सहकारी चळवळीची तोंडओळख | १ |
| २ | भारतातील कृषी सहकारी संस्था | ३० |
| ३ | भारतातील सहकारी बँका आणि पतसंस्था | ७२ |
| ४ | भारतातील महत्त्वाच्या सहकारी संस्था | १०७ |
| | **सत्र–६** | |
| १ | सहकार कायदे व नियम | १४३ |
| २ | भारतातील सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण | १७९ |
| ३ | भारतातील सहकारी गृहनिर्माण संस्था | १९४ |
| ४ | सहकार निबंधक व भारतातील सहकारी हिशेब तपासणी | २४९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र ५ : घटक १

# सहकारी चळवळीची तोंड ओळख

१.१ उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ सहकाराचा अर्थ, व्याख्या आणि वैशिष्ट्ये

  १.२.२ सहकाराची तत्वे

  १.२.३ सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका

  १.२.४ १९९१ पासूनच्या सहकारी विकासावरील समित्यांचा आढावा.

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक संज्ञा

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी प्रश्न

१.८ क्षेत्रीय कार्य

१.९ संदर्भ पुस्तके

## १.० उद्दिष्टे

- सहकाराचा अर्थ, व्याख्या व वैशिष्टये समजून घेणे.
- आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेव्दारे निर्धारित सहकाराच्या तत्त्वांची माहिती घेणे.

- १९९५ सालातील मँचेस्टर तत्वांची माहिती करून घेणे.
- सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका समजून घेणे.
- १९९१ पासूनच्या सहकारी विकासावरील समित्यांचा आढावा घेणे.

## १.१ प्रास्ताविक

भारतात १९०४ मध्ये पहिला सहकाराचा कायदा संमत करण्यात आला. त्यानंतर १९९२ मध्ये सहकाराचा व्यापक व सुधारित कायदा केला. १९१९ पर्यंत सहकार हा विषय केंद्र सरकारच्या क्षेत्रात होता. १९१९ मध्ये भारत सरकारने सुधारणा कायदा संमत केला. त्यानुसार सहकार विषय राज्यसरकारकडे सोपविण्यात आला. तसेच सहकाराच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रालय निर्माण केले. त्यामुळे सहकाराची चळवळ मोठ्या प्रमाणात विकसित झाली. समाजाच्या सर्वांगीण विकासाचे मूळ हे सहकारात आहे. व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, नैतिक आणि शैक्षणिक विकासाचा पाया सहकार आहे. ''एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ'', ''विना सहकार नही उद्धार'' अशा वाक्यप्रचारवरून सहकाराचे महत्व स्पष्ट होते.

## १.२ विषय विवेचन

घटक क्रं. १ मध्ये आपण सहकाराचा अर्थ आणि विविध तज्ञांनी सहकाराच्या केलेल्या व्याख्या पाहणार आहोत. तसेच सहकाराची वैशिष्ट्ये कोणती आहेत याचीही माहिती करून घेणार आहोत. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने सांगितलेली सहकाराची तत्वे आणि १९९५ मधील मॅचेस्टरची सहकाराची तत्वे याचाही अभ्यास करणार आहोत. तसेच सहकाराची आर्थिक विकासातील भुमीका आणि १९९१ नंतरच्या सहकार विकास समितीच्या शिफारशी इत्यादीची माहिती या घटकामध्ये घेतली जाणार आहे.

### १.२.१ सहकार : अर्थ, व्याख्या आणि वैशिष्ट्ये

**अ) सहकाराचा अर्थ :**

सहकार (Co-operation) हा शब्द को-ऑपररी (Co-operari) या मूळ लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. को (co) म्हणजे सह आणि ऑपररी (operari) म्हणजे काम करणे असा त्याचा अर्थ आहे. दोन्ही शब्दांचा एकत्रित विचार केल्यास एकत्रितपणे काम करणे किंवा एकमेकांच्या सहकार्याने

काम करणे असा सहकाराचा अर्थ होतो. परस्पर सहाय्य करणे, किंवा सर्वांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करणे म्हणजे सहकार होय. लोकशाही, चारित्र्य, बंधुभाव, शांतता आणि प्रगती या अधिष्ठानावर आधारलेली एक आदर्श समाजव्यवस्था म्हणजे सहकार होय की ज्यामध्ये समान निष्ठा असणारे लोककल्याणासाठी एकत्र येत असतात.

**ब) सहकार : व्याख्या**

१. **सी. आर. फे. :** 'नि:स्वार्थी वृत्तीने किंवा व्यवहार करण्यासाठी दुर्बलतेतून अस्तित्वात आलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. तसेच सभासदांनी सहकारी संस्थेमार्फत केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात संस्थेच्या नफ्यात भागीदार होता येईल या अटीवर संस्थेच्या कारभार चालविण्यात येतो.'

२. **एम. डार्लिंग :** अर्थव्यवस्था किंवा अर्थपद्धती यांपेक्षा काहीतरी अधिक सांगणारी संकल्पना म्हणजे सहकार होय. हृदय व मन यांना आवाहन करणारी ही संकल्पना आहे. व्यवसायातील धर्म म्हणजे सहकार. तसेच स्वावलंबन व सेवा यांचे शिक्षण देणारी सहकारी चळवळ असते.

३. **सर होरेस प्लकेट :** व्यकींच्या संघटनेतून परिणामकारक ठरणारे स्वावलंबन म्हणजे सहकारी चळवळ होय. सहकाराची तीन उद्दीष्टे आहेत : उत्तम शेती, उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान.

४. **एच. कलव्हर्ट :** व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्रित येऊन स्वत:च्या व सर्वांच्या आर्थिक हितरक्षणासाठी व वृद्धीसाठी समतेच्या पायावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.

५. **डब्लू. पी. वटकीन :** एकता, लोकशाही, समता आणि स्वातंत्र्य या तत्वांवर आधारलेली सामाजिक संघटना सहकार होय.

६. **प्रा. पॉल :** स्वत: उपयोग करून घेणाऱ्या व्यक्तीसमूहानी स्थापन केलेली व नियंत्रित केलेली व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. या संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविला जातो, तसेच सभासदांच्या आणि एकूण समाजाच्या सेवेचा प्रयत्न करण्यात येतो.

७. **वैकुंठलाल मेहता :** समान आर्थिक उद्दीष्टे साध्य करण्यासाठी, समान मत असणाऱ्या व्यक्तींची स्वेच्छेने संघटना स्थापन करण्यास प्रवृत्त करणारी एक चळवळ म्हणजे सहकार होय.

८. **पी. एच. कॅसलमन :** सामाजिक आशय असणारी अर्थपद्धती म्हणजे सहकार होय.

९. **भारतीय सहकारी कायदा :** सहकारी तत्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितरक्षण व हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.

### क) सहकाराची वैशिष्ट्ये :

सहकाराच्या विविध व्याख्यांचा विचार केल्यास सहकारी संस्थेचे स्वरूप तसेच वैशिष्ट्ये स्पष्ट होण्यास मदत होते. कोणत्याही सहकारी संस्थेचे सभासद सामुहिक प्रयत्नातून त्यांच्या समान गरजा पूर्ण करीत असतात. त्यासाठी सहकाराची तत्वे पाळली जातात. जसे निस्वार्थ वृत्ती, काटकसर, परस्पर सहाय्य, स्वावलंबन, स्वसेवा इत्यादी. सहकारी चळवळीतून सामाजिक, आर्थिक आणि नैतिक प्रगती होते. त्यासाठी प्रत्येक सभासदाचा समान दर्जा, समान हक्क, नफा-तोट्याची न्याय वाटणी आणि सामुहिक नियंत्रण इत्यादि मार्गांनी सहकारी संस्था चालविली जाते.

या चर्चेतून सहकाराची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील:

### १. व्यक्तींची संघटना :

सहकारी संस्था हि व्यक्तींची संघटना आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. समान आर्थिक गरजा असणाऱ्या व्यक्ती एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करीत असतात. प्रामुख्याने दारिद्र्याच्या व प्रतिकूल परिस्थितीच्या चक्रव्यूहात अडकलेल्या व्यक्तींनी एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करावी अशी अपेक्षा आहे. सहकारी संस्थेत भांडवलास दुय्यम महत्व आहे. म्हणूनच सहकारी संस्था भांडवलाची संघटना नसून व्यक्तींची संघटना आहे असे म्हणतात. अर्थात सहकारी संस्थेच्या व्यवहारात भांडवलाचे अस्तिव नसते असा निष्कर्ष काढता येत नाही. या प्रकारात भांडवलापेक्षा व्यक्तीला महत्व आहे एवढाच अर्थ होतो. यामुळेच सहकारी संघटना प्रकार व इतर व्यावसायिक संघटना प्रकार यातला फरक स्पष्ट होतो.

### २. ऐच्छिक संघटना :

सहकारी संस्था हि व्यक्तींची संघटना आहे. परंतु या संघटन प्रकारात सक्तीला किंवा जबरदस्तीला कोणतेही स्थान नाही. कोणत्याही सहकारी संस्थेचे सभासदत्व ऐच्छिक व खुले असते. कोणत्याही व्यक्तीला एखाद्या सहकारी संस्थेचे सभासदत्व  स्वीकारण्याचा तसेच ते रद्द करण्याचा अधिकार आहे. सहकारी चळवळ आणि सक्ती या दोन परस्परविरोधी संकल्पना आहेत. याचे कारण एखाद्या सहकारी संस्थेचे सभासदत्व स्वीकारल्यास आपल्याला लाभ मिळणार याची खात्री झाल्यावरच ती व्यक्ती संस्थेत प्रवेश करीत असते.

### ३. एक उद्योगसंस्था :

सहकारी संस्था हि एक उद्योगसंस्था आहे. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सहकारी संस्था म्हणजे उत्पादन व्यापार सेवा इत्यादी आर्थिक व्यवहार करणारी उद्योगसंस्था आहे. साध्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, सहकारी संस्थेच्या सभासदांनी स्वतःच्या भांडवलावर व जबाबदारीवर व्यावसायिक धोके पत्करून सुरु केलेले एक व्यवसायिक धाडस सहकारी संस्था करीत असते.या अर्थाने संयुक्त भांडवली उद्योग संस्था किंवा भागीदारी उद्योगसंस्था यांच्याशी सहकारी संस्थेचे साम्य आहे. तथापि सहकारी संस्थेच्या व्यवहारात त्याग, नीती, सेवा इत्यादी मानवी मूल्यांना अधिक महत्व आहे.

### ४. लोकशाही व्यवस्थापन :

सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविला जातो. तसेच प्रत्येक सभासदास संस्थेच्या व्यवस्थापनात समान हक्क असतात. एक सभासद एक मत या लोकशाही तत्वाचा स्वीकार करण्यात आलेला असतो. यामुळे संस्थेतील सभासद स्वाभिमानाने राहू शकतो आणि प्रत्येकाला संस्थेच्या कारभारात सक्रीय भाग घेता येतो.

### ५. सेवाभाव वाढविणारी संस्था :

सहकारी संस्था म्हणजे व्यवसाय संघटन प्रकार असला तरी नफा हे प्रमुख उद्दिष्ट कधीच नसते. आपल्या सभासदांची सेवा करणे हे सहकारी संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असते. याचा अर्थ सहकारी संस्थेच्या व्यवहारात नफा मिळविला जात नाही किंवा नफ्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात येते असा नाही. सहकारी संस्थेने देखील किमान प्रमाणात का होईना, नफा मिळविला पाहिजे. त्याशिवाय व्यवसाय संघटन प्रकार म्हणून सहकारी संस्था कार्य करू शकणार नाही. परंतु सहकारी संस्थेच्या व्यवहारात सेवाभाव किंवा सेवावृत्ती यांस प्रथम क्रमाकांचे तर नफ्यास दुय्यम महत्व देण्यात येते.

### ६. समता :

सहकारी संस्थेत समान पातळीवरील व्यक्ती संघटीत होतात व एकमेकांना सहकार्य करीत असतात. त्यामुळे सर्व सभासदांना समानतेची वागणूक मिळते. त्यांच्यात कोणत्याही कारणांमुळे भेद केला जात नाही. जसे धर्म, राजकीय पक्ष किंवा सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी. सर्वांना समान संधी देण्यात येते, तसेच सर्वांना समान सेवा उपलब्ध करून देण्यात येतात. साम्यवादाचे खरे लक्षण न्यूनगंड संपुष्टात येणे हेच आहे. त्यामुळे सहकारी संस्था म्हणजे समतेची प्रयोगशाळा मानली जाते.

### ७. विधायक स्पर्धा :

एखाद्या राष्ट्रात विविध प्रकारच्या अनेक सहकारी संस्था स्थापन झाल्यास आणि त्या सर्वांनी विविध प्रकारच्या वस्तू व सेवा उत्पादन केल्यास देशात विधायक स्पर्धा निर्माण होते. भांडवलशाही

अर्थव्यवस्थेतील स्पर्धा गळेकापू व मारक स्वरुपाची असते, तर सहकारी क्षेत्रातील स्पर्धा विधायक व पोषक असते.

**८. सामाजिक आणि आर्थिक चळवळ :**

सहकारी संस्था हा एक व्यवसाय संघटन प्रकार आहे. परंतु सहकारी चळवळीकडे दूरदृष्टीने पाहिल्यास ती एक सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडविणारी चळवळ आहे हे लक्षात येते. वैकुंठलाल मेहता यांच्या मते, एखाद्या समाजात शांततामय मार्गाने मुलभूत परिवर्तन घडविण्यासाठी सहकारी चळवळ हे एक प्रभावी शस्त्र आहे.

**९. कायदेशीर अस्तित्व :**

सहकारी संस्थेची स्थापना कायदेशीर केली जाते. त्यामुळे सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होते. सहकारी संस्था त्याना लागू असणाऱ्या कायद्यानुसार स्थापन झालेल्या असतात. आणि त्यांचे कार्य सुद्धा त्याच पद्धतीने चालते. सहकारी संस्थेला कंपनीप्रमाणे तिच्या सभासदापासून स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असते. तसेच सहकारी संस्थाना त्यांच्या नावाने मालमत्ता व्यवहार करण्याचे आणि कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार असतात.

**१०. नफा / अधिक्याचे वाटप :**

सहकारी संस्था सभासदांची पिळवणूक न करता योग्य मार्गाने नफा मिळवितात. मिळालेला नफा म्हणजेच आधिक्य सभासदाना त्यांच्या आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात वाटला जातो. सहकारी संस्थेवर सभासदांचे नियंत्रण असते आणि सर्वच सभासद संस्थेच्या कार्यात सहभागी होत असतात. त्यामुळे सभासदाना नफ्याचे वाटप केले जाते. संस्थेला मिळालेला सर्वच नफा सभासदाना न वाटता नफ्याचा काही भाग हा विविध निधीमध्ये वर्ग केला जातो. सभासदाना आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात नफा वाटला जातो.

## १.२.२ सहकाराची तत्वे (Principle of Co-operation)

**अ) प्रस्तावना :**

सहकारी संस्थांचे स्वरूप स्पष्ट करणेसाठी आणि व्यवसाय संघटनेच्या इतर प्रकाराशी तुलना करणेसाठी सहकाराची तत्वे महत्त्वाची आहेत. सहकाराची तत्वे व्यवहारात कितपत रुजली आहेत यावरच सहकारी चळवळीचे यशापयश अवलंबून असते. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे (आय.सी.ए.) संचालक डब्लू.पी. वटकीन यांच्या मते, सहकाराची तत्वे म्हणजे सहकारी चळवळीचा गाभा आहे. सहकारी तत्वांच्या सहाय्याने सहकारी संस्थेचे व्यावहारिक धोरण ठरविता येते.

**ब)  सहकारी तत्वे  व्याख्या :**

**१) डब्लू. पी. वटकीन :** 'सहकारी तत्वे म्हणजे सहकारी चळवळीत मूलतः समाविष्ट असलेला आचारविचार होय. त्या आधारे संस्थेच्या कार्याची दिशा ठरविता येते तसेच उद्दीष्टे साध्य करता येतात.'

**२) जॉर्ज डेव्हिस :** 'सहकारी संघटन प्रकारचे अस्तित्व व कार्यपद्धती ठरविणाऱ्या नियमांचा संच म्हणजे सहकारी तत्वे होय.'

**३) आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना :** 'सहकारी चळवळीची उदिष्टे साध्य करण्यासाठी अत्यावश्यक नियम म्हणजे सहकारी तत्वे होय.'

**क)  सहकारी तत्वे  उगम :**

रॉश्डेल पद्धती, रायफाझन पद्धती आणि शुल्झ डेलिश पद्धती अशा सहकाराच्या प्रमुख तीन पद्धती आहेत. ग्राहक, शेतकरी आणि व्यापारी हे समाजातील तीन मुख्य गट आहेत. या गटातील वेगवेगळ्या लोकांसाठी या तीन पद्धती स्थापन करण्यात आल्या आहेत. सहकाराच्या वरील तीन प्रकारामध्ये मुलभूत साम्य होते. म्हणजेच हे तीन प्रकार समान तत्वावर आधारलेले होते. सहकारी चळवळीचा विविध देशात प्रसार झाल्यानंतर १९३४ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सहकारी तंत्त्वाचा अभ्यास करणेसाठी समिती नेमली. या समितीने रॉश्डेल प्रणीत सहकारी तत्वांचा अभ्यास करून आपला अहवाल १९३७ मध्ये सादर केला. या समितीने आवश्यक सहकारी तत्वे आणि अनावश्यक सहकारी तत्वे अशा दोन भागात सहकारी तत्वांचे वर्गीकरण केले.

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक देशातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बदल झाले. त्यामुळे सहकारी चळवळीसमोर आवाहन निर्माण झाले. त्यामुळे सहकारी तत्वांचा पुनर्विचार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली १९६४ मध्ये समिती नियुक्त केली. या समितीने सहाकारी तत्वांची मांडणी अधिक काटेकोरपणे केली. आणि आपला अहवाल १९६६ मध्ये सादर केला. आंतरराष्ट्रीय सहकार समितीने हा अहवाल स्वीकारून जगातील सहकारी चळवळीला सहा तत्वांची शिफारस केली. ती तत्वे खालीलप्रमाणे

**ड)  आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेव्दारे निर्धारित सहकाराची तत्वे :**

**१.  ऐच्छिक व खुले सभासदत्व :**

सहकारी संघटन प्रकाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती एक ऐच्छिक संघटना आहे. म्हणूनच सहकारी चळवळीचे मुलभूत तत्व  असा या तत्वाचा उल्लेख केला जातो. सहकारी संस्थेत कोणत्याही व्यक्तीला ऐच्छिक व खुले सभासदत्व असते. सहकारी चळवळ आणि खुले सभासदत्व असेच समीकरण

आहे. ऐच्छिक व खुले सभासदत्व याचा अर्थ सभासदत्व स्वीकारण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जात नाही. एखाद्या सहकारी संस्थेच्या हितसंबधाशी व उद्दिष्टाशी एकनिष्ठ असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला या तत्त्वानुसार सभासदत्व दिले जाते. जात, धर्म किंवा भाषा यासारख्या अडथळ्यामुळे एखाद्याला सभासदत्व नाकारता येत नाही.

ऐच्छिक व खुले सभासदत्व म्हणजे सर्व व्यक्तींना अनिर्बंधित प्रवेश असा अर्थ करता येणार नाही; कारण कोणत्याही सहकारी संस्थेत एखाद्या व्यक्तीला प्रवेश देताना काही नियम व अटी आवश्यक असतात. सहकारी संस्थेच्या ध्येयधोरणाशी विसंगत भूमिका घेणाऱ्या किंवा विरोधात काम करणाऱ्या व्यक्तींना संस्थेत प्रवेश नाकारणे व प्रवेश दिला असल्यास तो रद्द करणे योग्य ठरते. तसेच स्वार्थी, चारित्र्यहीन व परस्परविरोधी हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींना प्रवेश नाकारण्याचा अधिकार सहकारी संस्थेला असतो. सरकारी संस्थेच्या उद्दिष्टांशी सहमत व एकनिष्ठ असणाऱ्यांना व पात्रता असणाऱ्यांना खुला प्रवेश असा अर्थ आहे.

**२) लोकशाही नियंत्रण :**

सहकारी चळवळीचे अत्यंत महत्वाचे तत्व म्हणजे सहकरी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. रॉश्डेल प्रणेत्यांनी लोकशाही नियंत्रण या तत्वाचा आवर्जून उल्लेख केला. लोकशाही नियंत्रण म्हणजे एक सभासद, एक मत असा अधिकार असतो. सहकारी संस्थेत सभासदास व्यक्ती म्हणून असल्याने त्यांच्या भांडवलाचा अथवा सामाजिक प्रतिष्ठेचा आणि मताचा संबंध जोडला जात नाही. सहकारी संस्थेत सभासदाला प्रतिनिधीमार्फत मतदान करता येत नाही. प्रत्यक्ष स्वत: मतदान करावे लागते. सहकारी संस्थेचा कोणताही निर्णय सभासदांच्या बहुमताने घेतला जातो.

व्यवस्थापकीय समितीने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्वसाधारण सभेकडून तसे अधिकार घेतले पाहिजेत. प्रत्येक सभासदाला संस्थेविषयी माहिती किंवा जमा खर्चाचा तपशील मागविण्याचा व पाहण्याचा अधिकार असतो. सभासदाला संस्थेच्या कार्याची माहिती देण्याची किंवा अहवाल देण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय समितीवर असते. सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना सतत शिक्षण व प्रशिक्षण देण्यात येते. अशा प्रकारे सहकारी संस्थेचे व्यवस्थापन असल्याने, त्यास लोकशाही नियंत्रण म्हणतात.

**३) लाभांश वाटप :**

सहकारी संस्था या व्यावसायिक संघटना आहेत. सहकारी संस्था स्थापन करण्याचा मुख्य हेतू आर्थिक व्यवहार सुरु करण्याचा असतो. जसे शेती, खरेदी-विक्री प्रक्रिया, ग्राहक भांडार इत्यादी. साहजिकच सहकारी संस्था आपल्या आर्थिक व्यवहारातून नफा मिळवू शकते. सहकारी संस्थेला नफा मिळत असतो.

तथापि सहकारी संस्था केवळ नफा मिळविण्यासाठी स्थापन केल्या जात नाहीत; म्हणून सहकारी संस्थाचा नफा आधिक्य या नावाने ओळखला जातो. सहकारी संस्थेने आर्थिक वर्षात मिळविलेले आधिक्य सभासदांच्या मालकीचे असते. तेव्हा सहकारी संस्थेने नफ्याची किंवा आधिक्याची वाटणी सभासदांमध्ये केली पाहिजे.

रॉश्डेल यांनी मांडलेल्या तत्त्वानुसार सहकारी संस्थेच्या प्रत्येक सभासदाने संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात एकूण नफा / एकूण आधिक्य वाटण्यात येते. एखाद्या सभासदाने सहकारी संस्थेमार्फत किती आर्थिक व्यवहार केले आहेत, त्यावरून त्याच्या वाटणीचा लाभांश ठरविण्यात येतो.

**४) भांडवलावर मर्यादित व्याज :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वर्गसंघर्षाचे मूळ कारण म्हणून भांडवलाचा उल्लेख केला जातो. कारण भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यक्तीपेक्षा भांडवल श्रेष्ठ असते. जांच्या ताब्यात भांडवल ते अर्थव्यवस्थेत अधिराज्य करीत असतात. स्वतःचा नफा वाढविण्यासाठी भांडवलदार अन्याय व पिळवणूक करीत असतात. परिणामी आर्थिक विषमता वाढीस लागते. सहकारी अर्थव्यवस्थेत मात्र व्यक्ती महत्वाची असते. सहकारी संस्थेची ध्येयधोरणे व्यक्ती केंद्रबिंदू मानून ठरविण्यात येतात. साहजिकच भांडवल दुय्यम महत्वाचे असते. सहकारी चळवळीला अभिप्रेत असलेली समता व लोकशाहीची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी भांडवलावर संपूर्ण नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असते. सहकारी चाळवळीत भांडवलाचा प्रभाव कमी करण्यासाठी त्यावर व्याज देण्यात येऊ नये अशी शिफारस केली आहे.

परंतु बिनव्याजी भांडवल गोळा करणे व्यावहारिक दृष्ट्या अशक्य होते आणि भांडवलशिवाय सहकारी संस्थेचा व्यवहार चालू शकत नाही. बिगर सभासदांकडून भांडवल गोळा करण्यासाठी व्याज देणे आवश्यक आहे. तेव्हा केवळ गरज म्हणूनच भांडवलावर व्याज देण्याची शिफारस सहकार तज्ञांनी केली. तेव्हा भांडवलावर व्याज दयायला हरकत नाही इथपर्यंत विचारसरणीत बदल झाला. त्यातून एक निष्कर्ष काढण्यात आला. तो असा की, भांडवलावर मर्यादित व्याज देण्यात यावे.

**५) सहकारी शिक्षण :**

आधुनिक सहकारी चळवळीच्या प्रणेत्यांनी सहकारी चळवळ प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी सहकारी शिक्षण अत्यंत महत्वाचे मानले. इतकेच नव्हे तर सहकारी शिक्षणाशिवाय सहकारी चळवळीचा योग्य प्रसार होणार नसल्याचे मत व्यक्त केले. तसेच सहकारी संस्थेला मिळणाऱ्या नफ्याचा अडीच टक्के भाग सहकारी शिक्षणावर खर्च करण्याचा कायदा सन १८५३ मध्ये रॉश्डेल प्रणेत्यांनी केला.

सुसंस्कृत व जागरूक सभासद निर्माण करण्यासाठी सहकारी शिक्षणाची आवश्यकता असते. मॅडीसन यांनी म्हटल्याप्रमाणे सहकारी शिक्षण व प्रशिक्षण नसणाऱ्या व्यक्तीच्या हाती सहकारी संस्था

किंवा सहकारी चळवळ सोपविल्यास ती एक शोकांतिका ठरण्याचा अधिक संभव आहे. प्रा. डी. जी. कर्वे यांच्या मते, सहकारी चळवळीच्या अस्तित्वासाठी सहकारी शिक्षणाच्या कोणत्याही बाजूकडे दुर्लक्ष करणे सहकारी संस्थेला किंवा सहकारी कार्यकर्त्याला फायद्याचे नसते.

सन १९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सहकारी शिक्षणाचा एक तत्व म्हणून पुन्नरुच्चार केला. सहकारी संस्था लोकशाही पद्धतीने कार्य करीत असल्याने प्रत्येक सभासदाला सहकारी शिक्षण दिले पाहिजे. सभासदांचे प्रतिनिधी व व्यावसायिक प्रतिनिधी यांना सहकारी संस्थेचा दैनंदिन कारभार चालवावयाचा असतो. तेव्हा त्यांना सहकारी संस्था चालविण्याचे तंत्र व कौशल्य चांगले माहित असणे आवश्यक असते. त्यासाठी सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सहकारी शिक्षण आवश्यक आहे.

**६) सहकारांतर्गत सहकार (विकास तत्व) :**

सन १९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सहकारी तत्त्वात एक नवी भर घातली. त्या नव्या तत्त्वास 'सहकारांतर्गत सहकार' असे म्हणतात. या सहकारी तत्त्वास 'विकास तत्व' असे देखील म्हणतात. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी स्थानिक पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर परस्पर सहकार्य करावे व सहकारी चळवळीच्या प्रगतीत मदत करावी असा या तत्वाचा अर्थ आहे. कारण सहकारी संस्थांनी परस्पर सहकार्य केल्याशिवाय त्यांच्या समस्या सोडविता येणार नाहीत.

सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठी व विकासासाठी सहकारांतर्गत सहकार अत्यंत महत्त्वाचा आहे; कारण खासगी भांडवलदार एकमेकांशी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य करीत असतात; त्यामुळे खासगी उत्पादकांची कार्यक्षमता, उत्पादकता व कौशल्य यात वाढ होते, तसेच उत्पादन खर्च कमी होतो.

**इ) मँचेस्टरची सहकाराची तत्वे :**

इंग्लंड मध्ये मँचेस्टर येथे १९९५ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेमध्ये सहकारी तत्वांचा पुनर्विचार करण्यात आला. जागतिक परिस्थितीचा व्यापक अभ्यास करून सहकारी तत्वांची पुनर्मांडणी करणे संदर्भात आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने स्वीडन मधील स्पेन अके. बुक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने केलेल्या शिफारशिंचा आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने विचार केला आणि १९९५ मध्ये इंग्लंडमध्ये मँचेस्टर येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेत सहकारी तत्वावर सखोल चर्चा करण्यात आली आणि सहकारी तत्वांची पुनर्मांडणी केली. त्यालाच सहकाराची मॅचेस्टरची तत्वे किंवा सहकाराची आधुनिक तत्वे असे म्हणतात. हि तत्वे खालीलप्रमाणे

### १) ऐच्छिक आणि खुले सभासदत्व :

सहकारी संस्थेचे सभासदत्व सर्वांसाठी ऐच्छिक असते. म्हणजेच सभासद होण्यासाठी कोणावरही सक्ती केली जात नाही, दडपण आणले जात नाही. खुले सभासदत्व म्हणजे सहकारी संस्थेचे सभासद होणेसाठी व्यक्तीची जात, धर्म, वंश, लिंग, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी घटक आड येऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे कोणतीही सभासद व्यक्ती सहकारी संस्थेच्या सभासदत्वाचा त्यागही करू शकते. सहकारी संस्था यशस्वी होण्यासाठी हे तत्व महत्त्वाचे आहे.

सभासदाकडून सहकारी संस्थेच्या हितास बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. तसेच असमान व्यक्तीला सभासदत्व देऊ नये. इतर प्रदेशातील व्यक्तीला सभासदत्व देण्यात येऊ नये. सहकारी संस्थेच्या प्राकृतिक मर्यादा विचारात घेता ऐच्छिक आणि खुले सभासदत्व हे सहकाराचे आधुनिक तत्व आहे. या तत्त्वाचे महत्व सांगताना बॉनर म्हणतात की ऐच्छिक आणि खुले सभासदत्व या तत्वाशिवाय सहकारी संस्था आपले सहकाराचे वैशिष्ट्य गमावतील आणि त्यांचे नफा मिळविणाऱ्या संस्थेत रुपांतर होईल.

### २) सभासदांचे लोकशाही नियंत्रण :

सहकारी संस्थेच्या कारभारामध्ये लोकशाहीची सर्व वैशिष्ट्ये दिसून येतात. सभासद हा सहकारी संस्थेचा मालक असतो. सहकारी संस्थेची कार्यपद्धती, ध्येयधोरणे, निर्णय इत्यादीची अंमलबजावणी सभासद सामुदायिक पणे करतात. एक सभासद एक मत या तत्वानुसार सर्व सभासद आपले प्रतिनिधी मार्फत सहकारी संस्थेचा कारभार करत असतात. त्याचप्रमाणे सहकारी संस्थेत व्यवस्थापन आणि इतर कारभारामध्ये सर्व सभासदाना समान अधिकार असतो. संस्थेच्या विकासासाठी आणि संस्थेचे हित जपण्यासाठी प्रतिनिधी मार्फत सहकारी संस्थेवर ठेवलेले नियंत्रण म्हणजे लोकशाही नियंत्रण होय. संस्थेचा सभासद जबाबदारीने निर्णय घेत असल्याने सभासदांचे लोकशाही नियंत्रण सहकारी संस्थेवर राहते. सहकारी संस्थेचे पदाधिकारी, संचालक हे लोकशाही पद्धतीचा वापर करून सहकारी संस्था चालवतात. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च प्रक्रिया मानली जाते. अशा प्रकारे सहकारी संस्थेचा सभासद हा मालक म्हणून संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवतो.

### ३) सभासदांची आर्थिक भागीदारी :

सहकारी संस्था सभासदांच्या कडून भागभांडवल गोळा करतात आणि भांडवलावर मर्यादित व्याज दिले जाते. संस्थेच्या भांडवलाची गुंतवणूक कोठे करावी, त्याचा वापर कशा पद्धतीने करावा याची शिफारस वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाकडून केली जाते. लाभांशाचे वाटप कशा पद्धतीने

करावे तसेच लाभांश वाटप केलेनंतर शिल्लक राहिलेली रक्कम सभासदांच्या कल्याणासाठी कशी वापरावी, सभासदांच्या विकासासाठी राखीव निधी किती प्रमाणात उभा करावा या बाबतीत वार्षिक सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जातो. सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च असल्याने सभासदांची भागीदारी महत्वाची असते. अशा प्रकारे सहकारी संस्थेच्या सभासदांची आर्थिक प्रक्रियेतील भागीदारी हे सहकाराचे महत्वाचे तत्व आहे.

**४) स्वायत्तता आणि स्वातंत्र्य :**

सहकारी संस्था ह्या स्वायत्त संस्था असल्या पाहिजेत. सहकारी संघटना सभासदाच्या आर्थिक प्रगतीसाठी सभासदांच्या नियंत्रणासाठी काम करते. श्री. डी. जी. कर्वे यांच्या मते स्वावलंबन आणि परस्पर सहकार्य हे सहकाराचे सार आहे. त्याशिवाय निर्भेळ सहकार अस्तित्वात येऊ शकत नाही. सहकारी संस्था सर्वांकरिता एक आणि एकाकरिता सर्व या तत्वानुसार कार्य करतात आणि त्यामधूनच त्या स्वावलंबी बनतात.

सहकारी संस्थेमार्फत सर्व व्यक्ती संघटीत होऊन एकमेकांशी सहकार्य करून स्वतःचे आणि संस्थेचे हित साध्य करतात. त्या दृष्टीने सर्व सभासद परस्पर सहकार्य करतात. या सहाय्यातुनच सहकारी संस्था स्वावलंबी बनतात. सहकारी संस्था स्वायत्त आणि स्वावलंबी झाल्यानंतर आपल्या सभासदांच्या गरजा पूर्ण करतात. सहकारी संस्थेने व्यावसायिक व्यवस्थापनेचे तत्व स्वीकारून सहकार मूल्यांचा आधार घेऊन सहकारी संस्था कार्यक्षमपणे कार्य सरू शकतात. अशा प्रकारे सहकार व्यवस्थापना बरोबर व्यावसाईक व्यवस्थापनाचा वापर करून स्वावलंबन निर्माण केले तर स्वायत्तता या तत्वाची योग्य अंमलबजावणी होईल.

**५) शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती :**

सहकारी संस्थेच्या विकासासाठी सहकारामध्ये काम करणारे कर्मचारी, अधिकारी, सहकारी संस्थेचे सभासद, संचालक या सर्वांना सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणाची आवश्यकता असते. रॉश्डेल प्रवर्तकानी १८५३ मध्ये तयार केलेल्या नियमाप्रमाणे संस्थेच्या वाटपातील अडीच टक्के भाग हा शिक्षण प्रसारासाठी खर्च केला जावा. रफायसन आणि शुल्झ डेलीस यांनी सुद्धा सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण या तत्वाकडे दुर्लक्ष केले नाही. मॉडिसन यांच्या मते ''सहकार शिक्षण व प्रशिक्षण नसलेल्या लोकांच्या हाती सहकारी संस्थेचा कारभार सोपविणे हे एकतर हास्यास्पद ठरेल किंवा शोकांतिका ठरेल.'' आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या मते ''सहकाराशी निगडीत असणाऱ्या व्यक्तींनी सहकार शिक्षण व प्रशिक्षण कार्यामध्ये भाग घ्यावा.'' सहकारी संस्थेच्या सर्वच घटकांना सहकाराची तत्त्वे, नियम, सहकाराचे कायदे इत्यादी बाबतीत

शिक्षण व प्रशिक्षण द्यावे. त्यामुळे सहकारी संस्थेचा कारभार यशस्वीपणे चालविता येईल. मिर्धा समितीच्या मते ''सहकारी संस्थांनी केवळ निधीच्या स्वरुपात शिक्षणाला मदत न करता सहकारी संस्थांनी शिक्षण व प्रशिक्षणाच्या योजना राबवाव्यात.'' सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे महत्व ओळखून भारतातील विविध राज्यांनी सहकारी कायद्याप्रमाणे सहकारी शिक्षणावर खर्च करण्याचा अथवा शिक्षणासाठी देणगी देण्याचा अधिकार दिलेला आहे.

सहकारी संस्थेतील व्यवहारांची माहिती सर्व सभासदांना पुरविण्यात यावी. सहकारी संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेची ध्येय धोरणे, आर्थिक व्यवहार इत्यादींची माहिती सभासदांना देणे आवश्यक असते. त्यासाठी सभासदांच्या सभा वारंवार बोलवल्या जातात. संस्थेच्या सर्व कामकाजाची माहिती सभासदांना देणेत यावी. यासाठी संस्थेने प्रसिद्धी तंत्राचा वापर करावा. त्यामुळे सभासदामध्ये संस्थेच्या बाबतीत विश्वास निर्माण होतो आणि सहकारी संस्थेच्या विकासाला मदत होते.

### ६) सहकारी संस्थांतर्गत सहकार :

१९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने हे तत्व प्रथमच नव्याने मांडले. त्याचाच पुनरुच्चार १९९५ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या मँचेस्टर येथील परिषदेमध्ये केला. सहकारी संस्थानी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर इतर सहकारी संस्थाशी सहकार्य करून आपली ताकत वाढविली पाहिजे असे या तत्वाद्वारे अपेक्षित आहे. सहकारातर्गत सहकार हे केवळ नैतिक तत्व नसून ते परस्पर प्रगतीचे आणि विकासाचे तत्व आहे. या तत्वाप्रमाणे सहकारी संस्थाचा विकास होण्यास मदत होते. डीग्वे यांच्या मते, आधुनिक जगात सहकाराचे अस्तित्व टिकविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी विविध सहकारी संस्थामध्ये परस्पर सहकार्य असणे आवश्यक आहे.

### ७) सामाजिक बांधिलकी :

सहकारी संस्थेची आणि सभासदांची प्रगती होत असताना सहकारी संस्थांनी समाजाभिमुख बनण्याची आवश्यकता आहे. त्यातूनच सामाजिक बांधीलकीची जाणिव निर्माण होते. आणि त्यामधूनच समाजातील दुर्बल घटकांचा विकास साध्य करायचा प्रयत्न केला जातो. सहकारामुळे सामाजिक, आर्थिक, नैतिक, राजकीय आणि विधायक मार्ग स्वीकारला जातो. जगातील सर्वच देशात सहकार हे सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून कार्यरत आहे. सहकारी संस्था समाजातील आर्थिक शोषण थाबावू शकते. गरीब-श्रीमंत यामधील दरी कमी करते. आर्थिक विषमता दूर करते. अशा प्रकारे सहकारी चळवळ हि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचे साधन बनले आहे.

वैकुंठलाल मेहता यांच्या मते, ''सहकारचे प्रमुख उद्दिष्ट हे शांततामय मार्गाने दूरगामी परिणाम घडवून सामाजिक परिवर्तन करणे, पिळवणूकीला पायबंद घालणे, समाजपद्धती, जात-पात आणि वर्णनिरपेक्ष समता तसेच सामाजिक स्वास्थ्य याची व्यक्तीच्या प्रतिष्ठेशी सांगड घालणारी परिस्थिती निर्माण करणे हे आहे.''

### १.२.३ आर्थिक विकासातील सहकाराची भूमिका :

#### अ) प्रास्ताविक :

आर्थिक विकास ही एक गतिमान आणि सतत बदलत जाणारी संकल्पना आहे. तसेच आर्थिक विकास ही दीर्घकालीन चालणारी प्रक्रिया आहे. प्रा. ए. मॅडिसन यांच्या मते विकसनशील देशातील लोकांच्या उत्पन पातळीतील वाढ म्हणजे आर्थिक विकास होय. प्रा. जे. के. मेहता यांच्या मते, अर्थव्यवस्थेत घडून येणारे संख्यात्मक स्वरूपाचे बदल म्हणजे आर्थिक विकास होय. प्रा. शुंपिटर यांच्या मते स्थितीशील अर्थव्यवस्थेमध्ये सातत्याने व स्वयंस्फूर्तीने होणारे बदल म्हणजे आर्थिक विकास होय.

थोडक्यात आर्थिक विकासामध्ये वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे. आर्थिक विकासाच्या कार्यात बचत, भांडवल संचय, रोजगार निर्मिती, उत्पादन इत्यादी बाबींचा विचार केला जातो. अशाप्रकारे आर्थिक विकासाची प्रक्रिया ही व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. आर्थिक विकास आणि सहकारी चळवळ यामध्ये जवळचा आहे. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकासातील अडथळे दूर करता येतात आणि आर्थिक विकास साध्य करता येतो. आर्थिक आणि सामाजिक अंगाचा विचार करता सहकारी चळवळ हे विकासाचे एक महत्वाचे साधन आहे. त्यामुळे आर्थिक विकासातील सहकाराची भूमिका पाहणे महत्वाचे ठरते.

#### ब) आर्थिक विकासातील सहकाराची भूमिका :

देशाच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळ कोणती भूमिका पार पाडू शकते याचा अभ्यास खालील मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

#### १) कृषी/शेती विकास :

भारताच्या आर्थिक विकासात शेती क्षेत्राचा वाटा महत्वाचा आहे. त्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासासाठी सहकारी चळवळीने महत्वाची भूमिका बजावली आहे. शेती विकासासाठी भांडवलाची मोठ्या प्रमाणात गरज असते. सहकारी पतपुरवठा संस्था शेतीसाठी कर्जपुरवठा करतात. तसेच सेवा सहकारी संस्थाच्याकडून सुधारित बियाणे, खते, कीटकनाके इत्यादींचा पुरवठा केला जातो. शेतमालाची साठवणूक करणे, प्रतवारी करणे, शेतमालाची खरेदी करणे, इत्यादी कार्ये सहकारी खरेदी-विक्री संस्थेच्या

वतीने केली जातात. तसेच सहकारी प्रक्रिया संस्थेच्या माध्यमातून शेतमालावर प्रक्रिया करणे, कृषीउत्पादनावर आधारित उद्योग सुरु करणे, शेतमालाची देशात आणि विदेशात विक्री करणे, इत्यादी कार्ये केली जातात. त्याचबरोबर शेतीबाबत तज्ञांचा सल्ला देणे आणि मार्गदर्शन करणे, शेती पिकांचे योग्य नियोजन करणे, पिकांचे संरक्षण करणे इत्यादी कार्ये हि शेती संशोधन संस्था करतात. त्यामुळे शेती क्षेत्राचे उत्पादन आणि उत्पादन क्षमता वाढलेली दिसून येते. अशा प्रकारे कृषी विकासात सहकाराची भूमिका महत्वाची आहे.

### २) औद्योगिक क्षेत्राचा विकास :

देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्राचे महत्वाचे स्थान आहे. औद्योगिक क्षेत्राच्या विकासामध्ये सहकारी चळवळीची भूमिका महत्वाची आहे. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी तेल गिरण्या, सहकारी खत कारखाने, सहकारी फळ व भाजी प्रक्रिया संस्था, सहकारी दुध संस्था इत्यादींचा विकास सहकाराच्या माध्यमातूनच झालेला आहे. तसेच ग्रामीण भागातील लघु आणि कुटीर उद्योगांच्या विकासामध्ये ही सहकाराची भूमिका महत्वाची आहे. सहकारी प्रक्रिया उद्योगातून शिल्लक राहणाऱ्या आणि टाकाऊ पदार्थावर आधारित कागद कारखाने, प्लायवूड निर्मिती, स्पिरीट उत्पादन, खत कारखाने इत्यादी उपउत्पादने सहकारी क्षेत्रात घेतली जातात आणि यामधूनच ग्रामीण भागाचा विकास साध्य केला जातो. अशा पद्धतीने सहकारी चळवळीच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्राचा विकास झालेला दिसून येतो. सहकारी चळवळीची ही कामगिरी पाहता देशाच्या आर्थिक विकासातील सहकाराची भूमिका महत्वाची ठरते.

### ३) व्यापार क्षेत्राचा विकास :

जागतिकीकरणानंतर सहकारी संस्था आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी झाल्या. शेतमाल, दुग्ध पदार्थ, प्रक्रिया केलेला माल, फळे, भाजीपाला, साखर इत्यादी माल सहकारी संस्थामार्फत निर्माण केला जातो आणि त्याद्वारे देशाला विदेशी चलन मिळत आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाची गती वाढत आहे. अशा प्रकारे सहकारी संस्थाच्या माध्यमातून व्यापार क्षेत्राचा विकास होत आहे. आणि त्याच्या सहाय्याने देशाचा आर्थिक विकास होत आहे.

### ४) रोजगार निर्मिती :

सहकारी चळवळीच्या माध्यमातून देशात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. प्रामुख्याने शेती आणि औद्योगिक क्षेत्रात सहकारी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली असल्याने तेथे रोजगाराची निर्मिती झालेली दिसून येते. सहकारी साखर कारखान्यामुळे भूमिहीन व गरीब शेतकऱ्यांना

हंगामी रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, प्रक्रिया संस्था यांनी अनेक लोकांना कायमचा रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच सहकारी संस्थामुळे स्वयंरोजगारही मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लघुउद्योगांच्या विकासाला चालना मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण होऊन आर्थिक विकास होत आहे.

**५) दृष्टीकोणात बदल :**

सहकारी चळवळमुळे समाजामध्ये सहकार्याची भावना वाढलेली दिसून येते. सहकारामुळे कृषी आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास होतो. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होतो. परिणामी समाजाचा शेती व अन्य कार्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. त्यातूनच बाजारविषयक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण होते. त्यामुळे शेतीक्षेत्राकडे व्यापारी दृष्टीकोणातून पाहण्याची प्रवृत्ती निर्माण होते. उत्पन्न वाढते, राहणीमानात सुधारणा होते.

अशा प्रकारे सहकारी चळवळीच्या माध्यमातून लोकशाहीची मुल्ये आणि सहकाराचे तत्वज्ञान यांच्या आधारे लोकांचा विकासाचा दृष्टीकोन बदलत आहे. सहकारामुळे शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य इत्यादि क्षेत्राचा विकास झालेला आहे आणि त्यातूनच देशाचा आर्थिक विकास साध्य होत आहे.

**६) ग्रामीण भागाचा विकास :**

सहकारी चळवळ ही ग्रामीण विकासाचे महत्वाचे साधन बनले आहे. शेती आणि शेतीवर आधारित उद्योगांचा विकास सहकारी चळवळीच्या माध्यमातून झालेला दिसून येतो. सहकारी संस्थामुळे ग्रामीण भागातील लोकांना कमी व्याजदराने पतपुरवठा होऊ लागला. त्यामुळे शेती क्षेत्रात सुधारणा करता आल्या. शेतीच्या उत्पादनात वाढ झाली. सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागात लघु आणि कुटीर उद्योगांची वाढ झाली त्यामुळे रोजगार वाढला. लोकांचे उत्पन्न वाढले यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली. थोडक्यात सहकारी पतपुरवठा संस्था, सहकारी ग्राहक भांडारे, सहकारी प्रक्रिया संस्था इत्यादीमुळे ग्रामीण भागाचा विकास झालेला आहे.

**७) बचत करणेस प्रोत्साहन :**

सहकारी चळवळीच्या माध्यमातून शेती आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास झालेला आहे. त्यामुळे रोजगारात वाढ होऊन लोकांच्या उत्पन्नातही वाढ झाली आहे. उत्पन्न वाढल्यामुळे बचतीच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात सहकारी पतसंस्था, सहकारी बँका लोकांना बचतीसाठी प्रोत्साहन

देतात. त्यासाठी बचतीच्या आकर्षक योजना राबविल्या जातात. जमा झालेल्या बचतीमधून कर्जपुरवठा केला जातो आणि त्यामधूनच भांडवल निर्मितीस चालना मिळते व आर्थिक विकासाची गती वाढते.

**८) ग्राहकांचे हित :**

सहकारी चळवळीमुळे ग्राहकांचे आर्थिक शोषण कमी झाल्याचे दिसून येते. सहकारी तत्वावर ग्राहक संस्था स्थापन झाल्यामुळे सभासद ग्राहकांची इतर संस्था व व्यापारी यांच्याकडून होणारी फसवणूक आणि पिळवणूकीस आळा बसला आहे. ग्राहक सहकारी संस्थेच्या वतीने ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांचे आर्थिक हित पाहणे, त्यांचे कल्याण करणे इत्यादी कार्ये केली जातात. त्यामुळे आर्थिक विकासास मदत झालेली दिसून येते.

**९) मुलभूत सुविधांचा विकास :**

सहकारी चळवळीच्या माध्यमातून मुलभूत सुविधांचा विकास झालेला दिसून येतो. ग्रामीण भागात सहकारी संस्थांचा विकास करत असताना सुरुवातीला पाणीपुरवठा, रस्ते, वीजपुरवठा इत्यादी मुलभूत सुविधांचा विकास करावा लागतो. त्यासाठी शासन आर्थिक मदत देत असते. ग्रामीण भागात रस्ते निर्मितीमुळे शेतमाल कारखान्यापर्यंत पाठविता येतो. तसेच कारखान्यामध्ये तयार झालेला माल बाजारपेठेत पाठविता येतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य दर मिळू शकतो व त्यातूनच शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होतो.

**१०) महिलांचे कल्याण :**

सहकारी चळवळीच्या माध्यमातून देशातील महिला वर्गाचे कल्याण साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करून महिलांना रोजगाराच्या संधी प्राप्त करून दिल्या आहेत तर अनेक महिलांनी सहकाराच्या माध्यमातून स्वयंरोजगार निर्माण केला आहे. ग्रामीण भागात सहकारी तत्वावर पापड, लोणची तयार करणे, तसेच महिलांनी चालविलेल्या सहकारी दुध संस्थांचा विकास करणे इत्यादी कामे महिला सहकारी संस्थाकडून केली जातात. तसेच शालेय गणवेश तयार करणे, कला-कौशल्याच्या विविध वस्तू तयार करणे, वुलनची कपडे तयार करणे अशा प्रकारची कामेही महिला सहकारी संस्थेमार्फत केली जातात. त्यामुळे अनेक महिलांना रोजगार मिळाला आहे. अशा पद्धतीने सहकारी संस्था महिला वर्गाचे कल्याण साध्य करणेसाठी महत्वाची भूमिका पार पडतात व त्यामधूनच देशाचा आर्थिक विकास झालेला दिसून येतो.

अशा प्रकारे सहकारी चळवळीच्या माध्यमातून बचतीला प्रोत्साहन भांडवल निर्मिती, रोजगार निर्मिती, शेती व शेतीआधारीत उद्योग, व्यापार, प्रक्रिया उद्योग, ग्राहक व महिलांचे कल्याण, दारिद्र्य

आणि आर्थिक विषमता कमी करणे, मुलभूत सुविधांचा विकास, ग्रामीण विकास भागाचा इत्यादी उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी सहकारी चळवळीच्या माध्यमातून विशेष कार्य केल्यामुळे देशाच्या आर्थिक विकासामध्ये सहकाराची भूमिका महत्वाची ठरते.

## १.२.४ १९९१ पासूनच्या सहकार विकासावरील समित्यांचा आढावा :

**प्रास्ताविक :**

भारत सरकारने १९९१ मध्ये खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरणाचा स्वीकार केला. या नवीन आर्थिक धोरणाचा भारताच्या अर्थव्यवस्थे मधील सर्वच क्षेत्रावर परिणाम झाल्याचे दिसून आले. सहकारी चळवळवरही त्याचे परिणाम दिसू लागले. भारताच्या अर्थव्यवस्थेत या नवीन आर्थिक धोरणामुळे अनेक प्रकारचे बदल झाले. अशा बदलत्या परिस्थितीत सहकार चळवळ विकसित करणेसाठी त्याच्या निकोप वाढीसाठी आणि ती सदृढ बनविण्यासाठी भारत सरकारने वेळोवेळी अनेक समित्यांची नियुक्ती केली. १९९१ पासून सहकारी चळवळीच्या विकासासाठी भारत सरकारने स्थापन केलेल्या विविध समित्यांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**अ) ब्रम्ह प्रकाश समिती (१९९१) :**

१९९१ मध्ये भारतीय नियोजन मंडळाने सहकारी चळवळीचा आढावा घेण्यासाठी चौधरी ब्रम्ह प्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीलाच प्रारूप सहकारी संस्था कायदा समिती असेही म्हटले जाते. या समितीने सहकारी चळवळीसाठी भविष्यकालीन दिशानिर्देश सुचविले आणि प्रारूप सहकारी संस्था कायद्याचा मसुदा मांडला आणि आपला अहवाल १९९१ मध्ये सादर केला.

या समितीने केलेल्या शिफारसशी पुढीलप्रमाणे

१) सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र आणि आर्थिक क्षमता या बाबतीत बंधन शिथील करणे.

२) सहकारी संस्थांची नोंदणी पद्धती सोपी करण्यात आली.

३) सहकारी चळवळीबाबतचे शासनाचे धोरण आणि सहकारी तत्वे प्रारूप सहकारी संस्था कायद्यात स्पष्ट करण्यात आले.

४) प्रारूप सहकार कायद्यानुसार संचालक बदलणे, पोटनियमातील दुरूस्तीची सक्ती, ठरावाबाबत नकाराधिकार इत्यादी बाबतीत शासनास अधिकार असणार नाही.

५) या समितीने सहकारी संस्थाना शासनाकडून समभागाच्या मार्गाने निधी स्वीकारण्यास प्रतिबंध केला.

६)	समितीने सहकारी संस्थांच्या सभासदावर विशेष जबाबदारी सोपवावी अशी शिफारस केली.

७)	प्रारूप सहकारी संस्था कायद्यानुसार शासकीय अधिकाऱ्यांना सहकारी संस्थामध्ये कार्य करण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

**ब) अलघ समिती (१९९९) :**

नोव्हेंबर १९९९ मध्ये डॉ. वाय. के. अलघ यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. देशातील सहकारी चळवळीचा आढावा घेऊन या समितीने आपला अहवाल मार्च २००० मध्ये सादर केला. या समितीने सहकारी संस्थांचे प्रमंडळ (Corporatization) किंवा कंपनीमध्ये रुपांतर करणेबाबत महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे

१)	सहकारी संस्थाना स्वेच्छेने प्रमंडळ किंवा कंपनी मध्ये रुपांतर करणेसाठी खाजगी कंपनीच्या अधिनियमानुसार सार्वजनिक, विश्वस्त किंवा विधी यापैकी कोणत्याही स्वरुपात सहकारी संस्थांची नोंदणी व निर्मिती यासाठी सहकारी तत्वावर आधारीत कायदेशीर व नियामक चौकट तयार करणे.

२)	सहकारी संस्थांना सदस्यांच्या भांडवलाचे हस्तांतरण करणेसाठी निर्देशक मंडळाची मंजुरी घ्यावी लागेल.

३)	आंतरराज्य सहकारी संस्थेचे कंपनीमध्ये रुपांतर करणेसाठी संबधित सहकारी संस्थेच्या दोन तृतीयांश (२/३) सदस्यानी मान्यता देणे आवश्यक आहे.

४)	कंपनीमध्ये रुपांतरीत झालेल्या सहकारी संस्थेस मूळ स्वरुपात परत जाणेची तरतूद असेल.

५)	उत्पादक कंपनीच्या विविध उद्दिष्टाबरोबरच उत्पादन, प्रक्रिया, प्राथमिक आणि आनुषंगिक उत्पादने व त्यांची विक्री इत्यादींचा समावेश समितीने त्यामध्ये केला आहे.

६)	समितीच्या मते उत्पादक कंपन्यांचे सभासद हे प्राथमिक उत्पादक असले पाहिजेत आणि या उत्पादक कंपनीची मालकी विशीष्ट व्यवसायात असणाऱ्या लोकांकडेच राहील.

७)	सहकारी संस्थेतून रुपांतरीत झालेल्या उत्पादक संस्थाना वित्तीय व प्रशासकीय निर्णयामध्ये स्वायत्तता असेल.

**क) कपूर समिती (२०००) :**

देशातील सहकारी पतपुरवठा व्यवस्थेचा अभ्यास करून त्यामध्ये सुधारणा करणेसाठी केंद्र सरकारने मे २००० मध्ये तत्कालीन डेप्युटी गव्हर्नर श्री. जगदीश कपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या

समितीने आपला अहवाल जुलै २००० मध्ये शासनाला सादर केला. सहकारी पतपुरवठा संस्थांच्या वित्तीय परिस्थितीचा आणि कामगिरीचा अभ्यास करून त्यामधील दोष दूर करून या संस्थाची वित्तीय स्थिती सुधारून ग्रामीण भागासाठी वित्तपुरवठा करण्याचे कार्यक्षम साधन म्हणून त्यांचा विकास करण्यासाठी उपाय योजण्याचे कार्य या समितीने केले.

सहकारी चळवळीच्या विकासासाठी आणि संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी पुनर्वसन आणि विकास निधी निर्माण करावा, सहकारी संस्थांच्या कार्यपद्धती मध्ये व्यावसायिक दृष्टीकोन निर्माण करणे, सहकारी संस्थांची वसुली यंत्रणा कार्यक्षम करणे, सहकारी संस्था कार्यक्षमतेने चालविण्यासाठी स्थानिक नेतृत्व विकसीत करणे इत्यादी शिफारशी या समितीने केल्या आहेत.

**ड) वैद्यनाथन समिती (२००४) :**

ग्रामीण पतपुरवठा रचना कार्यक्षम करण्यासाठी केंद्रसरकारने ऑगस्ट २००४ मध्ये प्रा. ए. वैद्यनाथन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने आपला अहवाल फेब्रुवारी २००५ मध्ये शासनाकडे सादर केला. या समितीच्या अहवालातील प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे,

१. सहकारी पतपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी या संस्थांचे पुनरुज्जीवन आणि पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

२. कार्यक्षम सहकारी संस्थाना राज्य आणि केंद्र सरकारने आर्थिक मदत केली पाहिजे.

३. सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण सनदी लेखापरीक्षका मार्फत करणे.

४. सहकारी संस्थामधील राज्यसरकारचा हस्तक्षेप कमी करणे.

५. वित्तीय सेवांचा लाभ घेणाऱ्या सर्वांना मताचा अधिकार देणे.

६. सहकारी बँकाना रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आणून व्यापारी बँकांप्रमाणे सहकारी बँकांनाही रिझर्व्ह बँकेचे सर्व निकष लागू करावेत.

७. सहकारी संस्थामधील कर्मचाऱ्याना प्रशिक्षण देणे.

८. सहकारी पतपुरवठा रचना सुधारणा कार्यक्रमामध्ये समन्वय साधून त्यावर नियंत्रण ठेवणेची जबाबदारी नाबार्डकडे देणेत यावी.

९. सहकारी संस्थांच्या संचालक मंडळामध्ये किमान पात्रतेवर आधारित योग्य व्यक्तींचा समावेश करावा.

१०. सहकारी संस्थाना सक्षम बनविण्याकरीता राज्य सरकारने कायद्यात योग्य ते बदल करावेत.

### इ) सहकारावरील उच्चधिकारी समिती (२००६) :

मागील शंभर वर्षातील देशातील सहकारी चळवळीचा आढावा घेऊन बदलत्या परिस्थितीत सहकारी चळवळ सक्षम बनविण्याचा उद्देश समोर ठेवून ७ डिसेंबर २००४ रोजी नवी दिल्ली येथे देशातील सर्व राज्यांच्या सहकार मंत्र्यांची परिषद आयोजित केली होती. या परिषदेमध्ये सहकारी चळवळीचे वरील उद्देश साध्य करण्यासाठी भारत सरकारने उच्चधिकारी समिती नियुक्त करावी असे ठरविण्यात आले. त्यानुसार भारत सरकारने शिवाजीराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मे २००५ मध्ये समिती नेमली. या समितीने आपला अहवाल २००९ मध्ये शासनाला सादर केला. या समितीच्या शिफारशी पुढीलप्रमाणे

१) या समितीच्या मते सहकाराच्या विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रगतीशील आणि आदर्श सहकारी कायदा निर्माण करावा.

२) प्रारूप सहकारी संस्था कायद्याचे पालन करणेसाठी या समितीने राज्यघटनेत दुरुस्ती करणेची शिफारस केली.

३) समितीच्या मते सहकारी संस्थांची संख्या वाढविणेसाठी त्यांना उत्तेजन दिले पाहिजे आणि सहकारी संस्थांचे विलीनीकरण व एकत्रीकरण करावे.

४) महिलांनी सहकारी चळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत अशीही शिफारस या समितीने केली.

५) सरकारने सहकारी संस्थांच्या सभासदांच्या प्रशिक्षणासाठी अनुदान दिले पाहिजे असे या समितीने सुचविले.

६) या समितीच्या मते सहकारी संस्थाना आर्थिक संस्था म्हणून कायदेशीर मान्यता द्यावी.

७) सहकारी संस्थाना सक्षम बनविण्यासाठी राज्य सरकारने कायद्यात योग्य ते बदल करावेत असेही या समितीने सांगितले.

८) या समितीने सहकारी संस्थांचे राजकियीकरण होऊ न देणेविषयी शिफारस केली आहे.

९) सक्रीय सदस्य व्याख्येचा कायद्यात समावेश करावा आणि सहकारी संस्थांची स्पर्धात्मकता वाढवावी असे या समितीने सांगितले.

१०) देशातील आजारी आणि दुर्बल सहकारी संस्थांच्या पुनर्वसनासाठी राष्ट्रीय सहकारी पुनर्वसन समिती स्थापन करणे विषयीची शिफारस या समितीने केली आहे.

अशा प्रकारे नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर भारत सरकारने सहकाराच्या विकासासाठी वेळोवेळी विविध समित्या नियुक्त केल्या. या समित्यानी नवीन आर्थिक धोरणामुळे बदलत्या परिस्थितीचा सहकारावर झालेल्या परिणामाचा आढावा घेऊन सहकाराच्या विकासासाठी भारत सरकारला विविध प्रकारच्या शिफारशी केल्या. समितीने केलेल्या शिफारशी सरकारने स्वीकारून त्याची अंमलबजावणी केल्याने आज बदलत्या परिस्थितीत सहकाराचा विकास झालेला दिसून येतो.

## १.३ सारांश

- इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने निर्माण केलेले दुष्परिणामातून मार्ग काढण्यासाठी रॉबर्ट ओवेन यांनी सहकारी चळवळीतून संस्था काढली. इंग्लंडमधील सहकारी चळवळ जगभर पसरली.
- सहकार हा अत्यंत महत्वाचा आणि व्यापक विषय आहे. सहकार म्हणजे एकत्रित काम करणे. सहकार्याने काम करणे, मानवी विकासासाठी काम करणे.
- सहकाराचा व्यापक अर्थ पाहता मानवी जीवनाच्या विकासाचे मूळ सहकारात आहे. त्यामुळे एकत्र राहून काम करणे हा अर्थ अभिप्रेत आहे.
- सहकाराच्या दिलेल्या व्याख्या मध्ये सी. आर. के., एच कॅलव्हर्ट, सर होरेस प्लेंकेट, पी. एच. कॅसलमन, वॅटकिन्स, वैकुंठ्लाल मेहता, भारतीय सहकारी कायदा इत्यादी तज्ञांच्या व्याख्या आहेत.

सहकाराच्या व्याख्या अभ्यासताना काही वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करता येतात. ती खालीलप्रमाणे आहेत.

१) सहकार हे व्यक्तींचे संघटन आहे.

२) सहकार ही ऐच्छिक संघटना आहे.

३) सहकार हे लोकशाही व्यवस्थापन आहे.

४) सहकारी संस्था एक उद्योग संस्था आहे.

५) सहकारी संस्था सेवाभाव वाढविणारी संस्था आहे.

६) सहकारी संस्था समतेची प्रयोगशाळा आहे.

७) सहकारी संस्था विधायक स्पर्धा आहे.

८) सहकारी संस्था ही सामाजिक / आर्थिक चळवळ आहे.

- सहकारी तत्वे म्हणजे सहकारी संस्थांचे कार्य, व्यवस्थापन, कार्यपद्धती संबंधींचे नियम होय.
- सहकार तत्त्वाच्या व्याख्या जॉर्ज डे. टी. डिबोक, वॅटकिन्सन डी. जी. कर्वे यांनी दिलेल्या आहेत.
- सहकारी तत्वाचा उगम १८४४ साली रॉशडेल सोसायटीच्या नियमातून झाला. त्यानंतर रायफझन पद्धती, शुल्झ डेलिश पद्धतीची तत्वे सहकारी चळवळीत आली.

सहकार तत्वांना आधुनिक दृष्टीकोन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने १९६४ साली डॉ. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीने मांडलेली तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

१) ऐच्छिक व खुले सभासदत्व

२) लोकशाही नियंत्रण

३) लाभांश वाटप

४) भांडवलावर मर्यादित व्याज

५) सहकारी शिक्षण

६) सहकारांतर्गत सहकार

**सहकाराची मँचेस्टर तत्वे**

१९९५ साली इंग्लंडमध्ये मँचेस्टर येथील आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या परिषदेत सहकारी तत्वांची पुनर्मांडणी केली ती खालीलप्रमाणे

१) ऐच्छिक व खुले सभासदत्व

२) सभासदाचे लोकशाही नियंत्रण

३) सभासदाची आर्थिक भागीदारी

४) स्वायत्तता आणि स्वातंत्र्य

५) सहकारी शिक्षण, प्रशिक्षण व माहिती

६) सहकारांतर्गत सहकार

७) सामाजिक बांधिलकी

**सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका**

देशाच्या आर्थिक विकासात सहकाराला महत्वाचे स्थान आहे. आर्थिक विकास ही दिर्घकालीन सतत चालणारी प्रक्रिया आहे. सहकारातून व्यक्तींचे स्वावलंबन व विकास साधता येतो. त्यामुळे सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका महत्वाची असते.

सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका खालीलप्रमाणे

१) शेतीचा विकास

२) औद्योगिक विकास

३) व्यापार क्षेत्राचा विकास

४) रोजगार निर्मिती

५) लोकांच्या दृष्टीकोनात बदल झाला.

६) ग्रामीण विकास झालेला आहे.

७) लोकांना बचत करणेस प्रोत्साहन मिळाले.

८) ग्राहकांचे हित साध्य झाले.

९) मुलभूत सुविधांचा विकास

१०) महिलांचे कल्याण होणेस मदत झाली.

## १.४ पारिभाषिक संज्ञा

- सहकार : सर्वांच्या हितासाठी एकत्र काम करणे.
- संघटन : एकत्रितपणे येण्यातून निर्माण झालेली संस्था
- उच्चाटन : नायनाट करणे / नष्ट करणे.
- लोकचळवळ : लोकांनी चालू केलेली चळवळ
- विश्वव्यापक : जगभर चालू असलेली चळवळ
- तत्व : संस्था चालविण्यासाठी नियम

- पुनर्मांडणी : तत्वांची पुन्हा मांडणी करणे
- आधुनिक दृष्टीकोन : व्यापक / नवा दृष्टीकोन
- अधिक्य : अधिक उत्पन्न
- लाभांश : मिळालेल्या नफ्यातील भाग
- स्वायत्तता : स्वातंत्र्य / अधिकार असणे
- पुनर्रचिततत्वे : पुन्हा बदलून मांडलेली तत्वे
- बांधिलकी : समाजाबद्दलची जबाबदारी
- कृषी विकास : शेती विकास
- कल्याण : आर्थिक सामाजिक हित / लाभ

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) चूक की बरोबर ते लिहा.**

१) सहकार हे व्यक्तीचे संघटन नाही.

२) सहकार तत्वांची मांडणी प्रथम रॉश्डेल यांनी केली

३) सहकाराच्या आधुनिक तत्वानाच मँचेस्टरची तत्वे म्हणतात.

४) आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने सहकार तत्वांची पुनर्मांडणी केली आहे.

५) सहकाराची आर्थिक विकासात महत्वाची भूमिका आहे.

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) सहकारी संस्थांना नोंदणी ...................... असते.

२) सहकारी संस्था व्यवहाराच्या प्रमाणात ....................... वाटप करते.

३) सहकाराच्या आधुनिक तत्वांना ........................... म्हणतात.

४) सहकाराची वैद्यनाथन समिती ............................ साली नियुक्त केली.

५) सहकाराची अलघ समिती ....................... मध्ये नियुक्त केली.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आय. सी. ए. म्हणजे काय ?

२) १९९५ च्या सहकार तत्वाना कोणती तत्वे म्हणतात ?

३) सहकारी संस्थामध्ये राजकीय हस्तक्षेप नसावा असे कोणत्या समितीने सुचविले ?

४) राष्ट्रीय स्तरावरील एकाच आदर्श सहकार कायद्याची निर्मिती करावी अशी शिफारस कोणत्या समितीने केली ?

५) सहकारामुळे कोणत्या सुविधांचा विकास झाला?

**ड) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) सहकार हे ............................... संघटन आहे

अ) लोकशाही ब) धार्मिक क) राजकीय ड) कोणतेही नाही

२) सहकारी शिक्षण, प्रशिक्षण व माहिती हे तत्व ..................... साली मान्य झाले आहे.

अ) १९३७ ब) १९९५ क) १९६७ ड) कोणत्याही नाही

३) सहकारी चळवळीने विवध क्षेत्रात ................... घटक निर्माण केला.

अ) बेकारी ब) विषमता क) रोजगार ड) कोणतेही नाही

४) सहकारावरील उच्चधिकार समिती .................... मध्ये नियुक्त केली.

अ) २००१ ब) २००२ क) २००४ ड) २००५

५) सहकारी पतपुरवठा व्यवस्थेची पुनर्रचना करणेविषयीची शिफारस ........... या समितीने केली.

अ) वैद्यनाथन ब)अलघ

क) शिवाजीराव पाटील ड) यापैकी एकही नाही

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ) चूक की बरोबर ते लिहा.**

१) चूक २) बरोबर ३) बरोबर

४) बरोबर ५) बरोबर

**ब) रिकाम्या जागा भरा**

१) सत्तीची २) नफ्याचे ३) मँचेस्टर

४) २००४ ५) १९९९

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आतंरराष्ट्रीय सहकार संघटन

२) मँचेस्टर ची सहकार तत्वे

३) वैद्यनाथन समिती

४) उच्चधिकार समिती

५) मुलभूत सुविधांचा

**ड) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) लोकशाही २) १९९५ ३) रोजगार

४) २००४ ५) वैद्यनाथन

## १.७ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) सहकाराचा अर्थ व व्याख्या द्या आणि सहकाराची वैशिष्टये सविस्तर लिहा.

२) आंतरराष्ट्रीय सहकार समितीने मांडलेली सहकाराची तत्वे स्पष्ट करा.

३) सहकाराची मॅचेस्टरची तत्वे स्पष्ट करा.

४) सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करा.

५) १९९१ नंतर सहकाराच्या विकासासाठी स्थापन केलेल्या विविध समित्यांचा थोडक्यात आढावा घ्या.

**ब)  टिपा लिहा.**

१) सहकाराची वैशिष्ट्ये

२) सहकाराची मॅचेस्टरची तत्वे

३) आर्थिक विकासातील सहकाराची भूमिका

४) सहकार विकासासाठी स्थापित वैद्यनाथन समिती

५) सहकार विकासासाठी स्थापित शिवाजीराव पाटील समिती

## १.८ क्षेत्रिय कार्य

१) सहकारी संस्था सहकारी तत्वाची अमलबजावणी कशी करतात याची पाहणी करणे

२) एखाद्या गावातील सहकारी चळवळीचा उगम व विकास या संबंधी पाहणी करणे

३) सहकारी चळवळीतील सभासद, संचालक मंडळ, अधिकारी, व्यवस्थापक, कर्मचारी व सेवक सहकारी तत्वांची अंमलबजावणी कशी करतात या संबंधीची माहिती देणे.

४) सहकारी संस्थेचे गांवातील आर्थिक विकासातील भूमिकेचे सर्वेक्षण करणे

५) सहकारी चळवळीमुळे परिसराचा आर्थिक विकास कसा झाला या संबंधीची पाहणी करणे.

## १.९ संदर्भ पुस्तके

१) कुलकर्णी /भोसले / चौगुले  सहकाराचा विकास  अजब प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृती जुलै २००५.

२) शहा रूप / दामजी बी. एच  सहकार  फडके प्रकाशन कोल्हापूर प्रथमावृती जुलै २०२०.

३) शिंदे आर. के.  भारतातील सहकारी चळवळ  रॉविल पब्लिकेशन सातारा, १९८०.

४) डॉ. सी. जे. जोशी, प्रा. के. सी. जोशी  सहकाराचा विकास  फडके प्रकाशन कोल्हापूर ऑगस्ट, २०२०.

५) बिराजदार माधव  सहकार  तिर्थरूप प्रकाशन, भोकर, सुधारित आवृती जून २००४.

६) सराफ मोहन सहकार सिजामनदास आणि कंपनी मुंबई सुधारित आवृती सप्टेंबर १९८९.

७) वाळके / बारहाते / सहाणे सहकारी विकास शेठ पब्लिकेशन प्रा. लि. मुंबई, प्रथमावृती ऑक्टोंबर १९९९.

८) कामत गो. स. सहकार : तत्व व्यवहार आणि व्यवस्थापन

९) रमखेलकर / डांगे सहकार : तत्वे आणि व्यवहार

१०) कुलकर्णी प्र. रा. सहकार : तत्वे आणि व्यवहार

११) Bedi R. D. - Theory, History and Practice of Co-operation, R-Lall Book Depo Meeral - 17th Edition, 2001.

१२) Hajala T. N. - Co-operation Principles Problems and Practice, Konark Publishes Pvt. Ltd., 6th Edition 2002.

१३) Mathur B. S. - Co-operation in India, Sahtuas Bhavan, Agra 4th Edition, 1988.

१४) Kulkarni S. K. - Co-operation Development, Phadke Prakashan, Kolhapur, Oct. 1999.

१५) Swami Krishna - Fun Damentals of Co-operation, Schand and Company Ltd. Ram Nagar, New Delhi.

१६) Mukhi H. R. - Co-operation in India, Heisuts - Publisher, New Delhi.

१७) R. B. Tyagi - Recent Trends in the Co-operative Movement in India.

१८) R. Salvaraji - Co-operatives in the New Millennium.

१९) Memoria Saksena - Co-operation in India.

# सत्र ५ : घटक २

# भारतातील कृषी सहकारी संस्था

## (Agricultural Co-operatives in India)

## अनुक्रमणिका


२.१ भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्था

- २.१.१ उद्दिष्टे
- २.१.२ प्रास्ताविक
- २.१.३ विषय विवेचन
- २.१.४ सहकारी शेतमाल खरेदी-विक्रीचा अर्थ
- २.१.५ सहकारी खरेदी-विक्री संस्थांची गरज / आवश्यकता
- २.१.६ भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांची रचना किंवा प्रकार
- २.१.७ सहकारी खरेदी-विक्री संस्थांची कार्ये
- २.१.८ सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या समस्या / दोष
- २.१.९ सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना

२.२ नाफेड

- २.२.१ उद्दिष्टे
- २.२.२ प्रास्ताविक
- २.२.३ विषय विवेचन
- २.२.४ नाफेडची स्थापना
- २.२.५ नाफेडची उद्दिष्टे
- २.२.६ सभासदत्व
- २.२.७ भागभांडवल
- २.२.८ व्यवस्थापन
- २.२.९ नाफेडची प्रगती

२.२.१० नाफेडची कार्ये किंवा भूमिका

२.२.११ नाफेडच्या समस्या

२.२.१२ नाफेडच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना

२.३ भारतातील सहकारी शेती

२.३.१ उद्दिष्टे

२.३.२ प्रास्ताविक

२.३.३ विषय विवेचन

२.३.४ सहकारी शेतीचा अर्थ व व्याख्या

२.३.५ सहकारी शेतीचे प्रकार

२.३.६ सहकारी शेती संस्थांचे महत्व किंवा फायदे

२.३.७ सहकारी शेतीच्या समस्या किंवा दोष

२.३.८ सहकारी शेतीतील दोष कमी करण्यासाठी उपाय

२.४ भारतातील सहकारी दुग्ध संस्था

२.४.१ उद्दिष्टे

२.४.२ प्रास्ताविक

२.४.३ विषय विवेचन

२.४.४ सहकारी दुग्ध संस्थांची भूमिका

२.४.५ राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळ

२.४.६ राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाची उद्दिष्टे किंवा कार्ये

२.४.७ राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाची भूमिका

२.४.८ राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाची प्रगती

२.५ सारांश

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

# २.१ भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्था

**(Co-operative Marketing Societies in India)**

## २.१.१ उद्दिष्टे (Objectives)

या घटक अभ्यासानंतर आपणास -

१) सहकारी खरेदी-विक्री संस्थेबाबतची संकल्पना समजण्यास मदत होईल.

२) सहकारी खरेदी-विक्री संस्थांची गरज / आवश्यकता समजण्यास मदत होईल.

३) भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांची रचना किंवा प्रकार अभ्यासता येतील.

४) भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांची कार्ये समजण्यास मदत होईल.

५) सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या समस्या / दोष समजण्यास मदत होईल.

६) सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना अभ्यासता येतील.

## २.१.२ प्रास्ताविक (Introduction)

भारतीय शेतीचे स्वरूप सध्या बदलते आहे. शेती एक उपजीविकेचे साधन नसून एक व्यवसाय म्हणून केली जाते. अधिक उत्पन्नासाठी शेतकरी नगदी पिके घेत आहेत. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादन पद्धत, आधुनिक बी-बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशके, पाणीपुरवठा यांचा वापर वाढल्याने शेतमाल उत्पादनात वाढ झाली आहे. परंतु शेतमालाच्या किंमतीमध्ये प्रचंड चढ-उतार होत असल्याचे दिसून येते. शेतमाल हा नाशवंत असल्याने शेतकऱ्यांना तो त्वरित विकावा लागतो. शेतमालाची विक्री करताना शेतमालाची किंमत ठरविण्यात शेतकऱ्याचा सहभाग नसतो. शेतकऱ्याना अनेक व्यापारी व मध्यस्थाना तोंड द्यावे लागते. त्यांची फसवणूक व पिळवणूक केली जाते हे टाळण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्था महत्वाच्या आहेत. सहकारी खरेदी-विक्री संस्थांनाच सहकारी विपणन संस्था असेही म्हणतात.

## २.१.३ विषय विवेचन (Analysis of the Unit)

शेतमाल विपणन या संकल्पनेचा अभ्यास करीत असताना त्यामध्ये शेतमाल विपणनाची संकल्पना, अर्थ, विपणनाची आवश्यकता, विपणन संस्थांची रचना, त्यांची कार्ये, त्यांच्या समस्या व समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना इ. बाबी विचारात घ्याव्या लागतात.

## २.१.४ सहकारी शेतमाल खरेदी-विक्रीचा अर्थ

### (Meaning of Co-operative Agrucltural Marketing)

विपणन ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरली जाते. विपणन म्हणजेच खरेदी-विक्री करणे होय. यामध्ये वस्तू उत्पादनापासून ती ग्राहकाच्या हातामध्ये जाईपर्यंत सर्व क्रियांचा समावेश होते. या खरेदी-विक्रीच्या प्रक्रियेत शेतमालाचे एकत्रीकरण करणे, मालाची वाहतूक करणे, प्रमाणीकरण व प्रतवारी करणे, शेतमालावर प्रक्रिया करणे, शेतमाल साठवून ठेवणे, शेतमालाची बांधणी करणे, वाहतूक करणे अशा विविध गोष्टींचा समावेश होते.

शेतमालाची खरेदी-विक्री करणारी व सहकारी तत्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्था होय. सहकारी खरेदी-विक्री संस्था आपल्या सभासदांनी उत्पादित केलेल्या शेतमालाची खरेदी करून ग्राहकांना विकतात. सहकारी विपणन किंवा खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांनी निर्माण केलेला शेतमाल खरेदी करून ग्राहकांना विकतात त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगली किंमत मिळते. सहकारी खरेदी-विक्री संस्थांमुळे खरेदी व विक्री प्रक्रियेतील मध्यस्थांची संख्या नाहीशी होते व शेतमालाला योग्य किंमत मिळण्यासाठी मदत होते.

**व्याख्या :**

**१. अमेरिकन फेडरल बोर्ड**

''शेतकऱ्यांनी निर्माण केलेल्या शेतमालाला खाजगी व्यापारी जी किंमत देतात त्यापेक्षा जास्त किंमत मिळवून देण्याच्या उद्देशाने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतमाल खरेदी-विक्रीसाठी स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्था होय.''

**२. मार्गारेट डिग्बी**

''सहकारी विपणन म्हणजे अशी पद्धत की ज्यामध्ये शेतकरी एकत्र येऊन उत्पादनापासून ग्राहकांपर्यंतच्या सर्व विपणन विषयक क्रिया सहकारी तत्त्वावर पूर्ण करणारी संस्था होय''.

**३. भारतीय रिझर्व्ह बँक**

''खाजगी व्यापारापेक्षा अधिक किफायतशीरपणे उत्पादनाची खरेदी-विक्री करण्याच्या हेतूने आणि सभासद शेतकऱ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्था होय''.

सहकारी विपणन संस्था म्हणजे विपणन विषयक कार्ये करण्याच्यादृष्टीने उत्पादकांनी सहकारी तत्वावर स्थापन केलेली संघटना होय.

''शेतकरी व उत्पादकांनी स्वत:हून उत्पादित केलेल्या शेतमालाची विक्री करण्यासाठी स्थापन केलेल्या संस्थेस सहकारी खरेदी-विक्री संस्था असे म्हणतात.''

खरेदी-विक्री (विपणन) विषयक कार्ये करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी विपणन संस्था होय. यालाच ''सहकारी खरेदी-विक्री संस्था'' किंवा ''सहकारी क्रय-विक्रय संस्था'' संस्था असे ही म्हणतात.

वरील व्याख्यांवरून असे दिसून येते की, शेतकऱ्यांनी स्वत:हून स्वेच्छेने स्थापन केलेली व शेतमालाची खरेदी-विक्री करून सभासद शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त किंमत मिळवून देण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय. सहकारी खरेदी-विक्री संस्था सभासद शेतकऱ्यांनी उत्पादन केलेला शेतमाल खरेदी करून तो ग्राहकांना विकण्याचे कार्य करतात. त्यामुळे शेतकरी व ग्राहक दोघांचेही हितसंवर्धन होण्यास मदत होते.

## २.१.५ सहकारी खरेदी-विक्री संस्थांची गरज / आवश्यकता

**(Need of Co-operative Marketing Societies)**

### १. खरेदी-विक्री खर्चात बचत

सहकारी खरेदी-विक्री संस्था मोठ्या प्रमाणात शेतमालाची खरेदी व विक्री करतात. त्यामुळे शेतमालाचे एकत्रीकरण करणे, वर्गीकरण करणे, साठवणूक करणे, प्रामाणिकरण करणे सहज शक्य होते, परिणामी खर्चात घट होऊन नफा अधिक मिळण्यास मदत होते. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्थांची गरज आहे.

### २. शेतकऱ्यांची फसवणूक होत नाही

लहान शेतकरी आपला शेतमाल खाजगी व्यापाऱ्यामार्फत विकतात. खाजगी व्यापारी शेतकऱ्यांची वेगवेगळ्या पद्धतीने फसवणूक व पिळवणूक करतात. खोटी वजने-मापे वापरणे, चुकीचे वजन करणे, वेगवेगळया निधी साठी रक्कम कापून घेणे इ. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारी रक्कम कमी होते. शेतमालाची योग्य किंमत मिळत नाही. शेतकऱ्यांची फसवणूक होते. म्हणून हे टाळण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्था आवश्यक आहेत.

### ३. शेतमालाची साठवणूक

भारतीय शेतकऱ्यांकडे शेतमाल साठवणुकीच्या सोई नसतात. त्यामुळे शेतकऱ्याना आपला शेतमाल त्वरित विकावाला लागतो. एकाच वेळी मोठ्या प्रमाणात शेतमाल बाजारात विक्रीसाठी आल्यामुळे

शेतमालाच्या किंमती घसरतात व शेतकऱ्यांचे नुकसान होते. परंतु सहकारी खरेदी-विक्री सहकारी संस्थांमुळे शेतमालाच्या साठवणुकीसाठी गोदाम सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे किंमती कमी असताना शेतमाल साठवून ठेवणे शक्य होते व किंमती वाढल्यानंतर मालाची विक्री करता येते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.

### ४. शेतकऱ्यांच्या सौदाशक्तीत वाढ

सहकारी विपणन संस्थांमुळे शेतकऱ्यांची सौदाशक्ती वाढण्यास मदत होते. शेतकऱ्याच्या शेतमालाला अधिक किंमत मिळण्यास मदत होते. यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची आवश्यकता आहे.

### ५. मध्यस्थांची साखळी नष्ट होते

शेतकऱ्यांकडून ग्राहकांच्या हातात शेतमाल जाईपर्यंत अनेक मध्यस्थ कार्यरत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी किंमत मिळते व ग्राहकांना जास्त किंमत द्यावी लागते. व्यापारी व मध्यस्थ मोठ्या प्रमाणात नफा मिळवितात त्यामुळे शेतकऱ्यांचे व ग्राहकांचे नुकसान होते.

### ६. वित्त पुरवठ्याची सोय

सहकारी विपणन संस्थांमुळे शेतकऱ्यांचा वित्त पुरवठ्याचा प्रश्न सोडविला जातो. विपणन संस्था पतपुरवठा संस्थेकडून कर्ज घेऊन त्याचे वितरण सभासदाना करतात. हा कर्ज पुरवठा ठराविक मुदतीसाठी केला जातो. विपणन संस्थांकडून केल्या गेलेल्या कर्ज पुरवाठ्यामुळे शेतकऱ्याना सावकाराकडून कर्जे घ्यावी लागत नाहीत.

### ७. इतर सहकारी संस्थाना मदत

सहकारी विपणन संस्थांमुळे ग्राहक सहकारी संस्था, सहकारी पतपुरवठा संस्था यांना फायदा होतो. साभासदांचा शेतमाल विक्री केल्या नंतर मिळणाऱ्या उत्पन्नातून या विपणन सहकारी संस्थामुळे सभासदांची देणी भागविण्यासाठी मदत होते. त्यामुळे या संस्थांच्या विकासास मदत होते. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्था आवश्यक आहेत.

## २.१.६ भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांची रचना किंवा प्रकार

**(Types of Co-operative Marketing Societies in India)**

भारतातील खरेदी-विक्री संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे.


१) राष्ट्रीय सहकारी संघ - राष्ट्रीय पातळी

२) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ - राज्य पातळी

३)	जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ - जिल्हा पातळी

४)	प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था - गांव किंवा तालुका पातळी

भारतामध्ये सर्व राज्यामध्ये सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या रचनेत समानता असल्याचे दिसून येत नाही. काही राज्यात द्विस्तरीय तर काही राज्यात त्रिस्तरीय रचना आहे. गुजरात, हरियाणा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि पंजाब या राज्यात त्रिस्तरीय रचना आहे. भारतात या सहकारी संस्थांची रचना पिरॅमिडप्रमाणे असल्याचे दिसून येते.



त्यातील संस्था पुढील प्रमाणे आहेत -

**१.	प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था**

**(Primary Co-operative Marketing Societies)**

या संस्थांचे कार्यक्षेत्र विशिष्ट तालुक्यापुरते किंवा काही बाजारपेठांपुरते मर्यादित असते. त्या गावातील शेतकरी, लघु व कुटीर उद्योजक, कारागीर यांना या प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासद होता येते. या संस्था गावामध्ये शेतमालाचे एकत्रीकरण करणे, प्रतवारी करणे, साठवणूक करणे, वाहतूक करणे आणि विक्री करण्याचे कार्य करतात. या बरोबरच सभासदांनी दिलेल्या मालाच्या तारणावर

साभासदाना कर्ज पुरवठा करणे, कच्च्या मालावर प्रक्रिया करणे, साभासदाना शेती अवजारे, बी-बियाणे, खते पुरवितात. याबरोबरच काटकसर, स्वावलंबन आणि सहकारचे प्रशिक्षण सभासदाना देतात.

भारतात पहिली सहकारी खरेदी-विक्री संस्था सन १९१५ मध्ये कर्नाटक राज्यात हुबळी येथे स्थापन झाली. भारतात सन १९२१ मध्ये प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांची संख्या ३१ होती. सन १९६१ मध्य ३१०८ प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था होत्या. सन १९७७ मध्ये त्यांची संख्या ३३७० एवढी होती ती सन १९८१ मध्ये ४००० पर्यंत वाढली तर सन १९९४-९५ मध्ये ८८०५ पर्यंत वाढली व त्यांचे एकूण भागभांडवल २३१.३४ कोटी रु. एवढे होते. त्यांची सभासद संख्या ५३.३९ लाख होती. सन २००९-१० मध्ये प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांची संख्या ७२०२ पर्यंत वाढली व त्यांचे भाग भांडवल ३४०.३ कोटी रु. होते.

## २. जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ

## (District Central Co-operative Marketing Societies)

भारतातील घटक राज्यामध्ये जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी विपणन संस्था आहेत. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी विपणन संस्था या संस्थेच्या सभासद असतात. आपल्या देशामध्ये पंजाब, तामिळनाडू, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, हिमाचलप्रदेश, कर्नाटक या राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी विपणन संस्था कार्य करतात. या सस्थाचे कार्यक्षेत्र जिल्ह्यापुरते मर्यादित असते. जिल्हा सहकारी विपणन संघ सर्व प्राथमिक सहकारी विपणन संस्थाच्या कार्यात समन्वय साधने. मार्गदर्शन करणे. वस्तूंचा पुरवठा करणे. शेती उत्पादनावर प्रक्रिया करणे, खते, बि-बियाणे, अवजारे पुरविणे, मालाची साठवणूक करणे इ. कार्ये करते.

सन १९६१ मध्ये जिल्हा सहकारी विपणन संस्थांची संख्या १७१ एवढी होती. सन १९८२ मध्ये भारतात जिल्हा सहकारी विपणन संस्थाची संख्या ३०० पर्यंत वाढली. त्यामध्ये ऊसाचा पुरवठा करणाऱ्या संस्थांची संख्या १३८. फळे व भाजीपाल्याची खरेदी-विक्री करणारया संस्थांची संख्या १६. तर तंबाखू खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थांची संख्या ३ एवढी होती. त्यांची एकूण उलाढाल सन १९८१-८२ मध्ये रु. ५४० कोटी एवढी होती. सन २००९-१० मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी विपणन संघाची संख्या ३७८ होती. तर त्यांचे भागभांडवल रु. १४९७.१८ कोटी होते.

## ३. राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ (State Co-operative Marketing Federation)

राज्य पातळीवर शेतमालाची खरेदी-विक्री करणारी ही सर्वोच्च संस्था आहे. सर्व जिल्हा पातळीवरील खरेदी-विक्री संघ या संस्थेच्या सभासद असतात. राज्य संघ सर्व जिल्हा सहकारी संघा मध्ये

समन्वय साधण्याचे व शेतमालाच्या खरेदी-विक्रीचे कार्य करतो. तसेच कर्ज पुरवठा करणे, मार्गदर्शन करणे, शेतमालाच्या खरेदी-विक्री व आंतरराज्य व्यापारास मदत करण्याचे कार्य करते. काही घटक राज्यात साखर, रॉकेल, रासायनिक खते, शेती अवजारे, उपभोग्य वस्तू, पोलाद, सिमेंट इ. वस्तूचे वितरण करण्याचे कार्य राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो. शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी सल्ला व मार्गदर्शन करते. शेतमालावर प्रक्रिया करण्याचे कार्य राज्य सहकारी संघ करतो.

भारतात सन १९६१ मध्ये राज्य सहकारी खरेदी-विक्री संघांची संख्या २४ होती तर सन १९८६ मध्य २९ राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ होते. दिल्ली, त्रिपुरा व मणिपूर या केंद्र शासित प्रदेशासाठी एकच संघ कार्य करीत होता. सन २००९-१० मध्ये राज्य पातळीवरील सहकारी विपणन संस्थांची संख्या २८ होती. तर फळे व भाजीपाला खरेदी-विक्री संघ गुजरात व दिल्ली येथे कार्यरत होते.

### ४. राष्ट्रीय कृषी विपणन सहकारी संघ

### (NAFED - National Agricultural Co-operative Marketing Federation)

भारतामध्ये या संस्थेला नाफेड या नावाने ओळखले जाते. ही भारतातील सहकारी विपणनातील सर्वोच्च संस्था आहे. सर्व घटक राज्यातील राज्य सहकारी विपणन संघ या संस्थेचे सभासद असतात. सर्व घटक राज्यातील राज्य सहकारी विपणन संघातील कार्यात समन्वय व सुसुत्रीकरण साधने, सल्ला व मार्गदर्शन करणे, किंमत पातळीत स्थैर्य राखणे, शेतमाल आयात-निर्यातीस मदत करणे इ. कार्ये ही संस्था करते.

नाफेडची स्थापना सन १९५८ मध्ये करण्यात आली. तिचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे तर नाफेडच्या कोलकत्ता व मुंबई या ठिकाणी शाखा आहेत. भारतात २० ठिकाणी कार्यालये आहेत तर जगातील अनेक देशाशी व्यापारी संबंध आहेत. सन १९७७-७८ मध्ये नाफेडचे भाग भांडवल ६०.९६ लाख रुपयांचे होते व एकूण उलाढाल रु. ४६.४१ कोटी होती. सन १९८४-८५ मध्ये नाफेडने ५०० दशलक्ष रुपयांचा शेतमाल निर्यात केला होता. सन २०१३-१४ मध्ये नाफेडचे एकूण ८४८ सभासद होते व भागभांडवल रु. २१८.२ दशलक्ष एवढे होते.

## २.१.७ सहकारी खरेदी-विक्री संस्थांची कार्ये

## (Functions of Co-operative Marketing Societies)

### १. शेतमालाचे एकत्रीकरण :

प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था गांव किंवा तालुका पातळीवर कार्य करतात. त्या साभासदाकडून शेतमाल एकत्र करण्याचे कार्य करतात.

## २. शेतमालाची प्रतवारी :

प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमाल एकत्र करून त्याची प्रतवारी करण्याचे कार्य करतात. कारण सर्व शेतकऱ्यांचा शेतमाल एकसारखा नसतो. म्हणून मालाची प्रत, गुणवत्ता, दर्जा, रंग, वास, चव, आकार यानुसार प्रतवारी करणे आवश्यक असते. त्यामुळे चांगल्या मालाला जास्त किंमत मिळते व दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळते.

## ३. साठवणूक गृहांची सोय :

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत न मिळण्याची जी अनेक कारणे आहेत त्यामध्ये साठवणूक सोयींचा अभाव हे एक प्रमुख कारण असल्याचे दिसून येते. शेतमालाच्या साठवणूक सोयींचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना आपला शेतमाल कमी दराने विकावा लागतो. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांना साठवणूक गृहांची सोय उपलब्ध करून देतात. शेतमालाची गुणवत्ता, दर्जा आणि वजन यात घट न होता तो साठवून ठेवणे आवश्यक असते त्यादृष्टीने या संस्था महत्वाच्या ठरतात.

सुगीच्या हंगामात एकाच वेळी सर्व शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारपेठेत आल्यामुळे त्याच्या किंमती प्रचंड घसरतात व शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणून शेतमालाला चांगली किंमत मिळेपर्यंत त्याची साठवणूक करणे आवश्यक असते. सहकारी खरेदी-विक्री संस्था मालाची साठवणूक करतात. त्यामुळे मालाला चांगली किंमत मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत. तसेच यासंस्था शेतकऱ्यांना मालाच्या तारणावर कर्ज सुविधा उपलब्ध करून देतात.

## ४. मालाची बांधणी :

मालाची चव, प्रत, गुणवत्ता नाहीशी होऊ नये व मालाची वाहतूक सुलभ व्हावी यासाठी मालाची योग्य प्रकारे व योग्य आकारात बांधणी करावी लागते. उदा. कापूस, वजनाने कमी परंतु आकारमानाने जास्त असल्याने त्याचे योग्य आकारात गठ्ठे तयार करावे लागतात.

## ५. शेतमालाची वाहतूक :

शेतमालाची वाहतूक शेतापासून घरापर्यंत व घरापासून प्रक्रिया संस्थेपर्यंत किंवा बाजारपेठे पर्यंत करावी लागते. शेतकऱ्याकडे स्वत:ची वाहतूक व्यवस्था नसते म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्था स्वत:ची वाहतुकीची साधने वापरून मालाची वाहतूक करतात.

## ६. शेतमालावर प्रक्रिया करणे :

शेतमालाला चांगली किंमत मिळण्यासाठी त्यावर प्रकिया करणे आवश्यक असते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. उदा. ऊसा पासून साखर तयार करणे, भातापासून तांदूळ तयार करणे, डाळी तयार करणे इ.

### ७. माहितीचे संकलन आणि वितरण करणे :

सहकारी खरेदी-विक्री संस्था या विक्री व्यवस्थेशी निगडीत असणाऱ्या सर्व प्रकारच्या माहितीचे संकलन करतात. ही माहिती सभासदांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करतात. यामध्ये स्थानिक पातळीवरील माहिती तसेच जागतिक पातळीवरील माहितीचे संकलन केले जाते. शेतकऱ्याला या माहितीच्या आधारे शेतमालाच्या उत्पादनाची शेतमालाच्या मागणीशी सांगड घालता येते. शेतकऱ्याला मालाचा दर्जा, प्रकार, घाऊक व किरकोळ किंमत, इतर ठिकाणच्या शेतमालाचे उत्पादन आणि मागणीतील बदल याची माहिती मिळते.

### ८. शेतमाल विक्री व्यवस्था :

शेतमालाला चांगली किंमत मिळण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्था स्वत: ची विक्री व्यवस्था निर्माण करून विक्री केंद्रे सुरु करतात. त्यामुळे मध्यस्थांची संख्या नाहीशी होऊन संस्थेला जास्तीत जास्त फायदा मिळतो.

### ९. शेती पूरक वस्तुंचे वितरण :

शेती उत्पादन वाढावे यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्था सभासदाना शेतीपूरक वस्तुंचे वाटप करतात. उदा. आधुनिक बी-बियाणे, रासायनिक खते, रासायनिक द्रव्ये, कीटकनाशके, यंत्रे व अवजारे इ.

### १०. कर्ज व विक्री यामध्ये समन्वय साधने :

शेतकरी पीक लावणीपासून ते काढणीपर्यंत आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी सहकारी पतसंस्थांकडून कर्ज घेतात, तसेच पिककर्ज घेतात त्या कर्जाची परतफेड करण्यासाठी या सहकारी खरेदी-विक्री संस्था मदत करतात. सभासदांचा शेतमाल विक्री केल्यानंतर या सहकारी खरेदी-विक्री संस्थामार्फत सहकारी पतसंस्थांची कर्ज रक्कम भागविली जाते त्यामुळे पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांच्या वसुलीस मदत होऊन थकबाकी कमी ठेवण्यास विपणन संस्थांची मदत होते. शेतकऱ्यांच्या कर्जाची परतफेड होण्यास मदत होते.

### ११. शेतमालाच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणे :

सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांचा शेतमाल एकत्र करतात. त्यामुळे बाजारातील मागणी प्रमाणे पुरवठा केला जातो. परिणामी मागणीपेक्षा पुरवठा वाढून किंमती कमी होण्याचा धोका कमी होते. या सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालाचा पुरवठा नियंत्रित करून किंमती नियंत्रित ठेवण्याचा पर्यंत करतात.

## २.१.८ सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या समस्या किंवा दोष

### (Problems of Co-operative Marketing Societies)

**१. भांडवलाची कमतरता :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांना मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. कारण त्याना शेतमाल रोखीने विकत घेणे व शेतकऱ्यांना मालाच्या तारणावर कर्ज पुरवठा करणे यासाठी अधिक पैशाची आवश्यकता असते. परंतु या संस्थाना पतपुरवठा संस्था किंवा बँका मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करत नाहीत. तसेच सभासद शेतकरी गरीब असल्याने त्यांच्याकडून ही अधिक भांडवल गोळा करता येत नाही. या संस्थाना मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाणही कमी असते. त्यामुळे त्यांना भांडवलाची कमतरता मोठ्या प्रमाणात जाणवते.

**२. सहकारी खरेदी-विक्री व सहकारी पतपुरवठा संस्थामध्ये समन्वय कमी :**

शेतकऱ्यांना सहकारी पतपुरवठा संस्था कर्ज पुरवठा करतात. त्या कर्जाची वसुली शेतकऱ्यांचा शेतमाल विक्री झाल्यानंतर होते. परंतु शेतकरी मिळणारे उत्पन्न आपल्या उदरनिर्वाहासाठी खर्च करतात त्यामुळे कर्ज परतफेड वेळेवर होत नाही. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्था व सहकारी पतपुरवठा संस्थामध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे परंतु भारतात या दोन्ही संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते.

**३. अकार्यक्षम व्यवस्थापन :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे व्यवस्थापन शेतकऱ्याकडूनच केले जाते. आणि शेतकरी हा अडाणी, अशिक्षित, अज्ञानी असल्याने त्याला सहकारी संस्था चालविण्याचा अनुभव व माहिती कमी असते. तसेच या संस्था पात्र, कुशल, अनुभवी, तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करू शकत नाहीत. त्यामुळे अकार्यक्षम व्यवस्थापनाचे तोटे वाढत जातात. त्याचा संस्थेच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

**४. पतपुरवठ्याच्या अपुऱ्या सोई :**

अलीकडे उधारीवर मोठ्याप्रमाणात व्यवहार चालतात. परंतु सहकारी खरेदी-विक्री संस्थाकडे भांडवलाची कमतरता असते त्यामुळे त्या उधारीवर माल देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या विक्रीचे प्रमाण कमी असते. तसेच या संस्था ही आपल्या सभासदाना पतपुरवठा करत नाहीत.

**५. समन्वयाचा अभाव :**

प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था, जिल्हा मध्यवर्ती खरेदी-विक्री संघ, राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ आणि नाफेड यांच्या कार्यात, उद्दिष्टात आणि धोरणात एकसूत्रीपणा किंवा समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते. त्याचा सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

## ६. प्रक्रिया सोयींचा अभाव :

शेतमालाला चांगली किंमत मिळण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणे आवश्यक असते. सहकारी खरेदी-विक्री संस्थाकडे भांडवलाची कमतरता असते त्यामुळे त्या शेतमालावर प्रक्रिया करू शकत नाहीत. त्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री खरेदी करू शकत नाहीत. त्यामुळे चांगली किंमत मिळत नाही. परिणामी नफा कमी मिळतो.

## ७. अपुऱ्या वाहतूक सोई :

अनेक शेतकऱ्यांकडे विक्रीयोग्य शेतमाल कमी असतो, तसेच वाहतुकीच्या साधनांचा अभाव असतो परिणामी शेतकरी आपला शेतमाल गावात विकतो त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. तसेच या सहकारी खरेदी-विक्री संस्थाकडेही वाहतुकीची पुरेशी साधने उपलब्ध असत नाहीत त्यामुळे अधिक किंमत देणाऱ्या लांबच्या बाजारपेठेपर्यंत माल पाठविता येत नाही.

## ८. हिशेब तपासणीचा अभाव :

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे नियंत्रण व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी योग्य अशी यंत्रणा असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे गैरव्यवहार, खोटे हिशेब ठेवणे असे गैरप्रकार होतात. पैशाचा गैर वापर होतो. हिशेब वेळेवर तपासले जात नाहीत. कागदपत्रे व हिशेब पुस्तके व्यवस्थित ठेवली जात नाहीत.

## ९. सहकारी पतपुरवठा संस्थांकडून स्पर्धा :

सहकारी पतपुरवठा संस्थांनी सहकारी खरेदी-विक्री संस्थाना पतपुरवठा करणे आवश्यक असते. परंतु पतपुरवठा संस्थाच अनेक वेळा शेतमाल विकतात. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थाना पतपुरवठा संस्थांबरोबर स्पर्धा करावी लागते.

## १०. अकार्यक्षम व अप्रशिक्षित कर्मचारी :

सहकारी खरेदी विक्री संस्थामध्ये काम करणारे कर्मचारी अशिक्षित, अप्रशिक्षित असतात. त्यामुळे ते योग्य प्रकारे कार्य करू शकत नाहीत. परिणामी सहकारी संस्थांना जास्त खर्च करावा लागतो. तसेच सहकारी संस्थेतील कर्मचारी प्रामाणिकपणे कार्य करीत नाहीत. अनेक अधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करतात. त्यामुळे संस्थेला तोटा होतो.

## ११. अपुऱ्या साठवणूकीच्या सोयी :

सहकारी खरेदी विक्री संस्थां जवळ शेतमाल साठविण्याची पुरेशी व्यवस्था नसते. अनेक वेळा खाजगी गोदामे भाड्याने घेतली जातात. त्यासाठी मोठे भाडे द्यावे लागते. साठवणुकीची योग्य सोय नसल्यामुळे शेतमालाचे नुकसान होते. शेतमाल खराब होतो. परिणामी सभासद व संस्थेचा तोटा होतो.

**१२. खाजगी व्यापऱ्या बरोबर स्पर्धा :**

खाजगी व्यापाऱ्याप्रमाणे सहकारी संस्था त्वरित बाजारातील बदलत्या परिस्थितीनुसार निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे शेतकरी आपला शेतमाल खाजगी व्यापारी, मध्यस्थ किंवा दलालाना विकतात. खाजगी व्यापारी मालाची किंमत रोखीने त्वरित देतात. त्यामुळे शेतकरी आपला शेतमाल या खाजगी व्यापाऱ्यांना विकतात. म्हणून या खाजगी व्यापाऱ्यांबरोबर सहकारी संस्थाना स्पर्धा करावी लागते.

## २.१.९ सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना (Remedies)

**१. विविध संस्थांच्या कार्यात समन्वय साधने :**

सहकारी खरेदी विक्री संस्था व इतर विविध सहकारी संस्थांमध्ये योग्य तो समन्वय साधण्यात यावा त्यामुळे सहकारी चळवळीचा विकास होण्यास मदत होते.

**२. सहकारी खरेदी-विक्री व पतपुरवठ्यात समन्वय साधने :**

शेतकऱ्यांनी आपला शेतमाल सहकारी खरेदी विक्री संस्थे मार्फत विकला पाहिजे म्हणजे सहकरी संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची वसुली होण्यास मदत होईल.

**३. कर्ज पुरवठ्यात वाढ करणे :**

सहकारी खरेदी विक्री संस्थाना केंद्र सरकार, राज्य सरकार व बँकांनी कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करावा. या संस्थांचे भाग भांडवल सरकार व इतर संस्थांनी खरेदी करावे म्हणजे त्याना भांडवल पुरवठा होईल. तसेच शेतकऱ्यांना कमी व्याज दराने त्यांच्या मालावर कर्ज उपलब्ध करून द्यावे.

**४. साठवणूक सोयीत वाढ :**

सहकारी खरेदी विक्री संस्थानी आपली स्वत:ची गोदाम व्यवस्था निर्माण केली पाहिजे. म्हणजे दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागणार नाही. खर्चात घट होण्यास मदत होईल. त्यासाठी गुदाम महामंडळ व राज्य सरकारने कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करावा.

**५. कर्मचारी प्रशिक्षण :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी आपल्या कर्मचऱ्याना आवश्यक ते शिक्षण व प्रशिक्षण द्यावे. अनुभवी, तज्ज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे.

### ६. योग्य नियोजन करणे :

सर्व सहकारी संस्थानी कोणत्या वेळी कोणते काम करावयाचे आहे याचे योग्य प्रकारे नियोजन करावे. भविष्यकालीन नियोजनाचा आराखडा तयार करावा व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी.

### ७. प्रतवारी व प्रक्रिया सोयीत वाढ करणे :

सहकारी खरेदी विक्री संस्थानी एकत्र केलेल्या शेतमालाची प्रतवारी करण्यात यावी. शेतमालाला अधिक किंमत मिळविण्यासाठी त्यावर प्रक्रिया करण्यात यावी त्यामुळे जास्त किंमत मिळून संस्था व सभासद दोघांचा ही फायदा होईल.

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१) ................. म्हणजे शेतमालाची खरेदी-विक्री करणे होय.

अ) उत्पादन ब) विपणन क) प्रक्रिया

२) शेतमाल विपणनात .................. ची मोठी साखळी असते.

अ) उत्पादक ब) ग्राहक क) मध्यस्थ

३) सहकरी खरेदी-विक्री संस्थांमुळे .................... साखळी नष्ट होते.

अ) उत्पादक ब) मध्यस्थ क) ग्राहक

४) भारतात पहिली सहकारी खरेदी-विक्री संस्था सन १९१५ मध्ये ............ येथे स्थापन झाली.

अ) मुंबई ब) हुबळी क) धारवाड

५) नाफेडची स्थापना सन ....................मध्ये करण्यात आली.

अ) १९५८ ब) १९४७ क) १९८५

**उत्तरे :** १) ब २) क ३) ब ४) ब ५) अ

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांची रचना कशा स्वरूपाची आहे ?

२) नाफेडचे मुख्य कार्यालय कोठे आहे ?

३) राष्ट्रीय सहकारी विपणन संघास कोणत्या नावाने ओळखले जाते ?

**उत्तरे :**

१) भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे.

२) नाफेडचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे

३) राष्ट्रीय सहकारी विपणन संघास नाफेड या नावाने ओळखले जाते.

## २.२ राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री (विपणन) संघ (नाफेड)

**National Agricultural Co-operative Marketing Federation (NAFED)**

### २.२.१ उद्दिष्टे

या घटक अभ्यासानंतर आपणास -

१) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ (नाफेड) समजण्यास मदत होईल.

२) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना, उदिष्टे, सभासदत्व, भागभांडवल आणि व्यवस्थापन रचना समजण्यास मदत होईल.

३) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ (नाफेड) ची प्रगती अभ्यासता येईल.

४) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ (नाफेड) ची भूमिका समजण्यास मदत होईल.

५) नाफेडच्या समस्या समजण्यास मदत होईल.

६) नाफेडच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना अभ्यासता येतील.

### २.२.२ प्रस्तावना

भारतात सहकारी विपणन संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे. काही घटक राज्यात द्विस्तरीय तर काही घटक राज्यात त्रिस्तरीय रचना असल्याचे दिसून येते. द्विस्तरीय रचनेत प्राथमिक सहकारी विपणन संस्था व राज्य सहकारी विपणन संघ असे दोन प्रकार असतात तर त्रीस्तरीय रचनेत प्राथमिक सहकारी विपणन संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्था व राज्य सहकारी विपणन संघ असे प्रकार दिसून येतात.

### २.२.३ विषय विवेचन

या प्रकरणामध्ये आपण राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ (नाफेड) ची स्थापना करण्यामागील हेतू, नाफेडची उद्दिष्टे, नाफेडची कार्ये, नाफेडची भूमिका व नाफेडला येणाऱ्या विविध समस्या व त्या सोडविण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना यांचा अभ्यास करणार आहोत.

### २.२.४ नाफेडची स्थापना (Establishment)

राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना ऑक्टोबर १९५८ मध्ये करण्यात आली. कृषी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची सर्वोच्च शिखर संस्था म्हणून ती ओळखली जाते. ही संस्था राष्ट्रीय पातळीवर कार्य करते. तिला नाफेड असे ही म्हणतात.नाफेडचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे. तसेच देशातील चार विभागात मुंबई, चेन्नई, दिल्ली आणि कोलकत्ता येथे चार विभागीय शाखा आहेत. नाफेडने सर्व शाखा व कार्यालयावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय कार्यालये स्थापन केली आहेत.

### २.२.५ नाफेडची उद्दिष्टे (Objectives of NAFED)

नाफेडची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या सहकारी खरेदी-विक्री संस्थामध्ये समन्वय व एकसूत्रीपणा निर्माण करणे.

२. राज्य पातळीवरील राज्य कृषी सहकारी खरेदी-विक्री संस्थाना अर्थ सहाय्य देणे.

३. बाजारपेठ विषयक माहिती उपलब्ध करून देणे.

४. सहकारी कृषिमाल खरेदी-विक्री व प्रक्रिया संस्थाना आर्थिक मदत उपलब्ध करून देणे.

५. कृषीमालाची देशात विक्री वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

६. कृषीमालाची आयात-निर्यातीसाठी प्रोत्साहन देणे.

७. सहकारी साभासद संस्थाना शेती अवजारे, हत्यारे, यंत्रे पुरविणे व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

८. सहकारी सभासद संस्थाना बी-बियाणे, खते, रासायनिक द्रव्ये, कीटकनाशके यांचा पुरवठा करणे.

९. शेतमालाच्या साठवणूकीसाठी साठवणूक गृहे व शितगृहांची व्यवस्था उपलब्ध करून देणे.

### २.२.६ सभासदत्व (Membership)

देशातील प्रत्येक राज्यातील सर्व राज्य सहकारी खरेदी विक्री संस्था या नाफेडच्या सभासद असतात. सन १९१६-१७ मध्ये नाफेडचे ८५४ सभासद होते व एकूण उलाढाल रु. ५०४७.६७ दशलक्ष एवढी होती. तसेच अलीकडे सहकारातील ज्या संस्थांची उलाढाल २० लाख रुपयापेक्षा जास्त आहे अशा संस्थांना नाफेडचे सभासदत्व दिले जाते. सहकाराचा विकास ज्या राज्यात झालेला नाही किंवा कमी झालेला आहे त्या राज्यासाठी दहा लाख रुपया पर्यंत सवलत दिली आहे.

### २.२.७ भागभांडवल (Share Capital)

सर्व राज्यातील सहकारी खरेदी विक्री संस्था नाफेडचे भाग भांडवल खरेदी करतात. राज्य सरकार व राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ नाफेडचे भाग भांडवल खरेदी करतात. मध्यवर्ती बँक व स्टेट बँक नाफेडला भांडवल पुरवठा करतात. नाफेडचे सन १९७७-७८ मध्ये ६.१२ कोटी रुपयांचे भागभांडवल होते. तर सन २००९-१० मध्ये ते रु. ११२.९ दशलक्ष पर्यंत वाढले आणि सन २०१६-१७ मध्ये नाफेडचे भाग भांडवल रु. २४२.८० दशलक्ष एवढे होते.

### २.२.८ व्यवस्थापन (Management)

देशातील राज्य शेती सहकारी खरेदी-विक्री संस्था व प्राथमिक सहकारी खरेदी विक्री संस्था नाफेडच्या सदस्य असतात. नाफेडचे कामकाज संचालक मंडळ पहाते. नाफेडच्या संचालक मंडळात प्रत्येक घटक राज्याचा एक प्रतिनिधी आणि संस्था व केंद्रशासित प्रदेशातील एक संचालक असतो. तसेच केंद्र सरकारचे तीन, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे दोन, रिझर्व्ह बँक व स्टेट बँक यांचा एक प्रतिनिधी असतो, तर राज्य व्यापार महामंडळ, भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ, भारत कृषक समाज यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी संचालक मंडळात असतो. या संचालक मंडळातून कार्यकारी समिती, व्यापार समित्या व उपसमित्या स्थापन केल्या जातात व त्यांच्या मार्फत नाफेडचे कामकाज चालविले जाते.

### २.२.९ नाफेडची प्रगती (Progress of NAFED)

नाफेड ही भारतातील सर्व सहकारी खरेदी-विक्री संस्थांची राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च शिखर संस्था आहे. नाफेड विविध प्रकारच्या शेतमालाची आयात व निर्यात करते. शेतमाल खरेदी करणे, त्यावर प्रक्रिया करणे, त्याचे वितरण करणे यासारखी कार्ये करते. नाफेड भाजीपाला, कांदा, बटाटा, केळी,

मसाले, डाळी, हळद, मिरची, कडधान्ये यांची निर्यात करते. नाफेडची सन १९७७-७८ मध्ये एकूण उलाढाल रु. ४६७६ दशलक्ष होती त्यामध्ये सन १९९४-९५ मध्ये ७२०० दशलक्ष रूपया पर्यंत वाढ झाली. तर २०१६-१७ पर्यंत ही उलाढाल रु. ५०४.७६ दशलक्ष पर्यंत वाढली. नाफेडने सन २०१० मध्ये रु. ६३१० दशलक्ष रुपयाचा शेतमाल निर्यात केला होता. आणि नाफेडला सन २०१८ मध्ये एकूण रु. २५,२१४ दशलक्ष एवढा नफा झाला होता.

## २.२.१० नाफेडची कार्ये किंवा भूमिका (Role / Functions of NAFED)

### १. राज्यांतर्गत व्यापार वाढला :

नाफेड राज्या-राज्यांतर्गत व्यापार वाढविण्यासाठी प्रयत्न करते. सुगीच्या काळात शेतमाल खरेदी करून वेगवेगळ्या बाजारपेठामध्ये शेतमाल पाठविणे हे नाफेडचे महत्वाचे कार्य आहे. नाफेड खरेदी केलेला शेतमाल ज्या भागात टंचाई आहे त्या भागात पाठविते. नाफेडच्या कार्यामुळे राज्या-राज्यांतर्गत व्यापार वाढण्यास मदत झाली आहे. १९७४-७५ मध्ये राज्यांतर्गत व्यापार ५२० दशलक्ष रुपयाचा होता. तो २०१७-१८ मध्ये तो ३२,१२,६७० दशलक्ष रुपया पर्यंत वाढला.

### २. निर्यात वाढली :

भारत हा कृषी प्रधान देश असून अनेक लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधन हे शेती आहे. शेतमालाची विक्री वाढल्याने कृषिमाल उत्पादन वाढण्यास मदत झाली. प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था सभासद शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करतात व तो माल नाफेडला पाठवितात. नाफेड त्याची वेगवेगळ्या राज्यात विक्री करते. तसेच निर्यात वाढविण्यासाठी नाफेड सहकारी संस्थाना मदत करते. त्यासाठी चांगल्या प्रतीचा शेतमाल निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले जाते. नाफेड कांदा, बटाटा, भाजीपाला, मसाल्याचे पदार्थ, डाळी, मिरची, हळद, ताग, वेलेदोडे इ. वस्तू निर्यात करण्यासाठी मदत करते.

नाफेड शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळवून देण्याचा प्रयत्न करते. शेतकऱ्यांना सहकारी संस्थामार्फत शेतमाल साठवणुकीसाठी साठवणूक गृहांची सोय उपलब्ध करून दिली जाते. शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थाना नाफेड मदत करते. त्यामुळे शेतमालाला चांगली किंमत मिळते व निर्यात वाढण्यास मदत होते. कृषीमाल निर्यातीमुळे देशाला विदेशी चलन मिळण्यास मदत होते. सन २००६-०७ मध्ये नाफेडने ५२०.५४ कोटी रुपायाचा शेतमाल निर्यात केला. तर सन २०१३-१४ मध्ये २७९.९ दशलक्ष रुपयाचा शेतमाल निर्यात केला.

### ३.    शेतमाल आयातीस मदत  :

देशांतर्गत शेतमालाची मागणी व पुरवठा नियंत्रित करण्याचे कार्य नाफेड करते. देशात एखाद्या शेतमालाचे उत्पादन कमी होऊन पुरवठा कमी झाला असेल व किंमती मोठ्या प्रमाणात वाढत असतील तर नाफेड त्याची आयात करते. त्यामुळे किंमती नियंत्रित ठेवण्यास मदत होते. सन १९७८-७९ यावर्षी नाफेडने अफगाणिस्तानकडून ५.७७ दशलक्ष रुपयाची फळे आयात केली होती. तर १९७७-७८ मध्ये २.४८ दशलक्ष रुपयाची डाळ आयात केली होती. तसेच २००९-१० मध्ये २३१३.५ दशलक्ष रुपयाची डाळ आयात केली होती. नाफेडच्या आयातीमुळे देशातील वाढलेल्या किंमती नियंत्रित करणे व शेतमालाच्या किंमतीत स्थैर्य निर्माण करणे शक्य झाले आहे.

### ४.    अन्नधान्य खरेदी-विक्री सुलभ :

नाफेड देशातील अन्नधान्याची खरेदी-विक्री करण्यास मदत करते. नाफेडने सन १९७०-७१ मध्ये २६९० दशलक्ष रुपयाच्या अन्नधान्याची खरेदी-विक्री केली होती. त्यासाठी भारतीय अन्नमहामंडळ अर्थ पुरवठा करते. मोठ्याप्रमाणात गहू पिकविणाऱ्या पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांना गहू खरेदीसाठी नाफेडने मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. एकूण गहू खरेदीमध्ये नाफेडचा सहभाग अधिक असल्याचे दिसून येते.

### ५.    प्रादेशिक असमतोल कमी करण्यास मदत :

भारताचा प्रादेशिक विस्तार प्रचंड आहे. भारतात प्रादेशिक विषमता ही मोठ्या प्रमाणात दिसून येते. ही विषमता कमी करण्यासाठी नाफेड प्रयत्न करते. वाहतुकीच्या साधनांचा अभाव, साठवणूकगृहे व शितगृहाचा अभाव, कर्ज पुरवठ्याच्या अपुऱ्या सोयी इ. मुळे शेतमालाच्या विपणनात अनेक समस्या निर्माण झाल्या. शेतमाल नाशवंत असल्याने त्याची योग्य प्रकारे साठवणूक करणे व वाहतूक करणे आवश्यक असते. म्हणजे त्यास योग्य किंमत मिळते. त्यासाठी नाफेड मदत करते. अनेक राज्यामध्ये प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन करण्यावर नाफेडने भर दिला आहे. तसेच अनेक राज्यातील शेती उत्पादन खरेदी करण्यास नाफेडने मदत केली आहे.

### ६.    विकास कार्ये :

भारतामध्ये स्थापन झालेल्या अनेक प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार करीत नाहीत. म्हणून नाफेडने त्याना आपले सभासदत्व देण्याचा निर्णय घेतला. या प्राथमिक संस्थांचे परीक्षण व अभ्यास करण्यासाठी नाफेडने एक समिती स्थापन केली. या समितीच्या शिफारशीनुसार नाफेड प्राथमिक संस्थांच्या विकासासाठी प्रयत्न करते.

### ७. सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात सुधारणा :

प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थाचे व्यवस्थापन अनेक वेळा अकुशल, अपात्र, कमी अनुभव असलेल्या लोकांकडून केले जाते. त्यामुळे त्याना नुकसान होते किंवा त्या अकार्यक्षम होतात. हे टाळण्यासाठी नाफेड तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देते. सहकारी खरेदी-विक्री संस्था व प्रक्रिया संस्था यांच्या कार्यात समन्वय साधण्याचे कार्य नाफेड करते. त्यांना तांत्रिक मार्गदर्शन व वित्त पुरवठा ही उपलब्ध करून दिला जातो.

### ८. विविध सहकारी संस्थांच्या कार्यात समन्वय :

सहकारी तत्त्वावर कार्यरत असलेल्या अनेक संस्थामध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक असते म्हणजे सहकाराचा विकास होण्यास मदत होते. सहकारी खरेदी-विक्री संस्था, सहकारी पतपुरवढा संस्था, सहकारी वाहतूक संस्था यामध्ये समन्वय साधणे आवश्यक असते. हे कार्य नाफेड करते. शेतकऱ्यांनी आपला शेतमाल स्वत: विकण्याऐवजी तो सहकारी संस्थेमार्फत विकल्यास सहकारी पतपुरवठा संस्थांनी केलेल्या कर्जाची वसुली होण्यास मदत होईल. शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य किंमत मिळून त्यांचा फायदा वाढेल. तसेच सहकारी पतपुरवठा संस्थांची कर्ज वसुली होऊन त्यांच्या थकबाकीचे प्रमाण कमी होऊन त्या सक्षम होतील. म्हणून विविध सहकारी संस्थामध्ये समन्वय साधने आवश्यक असते.

### ९. बाजारपेठांचे संशोधन :

नाफेड बाजारपेठ संशोधन व माहिती वितरण विभागामार्फत बाजारपेठांचे संशोधन करते. शेतमालाला असलेली मागणी, त्याचा पूरवठा, शेतमाल प्रक्रिया व वितरण या सर्व गोष्टींचे संशोधन करते ती माहिती सहकारी संस्थांकडे पाठवून देते त्यामुळे सहकारी संस्थाना आपला माल विकण्यास मदत होते. त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.

### १०. लहान राज्यांना शेतमालाचा पुरवठा :

काही राज्यामध्ये शेतमालाचे उत्पादन योग्य प्रमाणात होत नाही. ज्यांना शेतमालाची कमतरता जाणवते अशा राज्यांना नाफेडमार्फत शेतमाल पुरविला जातो. ज्या राज्यात उत्पादन अधिक होते त्या राज्यातून नाफेड शेतमाल खरेदी करते व कमतरता असलेल्या राज्यांना त्याचा पुरवठा करते. त्यासाठी सहकारी संस्थांची मदत घेतली जाते. नाफेड चहा, अन्नधान्य, कांदे, बटाटे, खाद्यतेल, अंडी अशा विविध शेतमालाचा पुरवठा करते.

### ११. आधार किंमत धोरणास मदत :

शेतमालास योग्य किंमत मिळण्यासाठी सरकारमार्फत आधार किंमत धोरण जाहीर केले जाते. कारण अनेक वेळा बाजारपेठेत शेतमालाच्या किंमती प्रचंड प्रमाणात कमी होतात त्यातून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च ही भरून निघत नाही, त्यांचे प्रचंड नुकसान होते. हे टाळण्यासाठी आधार किंमत धोरण उपयुक्त ठरते. हे धोरण तयार करणे व आधार किंमती निश्चित करण्यासाठी नाफेड सरकारला मदत करते. सरकार गहू, ज्वारी, तांदूळ, सुर्यफुल, तूर, हरभरा, भुईमुग, कापूस अशा विविध पिकाबाबत धोरण आखते त्यासाठी नाफेड मदत करते.

## २.२.११ नाफेडच्या समस्या (Problems of NAFED)

नाफेडच्या समस्या पुढील प्रमाणे आहेत.

१. नाफेड शेतमालाची खरेदी-विक्री करते व शेतमालाच्या किंमतीमध्ये स्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करते. परंतु या कार्यामध्ये नाफेडला फारसे यश आलेले नाही.

२. राज्य सहकारी विपणन संघ व नाफेड मध्ये समन्वयाचा अभाव असल्याची टीका केली जाते.

३. नाफेडचे यश हे सर्व सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या सहकार्यावर अवलंबून असते. परंतु सर्व संस्था संपूर्ण सहकार्य करीत नसल्याने नाफेडच्या कार्यावर मर्यादा पडतात.

४. नाफेडने शेतमालाची खरेदी-विक्री करताना दर्जेदार व चांगल्या प्रतीचा शेतमाल खरेदी करताना दिसून येत नाही.

५. विविध प्रकारच्या डाळींच्या विपणनाबाबत नाफेडचे कार्य समाधानकारक नाही.

६. नाफेडला अनेक वेळा तोटा झाल्याचे दिसून येते. संचित तोटा वाढल्यामुळे नाफेडला आपली मालमत्ता गहाण ठेवावी लागली.

## २.२.१२ नाफेडच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना (Remedies)

१) शेतमाल खरेदी करताना त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करावी. त्यासाठी तज्ज्ञ खरेदी अधिकाऱ्याची नेमणूक करावी. त्यामुळे चांगल्या प्रतीचा शेतमाल मिळून नाफेडचा नफा वाढण्यास मदत होईल.

२) सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या प्रगतीवर नाफेडची प्रगती अवलंबून असते म्हणून नाफेडने सहकारी खरेदी-विक्री संस्थाच्या अडचणी, समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यावर भर द्यावा. अनेक संस्था आपल्या सभासदाना कर्ज पुरवठा करीत नाहीत त्यासाठी नाफेडने त्यांना अर्थ सहाय्य उपलब्ध करून द्यावे.

३) नाफेड काही विशिष्ट शेतमालाच्या खरेदी-विक्रीवर अधिक भर देते त्याऐवजी सर्व प्रकारच्या शेतमालाची खरेदी-विक्री अधिक करण्याचा प्रयत्न नाफेडने करावा त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा फायदा होईल.

४) सहकारी खरेदी-विक्री संस्था व सहकारी पतपुरवठा संस्था यांच्या कार्यामध्ये समन्वयाचा अभाव दिसून येतो. या संस्थांमध्ये योग्य समन्वय साधल्यास शेतमालाला अधिक किंमत मिळेल व पतपुरवठा संस्थांच्या कर्ज पुरवठ्याची वसुली होण्यास मदत होईल.

५) भारतामध्ये सर्व भागात सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन झालेल्या नाहीत. त्यामुळे अनेक शेतकऱ्याना त्याचा लाभ मिळत नाही. म्हणून ज्याठिकाणी सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन झालेल्या नाहीत तेथे नाफेडने संस्था स्थापनेवर अधिक भर द्यावा.

६) नाफेडने सहकारी संस्थांचे सभासद, कर्मचारी, संचालक मंडळ यांना आधुनिक व्यवस्थापनाचे, तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण द्यावे त्यामुळे संस्थांचे कामकाज व्यवस्थित चालून हिशोब व्यवस्थित ठेवण्यास मदत होईल.

७) नाफेडने सर्व राज्य पातळीवरील व जिल्हा पातळीवरील संस्थांच्या कार्यात एकसूत्रीपण निर्माण करावा व त्यांच्यामध्ये समन्वय साधण्याचा पर्यंत करावा.

८) नाफेडने शेतमालाची खरेदी-विक्री करताना दर्जेदार व चांगल्या प्रतीचा शेतमाल खरेदी करावा त्यामुळे अधिक किंमत मिळून, उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना ............... मध्ये करण्यात आली.

अ) १९७५ ब) १९५८ क) १९८०

२. राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या सहकारी खरेदी-विक्री संस्थामध्ये समन्वय व एकसूत्रीपणा निर्माण करण्याचे कार्य ................ संस्था करते.

अ) नाफेड ब) रिझर्व्ह बँक क) केंद सरकार

३. .............. ही भारतातील सर्व सहकारी खरेदी-विक्री संस्थांची राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च शिखर संस्था आहे.

अ) नाबार्ड ब) रिझर्व्ह बँक क) नाफेड

४. नाफेडच्या स्थापनेमुळे राज्या-राज्यांतर्गत ................वाढण्यास मदत झाली.

अ) खर्च ब) स्पर्धा क) व्यापार

५. नाफेडमुळे भारतातील .......................असमतोल कमी होण्यास मदत झाली.

अ) प्रादेशिक ब) आर्थीक क) व्यापारतोल

**उत्तरे :** १) ब २) अ ३) क ४) क ५) अ

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नाफेडची स्थापना कधी करण्यात आली ?

२. राज्या-राज्यातील व्यापार वाढविण्यास कोण उत्तेजन देते

३. सर्व शाखा व कार्यालयावर देखरेख ठेवण्यासाठी नाफेडने कोणती कार्यालये स्थापन केली आहेत?

**उत्तरे :**

१. नाफेडची स्थापना ऑक्टोबर १९५८ करण्यात आली.

२ राज्या-राज्यातील व्यापार वाढविण्यास नाफेड उत्तेजन देते.

३. सर्व शाखा व कार्यालयावर देखरेख ठेवण्यासाठी नाफेडने विभागीय कार्यालये स्थापन केली आहेत.

## २.३ भारतातील सहकारी शेती (Co-operative Farming in India)

### २.३.१ उद्दिष्टे

या घटक अभ्यासानंतर आपणास -

१) भारतातील सहकारी शेती संस्थांची संकल्पना समजण्यास मदत होईल.

२) भारतातील सहकारी शेती संस्थांची रचना किंवा प्रकार अभ्यासता येतील.

३) भारतातील सहकारी शेती संस्थांचे महत्व व फायदे समजण्यास मदत होईल.

४) भारतातील सहकारी शेती संस्थांच्या समस्या / दोष समजण्यास मदत होईल.

५) भारतातील सहकारी शेती संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना अभ्यासता येतील.

### २.३.२ प्रस्तावना

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय व उपजीविकेचे साधन शेती हे आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ६५% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. भारत हा कृषी प्रधान देश असून भारतीय शेतीची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते. कारण भारतात शेतीचे आकारमान लहान आहे. शेतीचे विभाजन व तुकडीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे आधुनिक पद्धतीने यंत्रांचा वापर करून शेती करणे अशक्य झाले आहे. अजून ही भारतीय शेतकरी परंपरागत व जुनाट पद्धतीनेच शेती करतात त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. शेतीची उत्पादकता व उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी, शेतीचे आकारमान वाढविणे आवश्यक आहे त्यासाठी सहकारी शेती करणे आवश्यक आहे. सहकारी पद्धतीने शेती केल्यास शेत जमिनीचे आकारमान वाढून मोठ्या यंत्रांचा वापर करणे शक्य होईल. त्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात होण्यास मदत होईल. डेन्मार्क, इस्त्राईल  व रशिया या राष्ट्रानी सहकारी शेतीचा स्वीकर करून कृषी क्षेत्राची प्रगती साध्य केली आहे. सध्या भारतातही सहकारी शेतीचा अवलंब करण्यात येत आहे.

### २.३.३ विषय विवेचन

भारतातील सहकारी शेतीचा अभ्यास करीत असताना त्यामध्ये सहकारी शेतीची संकल्पना, अर्थ, व्याख्या, सहकारी शेतीचे प्रकार, सहकारी शेतीचे महत्व व फायदे, या संस्थांसमोरील समस्या, त्या सोडविण्यासाठीच्या उपाययोजना इ. बाबी विचारात घ्याव्या लागतात.

## २.३.४ सहकारी शेतीचा अर्थ व व्याख्या

सहकारी शेती म्हणजे शेतकऱ्यांनी सहकारी तत्वावर एकत्र येऊन आपल्या जमिनीचे एकत्रीकरण करून सामुदायीकपणे शेतीविषयक सर्व कार्ये करणे होय.

**व्याख्या**

**१) सहकारी शेती अभ्यास गट (१९५९) :**

''शेतजमिनीचे एकत्रीकरण करून उपलब्ध श्रमशक्तीचा जास्तीत जास्त वापर करणे, शेतीमध्ये लागवड, उत्पादन, विक्री, वाहतूक या सर्व गोष्टी सामुहीकरीत्या करण्याच्या उद्देशाने सहकारी तत्वानुसार स्वेच्छेने स्थापन केलेल्या संस्थेस सहकारी शेती संस्था असे म्हणतात.''

**२) प्रा. एम. ए. दांतवाला :**

''शेती व्यवसायाच्या संदर्भात लागवडीपासून ते शेतमालाच्या विक्री पर्यंतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यक्तिगत घटकाकडून ज्या सामुदायिक संस्थेकडे हस्तांतरित केले जातात अशा संस्थेस सहकारी शेती संस्था असे म्हणतात.''

## २.३.५ सहकारी शेतीचे प्रकार (Types of Co-operative Farming)

सहकारी शेतीमध्ये सभासद शेतकरी आपल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण करून सर्व कार्ये सामुदायिकरीत्या करतात.

भारतात सहकारी नियोजन समितीने सहकारी शेतीचे पुढील प्रमाणे वर्गीकरण केले आहे.

**१. कूळ सहकारी शेती संस्था :**

स्वत:च्या मालकीची शेत जमीन नसणारे भूमिहीन शेतमजूर एकत्र येऊन स्वेच्छेने शेती करण्यासाठी अशा प्रकारच्या शेती संस्था स्थापन करतात. या संस्था सरकार, श्रीमंत शेतकरी किंवा जमीनदाराकडून भाड्याने जमीन घेतात. सहकारी शेती संस्थाकडून ती जमीन सभासद शेतकऱ्यांना लागवडीसाठी भाडेतत्वावर कुळ म्हणून लागवडीसाठी दिली जाते. त्या जमिनीवर सभासद शेतकरी स्वतंत्ररीत्या मशागत व लागवड करून उत्पादन घेऊ शकतो. हे उत्पादन त्याला विकता येते आणि जमिनीच्या वापराबद्दल त्याला सहकारी संस्थेला खंड द्यावा लागतो. सहकारी संस्था सभासदाना लागणारी बी-बियाणे, खते, रासायनिक द्रव्ये, हत्यारे, अवजारे यांचा पुरवठा करते. संस्थेला होणारा नफा संस्था सभासदांमध्ये वाटून देते. या संस्थांमुळे भूमिहीन शेतकरी व शेतमजूर यांना जमीन मिळून त्याना उत्पन्न मिळण्यास मदत होते.

### २. शेती सुधार सहकारी संस्था :

या प्रकारामध्ये शेत जमिनीची एकत्रीकरण न करता प्रत्येक शेतकरी स्वतःच्या जमिनीवर व्यक्तिगतरीत्या शेती करतो. या प्रकारात सहकारी शेती संस्था सभासदाना कोणती उत्पादने घ्यावयाची, कोणते उत्पादन तंत्र वापरावयाचे याची माहिती देते. शेतीमध्ये लागवडीपासून ते शेतमाल विक्रीपर्यंत सर्व पातळीवर सहकारी संस्था शेतकऱ्यांना मार्गदर्शन व सल्ला देते. सहकारी शेती संस्था सभासदाना आधुनिक बी-बियाणे, खते, पाणीपुरवठा, शेती उपयुक्त अवजारे, हत्यारे, पिकाची काढणी, मळणी आणि विक्रीबाबत मदत करते. सभासद या सहकारी शेती संस्थेला तिने केलेल्या मदतीबद्दल संस्थेला वर्गणी/ फी देतात. संस्थेला होणारा नफा शेवटी सर्व सभासदामध्ये वाटून दिला जातो.

### ३. सामुहिक सहकारी शेती संस्था :

भूमिहीन शेतकरी किंवा शेतमजूर यांच्यासाठी हा प्रकार महत्वाचा व उपयुक्त आहे. या सहकारी शेती प्रकारामध्ये सहकारी संस्था जमीनदार किंवा सरकारकडून जमीन भाड्याने घेते. त्या जमिनीवर लागवडी पासून ते पिक काढणी व विक्रीपर्यंत सर्व कार्ये संस्था करते. या प्रकारात आधुनिक पद्धतीने शेती केली जाते. सभासद शेतकरी त्या जमिनीवर काम करतात. कामाच्या बदल्यात त्यांना मजुरी दिली जाते.संस्थेला मिळणारा नफा सभासदाना वाटून दिला जातो.

### ४. संयुक्त सहकारी शेती संस्था :

या प्रकारामध्ये सभासद शेतकरी आपली जमीन संस्थेच्या नावे करून एकत्र येतात. जमीन संस्थेच्या नावे केली तरी शेतकऱ्यांची जमिनीची मालकी कायम राहते. परंतु जमिनीच्या वापराबद्दल सभासदाना संस्थेस खंड द्यावा लागतो. संयुक्त सहकारी शेती संस्था या प्रकारात सर्व जमिनीवर सामुदायिकरीत्या उत्पादन घेतले जाते. उत्पादनासाठी लागणारे उत्पादन घटक, बी-बियाणे, खते, रासायनिक द्रव्ये, कीटकनाशके, हत्यारे, अवजारे, यंत्रे इ. संस्थेमार्फत पुरविले जाते. शेतीतून मिळणारे एकूण उत्पादन संस्थेमार्फत विकले जाते. ऐकून उत्पादनाचा खर्च वजा जाता राहणारा नफा सभासदाना त्यांच्या जमिनीच्या प्रमाणात वाटून दिला जातो.

## २.३.६ सहकारी शेतीचे फायदे किंवा महत्व (Importance of Co-operative Farming)

### १. शेती मशागतीस उपयुक्त :

भारतात बहुसंख्य शेतकऱ्यांकडे असणाऱ्या शेतजमिनीचे प्रमाण सरासरी पाच एकर पेक्षा कमी आहे. सीमांत व लहान शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. शेतीचा आकार लहान असल्याने आधुनिक

हत्यारे व यंत्रसामुग्री वापरता येत नाही. त्यामुळे शेतीची योग्य प्रकारे मशागत करणे शक्य होत नाही. श्रमिकांचा वापर करावा लागतो. श्रमिक वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शेती उत्पादन घटते. म्हणून सहकारी शेती फायदेशीर ठरते सहकारी शेतीमुळे जमिनीचे एकूण आकारमान वाढते, आधुनिक यंत्रसामग्री वापरता येते. त्यामुळे उत्पादन वाढून सभासद शेतकरी व संस्थेचा फायदा होतो.

## २. शेतीचे विभाजन व तुकडीकरण टाळण्यास उपयुक्त :

भारतात वारसा हक्क कायदा असल्याने कुटुंब प्रमुखाचा मृत्यू झाल्यानंतर त्याची सर्व मालमत्ता, संपत्ती त्याच्या मुला-मुलींमध्ये / वारसदारांमध्ये वाटून दिली जाते. त्यामुळे जमिनीचे विभाजन व तुकडीकरण होते. उदा. समजा एका शेतकऱ्याची चार एकर जमीन आहे व ती जमीन वेगवेगळ्या चार ठिकाणी आहे, त्यास चार मुले आहेत तर त्या चौघामध्ये जमिनीचे वाटप होऊन प्रत्येकाला सर्व जमिनीत वाटा दिल्यास जमिनीचे सोळा तुकड्यामध्ये विभाजन होऊन जमिनीचे आकारमान खूप कमी होते. या विभाजन व तुकडीकरणामुळे तेवढ्या प्रमाणात जमिनीच्या बांधांची संख्या वाढते व लागवडी खालील क्षेत्र कमी होते. जमिनीचा आकार कमी होते. आधुनिक पद्धतीने, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करता येत नाही. सर्व जमिनीला पाणी पुरवठ्याच्या सोयी उपलब्ध करता येत नाहीत. जमिनीची मशागत करता येत नाही त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी होते. म्हणून सहकारी पद्धतीने शेती केल्यास जमिनीचे आकारमान वाढून आधुनिक पद्धतीने उत्पादन घेता येते. उत्पादन वाढून संस्थेचा व सभासद शेतकऱ्यांचा नफा वाढतो.

## ३. कर्ज पुरवठा :

शेतीमध्ये लागवडीपासून ते उत्पादन निघेपर्यंत मोठ्याप्रमाणात खर्च करावा लागतो.उत्पादन वाढीसाठी शेतीमध्ये काही सुधारणा कराव्या लागतात.त्यासाठी खर्च करावा लागतो. उदा. बांध-बंदिस्ती, पाणी पुरवठा, वीज पुरवठा, विहीर खोदने, ट्रॅक्टर व आधुनिक यंत्रे खरेदी करणे यासाठी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठ्याची आवश्यकता असते. शेतकऱ्यांकडे तारण उपलब्ध नसल्याने त्यांना व्यापारी बँका कर्ज पुरवठा करीत नाहीत. म्हणून या शेती सहकारी संस्था महत्त्वाच्या ठरतात, त्या आपल्या सभासदांना सहज, कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना दुसऱ्या संस्थांकडून कर्ज घ्यावे लागत नाही.

## ४. उत्पादन खर्च कमी होण्यास मदत :

सहकारी शेती संस्थांमुळे उत्पादन खर्चात घट होण्यास मदत होते. शेती उपयुक्त आधुनिक हत्यारे, अवजारे, यंत्रे, मळणी व कापणी यंत्रे यांचा वापर करणे शक्य होते. पाणी पुरवठ्याच्या सोयींमध्ये वाढ करण्यास मदत होते. त्यामुळे उत्पादन वाढते व उत्पादन खर्च कमी होतो.

### ५. बेकारी कमी करण्यास मदत :

भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. गरजेपेक्षा जास्त लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे कृषी क्षेत्रात छुपी बेकारी मोठ्या प्रमाणात आढळते. सहकारी शेती पद्धतीमुळे शेतजमिनीचे आकारमान वाढते, यंत्रांचा वापर करता येतो, आधुनिक पद्धतीने शेती करता येते, त्यामुळे उत्पादन वाढून उत्पन्न अधिक मिळते व सभासद आणि संस्था दोघांनाही फायदा मिळतो.

### ६. आधुनिक शेतीस उपयुक्त :

भारतात जमिनीचे विभाजन व तुकडीकरण मोठ्या प्रमाणात झाल्याने शेतकऱ्यांच्या जमिनीचे आकारमान लहान झाले आहे. त्यामुळे शेतीमध्ये आधुनिक उत्पादन पद्धतीचा वापर करता येत नाही. सहकारी शेतीमुळे जमिनीचे आकारमान वाढण्यास मदत होते. शेतीचे आकारमान वाढल्याने आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर करता येतो. आधुनिक बी-बियाणे, रासायनिक खते, आधुनिक यंत्रसामग्री वापरता येते. परिणामी शेतीचे उत्पादन वाढते आणि शेतकऱ्यांचा फायदा होतो. तज्ज्ञ व्यक्तींची मदत घेऊन नियोजनाच्या सहाय्याने उत्पादनाचा आराखडा आखता येतो. त्यामुळे अधिक उत्पन्न मिळण्यास मदत होते.

### ७. शेतमालास योग्य किंमत :

सहकारी शेती संस्था आपला शेतमाल विकण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची मदत घेतात. सहकारी खरेदी-विक्री संस्थांमार्फत शेतमाल विकल्यामुळे अधिक किंमत मिळण्यास मदत होते त्यामुळे सभासदांचे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते.

## २.३.७ सहकारी शेतीच्या समस्या किंवा दोष (Problems of Co-operative Farming)

### १. जमीनीची मालकी :

भारतासारख्या कृषी प्रधान देशात स्वत:च्या मालकीची जमीन असणे ही एक अभिमानाची व प्रतिष्ठेची गोष्ट मानली जाते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या नावावर थोडीतरी जमीन असावी असे वाटते त्यामुळे ग्रामीण शेतकरी आपली जमीन सहकारी संस्थेकडे देण्यास तयार होत नाहीत. त्यांचे सहकारी संस्थेस संपूर्ण सहकार्य मिळत नाही. अनेक शेतकरी सहकारी शेती संस्थेचे सभासद होण्यास तयार होत नाही. परिणामी सहकारी शेती संस्थांचा विकास होत नाही.

### २. बेकारी दूर झाली नाही :

सहकारी शेतीमध्ये शेतीचे आकारमान वाढते. त्यामुळे शेतीचे यांत्रीकीकरण केले जाते. यांत्रीकीकरणामुळे ग्रामीण शेतकऱ्यांना, शेतमजुरांना रोजगार मिळेलच असे नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील बेकारी कमी होण्याऐवजी वाढण्याची शक्यता असते.

### ३. नफा वाटपाचा प्रश्न :

सहकारी शेती संस्थेमधील प्रत्येक सभासद शेतकऱ्याच्या जमिनीचे आकारमान कमी-जास्त असते. तसेच त्याने केलेल्या कामाचा मोबदला देणे, जमा-खर्चाचा हिशेब ठेवणे यासाठी आकडेवारी करण्यासाठी तज्ञ, सुशिक्षित सभासदांची कमतरता असते. त्यामुळे हिशेब योग्य प्रकारे ठेवले जात नाहीत. परिणामी नफा वाटपाचा प्रश्न निर्माण होते व वाटपामध्ये अडचणी निर्माण होतात.

### ४. सहकारी शेतीस जनतेचे सहकार्य नाही :

भारतात सहकारी संस्थाना जनतेचे सहकार्य मोठ्या प्रमाणात मिळत नाही. शेतकरी स्वत:हुन सहकारी स्थापन करीत नाहीत तर राजकीय, सामाजिक पुढाऱ्यांनी संस्था स्थापन केल्यावर शेतकरी संस्थेचे सभासद होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना संस्था आपली आहे असे वाटत नाही. परिणामी भारतात सहकारी शेती संस्थांचा प्रयोग यशस्वी होऊ शकला नाही. रशिया व इस्त्राईल या देशात सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी झाला आहे. याउलट भारतात म्हणावे तसे यश मिळालेले नाही.

### ५. बेजबाबदार प्रवृत्ती वाढते :

शेतकरी स्वत:ची जमीन असेल व स्वत: करत असेल तर खूप कष्ट करण्यास तयार होतात परंतु सहकारी शेती संस्थांमध्ये शेतकऱ्यांचे संपूर्ण सहकार्य मिळतेच असे नाही, ते कार्यक्षमपणे आपली जबाबदारी पार पाडतातच असे नाही. त्यांचे संस्थेला संपूर्ण सहकार्य मिळत नाही त्यामुळे सहकारी शेती यशस्वी होण्यात अनेक अडचणी निर्माण होतात.

### ६. एकमत नाही :

सहकारी शेती संस्थेतील संचालक मंडळामध्ये एकमत असल्याचे दिसून येत नाही. विरोधी गटाकडून योग्य सहकार्य मिळत नाही. तसेच सत्ताधारी शेतकरी आपल्याशी संबंधित सभासदाना झुकते माप देण्याची शक्यता असते. त्यामुळे सहकारी संस्थेच्या विकासासाठी बहुमत असणे आवश्यक असते. परंतु अनेक वेळा सर्वांचे सहकार्य मिळत नाही, सर्वच सभासद संस्थेच्या कार्यात सहभागी होत नाहीत. त्यामुळे संस्थेच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो.

### ७. उत्पादकता वाढण्याची हमी नाही :

सहकारी शेती पद्धतीमुळे आधुनिक उत्पादन पद्धतीचा वापर करून शेती करता येते परंतु त्यामुळे उत्पादन वाढेलच हे सांगता येत नाही. अधिक उत्पादनाची खात्री देता येत नाही. कारण इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशाची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते.

## ८. प्रभावी नेतृत्वाचा अभाव :

सहकारी संस्था यशस्वी होण्यासाठी चांगले नेतृत्व असणे आवश्यक असते. त्यामुळे सभासदाना अधिक कष्ट करणे, उत्पादन वाढविण्यासाठी संस्थेस सहकार्य करणे शक्य होते. शेतकऱ्यांना प्रेरणा मिळण्यास मदत होते. तसेच भारतामध्ये शेतकऱ्यांमधून नेतृत्व निर्माण होत नाही. सहकारी संस्थांचे नेतृत्व शेतकऱ्या व्यतिरिक्त बाहेरील इतर व्यक्ती करतात त्यामुळे संस्थेचा विकास होण्यात अडथळे निर्माण होतात.

## ९. आर्थिक समस्या :

सहकारी शेती संस्थाना फार मोठ्या प्रमाणात भांडवलाची व पैशाची गरज असते. तसेच आधुनिक पद्धतीने, प्रगत उत्पादन तंत्राचा वापर करणे, मोठी व आधुनिक यंत्रे, हत्यारे, अवजारे वापरणे, पाणी पुरवठा, विहिरी खोदणे यासाठी मोठ्या प्रमाणात पैशाची गरज असते. परंतु सभासद शेतकरी गरीब व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याने सहकारी शेती संस्था त्यांच्याकडून पैसा, भांडवल मोठ्या प्रमाणात गोळा करू शकत नाहीत परिणामी संस्थाना व्यापारी बँकांवर अवलंबून रहावे लागते. बँकांनी आवश्यकतेनुसार कर्ज पुरवठा केला नाही तर संस्थेसमोर अनेक अडचणी निर्माण होतात.

# २.३.८ सहकारी शेतीतील दोष कमी करण्यासाठी उपाय (Remedies)

## १. संघटन भक्कम हवे :

सहकारी शेती संस्थाचे संघटन भक्कम व मजबूत असणे आवश्यक असते. सहकारी तत्वाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असते. प्राथमिक सहकारी शेती संस्था व जिल्हा व राज्य पातळीवरील संस्थामध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे.

## २. सीमांत व लहान शेतकऱ्यांवर अधिक भर देणे गरजेचे आहे :

भारतामध्ये सीमांत व लहान शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. त्याना सहकारी शेती संस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभागी करून घ्यावे म्हणजे त्याना रोजगार मिळेल व उत्पन्न ही प्राप्त होईल. सीमांत व लहान शेतकऱ्यांसाठी विशेष प्रयत्न संस्थांनी करावेत म्हणजे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

## ३. प्रभावी अंमलबजावणी आवश्यक :

सहकारी शेती संस्था भारतीय शेतीच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. त्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना त्यामध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. त्यांचे संस्थेशी आर्थिक व्यवहार वाढल्यास संस्था यशस्वी होण्यास मदत होते.

**४. वित्तपुरवठा :**

सहकारी शेती संस्थाना सरकारने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत कमी व्याजदराने कर्ज पुरवठा उपलब्ध करून दिला पाहिजे. तसेच पाणीपुरवठा, ट्रॅक्टर खरेदी यासाठी दीर्घमुदतीचा कर्ज पुरवठा ही उपलब्ध करून देण्यात यावा. म्हणजे शेती संस्थांचा विकास होण्यास मदत होईल.

**५. संयुक्त लागवड तंत्रज्ञान :**

सभासद शेतकऱ्यांना एकत्रित, संयुक्त लागवडीचे, शेती उत्पादनाचे फायदे समजावून सांगणे आवश्यक असते. आधुनिक शेती पद्धतीमुळे उत्पादन वाढून संस्था व सभासद यांचाही फायदा होते हे पटवून देणे आवश्यक आहे त्यामुळे त्यांचे संस्थेस सहकार्य मिळण्यास मदत होईल.

**६. व्यवस्थापकीय व तांत्रिक मार्गदर्शन :**

सहकारी संस्थेतील सभासद शेतकरी हे अडाणी, अशिक्षित व अज्ञानी असतात. त्याना संस्थेच्या कामकाजाची माहिती असत नाही. म्हणून सहकारी शेती संस्थांचे कामकाज व्यवस्थित व चांगल्या प्रकारे चालविण्यासाठी संस्थेचे कर्मचारी व संचालक मंडळातील सदस्याना व्यवस्थापनाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे आवश्यक असते. त्यासाठी शासकीय पातळीवर सहकारी प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली जाते.

**७. साभासदांच्या दृष्टीकोनात बदल होणे आवश्यक :**

सहकारी शेतीकडे पाहण्याचा सभासदांचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. कारण सभासद सहकारी संस्थेचे सभासद होतात परंतु नंतर संस्थेच्या सर्व कार्यामध्ये सहभागी होत नाहीत. म्हणून त्यांचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे.

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्याची संख्या ........... आहे.

अ) कमी ब) अधिक क) किरकोळ

२. सहकारी शेतीमध्ये सभासद शेतकरी आपल्या शेतजमिनीचे ............... करून सर्व कार्ये सामुदायिकरीत्या करतात.

अ) विलीनीकरण ब) विभाजन क) एकत्रीकरण

३. भारतात भूमिहीन शेतमजूर एकत्र येऊन ............... सहकारी शेतीसंस्था स्थापन करतात.

अ) शेती सुधार      ब) कूळ      क) संयुक्त

**उत्तरे :** १) ब   २) क   ३) ब

**आ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतात कोणत्या कायद्यामुळे शेतीचे विभाजन व तुकडीकरण झाले आहे ?

२. कोणत्या सहकारी शेती पद्धतीत संस्था जमीन सरकार किंवा जमिनदाराकडून भाडेतत्वावर मिळवितात ?

३. भारतीय नियोजन मंडळाने सहकारी शेतीचे किती प्रकार सांगितले आहेत ?

**उत्तरे :**

१. भारतात वारसाहक्क कायद्यामुळे शेतीचे विभाजन व तुकडीकरण झाले आहे.

२. भारतात कूळ सहकारी शेती संस्था व संयुक्त सहकारी शेती संस्था या प्रकारच्या सहकारी शेती संस्थामध्ये संस्था जमीन सरकार किंवा जमिनदाराकडून भाडेतत्वावर मिळवितात.

३. भारतीय नियोजन मंडळाने सहकारी शेतीचे चार प्रकार सांगितले आहेत.

## २.४ भारतातील सहकारी दुग्धसंस्था (Dairy Co-operatives in India)

## २.४.१ उद्दिष्टे

या घटक अभ्यासानंतर आपणास -

१) भारतातील सहकारी दुग्ध संस्थांची संकल्पना समजण्यास मदत होईल.

२) भारतातील सहकारी दुग्ध संस्थांची रचना किंवा प्रकार अभ्यासता येतील.

३) राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

४) राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाची उद्दिष्टे व कार्ये समजण्यास मदत होईल.

५) राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाची भूमिका अभ्यासता येतील.

## २.४.२ प्रस्तावना

भारत हा एक कृषी प्रधान देश असून ५०% पेक्षा जास्त लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती हे आहे. परंतु भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने व हंगामी स्वरूपाची असल्याने, भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे परिणामी शेतकऱ्यांना कमी उत्पन्न मिळते. म्हणून शेतकऱ्यांना शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय करावे लागतात. उदा. कुक्कुटपालन, पशुपालन, रेशीम शेती, वराहपालन या सारखे शेतीपूरक व्यवसाय केले जातात. भारतामध्ये फार पूर्वीपासून दुग्ध व्यवसाय हा शेतीपूरक परंपरागत व्यवसाय म्हणून चालत आलेला आहे. प्रचलित पद्धतीने हा व्यवसाय करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यापारी दृष्टीकोनातून हा व्यवसाय करणे फार फायदेशीर ठरते. या व्यवसायामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळण्यास मदत झाली आहे. जागतिक पातळीवर तुलना केल्यास भारताचा एकूण दुध उत्पादनात पहिला क्रमांक आहे. यामध्ये सहकारी दुध व्यवसायाचे स्थान महत्वाचे आहे. या प्रकरणामध्ये आपण भारतातील सहकारी दुग्ध व्यवसायाचा अभ्यास करणार आहोत.

## २.३.४ विषय विवेचन

सहकारी दुग्ध व्यवसायाचा अभ्यास करीत असताना त्यामध्ये सहकारी दुग्ध व्यवसायाची संकल्पना, अर्थ, सहकारी दुग्ध संस्थांची भूमिका, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना, उद्दिष्टे, कार्ये व भूमिका, प्रगती इ. बाबी विचारात घ्याव्या लागतात.

## २.४.४ सहकारी दुग्ध संस्थांची भूमिका (Role of Dairy Co-operatives)

भारतातील सहकारी दुग्ध संस्थांची भूमिका पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) दुधास योग्य किंमत :**

भारतात सहकारी दुग्ध संस्था अस्तित्वात येण्यापूर्वी खाजगी दुग्ध व्यावसायिकांची मक्तेदारी होती. त्यामुळे दुधास कमी किंमत मिळत असे. ग्रामीण भागात सहकारी दुग्ध संस्था स्थापन झाल्यानंतर दुधास योग्य किंमत मिळू लागली. सभासद शेतकऱ्यांच्या वाढत्या संख्येमुळे व त्याच्या मागणीमुळे सरकारला दुधाचे दर वाढवून द्यावे लागले. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली.

**२) रोजगार निर्मिती :**

भारतीय शेती हंगामी स्वरुपाची असून, पावसावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांना रोजगारही विशिष्ट हंगामातच उपलब्ध होतो. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना

वर्षभर रोजगार मिळण्यास मदत होते. अनेक ग्रामीण बेरोजगार लोकांना रोजगार मिळण्यासाठी दुग्ध व्यवसाय महत्वाचा आहे.

**३) आर्थिक विकास :**

ग्रामीण भागातील भूमिहीन शेतकरी व अल्प भू-धारक शेतकरी, शेतमजूर याची आर्थिक परिस्थिती खूपच हालाखीची आहे. त्यांना दारिद्र्यात जीवन जगावे लागते. या लोकांना दुग्ध व्यवसायामुळे रोजगार प्राप्त होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होते व त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

**४) राहणीमान सुधारते :**

शेतकऱ्यांना शेतीतून कमी उत्पादन मिळते त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी राहते. अनेक शेतकऱ्यांना आपल्या प्राथमिक गरजाही पूर्ण करता येत नाहीत. म्हणून दुग्ध व्यवसाय विकसित झाल्यास शेतकऱ्यांना शेती व्यतिरिक्त एक उत्पनाचे साधन मिळेल व त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. त्यामुळे त्यांचे राहणीमान वाढण्यास व सुधारण्यास मदत होते.

**५) ग्रामीण भागातील बचत वाढते :**

ग्रामीण भागात शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसायांचा विकास झाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे वाढलेल्या उत्पन्नामुळे बचतीचे प्रमाण ही वाढत जाते. परिणामी ग्रामीण भागात कर्ज पुरवठा वाढण्यास मदत होते.

**६) भांडवल उभारणी :**

शेतीपूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळते. या वाढलेल्या उत्पन्नामुळे त्याना पैसा इतरत्र गुंतवता येतो. ग्रामीण भागातील बँकांकडील ठेवी वाढतात व ग्रामीण भागत भांडवल पुरवढा वाढण्यास मदत होते.

**७) शेती पूरक व्यवसाय :**

दुग्ध व्यवसाय हा शेती पूरक व्यवसाय आहे.तसेच शेती व दुग्ध व्यवसाय एकमेकास पूरक आहेत. कारण जनावराना लागणारा चारा शेतीतून निर्माण होते. तर जनावरांच्या शेणापासून तयार होणारे खत शेती उत्पादन वाढविण्यास मदत करते म्हणून हे व्यवसाय एकमेकास पूरक व उपयुक्त आहेत.

**८) स्थानिक तंत्रज्ञान :**

शेतीपूरक व्यवसाय हे स्थानिक पातळीवरील परंपरागत तंत्रज्ञान वापरून करता येतात. त्यासाठी शेतकऱ्यांना विशेष प्रशिक्षण घेणे किंवा तंत्रज्ञान शिकणे आवश्यक नसते. आपल्या घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे हे व्यवसाय करता येतात.

## ९) शेतकऱ्यांना मार्गदर्शन :

सहकारी दुग्ध उत्पादन संस्था सभासद शेतकऱ्यांना दुध उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन करतात. संकरित जनावरांचा पुरवठा करणे, सकस, चांगल्या चाऱ्याची निर्मिती करणे, दुध विक्रीसाठी आणि प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करणे अशा सुविधा उपलब्ध करून देतात.

## १०) प्रकिया उद्योगाचा विकास :

दुधावर प्रक्रिया करणे आवश्यक असते कारण दुध नाशवंत असल्याने जास्त काळ टिकून राहू शकत नाही. दुध उत्पादनामुळे दुधावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थांचा विकास होण्यास मदत होते. दुधापासून दही, लोणी, तूप, पनीर, चीज, मिल्क पावडर, खवा आणि बेकरी उत्पादने या व्यावासायांचा विकास होण्यास मदत होते.

## ११) महिलांचा सहभाग :

सहकारी दुग्ध व्यवसायात ग्रामीण महिलांचा सहभाग वाढत आहे. महिला या व्यवसायात मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्याने दुधाचा मिळणारा पैसा कुटुंबासाठी वापरला जातो. दुधाचे बिल महिलांच्या हातात मिळेल अशी व्यवस्था अनेक संस्था करीत आहेत. दुग्ध व्यवसायातील महिलांच्या सहभागामुळे दुग्ध उत्पादन वाढण्यास मदत झाली आहे.

## २.४.५ राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळ (National Dairy Development Board)

राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळ ही एक राष्ट्रीय पातळीवरील संस्था असून तिची स्थापना जुलै १९६५ रोजी करण्यात आली. या संस्थेची स्थापना करण्यामागे श्री. वर्गीस कुरियन यांचा सिहाचा वाटा आहे. श्री. वर्गीस कुरियन हे दुग्ध व्यवसाय तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाचे मुख्य कार्यालय आनंद, गुजारात येथे आहे. ही संस्था वेगवेगळ्या भागात सहकारी दुध संस्था स्थापन करणे व त्यांना दुध उत्पादक शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याचे कार्य करते. दुध विक्री आणि दुधावर प्रक्रिया करण्यासाठी या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जाते व मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीबरोबरच या पूरक व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळण्यास मदत होते.

## २.४.६ राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाची उद्दिष्टे किंवा कार्ये (Objectives / Functions)

१. दुध उत्पाद्कांच्या मालकीच्या सहकारी संस्था स्थापन करणे.

२. प्राथमिक सहकारी दुग्ध उत्पादक संस्थाना अर्थ पुरवठा उपलब्ध करून देणे.

३. सहकारी दुग्ध संस्थाच्याव्दारे दुध उत्पादन वाढवून शाश्वत रोजगार मिळवून देणे.

४. ग्राहकांना शुद्ध, ताजे, सकस दुध उपलब्ध करून देणे.

५. दुध उत्पादक शेतकरी, प्रक्रिया उद्योग, कर्मचारी, यांना प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण देणे.

६. सहकारी दुग्ध प्रक्रिया संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे व त्यांचा विकास करणे.

७. सहकारी दुग्ध संस्थांचे नियंत्रण व परीक्षण करणे. त्याना तांत्रिक, आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

८. चागल्या दर्जाचे दुग्ध उत्पादन करून त्याच्या निर्यातीस प्रोत्साहन व चालना देणे.

९. पशुखाद्य, पशुसंकर, पशुआरोग्य, संशोधन आणि विकास यावर भर देणे.

## २.४.७ राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाची भूमिका

## (Role of National Dairy Development Board)

### १. सहकारी दुग्ध व्यवसायाचा विकास करणे :

राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाचे हे महत्वाचे कार्य आहे. या महामंडळा मार्फत गावागावात सहकारी दुग्ध संस्था सुरु करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना दुध उत्पादनाची गावातच विक्री करणे शक्य होते. हे महामंडळ दुध उत्पादना बरोबरच कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, वरह पालन या उद्योगाना चालना देण्याचे कार्य करते, तसेच गोबर गॅस वापरावर भर दिला जातो, त्यामुळे लाकडाचा जळणासाठी होणारा वापर कमी होऊन वृक्षतोड थांबण्यास मदत होते. ज्या ठिकाणी अल्पभूधारक शेतकरी किंवा शेतमजुरांना वर्षभर रोजगार मिळत नाही त्याठिकाणी हा व्यवसाय फायदेशीर ठरतो.

### २. पूरक सेवा :

दुग्ध व्यवसायातील एकूण खर्चामध्ये जनावरांचा चारा, खाद्य, यावरच मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळ जनावरांचे खाद्य कमी किंमतीमध्ये उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करते. चांगल्या जातीची, अधिक दुध देणाऱ्या जनावरांची पैदास करून शेतकऱ्यांना पुरविते. त्यामुळे दुध उत्पादन व दुधाची गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

### ३. उत्पादनात विविधता :

राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळ दुधावर प्रक्रिया करण्यास प्रोत्साहन देते. त्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान व अर्थ सहाय्य मंडळाने उपलब्ध करून दिले आहे. दुधावर प्रक्रिया करून दही, ताक, लोणी, श्रीखंड, पनीर, चीज इ. तयार करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

### ४. तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन :

या मंडळामार्फत दुभती जनावरे पैदास करणे, पशु खाद्य प्रकल्प उभारणे यासाठी मार्गदर्शन केले जाते. कृत्रिम रेतन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. दुग्ध उत्पादन साठवून ठेवण्यासाठी शीतगृहांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### ५. जनावरांचे आरोग्य :

दुध उत्पादन वाढीसाठी जनावरांचे आरोग्य चांगले राहणे आवश्यक आहे. त्यासाठी जनावरांच्या उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. उत्पादन वाढीसाठी संकरित जातीची जनावरे पैदास करून ती शेतकऱ्यांना पुरविली जातात. पशु आरोग्य चांगले राहण्यासाठी औषधे, लसी व गोळ्या पुरविल्या जातात. त्यामुळे दुध उत्पादन वाढून शतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.

### ६. बाजारपेठेची माहिती :

शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायाबाबत देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील माहिती मिळणे आवश्यक असते. त्यामुळे उच्च पैदास पशु कोठे मिळतील, किती दुध मिळते, पशु खाद्य कोठे मिळते, उत्पादित मालाला चांगली बाजारपेठ कोणत्या ठिकाणी उपलब्ध आहे याबाबतची माहिती या मंडळामुळे मिळते.

## २.४.८ भारतातील सहकारी दुग्ध व्यवसायाची प्रगती (Progress)

भारतात सन १९७० ते १९९५ या काळात ''ऑपरेशन फ्लड'' (दुध महापूर) योजनेमुळे दुग्ध क्रांती घडून आली. त्यामुळे भारतातील दुग्ध उत्पादन वाढून भारत दुग्ध उत्पादनात प्रथम क्रमांकाचा देश ठरला.

सन २०११-१२ मध्ये प्राथमिक सहकारी दुग्ध उत्पादक संस्थांची संख्या १.४९ लक्ष एवढी होती व त्यांची सभासद संख्या १४.७८ दशलक्ष होती. सन २०१६-१७ मध्ये भारतामध्ये राज्य दुग्ध संघांची संख्या २७ एवढी होती. जिल्हा मध्यवर्ती दुध संस्थांची संख्या २०१८ होती आणि १.७७ लक्ष प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था होत्या व त्यांची सभासद संख्या १६२ लक्ष होती व त्यांचे भागभांडवल रु. १५,४६१.९७ लक्ष एवढे होते.

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. दुग्ध व्यवसाय हा शेती .......... व्यवसाय आहे.

अ) पूरक ब) पर्यायी क) विरुद्ध

२. भारतात सर्वप्रथम गुजरातमध्ये ............ जिल्ह्यात १९४६ मध्ये सहकारी तत्वावर दुग्ध संस्था स्थापन झाली.

अ) अहमदाबात ब) म्हैसाना क) खेडा

३. भारतात राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना ................ यांनी केली.

अ) डॉ. वर्गीस कुरियन ब) दादाभाई नौरोजी क) वल्लभभाई पटेल

४. भारतात राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना ................. रोजी करण्यात आली.

अ) १५ जानेवारी १९६५ ब) २६ ऑगस्ट १९९० क) १६ जुलै १९६५

५. भारतात ............... योजनेमुळे दुग्ध क्षेत्रात कांती घडून आली.

अ) शेती क्रांती ब) औध्योगिक क्रांती क) ऑपरेशन फ्लड

**उत्तरे :** १) अ २) क ३) अ ४) अ ५) क

**आ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतात राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना कोणी केली ?

२. भारतात राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना कधी करण्यात आली ?

३. भारतात कोणत्या योजनेमुळे दुग्ध क्षेत्रात क्रांती घडून आली ?

४. शेती पूरक महत्वाचे व्यवसाय कोणते आहेत ?

**उत्तरे :**

१. भारतात राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना डॉ. वर्गीस कुरियन यांनी केली.

२. भारतात राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना १६ जुलै १९६५ रोजी करण्यात आली.

३. भारतात ऑपरेशन फ्लड योजनेमुळे दुग्ध क्षेत्रात क्रांती घडून आली.

४. कुक्कुट पालन, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, वराहपालन हे शेती पूरक महत्वाचे व्यवसाय आहेत.

## पारिभाषिक शब्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विपणन | : | खरेदी-विक्री |
| २. | अडते | : | व्यापारी |
| ३. | मध्यस्थ | : | शेतमाल खरेदी-विक्री प्रक्रियेत महत्त्वाचा सहभाग असणारे व्यापारी, दलाल, अडते |
| ४. | विक्रीयोग्य वाढावा | : | कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवून विक्री करण्यासाठी बाजारात आणला जाणारा शेतमाल. |
| ५. | प्रक्रिया | : | शेतमाल उपभोग योग्य बनविणे. |
| ६. | प्रतवारी | : | चांगल्या प्रतीचा, मध्यम प्रतीचा व कनिष्ठ प्रतीचा असे वर्गीकरण करणे. |
| ७. | निवास व्यवस्था | : | राहण्याची सोय |
| ८. | एकत्रीकरण | : | शेतमाल एका ठिकाणी जमा करणे. |
| ९. | वाहतूक | : | माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाणे. |
| १०. | स्वेच्छेने | : | स्वत:हून |

## २.४ सारांश

विपणन म्हणजेच खरेदी-विक्री करणे होय. यामध्ये वस्तू उत्पादनापासून ती ग्राहकांच्या हातामध्ये जाईपर्यंत सर्व क्रियांचा समावेश होतो. या खरेदी-विक्रीच्या प्रक्रियेत शेतमालाचे एकत्रीकरण करणे, मालाची वाहतूक करणे, प्रमाणीकरण व प्रतवारी करणे, शेतमालावर प्रक्रिया करणे, शेतमाल साठवून ठेवणे, शेतमालाची बांधणी करणे, वाहतूक करणे इ. गोष्टींचा समावेश होते.

शेतमालाची खरेदी-विक्री करणारी व सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्था होय. भारतात सहकारी विपणन संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे. काही घटक राज्यात द्विस्तरीय तर काही घटक राज्यात त्रिस्तरीय रचना आहे.

राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची (नाफेड) स्थापना ऑक्टोबर १९५८ मध्ये करण्यात आली. कृषी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची सर्वोच्च शिखर संस्था म्हणून ती ओळखली जाते. ही संस्था राष्ट्रीय पातळीवर कार्य करते.

सहकारी शेतीमध्ये सभासद शेतकरी आपल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण करून सर्व कार्ये सामुदायिकरीत्या करतात.

भारतात वारसा हक्क कायदा असल्याने कुटुंब प्रमुखाचा मृत्यू झाल्यानंतर त्याची सर्व मालमत्ता, संपत्ती त्याच्या वारसदारांमध्ये वाटून दिली जाते. त्यामुळे जमिनीचे विभाजन व तुकडीकरण होते.

सहकारी पद्धतीने शेती केल्यास जमिनीचे आकारमान वाढून आधुनिक पद्धतीने उत्पादन घेता येते. शेतीचे आकारमान वाढल्याने आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर करता येतो. आधुनिक बी-बियाणे, रासायनिक खते, आधुनिक यंत्रसामुग्री वापरता येते. परिणामी शेतीचे उत्पादन वाढते आणि शेतकऱ्यांचा फायदा होतो.

भारतीय शेती ही हंगामी स्वरूपाची असल्याने, भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे परिणामी शेतकऱ्यांना कमी उत्पन्न मिळते. म्हणून शेतकऱ्यांना शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय करावे लागतात. उदा. कुक्कुटपालन, पशुपालन, रेशीम शेती, वराहपालन इ.

भारतामध्ये दुग्ध व्यवसाय हा शेतीपूरक परंपरागत महत्त्वाचा व्यवसाय असल्याचे दिसून येते. प्रचलित पद्धतीने हा व्यवसाय करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यापारी दृष्टीकोनातून हा व्यवसाय करणे फार फायदेशीर ठरते. या व्यवसायामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळण्यास मदत झाली आहे. जागतिक पातळीवर तुलना केल्यास भारताचा एकूण दुध उत्पादनात पहिला क्रमांक आहे.

## २.६ सरावासाठी प्रश्न

१. सहकारी विपणन म्हणजे काय ? सहकारी विपणन संस्थांचे महत्त्व स्पष्ट करा.

२. भारतातील सहकारी विपणन संस्थांची कार्ये स्पष्ट करा.

३. भारतातील सहकारी विपणन संस्थांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना स्पष्ट करा.

४. नाफेडची उदिष्ट्ये स्पष्ट करा.

५. नाफेडची कार्ये विशद करा.

६. भारतातील सहकारी शेतीचे प्रकार स्पष्ट करा.

७. भारतातील सहकारी शेतीच्या समस्या व त्यावरील उपाययोजना स्पष्ट करा.

८. भारतातील सहकारी दुग्ध संस्थांची भूमिका स्पष्ट करा.

९. भारतातील राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाची कार्ये स्पष्ट करा.

**टिपा लिहा**

१. सहकारी खरेदी-विक्री संस्थांची कार्ये.

२. सहकारी विपणन संस्थांचे महत्व.

३. भारतातील सहकारी विपणन संस्थांच्या समस्या.

४. नाफेडची कार्ये.

५. भारतातील सहकारी शेतीच्या समस्या.

६. सहकारी दुग्ध संस्थांची भूमिका.

७. भारतातील राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाची कार्ये

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. Dr. B. S. Mathur, "Co-operation in India".

२. T. N. Hajela, "Principles, Problems and Practice of Co-operation".

३. सहकार तत्त्वे आणि व्यवहार - प्रा रायखेलकर, प्रा. डांगे

४. भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. देसाई, डॉ. भालेराव

# सत्र ५ : घटक ३

# भारतातील सहकारी बँका आणि पतसंस्था

## (Co-operative Banking and Credit Societies in India)


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ भारतातील सहकारी चळवळीचे पुनरावलोकन-द्विस्तरीय आणि त्रिस्तरीय रचना

३.२.२ भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था - कार्ये, समस्या आणि उपाय

३.२.३. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका - प्रशासकीय रचना, प्रगती , समस्या आणि उपाय

३.२.४ राज्य सहकारी बँका - प्रशासकीय रचना, प्रगती , समस्या आणि उपाय

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ आधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टीचे आकलन होईल.

१) भारतातील सहकारी चळवळीचे पुनरावलोकन किंवा उगम कसा झाला हे समजून घेणे.

२) भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची माहिती घेणे .

३) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती घेणे .

४) राज्य सहकारी बँकांची माहिती घेणे .

## ३.१ प्रस्तावना

मागील घटक क्र. २ मध्ये आपण भारतातील कृषी सहकारी संस्थांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये सहकारी विपणन, नाफेड, सहकारी शेती आणि सहकारी दुग्धसंस्थाची भूमिका या घटकांचा अभ्यास केला. घटक क्र.३ मध्ये आपण भारतातील सहकारी बँका आणि पतसंस्था यांचा अभ्यास करणार आहोत म्हणजेच त्यामध्ये भारतातील सहकारी चळवळीचे पुनरावलोकन, भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका इत्यादी बाबींचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

या घटकामध्ये आपण सहकारी चळवळीच्या पुनरवलोकनाची किंवा उगमाविषयी माहिती घेणार आहोत.त्याचबरोबर वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांचा देखील अभ्यास करणार आहोत.

### ३.२.१ भारतातील सहकारी चळवळीचा उगम

जगातील इतर देशांप्रमाणेच भारतातदेखील ग्रामीण जनतेच्या गरिबीतून आणि आर्थिक शोषणातून सहकार चळवळ सुरु झाली. ग्रामीण भागातील सावकार विविध मार्गाने शेतकऱ्यांची फसवणूक करीत असत. सावकारांच्या अवाजवी व्याजदरामुळे शेतकरी कधीही कर्जातून बाहेर पडत नसे. तसेच शेतीच्या विभाजनामुळे दिवसेंदिवस शेतीच्या आकारमानात आणि उत्पादकतेत घट होत गेली. हि परिस्थिती विचारात घेवून सरकारने सहकाराच्या विकासाला चालना देण्यास सुरवात केली.

भारतात १९०४ मध्ये पहिला सहकारविषयक कायदा संमत झाला. नंतरच्या काळात अनेक टप्प्यातून सहकारी पतपुरवठा चळवळीचा विकास होत गेला. यामध्ये प्रामुख्याने १९०४ पर्यंतचा काळ, १९०४ ते १९११ पर्यंतचा काळ, त्यानंतर १९११ ते १९४७ पर्यंतचा व त्यानंतरच्या कालखंडाचा समावेश होतो. म्हणजेच भारतातील सहकारी चळवळीचा उगम लक्षात घेता त्यामध्ये प्राचीन काळ व आधुनिक काळ अशा दोन कालखंडातील सहकारी चळवळीचे प्रयत्न विचारात घेणे महत्वाचे ठरेल.

**प्राचीन काळातील सहकारी चळवळीचा उगम :**

भारतात सहकारी चळवळीचा उगम होण्यापूर्वी म्हणजेच १९०४ मध्ये अनेक वर्षे कुल, ग्राम, श्रेणी, चिटफंड स्वरुपात सहकार प्रचलित होता. या सहकारी चळवळीचे स्वरूप समाजाच्या विकासात महत्वाचे मानले जात होते. कुल स्वरुपाच्या सहकारी संघटनेत कौटुंबिक स्तरावर नातलग व मित्रमंडळी

परस्पर सहकार्याने एकमेकांच्या गरजा पूर्ण करत असत. त्यांनतर या संघटनेचे रुपांतर ग्रामसभेमध्ये झाले आणि या ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामीण पातळीवर कार्य करणाऱ्या गरम स्वरूपाच्या साब्ध्लेच्या माध्यमातून एखाद्या खेड्यातील विविध समस्या सोडविल्या जावू लागल्या. याच काळात औद्योगिक क्षेत्रात श्रेणी हा सहकारी संघटनेचा प्रकार उदयास आला. श्रेणी या संघटनेच्या माध्यमातून भारतातील व्यापारी कारागीर व कंत्राटदार लोक परस्पर सहकार्यातून आपले आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडवू लागले. नंतरच्या काळात समाजाच्या आर्थिक गरजांच्या पूर्ततेसाठी चिटफंड, निधीपाढती व फडपद्धतीच्या रूपाने सहकार चळवळ अस्तित्वात आली.

**आधुनिक काळातील सहकारी चळवळीचा उगम :**

भारतात आधुनिक काळात सहकारी चळवळीचा उगम शेतकऱ्यांचे दारिद्र्य व कर्जबाजारीपणा कमी करण्याच्या हेतूने झालेला आहे. ब्रिटीश राजवटीत भारतीय शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असल्याने शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा वाढला. शेतकऱ्यांच्या या असहाय्य परिस्थितीचा फायदा सावकारांनी घेतला. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शेतकऱ्यानी एकत्रित येवून दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रयत्न केले. त्याला त्या काळात विविध संघटनानी व ब्रिटीश अधिकाऱ्यांनी पाठींबा देवून सहकारी संस्थाच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास मदत केली. इ.स.१८७५ ते १९०४ या काळात भारतात आधुनिक स्वरुपात सहकारी चळवळ निर्माण करण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न खालील प्रमाणे सांगता येतील.

**अ) डेक्कन बंड आयोग (१८७५) :**

१८७५ मध्ये सरकारी जमिनीवर शेती करणाऱ्यापैकी १/३ शेतकरी कर्जबाजारी असल्याचे या आयोगाच्या लक्षात आले म्हणून या आयोगाने शेतकऱ्यांना खास आर्थिक मदत करणारी योजना राबविण्यात यावी अशी शिफारस केली. सन १८७९ चा डेक्कन शेतकरी मदत कायदा हा या आयोगाच्या शिफारशीतून निर्माण झाला.

**ब) कृषी बँकेचा प्रयोग (१८८३) :**

न्यायमूर्ती रानडे आणि सर विल्यम वेडरबर्न यांनी भारतातील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न सोडविण्यासाठी कृषी बँक स्थापन करण्याची योजना तयार केली. यामध्ये पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी तत्वावर कृषी बँक स्थापन केली. यामुळे शेतकऱ्यांना अल्प व्याजदरात कर्जाची सोय उपलब्ध झाली.

### क) शेती सुधारणा व शेती कर्ज कायदा (१८८४) :

या कायद्यानुसार शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी ६% व्याजदराने पतपुरवठा करण्याची तरतूद केली. त्यामुळे शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे, जनावरांची खरेदी, शेती अवजारे इत्यादींच्या खरेदीसाठी कर्जपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जात होता. नंतरच्या काळात म्हणजेच ५ फेब्रुवारी १८८९ मध्ये बडोदा याठिकाणी परस्पर सहाय्य संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेचा उद्देश हा मध्यमवर्गीयांच्या आर्थिक प्रश्नांचे निराकरण करणे हा होता.

### ड) निकोल्सन अहवाल (१८९२) :

या समितीने भारतीय परिस्थितीची युरोपशी तुलना करून मद्रास राज्यातील निधी व चिटफंड या संस्थांचे सहकारी संस्थेत रुपांतर करणे शक्य असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी अमर्यादित दायित्वाच्या तत्वावर सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. तसेच रफायझन संस्थेच्या धर्तीवर भारतात कृषी पतपुरवठा संस्था सुरु कराव्यात असे सुचविले. समान परिस्थितीतील लोकांनी एकत्र येऊन परस्पर कर्जव्यवहार करावेत. काटकसर व बचत करावी या व्यवहारांना सरकारने मुक्तहस्ते सहाय्य करावे अशी निकोल्सन अहवालाची भूमिका होती. कृषी आणि भूतरण बँका सुरु करण्याच्या शक्यतेचा विचार करून योग्य शिफारशी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती. सर एडवर्ड लॉ समिती (१९०१) पूर्वीच्या कायद्यात सहकारी तत्वावर संस्थेची उभारणी व सभासदांच्या आर्थिक हिताची जपणूक या तरतुदी ननसल्याने सहकारी संस्थांच्या विकासासाठी स्वतंत्र कायद्याची गरज निर्माण झाली. भारतात सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करण्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याची जबाबदारी या समितीवर सोपविली. या समितीच्या शिफारशीनुसार २५ मार्च १९०४ मध्ये सहकारी संस्था कायदा संमत करण्यात आला. भारतात सहकारी पतपुरवठा चळवळ सुरु करण्यासाठी होत असलेले हे सर्व प्रयत्न विचारात घेवून तात्कालीन ब्रिटीश शासनाने सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या १९०१ च्या दुष्काळ विमोचन आयोगाने भरतत परस्पर साह्य सहकारी संस्था स्थापन करण्याची शिफारस केली यामुळे शेतकऱ्यांना योग्य दराने कर्ज मिळेल व त्यांची सावकाराच्या कचाट्यातून सुटका होईल असे समितीने सुचविले.

## ३.२.२ भारतातील अल्पमुदतीच्या पतपुरवठा करणाऱ्या सहकारी पतपुरवठा संस्था :

भारतातील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न सोडविण्यासाठी व ग्रामीण भागातील सावकारांकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी १९०४ च्या सहकार कायद्याने कृषी पतपुरवठा सहकारी संस्थाच्या स्थापनेसाठी चालना दिलेली आहे. शेतकऱ्यांच्या अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जाच्या

गरजा पूर्ण करण्यासाठी भारतात त्रिस्तरीय रचना स्विकारण्यात आली आहे. यामध्ये प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँका या सहकारी संस्थांचा समावेश होतो. या तिन्ही सहकारी संस्थांची माहिती आपण पुढीलप्रमाणे पाहू.

**सहकारी पतपुरवठा रचना : (Co-operative Credit Structure)**


भारतातील सहकारी चळवळीचा अभ्यास जागतिक पातळीशी तुलना करता भारतातील सहकार चळवळ ही समाजातील जमिनदार व सावकारांकडून होणारे शेतकऱ्यांचे शोषण थांबविणे व गरीबी हटविण्यासाठी सरकारच्या पुढाकाराने सुरू झाली. १९०४ मध्ये सरकारने सहकाराचा पहिला कायदा करून सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

शेतकरी वर्गातला शेती व्यवसायासाठी दोन प्रकारच्या कर्जाची गरज असते. (अ) अल्प मुदतीचे कर्ज (ब) दीर्घ मुदतीचे कर्ज. हे पुढील तक्त्यावरून दिसून येते.

**सहकारी पतपुरवठा : रचना**

- **त्रिस्तरीय रचना**
  - अल्पमुदतीचे कर्ज
  - राज्य सहकारी बँका
  - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
  - प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण
- **द्विस्तरीय रचना**
  - दिर्घमुदतीचे कर्ज
  - राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक
  - प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था विकास बँक

भारतातील सहकारी पतपुरवठा रचना ही त्रिस्तरीय स्वरुपाची असून ती पिरॅमिडच्या आकाराची असते.




**त्रिस्तरीय रचना :**

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था (PACS):**

भारतातील शेतकरी वर्गाला अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी ग्रामीण पातळीवर प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. भारतातील लाखो खेड्यातील शेतकरी वर्गास स्वस्त दारात कर्जपुरवठा करून त्याची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी या संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी या संस्थांचे सभासद असतात. सभासदाकडून जमा होणारे भांडवल व ठेवी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कमी व्याजदराने मिळणारे कर्ज सर्व निधीतून या संस्था शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी कर्जे देतात.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती :**

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थेची सुरवात सन १९०४ मध्ये झाली असली तरी खऱ्या अर्थाने प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती स्वातंत्र्योत्तर काळात घडून आल्याचे दिसून येते. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती १९५०-५१ ते २०१२-१३ या काळातील प्रगती कोष्टक क्र. ३.१ वरून पाहता येईल.

### कोष्टक क्र. ३.१

### प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती

| अ. क्र. | तपशील | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९५०-५१ | २०००-०१ | २०१२-१३ | २०१८-१९ |
| १. | संस्था | १.१५ | ९५६३० | ९३४८८ | ९५९९५ |
| २. | सभासद संख्या | ५१.४० | ९०१७० | १२७४६८ | १३२०२९ |
| ३. | ठेवी | ४२८ (कोटी) | ७०३० (कोटी) | ६१४९४० (कोटी) | १३३०१०३६ |
| ४. | कर्जपुरवठा | २३ (कोटी) | १७५४०(कोटी) | १२५९९२७ (कोटी) | ११५०४८०६ |

स्रोत: NAFSCOB (www.nafscob.org)

कोष्टक क्र. ३.१ मध्ये प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची १९५०-५१ ते २०१८-१९ या कालावधीतील प्रगती स्पष्ट केली आहे. सन १९५०-५१ मध्ये संस्थांची संख्या १.१५ लाख होती. सन २०००-०१ मध्ये त्याची संख्या ९५६३० इतकी तर सन २०१२-१३ मध्ये संस्थेची संख्येत घट होवून ती संख्या ९३४८८ इतकी झाली. सन २०१८-१९ मध्ये संस्थांची संख्या ९५९९५ इतकी झाली. संस्थांच्या पुन:संघटनामुळे ही घट झाल्याची दिसून येते. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संख्येत सन १९५०-५१ च्या तुलनेत मोठी घट झालेली दिसते. सन १९५०-५१ मध्ये एकूण सभासद संख्या ५१.४० (लाख) इतकी होती. त्यामध्ये वाढ होऊन सभासद संख्या सन २०१२-१३ मध्ये १२७४६८ इतकी झाली. तर सन २०१८-१९ यामध्ये वाढ होवून १३२०२९ इतकी झाल्याचे दिसून येते. सभासद संख्येत सातत्याने वाढ होत आहे.

सन १९५०-५१ या काळात एकूण ठेवी ४२८ कोटी रू. च्या होत्या. यामध्ये प्रचंड वाढ होवून सन २०१२-१३ मध्ये एकूण ठेवीची रक्कम ६,१४,९४० कोटी रू. इतकी झाली आहे. तर सन २०१८-१९ मध्ये एकूण ठेवींची रक्कम १३३०१०३६ इतकी वाढल्याचे दिसून येते. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या ठेवीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. या संस्थांनी सन १९५०-५१ मध्ये सभासदांना एकूण कर्जपुरवठा २३ कोटीचा केला होता. त्यामध्ये प्रचंड वाढ होऊन सन २०१८-१९ मध्ये ११५०४८०६ कोटी रु. चा कर्जपुरवठा केला आहे.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) कर्जपुरवठा :**

ग्रामीण भागातील शेतकरी सभासदांना अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा या संस्थामार्फत केला जातो.

**२) कृषी वस्तूचा पुरवठा :**

ग्रामीण भागातील शेतकरी सभासदांना शेतीसाठी उपयुक्त बी-बियाणे, खते, अवजारे, जंतूनाशके, पशुखाद्य इ. प्रकारच्या वस्तूंचा पुरवठा वाजवी किंमतीत व नियमितपणे करण्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जाते.

**३) शेतीसाठी सेवा :**

शेतकरी वर्गाला त्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालास साठा करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, शेतमाल बाजारपेठेत पाठविण्यास मदत करणे, शेतमाल प्रक्रिया संस्थाना पाठविणे व मालविक्रीची बिले संबंधित व्यापारी किंवा संस्थेकडून वसूल करून शेतकऱ्यांस भागविणे इ. सेवा दिल्या जातात.

**४) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था दुर्मिळ भागातील संस्थाना आणि सभासदांना अन्नधान्य, रॉकेल, साखर इ. सारख्या जीवनावश्यक वास्थूंचा पुरवठा नियमित व वाजवी दरात करतात त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेचे जीवन सुसहाय्य बनते.

**५) तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन :**

शेतकऱ्यांना शेतीविषयी व उत्पादनवाढीसाठी तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन करण्याचे काम या संस्था करतात. त्यामध्ये नवीन बियाणे, खते, जंतुनाशके इ. चा वापर तसेच हवामान बदलाचे पिकावर होणारे परिणाम, जमिनीचा कस सुधारण्यासाठी करावयाचे प्रयत्न इ. बाबत तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन करण्याचे कार्य या संस्था करतात.

**६) बचत व काटकसरीची सवय :**

ग्रामीण भागातील सभासद शेतकऱ्यांना बचतीची व काटकसरीची सवय लावण्याचे कार्य या संस्थामार्फत केले जाते.

**७) दुवा म्हणून कार्य करणे :**

शेतकरी सभासद आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्यातील दुवा म्हणून प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थां कार्य करत असतात.

**८) उपभोगासाठी कर्जे देणे :**

छोटे शेतकरी व शेतमजूर यांच्या कर्ज परतफेडीची कुवत विचारात घेवून त्यांना उपभोगासाठी कर्जे देणे.

**९) विक्री व्यवस्थेसाठी मार्गदर्शन :**

ग्रामीण भागातील शेतकरी सभासदांना शेतमालाची विक्रीव्यवस्था करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य या संस्थामार्फत केले जाते.

**१०) विविध योजनामध्ये सहभागी घेणे :**

ग्रामीण भागांच्या विकासासठी आखण्यात आलेल्या आर्थिक व सामाजिक कल्याणाच्या योजनामध्ये सहभागी होण्याचे कार्य या संस्था करतात.

या सर्व कार्याबरोबरोबरच शेती विकासाच्या दृष्टीकोनातून माती परीक्षण, पिक रचना, खतांचा वापर, नैसर्गिक आपत्ती, आधुनिक शेती, तांत्रिक माहिती इ. बाबत या संस्था शेतकऱ्यास मदत करतात.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या समस्या/दोष :**

भारतात १९०४ पासून प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था शेती व्यवसायाच्या विकासासाठी कार्य करीत आहेत. स्वातंत्र्योत्तर सहकारी चळवळीच्या विकासाबरोबर या संस्थाच्या कार्यपद्धतीत अनेक समस्या किंवा दोष निर्माण झाले आहेत. त्याचे विश्लेषण आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) दुर्बल व अकार्यक्षम संस्था :**

सन १९६९ च्या भारतीय ग्रामीण पत पुरवठा पाहणी समितीच्या मते, भारतातील बहुसंख्य प्राथमिक कृषी सहकारी पुरवठा संस्था या कार्यक्षम नसून त्या अकार्यक्षम आहेत. तसेच उत्पादनावर आधारित पतपुरवठा करण्यामध्ये त्यांचे कार्य असमाधानकारक आहे. या संस्थांची सभासद संख्या कमी असून त्यांचे भांडवलदेखील अपुरे आहे. त्यामुळे या संस्था शेतीच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यात असमर्थ ठरतात.

**२) असमतोल विकास :**

प्राथमिक कृषी सहकारी पुरवठा संस्थांचा देशातील सर्व राज्यात सारख्याच प्रमाणात विकास झालेला नाही. देशातील पश्चिम व दक्षिण भागातील संस्था क्रियाशील आहेत तर उत्तर व पूर्व भागातील संस्था कमकुवत आहेत. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, गोवा तामिळनाडू या राज्यातील विकास इतर उर्वरित राज्यांच्या तुलनेत प्रगती पथावर आहे. असमतोल विकासामुळे धोरणांच्या बाबतीत सारखेपणा येत नाही.

**३) सदोष कर्जविषयक धोरण :**

भारतातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात व वेळेवर कर्जपुरवठा करीत नाहीत हे कर्ज बऱ्याच वेळा एका हफ्त्यात व रोखीने दिले जाते. त्याचबरोबर पिकांच्या तारणावर कर्जे देण्यात या संस्था अपयशी ठरल्या आहेत. तसेच दिलेल्या कर्जाची वेळेत वसुली न झाल्याने या संस्थामध्ये थकबाकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

**४) भांडवल टंचाई :**

या संस्था आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम नसल्यामुळे तसेच संस्थेकडे गोळा होणारी ठेव व भागभांडवल कमी असल्यामुळे सभासदांची आर्थिक गरज भागविता येत नाही. वाढत्या सभासदांची संख्या व कर्जाची मागणीची पूर्तता भांडवल टंचाईमुळे पूर्ण करता येत नाही.

**५) सदोष व्यवस्थापन :**

भारताच्या ग्रामीण भागात सध्या कार्यरत असलेल्या १,१२,३१९ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थापैकी बहुतांशी संस्थांचे व्यवस्थापन सदोष आहे. या संस्थेचे व्यवस्थापन हे सदोष असल्याने अजूनही सुशिक्षित व कार्यक्षम व्यक्तींचा समावेश असलेले व्यवस्थापन या संस्थाना लाभलेले नाही. बरेच सभासद संस्थेच्या कार्यात फारसा रस घेत नाहीत परिणामी बऱ्याच संस्थांच्या वार्षिक सभाही व्यवस्थित होत नाहीत.

**६) निष्क्रिय संस्था :**

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थामध्ये सुरवातीला निष्क्रिय पतपुरवठा संस्थाची संख्या अधिक होती. राज्य निहाय आकडेवारीच्या आधारावर ईशान्य कडील राज्यातील या संस्थेचे निष्क्रियपणा दिसून येतो. या संस्थाचे संचालन योग्यपणे होत नव्हते. या पतपुरवठा संस्थांचे अकार्यक्षम व निष्क्रियतेचा दर सातत्याने वाढत आहे. त्यामुळे सभासदांचे हित साधले जावू शकत नाही.

**७) कर्जवाटपात दिरंगाई :**

या संस्थामध्ये शेतकऱ्यांना वेळेवर कर्जपुरवठा होत नाही त्यामुळे शेतकरी कर्जाचा वापर उत्पादक कार्यासाठी वापर न करता अनुत्पादक कार्यासाठी करतात. त्यामुळे त्या सभासदांना कर्जाची परतफेड करण्याची क्षमता घटत जाते.

**८) वाढती थकबाकी :**

भारतात वाढती थकबाकी ही सर्वात मोठी गंभीर समस्या आहे. ही थकबाकी सातत्याने वाढत आहे हे थकबाकीचे प्रमाण जवळपास ३५ टक्क्यांच्या आसपास आहे. व्यक्तींना कर्ज देणे व कर्जवसूलीसाठी योग्य प्रयत्न न करणे इत्यादी बाबीमुळे थकबाकीमध्ये वाढत होत आहे.

**९) सदोष हिशोब तपासणी :**

भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थाची हिशोबतपासणी नियमितपणे होत नाही. बहुसंख्य पतपुरवठा संस्थांचे संचालक मंडळ व सभासद याबाबत निष्क्रिय असतात. त्यामुळे अशा संस्थात गैरव्यवहार आढळून येतात.

**१०) लहान शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष :**

या पतपुरवठा संस्थेचे सर्वात मोठा दोष म्हणजे लहान शेतकऱ्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. या संस्थामध्ये कागदोपत्री ४०% पेक्षा अधिक कर्जपुरवठा वितरीत केला जातो असे असले तरी त्याचा अधिक फायदा मोठ्या शेतकऱ्यांना होत आहे मात्र लहान शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

**११) कर्जवाटप व शेतमाल विक्री यांच्यात सांगड नाही :**

कृषी क्षेत्राला होणारा अर्थपुरवठा व शेतमाल विक्री यांच्यात योग्य समन्वय साधण्याची मूलभूत जबाबदारी ही या संस्थाची असते. परंतु या संस्थेमध्ये समन्वय साधता येत नाही आजही प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था आणि सहकारी विपणन संस्था यांच्यात समन्वय नसल्याचे दिसून येते.

**१२) आर्थिक परावलंबन :**

भारतातील बहुतांशी कृषी पतपुरवठा संस्था या भांडवलासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकावर अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील लोकांमध्ये बचतीची सवय लावण्यात व बचतीच्या रूपाने रक्कमा जमा करण्यात या संस्थाना अनेक अडचणी येत आहेत.

**उपाययोजना :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाच्या कार्यातील दोष दूर करण्यासाठी उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्थांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रयत्न करावेत. या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय त्यांच्या कार्यातील निष्क्रियता कमी होणार नाही.

२) या संस्थांनी आर्थिक स्वावलंबणासाठी आपल्या सभासदाकडून ठेवी/बचती स्विकाराव्यात.

३) प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्थांनी सभासदसंख्या व संस्थेचा व्यवहार वाढविण्यावर भर द्यावा.

४) या संस्थांनी कर्जाची वसुली वेळेवर व पूर्ण होण्यासाठी शेतमाल विक्रीची सांगड घातली पाहिजे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

५) प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्थांचे कामकाज राजकारणविरहीत करण्याचा प्रयत्न करावा.

६) या संस्थांनी सभासदांना दिलेल्या कर्जाचा योग्य विनियोग होतो कि नाही याकडे लक्ष द्यावे.

७) या संस्था अधिक कार्यक्षम बनण्यासाठी व्यवस्थापनात अनुभवी व शिक्षित व्यकींचा समावेश असणे आवश्यक आहे.

८) ग्रामीण भागातील कृषी सहकारी संस्थामधील कर्मचारी संचालक मंडळ व सभासदांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

९) प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्थांची हिशेब तपासणी वेळेवर करून घेण्यासाठी व्यवस्थापनाने प्रयत्नशील रहावे.

## ३.२.२ आपली प्रगती तपासा – १

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) भारतातील पहिला सहकार कायदा .................. यावर्षी पास झाला.

अ) १८८४ ब)१९०४ क) १९१२ ड) १९२१

२) .................... या देशात सर्वात प्रथम सहकार चळवळीची सुरवात झाली

अ) भारत ब) अमेरिका क) स्कॉटलंड ड) इंग्लंड

३) प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था ................ पातळीवर काम करतात.

अ) ग्रामीण ब) जिल्हा क) राज्य ड) देश

४) भारतातील सहकारी पतपुरवठा रचना ही .......... स्वरूपाची आहे.

अ) एकस्तरीय ब) द्विस्तरीय क) त्रिस्तरीय ड) बहुस्तरीय

**उत्तरे :** १) १९०४ २) इंग्लंड ३) ग'ामीण ४) त्रिस्तरीय

## ३.२.३ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (DCCB) :

भातातील कृषी पतपुरवठ्याची रचना त्रिस्तरीय असून जिल्हा पातळीवर म्हणजेच मधल्या स्तरावर कार्य करणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भूमिका पतपुरवठ्यात महत्त्वाची आहे. देशात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या डी.सी.सी. (DCC) बँक या नावाने लोकप्रिय आहेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या जिल्हा स्तरावर कार्य करीत असतात. म्हणून या बँकांना जिल्हा मध्यवर्ती बँका असे म्हंटले जाते. त्या त्या जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी संस्था या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असतात. जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था व राज्य सहकारी बँका यामध्ये दुवा साधण्याचे काम या बँका करीत असतात. देशात सर्वप्रथम १९०६ मध्ये उत्तर प्रदेशात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापन झाली. सन १९१२ च्या सहकारी कायद्यातील सुधारणा केल्यानंतर या बँकेच्या स्थापनेस मान्यता देण्यात आली. एकंदरीत भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था असून शेतीला प्राधान्यक्रम असल्यामुळे साहजिकच जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला उच्च स्थान आहे.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कार्ये :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कार्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाना पतपुरवठा करणे.

२) जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था व राज्य सहकारी बँका यामधील दुवा म्हणून कार्य करणे.

३) जिल्ह्यातील सभासद व बिगर सभासदाकडून ठेवी स्वीकारणे.

४) जिल्हा स्तरावर सहकारी चळवळीचे नेतृत्व करणे व सहकारी चळवळीचा विकास जिल्हा स्तरावर घडवून आणणे.

५) ग्रमीण भागात बँक व्यवसायाचा विस्तार घडवून आणून जनतेला बँकिंग व्यवहाराची सवय लावणे.

६) प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाना गुंतवणूक सल्ला व मार्गदर्शन करणे.

७) केंद्र व राज्य सरकारमार्फत ग्रामीण भागाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे.

८) जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थेच्या कामजावर नियंत्रण ठेवणे.

९) राज्य सहकारी बँकेची जिल्हा प्रतिनिधी बँक म्हणून कार्य करणे.

**प्रशासकीय रचना :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासदांची सभा ही सर्वोच्च असते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे धोरण यामध्ये ठरविले जाते. सभासद आपले प्रतिनिधी संचालक मंडळावर निवडून देतात. राज्य सहकारी बँक आपला एक प्रतिनिधी संचालक मंडळावर पाठविते. संचालक मंडळाची मुदत ५ वर्षे असते. संचालक मंडळ अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करते. कार्याच्या सोयीसाठी काही संचालकांच्या उपसमिती केल्या जातात. बँकेच्या अंतर्गत व्यवस्थापनासाठी कृषी विभाग, तपासणी विभाग व अन्य विभाग असतात. या विभागात विभागप्रमुख व आवश्यकतेनुसार कर्मचारी नियुक्त केले असतात. या बँकेचे कार्यक्षेत्र मर्यादित असते.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती :**

भारतात पहिली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक १९०६ साली उत्तर प्रदेशात मध्ये स्थापन झाली. त्यांनतर या बँका भारतातील विविध राज्यात व प्रांतात निर्माण झाल्या. १९२९ पर्यंत भारतात ५८६ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका निघाल्या होत्या. १९५०-५१ ते २०१०-११ या काळात भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती आपणास कोष्टक क्र. ३.२ वरून पाहता येईल.

**कोष्टक क्र. ३.२**

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती**

| अ.क्र. | तपशील | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९५०-५१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१८-१९ |
| १. | बँकांची संख्या | ५०५ | ३७१ | ३७१ | ३६३ |
| २. | सभासद संख्या | २.०७ लाख | १८,३७,४३३ | ३१,४६,०७०, | ४४,०१,३९० |
| ३. | कर्जे | ८३ कोटी | १८,२७,६०५ | ३९,१०,११६ | २,८०,८५,४१२ |
| ४. | ठेवी | ३८ कोटी | ६६,७९,७२१ | १,६१,३०,८८२ | ३,६६,९६,०४५ |
| ५. | कामगार संख्या | -- | १,१३,०८८ | ८७,९२२ | ८३,४४९ |

स्रोत : NAFSCOB (www.nafscob.org)

कोष्टक क्र. ३.२ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची १९५०-५१ ते २०१८-१९ या कालावधीतील प्रगती स्पष्ट केली आहे. सन १९५०-५१ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची संख्या ५०५ होती. त्यामध्ये घट होऊन २०००- ०१ आणि २०१०-११ मध्ये ३७१ झाली आहे. तसेच २०१८-१९ मध्ये पुन्हा बँकांच्या संख्येमध्ये घट होवून ३६३ झाल्याचे दिसून येते याचे कारण म्हणजे एक जिल्हा-एक बँक या धोरणाचा स्वीकार केल्यामुळे अनेक बँकांचे एकत्रीकरण झाले त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संख्येत मोठी घट झाली. या बँकेच्या सन १९५०-५१ मध्ये सभासद संख्या २.७ लाख इतकी होती. यामध्ये वाढ होऊन सन २०००-०१ मध्ये १८,३७,४३३ इतकी सभासद संख्या असून सन २०१०-११ मध्ये सभासदांची संख्या ३१,४६,०७० तर २०१८-१९ मध्ये ४४,०१,३९० इतकी सभासद संख्या झाली असून सन २०००-०१ च्या तुलनेत प्रचंड वाढ आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी सन १९५० -५१ मध्ये ८३ कोटी रू. चा कर्जपुरवठा केला होता. सन २०००-०१ व २०१०-११ या काळात अनक्रमे १८,२७,६०५ लाख व ३९,१०,११६ लाखाचा कर्जपुरवठा करण्यात आला आहे. तर सन २०१८-१९ मध्ये या बँकांनी रु. २,८०,८५,४१२ इतका मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केल्याचे दिसून येते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका सभासद व बिगर सभासदांकडून मोठ्या प्रमाणात ठेवी स्वीकारत असतात. सन १९५०-५१ मध्ये जवळपास ३८ को. रूपयांच्या ठेवीचे संकलन करण्यात आले. सन २०००-०१ व २०१० -११ मध्ये अनुक्रमे ठेवीचे

हे प्रमाण ६६,७९,७२१ लाख व १,६१,३०,८८२ लाख इतके होते आणि २०१८-१९ मध्ये या ठेवीमध्ये वाढ होवून ३,६६,९६,०४५ इतके झाल्याचे दिसून येते. हे प्रमाण सन २०००-०१ च्या तुलनेत जवळपास नऊ पट झाल्याचे दिसून येते. सन २०००-०१ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये एकूण १,१३०८८ कर्मचाऱ्यांना रोजगार होता. त्यामध्ये घट होवून सन २०१०-११ मध्ये ही कर्मचाऱ्यांची संख्या ८७,९२२ तर २०१८-१९ मध्ये कर्मचाऱ्यांची संख्या ८३,४४९ इतकी झाली आहे.

**भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकासमोरील समस्या/ अडचणी :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकानी विविध बाबीमध्ये लक्षणीय स्वरुपाची वाद केली असली तरी या बँकासमोर अनेक समस्या किंवा अडचणी आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) अपुरी साधनसामुग्री :**

भारतातील भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडे आपले आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री अपुरी आहे. तसेच सभासदांकडून ठेवी गोळा करण्यातील अपयश आणि अपुरे भांडवल यामुळे या बँका प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची पतपुरवठ्याची गरज पूर्ण करू शकत नाहीत.

**२) कर्ज वाटप व भागभांडवल :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्जवाटपाबरोबर भागभांडवलात वाढ करावी ही अपेक्षा होती परंतु या बँकांच्या कर्जाच्या प्रमाणात त्यांच्या भांडवलात वाढ झाली नाही. काही राज्यात ठेवीदारांना पुरेशा बँकिंग सुविधा देण्यात या बँकांना अडचणी आल्या आहेत. त्यामुळे ठेवीदारांच्या बरोबर चांगले संबंध प्रस्थापित न झाल्याने ठेवींचे प्रमाण वाढले नाही.

**३) वाढती थकबाकी :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी सभासद व प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाना दिल्या जाणाऱ्या कर्जाची वसुली होत नसल्यामुळे थकबाकीची समस्या निर्माण झाली आहे. सन १९५०-५१ मध्ये या बँकांची थाबाकी ०.९०% होती तर २००७-०८ मध्ये यामध्ये वाढ होवून ३०.७६% इतकी झाली आहे त्यामुळे या बँका तोट्यात आल्या आहेत.

### ४) कर्जवाटपातील त्रुटी :

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे कर्जाच्या वापरावर लक्ष ठेवण्यासाठी पुरेशी यंत्रणा नाही. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आपल्या कार्यक्षेत्रात विकासासाठी कर्जपुरवठा करताना असमान पद्धतीने कर्जाचे वितरण/ वाटप केले आहे. त्याचबरोबर वैयक्तिक सभासदांना व्यापारांना मोठे रक्कमेचे व शंकास्पद कर्जवाटप करण्यात आले.

### ५) कुशल व अनुभवी कर्मचाऱ्यांचा अभाव :

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सेवेत असणारे बहुतांशी कर्मचारी हे अकुशल व अनुभवहीन असल्यामुळे बँकेचे व्यवस्थापन व कारभार सुरळीत व पारदर्शक राहत नाही त्याचा परिणाम म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा विकास होत नाही.

### ६) बँकिंग सुविधांचा अभाव :

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये बँकिंग सुविधांचा अभाव दिसून येतो. देशातील पंजाब, हरयाणा, मध्य प्रदेश व बिहार या राज्यात इतर व्यापारी बँकांच्या तुलनेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या बँकिंग सुविधा देण्यामध्ये अपयशी ठरल्या आहेत. याचा नकारात्मक परिणाम बँकिंग व्यवहारावर झाला आहे.

### ७) प्रशिक्षित सेवकवर्गाचा अभाव :

देशातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामधील सेवक वर्गास पुरेसे बँकिंग व्यवहाराचे प्रशिक्षण दिलेले नाही. त्यामुळे या बँकांचे व्यवहार सदोष असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर या बँकामधील सेवक वर्गावर पुरेसे लक्ष ठेवण्यासाठी अधिकारी वर्गाचा अभाव आहे.

### ८) राजकारणाचा हस्तक्षेप :

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामधील विशिष्ट राजकीय पक्षाच्या वर्चस्वामुळे बँकेच्या दैनंदिन व्यवहारामध्ये त्याचा हस्तक्षेप असतो. त्यामुळे त्यांच्या बाजूने असणाऱ्या संस्थांना सभासदत्व देतात.

### ९) गुंतवणूक धोरणाचा अभाव :

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून विविध ठिकाणी गुंतवणुक करण्याचा निर्णय घेतला जातो. परंतु हा निर्णय रिर्झव्ह बँक ऑफ इंडिया च्या सल्ल्यानुसार घेतला जात नाही. त्यामुळे या बँकाकडून नवीन उद्योगात तसेच सरकारी रोख्यामध्ये गरजेपेक्षा अधिक गुंतवणूक केली जाते. त्यामुळे अयोग्य गुंतवणूक धोरणाचा फटका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना होतो.

**१०) देखरेख यंत्रणेचा अभाव :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पातपुरवठा संस्थांच्यावर योग्य देखरख व नियंत्रण करणारी सक्षम यंत्रणा नाही. त्यामुळे कर्जदारकडून कर्जाचा गैरवापर व कर्ज चुकविण्याचे प्रमाण वाढत आहे.

**उपाययोजना :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कार्यातील दोष दूर करण्यासाठी उपाययोजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) या बँकांनी आपल्या ठेवीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जाची गरज पूर्ण होईल.

२) या बँकांनी कर्जवाटप करताना कर्जवाटपात सुलभता आणावी.

३) या बँकांच्या कार्यपद्धतीत कार्यक्षमता व नियमितपणा आवश्यक आहे.

४) या बँकांनी आपला निधी योग्य ठिकाणी गुंतवावा. कोणाच्याही दबावाखाली येवून निधी गुंतवू नये.

५) थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी कर्जाची वसुली काटेकोरपणे करावी. प्रसंगी कायदेशीर कारवाई करावी.

६) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कार्यक्षमपणे चालावी व इतर संस्थांच्यावरती देखरेख करण्यासाठी प्रशिक्षित सेवक वर्ग नियुक्त करावा.

७) या बँकांनी कर्जवाटप करताना कर्जावर नियंत्रण ठेवावे.

८) या बँकांनी राजकीय दबावापासून दूर रहावे त्यामुळे वसुलीची समस्या राहणार नाही.

## ३.२.३ आपली प्रगती तपासा – २

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) भारतात पहिली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ............ साली स्थापन झाली.

अ) १८५६ ब) १८९० क) १९०६ ड) १९५०

२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना सर्वप्रथम ......... राज्यात झाली.

अ) मध्यप्रदेश ब) उत्तर प्रदेश क) कर्नाटक ड) महाराष्ट्र

३) प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थावर ................ चे नियंत्रण असते..

अ) भू-विकास बँक ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

क) राज्य सहकारी बँक ड) नाबार्ड

**उत्तरे :** १) १९०६ २) उत्तर प्रदेश ३) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

### ३.२.४ राज्य सहकारी बँका (State Co-operative Bank) :

भारतीय शेतीस कर्जपुरवठा करण्यासाठी प्रत्येक राज्यात त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आहे. या रचनेतील उच्च पातळीवर म्हणजेच राज्य पातळीवर काम करणारी ही राज्य सहकारी बँक आहे. राज्यातील पतपुरवठ्याची गरज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत जाणून घेवून त्यांच्यामार्फत कर्जपुरवठा करण्याचे काम ही बँक करते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि नाबार्ड मार्फत प्राप्त होणाऱ्या निधीचा वापर करून राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक मदत करण्याचे कार्य राज्य सहकारी बँक करते. राज्य सहकारी बँक राज्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्व करत असल्याने तिला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची बँक किंवा शिखर बँक असेही संबोधले जाते.

**अ) व्याख्या : जे.पी.नियोगी**

राज्य सहकारी बँक म्हणजे राज्यातील सहकारी चळवळीला अर्थपुरवठा करणारी राज्यातील सर्वोच्च सहकारी बँक होय.

भांडवलाचे एकत्रीकरण करून विविध क्षेत्रामध्ये आवश्यकतेप्रमाणे निधी देवून तेथील मागासलेपणा दूर करणे, विकासाला चालना देणे व संपूर्ण राज्यातील सहकारी क्षेत्राचा विकास घडवून आणणे या उद्देशाने ही बँक कार्य करते. तसेच रिझर्व्ह बक ऑफ इंडिया आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्यातील दुवा म्हणून देखील ही बँक जबाबदारी पार पडते. अर्थपुरवठा व नियंत्रण या दृष्टीकोनातून राज्यातील सर्वोच्च किंवा शिखर बँक म्हणून ही कार्य करते.

**ब) भांडवल आणि प्रशासकीय रचना :**

ही बँक भागभांडवलाची विक्री करून भांडवलाची उभारणी करत असतात. साधारणपणे हे भाग भांडवल सर्व सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँका व राज्य शासनास विकतात. त्यामाध्यामातून

भागभांडवल वसूल करतात. तसेच व्यापारी बँकिंग संस्थाप्रमाणे सभासद व बिगर सभासद व्यक्ति व संस्थेच्या ठेवी स्वीकारतात. कर्जरोख्यांची विक्री करूनही निधी गोळा केला जातो. राज्य सहकारी बँकेचा कारभार हा निवडून दिलेल्या संचालक मंडळामार्फत चालविला जातो हे संचालक मंडळ राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे प्रतिनिधी, इतर सभासद संस्थांचे प्रतिनिधी, राज्य सरकारचे प्रतिनिधी या संचालक मंडळाकडून अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड वर्षाला केली जाऊन त्यांच्याकडून या बँकेचा दैनंदिन कारभार सांभाळण्यासाठी व्यवस्थापकाची नेमणूक केली जाते. त्यांचबरोबर विविध सभा व कार्यकारी मंडळ निर्माण केली जातात. या सर्व माध्यमातून राज्य सहकारी बँकेच्या विकासाला गती दिली जाते. या संचालक मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो.

**क) राज्य सहकारी बँकांची प्रगती :**

भारतात खऱ्या अर्थाने राज्य सहकारी बँकांची प्रगती ही स्वातंत्र्योत्तर काळात झालेली दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात राज्य सहकारी बँकांची प्रगती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**कोष्टक क्र. ३.३**

**राज्य सहकारी बँकांची प्रगती**

| अ.क्र. | तपशील | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९५०-५१ | २००५-०६ | २०१२-१३ | २०१९-२० |
| १. | बँकांची संख्या | १५ | ३१ | ३१ | ३३ |
| २. | सभासद संख्या | — | १५३६९७ | ३३९८९६ | ६७५९०९ |
| ३. | भांडवल | १९० | ६९१४० | १७०११२ | २००८५५९ |
| ४. | कर्जे | ४२ | ४५४०५ | ९३२४९ | १४२४२२२२ |
| ५. | ठेवी | २१ | ४८२६० | ९२५९३ | १२६५४२८२ |

स्त्रोत : NAFSCOB (www.nafscob.org)

कोष्टक क्र. ३.३ मध्ये राज्य सहकारी बँकांची १९५०-५१ ते २०१९-२० या कालावधीतील प्रगती स्पष्ट केली आहे. सन १९५०-५१ या वर्षी संपूर्ण देशात राज्य सहकारी बँकांची संख्या १५ होती. परंतु सन २००५-२००६ व २०१२- २०१३ मध्ये या बँकांची संख्या ३१ होती. तर सन २०१९-२० मध्ये राज्य सहकारी बँकांच्या संख्येमध्ये वाढ होवून ३३ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे

राज्य सहकारी बँकांच्या संख्येतील वाढीबरोबर सभासद संख्येत सन २०१९-२० मध्ये ६,७५,९०९ इतकी लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.

राज्य सहकारी बँकाकडे सन १९५०-५१ मध्ये भांडवल हा १९० कोटी होते त्यामध्ये सातत्याने वाढ होऊन सन २०१९-२० हे भांडवल २०,०८,५५९ को. चे झाले. बँकांच्या सभासदांनी ठेवलेल्या आपल्या ठेवी व राज्य सहकारी बँकांनी त्याच्या व्यावसायिक गरजेनुसार भागभांडवलात वाढ झाल्याचे स्पष्ट दिसते. राज्य सहकारी बँकां आपल्या राज्याच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व इतर सहकारी संस्थांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करते. सन १९५० -५१ मध्ये ४२ कोटींचा कर्जपुरवठा केला होता सन २०१२-१३ मध्ये ९३,२४९ कोटी रू. व सन २०१९-२०२० मध्ये १४२,४२,२२२ को.रू चा कर्जपुरवठा केला. यावरून हे स्पष्ट होते की राज्य सहकारी बँकेने कर्जव्यवहारात कृषी विकासासाठी मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला आहे. सन १९५०-५१ मध्ये या बँकांकडे २१ कोटीच्या ठेवी होत्या. त्यामध्ये वाढ होऊन सन २००५-२००६ व सन २०१२ -२०१३ मध्ये अनुक्रमे ४८,२६० कोटी व ९२,५९३ कोटीच्या ठेवीचे संकलन झाले होते. त्यामध्ये सातत्याने वाढ होत आल्याचे दिसून येत आहे.

## ड) भारतातील राज्य सहकारी बँकांच्या समस्या :

राज्य सहकारी बँकांनी प्रगती केली असले तरी त्याच्या या प्रगतीत असणाया समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

### १) अपुरे भांडवल :

जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेकडून येणाऱ्या कर्जाच्या मागण्या पूर्ण करण्याइतपत आवश्यक भागभांडवल या बँकांकडे नाही. राज्य सहकारी बँकांच्या भाग भांडवलात वाढ होत असली तरी ती वाढ पूर्ण समाधानकारक नाही. भांडवल बाजारातून भांडवल उभारणीत अपयश आले आहे त्यांना या बँकांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी समाधानकारक प्रयत्न केले नाही.

### २) असमतोल विकास :

भारतातील राज्य सहकारी बँकांचा विकास हा सर्व राज्यात समतोल प्रमाणात झालेला दिसून येत नाही. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, केरळ या राज्यात राज्य सहकारी बँकांची जेवढी प्रगती झालेली आहे तेवढी प्रगती इतर राज्यात झालेली दिसून येत नाही. त्यामुळे राज्य सहकारी बँका समतोल विकास घडवून आणण्यात अपयशी ठरल्या आहेत.

### ३) चुकीचे गुंतवणूक धोरण :

बहुतांश राज्य सहकारी बँकांनी आपले गुंतवणूकविषयक धोरण काळजीपूर्वक राबविलेले नाही. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कृषी कर्जपुरवठा खात्याने या बँकेला सहकारी संस्थांचे भाग खरेदी करू नयेत अशी समज देवून सुद्धा राजकीय दबावामुळे या बँकेने त्यामध्ये गुंतवणूक केली आहे. परिणामी अनेकदा हि बँक आर्थिक अडचणीत आली आहे.

### ४) व्यक्तिगत कर्जपुरवठा :

या बँकांनी काही व्यक्तिगत कर्जपुरवठा करू नये असे RBI ने स्पष्ट आदेश दिले आहेत. परंतु काही राज्य सहकारी बँकांनी या नियमाचे उल्लंघन करून व्यक्तिगत कर्जपुरवठा केल्याचे दिसून येते. परिणामी बँकेच्या थकबाकीत वाढ होवून बँकेला नुकसान सहन करावे लागते.

### ५) थकबाकीची समस्या :

सदोष कर्जव्यवहार, कार्जवाटपाकडे दुर्लक्ष, कर्जवसुलीचे अपुरे प्रयत्न, राजकीय दबाव यामुळे कर्जवसुलीत अडथळे येतात. परिणामी या बँकेचे थकबाकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हे प्रमाण सन १९५०-५१ मध्ये १२.०१ टक्के होते. तर २०००-२००१ मध्ये हे प्रमाण १३.४ टक्के इतके होते.

### ६) पर्यवक्षेण व नियंत्रणातील अडचणी :

राज्य सहकारी बँक ही शिखर बँक असल्यामुळे राज्यातील सर्व सहकारी संस्थाच्या पर्यवेक्षण करणे व त्यांच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य राज्य सहकारी बँकांना करावे लागते. परंतु या बँकांकडे अनुभवी प्रशिक्षीत व पुरेसा कर्मचारी वर्गाचे अभाव असतो. तसेच राज्यातील सहकारी संस्थावर योग्य नियंत्रण ठेवू शकत नाही. त्यामुळे राज्य सहकारी बँकांच्या गैरव्यहारांना चालना मिळते.

### ७) मध्यम मुदतीच्या कर्जाकडे दुर्लक्ष :

भारतातील राज्य सहकारी बँका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या मध्यम मुदतीच्या कर्जाच्या गरजा पूर्ण करीत नाही. नाबार्डकडून या बँकांना मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला जातो. परंतु बहुतांश राज्य सहकारी बँकेकडून मागणी करण्यात येणाऱ्या मध्यम मुदत कर्ज प्रकरणाचा अभ्यास न केल्यामुळे या बँकांना आपले आर्थिक व्यवहार किफायतशीर बनविण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. RBI अशा पद्धतीचा कर्जपुरवठा करण्यास उत्सुक असूनदेखील राज्य सहकारी बँकांनी मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

### ८) राजकीय हस्तक्षेप :

राज्य सहकारी बँक या राज्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्व करीत असते. परंतु सहकार चळवळीमध्ये राजकीय लोकांचा अनावश्यक हस्तक्षेप वाढत असतो त्यामुळे ही सहकारी चळवळ न बनता ती राजकीय चळवळ बनते त्याचा विपरीत परिणाम होवून सहकार चळवळ व संस्था नुकसानीत जातात.

### ९) सदोष कर्जव्यवहार :

अनेक राज्य सहकारी बँका या सभासद संस्थांची आर्थिक स्थिती लक्षात घेता कर्जपुरवठा करतात. कर्ज मागणी अर्जाची छाननी न करता, योग्य तारण न घेता मर्यादेपेक्षा जास्त कर्जपुरवठा केला जातो. तसेच कार्जवसुलीकडे दुर्लक्ष केल्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढून बँका आर्थिक अडचणीत आल्या आहेत.

### उपाययोजना :

राज्य सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीतील असे विविध दोष दूर करण्यासाठी पुढील उपाययोजना सांगता येतील.

१) राज्य सहकारी बँकांनी शाखांच्या संख्येत वाढ करण्यासाठी प्रयत्न करावेत.

२) राज्य सहकारी बँकांचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम व निर्दोष बनवण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी.

३) राज्य सहकारी बँकांनी संस्थात्मक स्वरुपाची सभासदसंख्या वाढविण्यावर भर द्यावा.

४) या बँकांनी थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी कर्जवसुली व कर्जवाटप या कार्यावर अधिक काटेकोर लक्ष देणे गरजेचे आहे.

५) राज्य सहकारी बँकांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकावर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

६) राज्य सहकारी बँकांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व इतर प्रकारच्या सहकारी बँकांना मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करावा.

७) राज्य सहकारी बँकांना राज्य शासनाने आर्थिक साहाय्य व मदत करावी.

८) बँकांचा कारभार हा राजकारणविरहीत असावा कारण राजकीय लोकांचा अनावश्यक हस्तक्षेप वाढत असल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम होवून सहकार चळवळ व संस्था नुकसानीत जातात.

### ३.२.३ आपली प्रगती तपासा – ३

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) देशात सहकारी बँकांची शिखर बँक म्हणून ........ बँक ओळखली जाते

अ) राज्य सहकारी बँक ब) नाबार्ड

क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ड) यापैकी नाही

२) राज्य पातळीवर सहकारी बँकांची शिखर बँक म्हणून ........ बँक ओळखली जाते.

अ) राज्य सहकारी बँक ब) नाबार्ड

क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ड) यापैकी नाही

३) भारतात एकूण ....... राज्य सहकारी बँका आहेत.

अ) ३० ब) ३१ क) ३२ ड) ३३

४) राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळाचा कार्यकाल ...... वर्षाचा असतो.

अ) २ वष ब) ३ वर्षे क) ४ वष ड) ५ वर्षे

**उत्तरे :** १) नाबार्ड २) राज्य सहकारी बँक ३) ३१ ४) ५ वर्षे

**द्विस्तरीय रचना :**

स्वातंत्र्यापूर्व काळात देशातील शेतकऱ्यांची दीर्घकालीन कर्जाची गरज सावकाराकडून पूर्ण केली जात असे. पण या सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात असे. परंतु त्यानंतर राज्य सरकार व सहकारी पतपुरवठा संस्था व बँका यांच्याकडून दीर्घकालीन कर्जाची तरतूद शेती करण्यासाठी केली जात होती. परंतु या संस्थांतील असणाऱ्या अडचणीमुळे दीर्घकालीन कर्ज पुरवठा करण्यास या संस्था असमर्थ ठरल्या. म्हणून शेतकऱ्यांस दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करण्यास एखाद्या स्वतंत्र संस्थेची आवश्यकता होती यासाठी भूविकास बँकांची स्थापना झाली

### ३.२.५ भू–विकास बँका (Land Development Banks) :

भारतात शेतीला अल्प व मध्यम मुदतीचा करण्याची जबाबदारी राज्य सहकारी बँकांनी घेतलेली आहे. परंतु शेतीच्या विकासासाठी दीर्घकालीन स्वरूपाच्या सुधारणा आवश्यक आहेत.

शेतीती बांध घालणे, पाणीपुरवठा, विद्युतपंप खरेदी, कृषी अवजारांची खरेदी, जमीन सपाटीकरण इ.साठी मोठी रक्कम गुंतवावी लागते यासाठी दीर्घकालीन कर्जाची आवश्यकता असते म्हणून भू-विकास बँकांची स्थापना करण्यात आली. भारतात १९२० मध्ये पंजाबमधील झांज याठिकाणी पहिली भू-विकास बँक स्थापन झाली. मात्र खऱ्या अर्थाने या भू-विकास बँकांच्या कार्यपद्धतीस, विकासास गती मिळण्यासाठी १९३० मध्ये पास करण्यात आलेला जमीन तारण बँक कायदा (Land Mortgage Bank Act) हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. या कायद्यातील तरतुदीनुसार या बँकांना जमिनीच्या तारणावरती दीर्घमुदतीचा वित्तपुरवठा करण्याचे कायदेशीर अधिकार प्राप्त झाले व त्या अधिकारानुसार देशातील अनेक राज्यामध्ये या भू-विकास बँका सुरु झाल्या कि ज्यांचा उल्लेख जमीन तारण बँक (Land Mortgage Bank) म्हणून देखील केला जात होता. मात्र काळाच्या ओघात अनेक वेगवेगळ्या प्रकारचे बदल या बँकांच्या कार्यपद्धतीत झाले. त्यामधील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे या बँकांच्या नावात बदल करण्यात आला. पूर्वी या बँकांना प्राथमिक भू-विकास बँका (Primary Land Development Banks -PLDB) आणि मध्यवर्ती भू-विकास बँका किंवा राज्य भू-विकास बँका (Central Land Development Banks -CLDB) असे म्हंटले जात होते. मात्र या बँकांचे नामकरण करून प्राथमिक सहकारी कृषी आणि ग'ामीण विकास बँका (Primary Co-operative Agriculture and Rural Development Banks -PCARDB) आणि राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका (State Co-operative Agriculture and Rural Development Banks -SCARDB) असे ठेवण्यात आले. प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका (PCARDB) सर्वसाधारणपणे एका विशिष्ट जिल्ह्यातील काही निवडक तालुके किंवा पूर्ण जिल्ह्यातील कार्यक्षेत्र समाविष्ट करतात तर राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका (SCARDB) या राज्यपातळीवरती म्हणजेच राज्यात मध्यवर्तीपातळीवरती काम करणाऱ्या भू-विकास बँका आहेत कि ज्या त्या राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये कार्यरत असणाऱ्या प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाना पुन:र्वितपुरवठा करणे, त्यांना बँकिंग सेवा सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वित्तपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य करणाऱ्या या बँका आहेत.

**अ) भू-विकास बँकांची रचना (Structure of Land Development Banks) :**

भू-विकास बँकांची रचना द्विस्तरीय स्वरुपाची असते.

१) **प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक** (Primary Co-operative Agriculture and Rural Development Bank -PCARDB)(जिल्हा व तालुका पातळीवर)

२) **राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक** (State Co-operative Agriculture and Rural Development Bank -SCARDB) (राज्य पातळीवर)

भारतातील हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, ओरिसा, पंजाब , राजस्थान आणि तामिळनाडू या राज्यामध्ये द्विस्तरीय स्वरुपाची रचना असल्याचे दिसून येते. म्हणजेच या राज्यात राज्यपातळीवर काम करणाऱ्या राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका आणि जिल्ह्यातील विशिष्ट कार्य क्षेत्रात काम करणाऱ्या प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका असल्याचे दिसून येते.

**ब) प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांची कार्ये (Functions of Primary Co-operative Agriculture and Rural Development Banks) :**

प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांची कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) सावकारांकडून अधिक व्याजदराने घेतलेली कर्जे तसेच अन्य संस्थाकांडून शेती तारणावर घेतलेल्या कर्जाची परत फेडीसाठी अर्थपुरवठा करणे.

२) शेतात कायमस्वरूपी बदल घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करणे. उदा. जमिन सपाटीकरण, पाणी पुरवठा, विहीर खोदाई इ.साठी दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करणे.

३) शेती व्यवसायासाठी उपयुक्त यंत्रे व अवजारे यांच्या खरेदीसाठी, जमीन सुधारणा, विहीर खोदणे इ.साठी दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करणे.

४) शेतकऱ्यांना बचत आणि काटकसरीची सवय लावून त्यांच्याकडून जमा केलेला निधी ग्रामीण विकासासाठी वापरणे.

५) शेतकऱ्यांना दीर्घकालीन कर्जाचा पुरवठा हा जमिनीच्या तारणावर देणे त्याद्वारे सावकारी पाशातून मुक्तता करणे.

६) शेतकऱ्यांना चांगली संग्रहण गृहे उभी करण्यासाठी आणि शेतमाल साठवणुकीसाठी कर्ज परवठा करणे.

७) शेती उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी पतपुरवठा करणे.

८) शेतकऱ्यांना वाटप केलेल्या कर्जाचा पर्याप्त व योग्य कारणांसाठी वापर होतो का यावर लक्ष व नियंत्रण ठेवणे.

## क) प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांची प्रगती (Progress of Primary Co-operative Agriculture and Rural Development Banks) :

प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांची प्रगती पुढील कोष्टक क्र.३.४ वरून स्पष्ट करता येईल.

**कोष्टक क्र.३.४**

**प्राथमिक सहकारी कृषी आणि ग'ामीण विकास बँकांची प्रगती**

| अ.क्र. | तपशील | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९५०–५१ | २००२–०३ | २०१२–१३ | २०१८–१९ |
| १. | बँकांची संख्या | २८६ | ७६८ | ७१४ | ६०२ |
| २. | सभासद (द.लक्ष) | २.१ | ७.६१ | – | – |
| ३. | भाग भांडवल | ०.५२ | ८९१ | १३८६ | १०६८ |
| ४. | ठेवी | – | २२२ | ६०१ | १३०३ |
| ५. | कर्जे | १.२९ | २९५१ | ३४३४ | १५५९४ |

स्त्रोत : १) NAFSCOB (www.nafscob.org)

२) RBI Bulletin Report 2019-20

कोष्टक क्र. ३.४ मध्ये प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांची १९५०–५१ ते २०१८–१९ या कालावधीतील प्रगती स्पष्ट केली आहे. सन १९५०–५१ मध्ये प्राथमिक भू-विकास बँकांची संख्या २८६ होती. त्यामध्ये वाढ होवून सन २०१२–१३ मध्ये ही संख्या ७१४ इतकी झाली आणि २०१८–१९ मध्ये या बँकांच्या संख्येत घट होवून ६०२ झालेली दिसून येते. सन १९५०–५१ मध्ये प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची सभासद संख्या २.१ दशलक्ष होती आणि त्यामध्ये वाढ होवून सन २००२–२००३ मध्ये ७.६१ दशलक्ष इतकी झालेली दिसून येते. सभासद संख्येतील वाढ ही साडे सहापट इतकी असल्याचे दिसून येते. प्राथमिक भू-विकास बँकाचे भागभांडवल हे सन १९५० –५१ मध्ये ०.५२ कोटी होते. त्यामध्ये वाढ होवून सन २०१२ –२०१३ मध्ये १३८६ कोटी इतके झाले मात्र २०१८–१९ मध्ये यामध्ये घट होवून १०६८ झाल्याचे दिसून येते.

प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या ठेवींचा विचार केला तर सन २००२-०३ मध्ये या बँकांच्या ठेवी २२२ कोटी होत्या आणि यामध्ये वाढ होवून सन २०१२ -२०१३ मध्ये ६०१ कोटी झाल्या तर २०१८-१९ मध्ये या ठेवीमध्ये पुन्हा वाढ होवून १३०३ कोटी झाल्याचे दिसून येते. तर शेतकऱ्यांना केलेले कर्जवाटप सन १९५०-५१ मध्ये १.२९ कोटी होते. सन २०१२-२०१३ मध्ये शेतकऱ्यांना वाटप केलेल्या कर्जाची रक्कम ३४३४ को. इतकी झाली आणि २०१८-१९ मध्ये या बँकांनी दिलेल्या कर्जाची रक्कम १५५९४ कोटी वाढलेली दिसून येते. म्हणजेच सन १९५०-५१ ते २०१८-१९ या कालावधीत या बँकांची कर्ज वाटपातील वाढ मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

**ड) राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची कार्ये (Functions of State Co-operative Agriculture and Rural Development Banks) :**

राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) शेतकऱ्यांची सावकारी पाशातून सुटका करून त्यांना शेतीत कायम स्वरूपाचे बदल करण्यासाठी दीर्घकालीन कर्जपुरवठा करणे.

२) राज्यातील सहकारी संस्था, व्यक्ती व इतर संस्था यांच्याकडून दीर्घ मुदतीच्या ठेवी स्वीकारणे.

३) प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या मार्फत शेतकऱ्यांना जमिन तारणावर आधारित दीर्घकालीन कर्जपुरवठा करणे.

४) कर्जरोख्यांची विक्री करून त्याद्वारे दीर्घकालीन भांडवल उभारणी करणे.

५) विविध ठिकाणी भू-विकास बँकांच्या शाखा उघडण्यासाठी जमिनीसारख्या स्थावर मालमत्ता खरेदी करून इमारत बांधणे व त्याठिकाणी भू-विकास बँकांच्या शाखा उघडणे.

६) सरकारने दिलेल्या कर्जरोख्यांच्या हमीच्या जोरावर त्या कर्जरोख्यांची विक्री करून भांडवल गोळा करणे.

७) राज्यातील सहकारी संस्था, व्यक्ती व इतर संस्था यांच्याकडून दीर्घ मुदतीच्या ठेवी स्वीकारणे.

८) ग्रामीण भागातील बचती गतिक्षम करून प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांवर देखरेख ठेवणे व त्याची तपासणी करणे.

## इ) राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची प्रगती (Progress of State Co-operative Agriculture and Rural Development Banks) :

राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची प्रगती पुढील कोष्टक क्र. ३.५ वरून लक्षात येईल.

**कोष्टक क्र. ३.५**

**राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची प्रगती**

| अ.क्र. | तपशील | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९५०-५१ | २००२-०३ | २०१२-१३ | २०१८-१९ |
| १. | बँकांची संख्या | ५ | २० | २० | ७८९ |
| २. | सभासद (द.लक्ष) | ३.९८ | ५.९० | - | - |
| ३. | भाग भांडवल | ०.३१ | ७३२ | १८३९ | ९३९ |
| ४. | ठेवी | - | ५४६ | १०६५ | २४३४ |
| ५. | कर्जे | १.३३ | ३९३४ | ३५२६ | २०६५१ |

स्रोत : १) NAFSCOB (www.nafscob.org)

२) RBI Bulletin Report 2019-20

कोष्टक क्र. ३.५ मध्ये राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची १९५०-५१ ते २०१८-१९ या कालावधीतील प्रगती स्पष्ट केली आहे. राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांची संख्या सन १९५०-५१ मध्ये ५ इतकी होती. त्यामध्ये वाढ होवून सन २०१२-१३ मध्ये २० इतकी झाल्याचे दिसून येते तर या बँकांच्या कार्याचा विस्तार वाढल्यामुळे सन २०१८-१९ मध्ये या बँकांच्या संख्येत ७८९ इतकी मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच या बँकेच्या सभासद संख्येचा विचार केला तर सन १९५०-५१ मध्ये राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची संख्या ३.९८ दशलक्ष होती तर सन २००२-०३ मध्ये ५.९० दशलक्ष इतकी झाल्याचे दिसून येत आहे.

राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकेचे भागभांडवल हे सन १९५०- ५१ व २०१२-१३ मध्ये अनुक्रमे ०.३१ कोटी होते मात्र या भाग भांडवलात वाढ होवून २००२-०३ मध्ये ७३२ कोटी व सन २०१२-१३ मध्ये १८३९ को.रु. झाले तर सन २०१८-१९ मध्ये या भाग

भांडवलात घट होवून ९३९ को. झाल्याचे दिसून येते. सन २००२-०३ मध्ये राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या सर्व सभासदांकडून ५४६ कोटीच्या ठेवी गोळा केल्या होत्या तर या ठेवीमध्ये वाढ होवून सन २०१२-१३ मध्ये १०६५ कोटी आणि सन २०१८-१९ मध्ये २४३४ कोटी इतकी झाल्याचे दिसून येते. या राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकेने सभासद शेतकऱ्यांना सन १९५०-५१ मध्ये १.३३ कोटीचा कर्जपुरवठा केला होता या कर्जपुरवठ्यात प्रचंड वाढ होवून सन २००२-०३ मध्ये ३९३४ को.रु. तर २०१२ -२०१३ मध्ये ३५२६ को. रु. आणि २०१८-१९ मध्ये या कर्ज पुरवठ्यात प्रचंड प्रमाणात वाढ होवून २०६५१ को.रु. इतकी कर्जाची रक्कम वाटप केल्याचे दिसून येते.

## फ) भू-विकास बँकांच्या समस्या :

### १) थकबाकीची समस्या :

वाढती थकबाकी ही भू-विकास बँकांची प्रमुख समस्या आहे. भू-विकास बँकांच्या थकबाकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. याचा परिणाम कर्जवाटपावर झालेला दिसून येतो. बँकांचे सदोष कर्जवाटप धोरण, कर्जवापराकडे दुर्लक्ष, अपात्र व्यक्तींना कर्जपुरवठा, निष्क्रिय वसुली धोरण आणि राजकीय दडपण यामुळे भू-विकास बँकांच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे.

### २) अप्रशिक्षित सेवक वर्ग :

भू-विकास बँकांच्या कार्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असली तरी त्यासाठी आवश्यक असणारा प्रशिक्षित सेवक वर्ग बँकेकडे नाही. त्यामुळे बँकेला आपल्या कार्यात गुणात्मक बदल करता आला नाही. तसेच बँकिंग व्यवसायात त्यांना व्यावसायिकता आणता आली नाही.

### ३) सदोष कर्जवाटप पद्धती :

भू-विकास बँक ही शेतकऱ्यांना शेती तारणावर कर्ज देते. कर्ज देताना जमिनीचे मूल्य, जमिनीची उत्पादकता, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती इ.गोष्टी विचारात घेतल्या जात नाहीत. यामुळे जमिनीचे मूल्य जास्त असणाऱ्या व अल्पभूदारक शेतकऱ्यांना फारच कमी कर्ज मंजूर होते. परिणामी अशा शेतकऱ्यांना शेती उत्पादकता वाढविण्यापासून वंचित रहावे लागते.

### ४) कर्ज परतफेडीची समस्या :

भू -विकास बँकाना सभासद शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करताना त्यांची आर्थिक कुवत पाहून कर्जपुरवठा करणे गरजेचे असते. परंतु तसे न होता कर्ज रकमेचा पुरवठा शेतकऱ्यांना केला जातो.त्यामुळ अशा कर्जाची परतफेड होत नाही परिणामी भू-विकास बँका अडचणीत येतात.

**५) हिसेबतपासणी व देखरेखीचा अभाव :**

भू-विकास बँकेत निवडून आलेल्या सभासदांची गैरहजेरी, विविध समित्यांची बैठकीमधील अनियमीतपणा आणि बेजबाबदारपणा दिसून येतो. त्यामुळे या बँकेची कोणत्याही व्यवहारावर देखरेख व तपासणी असमाधानकारक असल्यामुळे या बँका आपले उद्देश व कार्य पूर्णपणे करू शकत नाहीत.

**६) असमान विकास :**

भू-विकास बँकांचा विकास काही राज्यामध्ये खूप चांगला झाला आहे. उदा.महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक तर काही राज्यामध्ये या भू-विकास बँकांना चांगली प्रगती साधता आलेली नाही यासाठी असमानता दूर करून सर्व राज्यामध्ये या बँकांचा समतोल पद्धतीने विकास साधण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**७) व्यवस्थापकीय दोष :**

भू-विकास बँकेच्या संचालक मंडळात बहुतांश संचालक अनुभव नसणारे, सहकाराची माहिती नसणारे, अशिक्षित व अप्रशिक्षित असतात. याचा परिणाम बँकेच्या व्यवस्थापकीय कार्यावर होतो. परिणामी बँकेचा कारभार व्यवस्थितपणे चालविणे अवघड बनते.

**८) मोठ्या शेतकऱ्यांना लाभ :**

या बँकेच्या कर्जपुरवठ्याचा लाभ मोठ्या शेतकऱ्यांनाच जास्त झाला आहे. या बँकेच्या एकूण पतपुरवठ्यापैकी अधिक हिस्सा मोठ्या शेतकऱ्यांना मिळालेला आहे. मात्र सीमांत व अल्पभूदारक असलेल्या शेतकऱ्यांना या बँकेच्या कर्जपुरवठ्याचा लाभ कमी प्रमाणात झाल्याचे दिसून येते. शेतीचे प्रमाण कमी असल्यामुळे भू-विकास बँक लहान शेतकऱ्यांकडे फारसे लक्ष देत नाही.

याचबरोबर बँकेचे मर्यादित व्यवहार आणि पतपुरवठ्याच्या विकेंद्रीकरणाचा अभाव अशा विविध समस्या भू-विकास बँकेसमोर आहेत.

**ग) उपाययोजना :**

शेतीसाठी दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी प्राथमिक आणि राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या कार्यातील अडचणी किंवा समस्या दूर करण्यासाठी खालील उपाययोजने आवश्यक आहे.

१) भू-विकास बँकांनी शेतकऱ्यांना अल्प वेळेत आणि सुलभ पद्धतीने कर्जवाटप यंत्रणा राबविण्याची गरज आहे.

२) भू-विकास बँकांनी आपली अर्थक्षमता वाढविण्यासाठी बचत ठेवी गोळा करण्यावर भर द्यावा त्यासाठी आपले भागभांडवल व राखीव निधी वाढवावा.

३) भू-विकास बँकांनी प्रशिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, त्याचप्रमाणे सेवकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी. तसेच व्यवस्थापन समितीत तज्ञ, कुशल, सहकाराचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तींचा समावेश करावा.

४) भू-विकास बँकेने प्रामुख्याने शेतकऱ्यांना उत्पादक कारणासाठी कर्ज द्यावे तसेच कर्ज मंजूर करताना शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती, कर्ज परतफेडीची क्षमता, शेतीपासून मिळणारे संभाव्य उत्पन्न इ.गोष्टींचा विचार करावा.

५) सरकारने भू-विकास बँकांना नोंदणी शुल्क व मुद्रांक शुल्कात सुट द्यावी. तसेच बँकेला कर्जवसुलीसाठी व कर्जवापराच्या नियमावलीसाठी मदत करावी.

६) भू-विकास बँकांनी लहान व सीमांत शेतकरी यांना पतपुरवठा करावा. कर्ज देताना दुर्बल घटकांना प्राधान्य द्यावे तसेच कर्जविषयक धोरणात लवचिकता ठेवावी.

## ३.३ सारांश

सहकार हे जीवन जगण्याच्या पध्दतीशी संबंधीत असून त्याचे अस्तित्व मानवी इतिहासाच्या आरंभापासून सुरू आहे. सहकार एक नैसर्गिक प्रवृत्ती व प्रगतीची प्रेरणा आहे. सहकारानेच मानवी जातीच्या अस्तित्वाबरोबर मानवी जीवनाचा सांगोपांग विकास करण्यास मदत होते. म्हणजेच सहकाराशिवाय मानवी विकास अशक्य आहे. सहकार हे स्वंय साहायत्ता संघटन असून सरकारकडून आर्थिक विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून यांचा वापर केला जातो. लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनात बदल घडवून आणण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून सहकाराकडे पाहिले जाते. एच. कल्वहर्टच्या मते, व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्रित येऊन स्वत:च्या व सर्वांच्या आर्थिक हितरक्षणासाठी व वृध्दीसाठी समानतेच्या तत्त्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी पतपुरवठा यंत्रणेस अनन्य साधारण महत्त्व आहे. या यंत्रणेकडून शेतकरी वर्गास शेती व्यवसायासाठी अल्पमुदतीचा कर्जपुरवठा व दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा केला जातो.

१) प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था ही सहकारी पतपुरवठा चळवळीचा मोठा आधार असून त्याचे कार्यक्षेत्र एक गांव आहे या संस्था अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करतात. २) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्हा पातळीवर कार्य करीत असून त्या राज्य सहकारी बँक व

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था यामध्ये दुवा साधण्याचे कार्य करतात. त्या प्राथमिक सहकारी संस्थांना मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करतात. ३) राज्य सहकारी बँका या राज्य पातळीवर कार्य करीत असून संबंधीत राज्यातील सहकारी संस्थांची सर्वोच्च संस्था किंवा शिखर बँक म्हणून कार्यरत असते. ही बँक राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवून योग्य दिशा देण्याचे काम करते. त्याचबरोबर दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करते सध्या देशात ३३ राज्य सहकारी बँका आहेत. भू-विकास बँकाची रचना द्विस्तरीय असून १) प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक (PCARDB) ही जिल्हा व तालुका पातळीवर कार्य करते. प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका सर्वसाधारणपणे एका विशिष्ट जिल्ह्यातील काही निवडक तालुके किंवा पूर्ण जिल्ह्यातील कार्यक्षेत्र समाविष्ट करतात. या बँकांनी शेती व ग्रामीण विकासासाठी काम करणे अपेक्षित आहे. तर राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक (SCARDB) ही राज्य पातळीवर कार्य करते. राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका या राज्यपातळीवरती म्हणजेच राज्यात मध्यवर्तीपातळीवरती काम करणाऱ्या भू-विकास बँका आहेत कि ज्या त्या राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये कार्यरत असणाऱ्या प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाना पुन:र्वितपुरवठा करणे, त्यांना बँकिंग सेवा सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वित्तपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य करतात.

### ३.२.४ आपली प्रगती तपासा – ४

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) दीर्घकालीन कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांची रचना ........ असते.

अ) एकस्तरीय　ब) द्विस्तरीय　क) त्रिस्तरीय　ड) यापैकी नाही

२) भू-विकास बँका ........ क्षेत्रासाठी कर्जपुरवठा करतात..

अ) शेती　ब) उद्योग　क) सेवा　ड) पर्यटन

३) भू-विकास बँका जमीन तारणांवर आधारीत ..... स्वरूपाचा कर्जपुरवठा करते

अ) अल्पकालीन　ब) मध्यमकालीन　क) दीर्घकालीन　ड) अंशकालीन

**उत्तरे :** १) द्विस्तरीय　२) शेती　३) दीर्घकालीन

## ३.४ पारिभाषिक शब्द

| | | |
|---|---|---|
| १) | पॅक्स (PACS) | – प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था |
| २) | डी.सी.सी.बी. (DCCB) | – जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका |
| ३) | एस.सी.बी. (SCB) | – राज्य सहकारी बँका |
| ४) | शिखर बँक | – शेती क्षेत्राला अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करणाऱ्या सहकारी बँक रचनेतील सर्वोच्च बँक होय. |

## ३.५ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्थेचे तीन स्तर सांगा.

२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची दोन कार्ये सांगा.

३) राज्य सहकारी बँकांची दोन उद्दिष्ट्ये लिहा.

४) भू-विकास बँका कोणत्या स्तरावर कार्य करतात ?

५) भू-विकास बँकांचे दोन दोष सांगा.

६) शेतीस दीर्घुदतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था कोणत्या ?

७) जिल्हा मध्यवर्ती बँकांची स्थापना कोणत्या कायद्यानुसार झाली ?

८) भारतातील पहिली राज्य सहकारी बँक कोणती आहे ?

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थेची दोष सांगा व त्यावर योग्य ते उपाय सुचवा.

२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे दोष कोणते आहेत ? हे दोष दूर करण्यासाठी उपाययोजना सुचवा.

३) राज्य सहकारी बँकेच्या समस्या सांगून त्यावर उपाययोजना सुचवा.

४) प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या अडचणी सांगून त्यावर उपाय सुचवा.

५) राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या समस्या सांगून त्यावर उपाय सुचवा.

६) सहकारी पतपुरवठा रचना स्पष्ट करा.

७) मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती व कार्य यांचे मूल्यमापन करा.

८) भारतातील भूविकास बँकांची कार्ये व रचना स्पष्ट करून त्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करा.

## ३.६ आधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) शिंदे आर. के. (१९८०) भारतातील सहकारी चळवळ, रवील पब्लिकेशन, सातारा.

२) सराफ मोहन (१९८९), सहकार, सी. जमनादास आणि कं., मुंबई.

३) रायखेलकर ए.आर व डांगे अशोक (१९८९),सहकार :तत्वे व व्यवहार,मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०.

४) शहा रूपा / दामजी बी.एच. (२००५) सहकाराचा विकास फडके प्रकाशन,कोल्हापूर.

५) कुलकर्णी /भोसले (२००५) सहकाराचा विकास, अजब प्रकाशन,कोल्हापूर.

६) खंदारे सुखदेव, (२०१३) भारतीय अर्थव्यवस्था एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.

७) जोशी सी. जे. व जोशी के. सी.(२०१५) सहकाराचा विकास फडके प्रकाशन, कोल्हापूर.

## सत्र ५ : घटक ४

# भारतातील महत्त्वाच्या सहकारी संस्था


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ भारतातील नागरी सहकारी बँका

४.२.२ बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था

४.२.३ भारतातील ग्राहक सहकारी संस्था

४.२.४ भारतातील सहकारी साखर कारखाने

४.३ स्वंयअध्ययन प्रश्न

४.४ स्वंयअध्यय प्रश्नांची उत्तरे

४.६ संदर्भ ग्रंथ


## ४.० उदिष्ट्ये (Objectives)

१ भारतातील नागरी सहकारी बँकाचा अर्थ, प्रकार, व्यवस्थापन प्रगती आणि समस्या समजावून घेणे.

२. भारतातील बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्य व समस्या समजावून घेणे.

३. भारतातील ग्राहक सहकारी संस्थांचे प्रकार, भूमिका व समस्या समजावून घेणे.

४. भारतातील सहकारी साखर कारख्यान्यांची भूमिका, प्रगती, समस्या व उपाययोजना समजावून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

मागील घटकांमध्ये आपण भारतातील सहकारी बँका व त्यांची कर्जपुरवठा चळवळ, सहकारी पतपुरवठा रचना, त्यामध्ये प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांची कार्ये, प्रगती, व्यवस्थापन, समस्या आणि त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास केला आहे. या घटकामध्ये आपण भारतातील नागरी सहकारी बँकांचे प्रकार, व्यवस्थापन, प्रगती आणि समस्या तसेच भारतातील बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये आणि समस्या, भारतातील ग्राहक सहकारी संस्थांचे प्रकार, भूमिका, समस्या आणि भारतातील सहकारी साखर कारखान्यांची भूमिका, प्रगती, समस्या व उपाययोजना यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

भारतातील सहकारी चळवळीच्या विकासामध्ये अनेक सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. या संस्थांनी प्रामुख्याने भारताच्या ग्रामीण विकासातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशातील नागरी सहकारी बँकांनी शहरी भागातील छोटे व्यापारी, व्यावसायिक, कारागीर, पगारदार व्यक्ती, छोटे उद्योजक यांची कर्जाची गरज भागविली आहे. तसेच ग्राहक सहकारी संस्थाच्यामुळे सभासदांना जीवनावश्यक वस्तू स्वच्छ, निर्भेळ योग्य वजनमापांच्या व किंमतीत उपलब्ध होत आहे. त्यामुळे या सभासदांचा जीवनस्तर सुधारण्यास मदत झाली आहे. भारतातील सहकारी साखर कारखान्यांनी ग्रामीण विकासाची प्रक्रिया गतीमान करण्यामध्ये चांगली भूमिका बजावली आहे. सहकारी साखर कारखाने ग्रामीण विकासाची केंद्रे बनली आहेत. साखर कारखान्यातून अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच या अनुषंगाने अनेक पूरक व्यवसाय सुरू झाल्याने ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान उंचावले आहे. परंतु अलिकडच्या काळामध्ये वरील संस्थांच्या कार्यपद्धतीमध्ये अनेक दोष निर्माण झाले आहेत. त्यामुळे अनेक संस्था आर्थिक दिवाळखोरीत गेल्या आहेत. परंतु प्राप्त परिस्थितीमध्ये या संस्था टिकवून ठेवण्यासाठी शासनाने मदत केली पाहिजे.

### ४.२.१ भारतातील नागरी सहकारी बँका (Urban Co-operative Banks in India)

भारतात सहकारी चळवळीची सुरूवात मुळातच ग्रामीण भागातून झाली. ग्रामीण भागातील लोकांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब लोकांना किमान व्याजदरात कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. परंतु शहारातल अर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांनाही पतपुरवठ्याची गरज असते. ही गरज लक्षात घेवून शहरातील पगारदार, लहान व्यापारी, कारागीर यांना पतपुरवठा करण्याच्या उद्देशाने नागरी सहकारी बँका अस्तित्वात आल्या.

**पूर्वइतिहास :**

नागरी सहकारी बँकांची सुरूवात 'हर्मन शुल्झ' यांनी जर्मनीत केली. सन १८५५ ते १९८५ या काळात जर्मनीमध्ये मध्यमवर्गीय लोकांनी स्थापन केलेल्या हर्मन शुल्झ व इटलीतील लुईगी लुझ्झारी या नागरी संस्थांना खूप यश लाभले. ग्रामीण भागातील लहान व्यापारी, कारागीर यांना पतपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी या संस्था स्थापन झाल्या. या प्रेरणेतून भारतातील डोदे येथील मध्यमवर्गीयांनी ५ फेब्रुवारी १८८९ परस्पर साहाय्यक संस्थेची स्थापना केली. सन १९०५ मध्ये धारवाड येथे 'बेटेगिरी सहकारी पतपुरवठा सोसायटी' तसेच कर्नाटकातील बेंगलोर येथे 'बंगलोर सिटी को-ऑप. क्रेडीट सोसायटीची स्थापना झाली. भारतात सुरूवातीला या संस्थांच्या प्रगतीचा वेग मंद होता. परंतु सन १९१५ मधील मॅकलॅगन समितीच्या शिफारशीनुसार या संस्थांच्या विकासाला चालना मिळाली. दरम्यानच्या काळात नियुक्त करण्यात आलेल्या विविध समित्यांनी भारतात नागरी सहकारी बँकाच्या विकासाबाबत शिफारशी केल्या होत्या. याचा परिणाम म्हणून दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या संस्थांची संख्या वाढण्यात मदत झाली. सन १९४९ मधील बँकिंग कायदा १ मार्च १९६६ पासून नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात आला.

**नागरी सहकारी बँकाचा अर्थ :**

नागरी सहकारी बँकांचा अर्थ समजावून घेण्यासाठी पुढील काही व्याख्यांचा आधार घ्यावा लागतो.

**१) मेहता भन्साळी समिती (सन १९३९) :**

''ज्या नागरी पतपुरवठा संस्थेचे भागभांडवल २०,००० रूपये किंवा त्यापेक्षा अधिक आहे, जी पतपुरवठा संस्था चालू खात्यावर ठेवी स्वीकारते, ज्या चेक्स, ड्राफ्टस्‌द्वारा परत करते त्यास नागरी सहकारी बँका असे म्हणतात.''

**२) बँकिंग नियमन कायदा १९४९ :**

हा कायदा नागरी सहकारी बँकांना सन १९६६ पासून लागू करण्यात आला. या कायद्यानुसार या बँकांना ''प्राथमिक सहकारी बँका'' असे संबोधण्यात आले. या कायद्यानुसार ''ज्या बँकांचे भागभांडवल १ लाख रूपयापेक्षा अधिक आहे, ज्या बंका सामान्य बँकिंग कार्ये करतात आणि ज्या बँका इतर सहकारी संस्थांना सभासदत्व देत नाहीत अशा बँकांना प्राथमिक सहकारी बँका असे म्हणतात.

**नागरी सहकारी बँकांचे प्रकार (Types of Urban Co-operative Banks)**

नागरी सहकारी बँका प्रामुख्याने नागरी भागात कार्यरत असतात. या बँकांचे प्रकार पुढील प्रमाणे पडतात.

## १) एकल पद्धतीच्या बँका (Unit Banking)

या पद्धतीच्या बँका आपल्या एका शाखेच्याद्वारे काम करतात. शाखेद्वारे स्थानिक लोकांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून या बँकांना एकल पद्धतीच्या बँका असे म्हणतात. सदर बँकांचा मोठ्या प्रमाणावर शाखाविस्तार झालेला नसतो. या बँकांचे आकारमान लहान असते. अशा बँकांचा संबंध स्थानिक परिसरातील लोकांशी येत असल्याने अशा स्थानिक बाजारातील चढ उतारांचा परिणाम या बँकावर होतो. आकार लहान स्वरूपाचा असल्याने त्यांच्याकडील वित्तीय साधने अल्प प्रमाणात राहून त्यांच्या विकासावर परिणाम होतो.

## २) शाखा पद्धतीच्या बँका (Branch Banking) :

ज्या नागरी सहकारी बँका आपल्या विविध शाखांमार्फत ग्राहकांना बँकिंग सेवा सुविधा पुरवितात त्यांना शाखा पद्धती बँका असे म्हणतात. बँकेच्या विविध शाखापैकी यातील एक मुख्य शाखा असते व ती इतर शाखांवर नियंत्रण ठेवण्याचे काम करते. या बँकांच्या शाखा स्थानिक क्षेत्रात व स्थानिक क्षेत्राबाहेर कार्यरत असतात. या शाखा देशातील इतर राज्यातही कार्यरत असतात. शाखा बँकिंग पद्धतीमध्ये मुख्य शाखेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. बँकेचा मुख्य कारभार या शाखेतूनच चालतो. बँकेच्या विविध सभा मुख्य शाखेतच होतात. विविध परिपत्रके, निर्णय, सूचना या मुख्य कार्यालयातून शाखांना पाठविल्या जातात. एकल बँकिंग पद्धतीपेक्षा या बँकाकडे अधिक वित्तीय साधने असतात. त्यामुळे त्यांचे आकारमान मोठे असते. तसेच एखाद्या शाखेकडे वित्तीय साधने अपुरी असतील तर मुख्य शाखेकडून याची पूर्तता केली जाते.

## ३) अनुसूचित नागरी सहकारी बँका (Scheduled Urban Co-operative Banks) :

भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४ च्या दुसऱ्या अनुसूचित समाविष्ठ असणाऱ्या बँकांना अनुसूचित बँका म्हणतात. या बँकांना पुढील काही अटी पूर्ण कराव्या लागतात जसे (अ) वसूल भांडवल आणि राखावे निधी २५ लाख रूपयांपेक्षा कमी असता कामा नये. (ब) बँकेचे कोणतेही कार्य ठेवीदारांच्या हितसंबंधावर परिणाम करणारे असू नये. रोख राखीव निधीच्या गुणोत्तराची रक्कम या बँकांना रिझर्व्ह बँकेकडे ठेवावी लागते. रिझर्व्ह बँकेकडून या बँकांना बँकदरानुसार कर्जपुरवठा केला जातो. तसेच या बँकांना निरसन केंद्राचे सभासदत्व ही प्राप्त होत असते.

## ४) बिगर सूचित नागरी सहकारी बँका (Non Scheduled Urban Co-operative Banks)

रिझर्व्ह बँक कायद्याच्या दुसऱ्या सूचित समाविष्ठ न होणाऱ्या बँकांना बिगर सूचित नागरी सहकारी बँका असे म्हणतात. या बँका रिझर्व्ह बँकेच्या कायद्यातील तरतुदींची पूर्तता करण्यास सक्षम

नसतात. या बँकांना सूचित बँकाप्रमाणे बँकदराने नेहमीच्या बँकिंग व्यवहारासाठी कर्ज उपलब्ध होत नाही. या बँकानासुद्धा रोख राखीव निधीच्या गुणोत्तराचे पालन करावे लागते. पण ही रक्कम स्वत:कडेच ठेवावी लागते.

### ५) पगारदार नोकरांच्या पतसंस्था (Salary Earner Society)

शहरी भागात नोकरी करणाऱ्या लोकांच्या कर्जविषयक गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने या संस्था स्थापन करता येतात. साधारणपणे स्थिर उत्पन्न गटातील लोकांना योग्य व्याजदराने कर्जपुरवठा करण्याचे काम या संस्था करतात. अशा प्रकारच्या संस्था अनेक सरकारी, निमसरकारी कार्यालयामधून व उद्योगामधून स्थापना झाल्याचे दिसते. या संस्था आपल्या सभासदांचे अर्थिक कल्याण साध्य करण्याच्या हेतूने व त्यांची सावकारांच्या तावडीतून सुटका करण्यासाठी स्थापन झालेल्या असतात. या संस्थेचे व्यवस्थापन करण्याची व संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळावर असते. पगारदार नोकरांच्या पतसंस्था सभासदांना वैयक्तिक जबाबदारीवर कर्जपुरवठा करतात. हा कर्ज पुरवठा धार्मिक कार्ये, जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी, शैक्षणिक काम इत्यादीसाठी केला जातो.

### ६) सर्वसामान्य नागरी सहकारी बँका (General Urban Co-operative Banks) :

या प्रकारात वरील बँकिंग प्रकाराशिवाय समाविष्ट असणाऱ्या नागरी बँकांचा समावेश होतो. साधारणात: या प्रकारच्या नागरी बँका विशिष्ट शहरापुरत्या मर्यादित कार्यक्षेत्रासाठी स्थापन झालेल्या असतात. या संस्था ठेवी स्वीकारणे व कर्जे देणे याबरोबरच बँकिंगची इतर कार्ये करतात. अशा बँकांचे सभासदत्व त्या क्षेत्रात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस प्राप्त होते. अशा बँकामध्ये काटकसर व पतपुरवठा संस्था यांचाही समावेश होतो.

### नागरी बँका व्यवस्थापन (Management of Urban Co-operative Banks)

भारतातील नागरी सहकारी बँकांचे व्यवस्थापन खालील पद्धतीने होते.

**व्यवस्थापन :**

नागरी सहकारी बँकांचे व्यवस्थापन बँकेच्या सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळामार्फत चालते. नागरी बँकांच्या व्यवस्थापनामध्ये संचालक मंडळाची भूमिका महत्त्वाची असते. संचालक मंडळाची मुदत सर्वसाधारणपणे ३ ते ५ वर्षाची असते. व्यवस्थापकीय स्वरूपाचे निर्णय घेण्यासाठी हे मंडळ महत्त्वाचे असते. सर्वसाधारण सभा, संचालक मंडळ, व्यवस्थापक व कर्मचारी हे नागरी सहकारी बँकेच्या व्यवस्थापनातील अत्यंत महत्त्वाचे प्रमुख व जबाबदार घटक असतात. सर्वसाधारण सभेला अंतिम

अधिकार असतात. बँकेचा दैनंदिन कारभार पाहाण्यासाठी पगारदार व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग नेमला जातो. संचालक मंडळांच्या सभामध्ये बँकेच्या कार्यासंबंधीचे निर्णय घेऊन प्रत्यक्ष अमंलबजावणी व्यवस्थापक व कर्मचारी वर्गाकडून केली जाते.

**कार्यक्षेत्र :**

नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने नागरी भागात असते. साधारणपणे विशिष्ट शहराची नगरपालिका किंवा महानगरपालिका हद्द, तालुका किंवा जिल्हा असे असते. अलिकडच्या रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार या बँकांना आपल्या शाखा इतरत्र ही सुरू करता येतात.

**सभासदत्व :**

या बँकांचे सभासदत्व साधारणता बँकेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या व्यक्तीना दिले जाते. साधारणपणे पगारदार व्यक्ती, छोटे उद्योजक, किरकोळ व्यापारी, लहान व्यावसायिक, कामगार, कारागीर, मध्यमवर्गीय लोक इत्यादींना सभासदत्व दिले जाते. या बँकांचे सभासदत्व धोरण लवचिक असून समाजातील सर्व स्तरातील लोकांना सभासदत्व दिले जाते.

**भागभांडवल :**

नागरी सहकारी बँका सभासदांमध्ये भागांची विक्री करून भांडवल उभे करतात. पूर्वी भागभांडवलाची मर्यादा २०,००० रूपये होती. सन १९६६ पासून ही मर्यादा १ लाख रूपयांइतके असते. एका भागाची किंमत २५ रूपये असते. सभासद जेव्हा कर्ज घेतात तेव्हा कर्जाच्या विशिष्ट प्रमाणात भागांची खरेदी करण्याचे बंधंन त्यांच्यावर असते. या बँकांना जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून कर्ज घेता येते.

**नागरी बँकांची कार्ये (Functions of Urban Co-operative Banks)**

नागरी सहकारी बँका इतर बँकाप्रमाणेच पुढील प्रकारची कार्ये करतात.

**१) ठेवी स्वीकारणे :**

नागरी सहकारी बँका सभासद आणि बिगर सभासदांकडून ठेवी स्वीकारतात. समाजातील नोकरदार, व्यावसायिक, लहान व्यापारी, उद्योजक, वाहातूकदार यांच्याकडूनही ठेवी स्वीकारतात. साधारणतः चालू ठेवी, बचत ठेवी, मुदतबंद ठेवी असा तीन प्रमुख प्रकारच्या खात्यावर ठेवी स्वीकारतात. याद्वारे लोकांच्यामध्ये बचत आणि काटकसरीची सवय लागते.

**२) कर्जे देणे :**

बँकांकडे जमा झालेल्या ठेवींच्या आधारे बँका सर्वसामान्य व अर्थिक परिस्थिती हालाखीचे असलेल्या लोकांना व सभासदांना कर्जपुरवठा करतात. कर्जपुरवठा करताना कर्जदारांकडून सोने, जमीन, घर तारण घेतले जाते. तसेच काही व्यक्ती जामीनदार घेतल्या जातात.

### ३) हुंड्या वटविणे :

या बँका वरील दोन प्रमुख कार्याबरोबरच हुंड्या वटविण्याचेही कार्य करतात. व्यापार आणि व्यवहारातून निर्माण झालेल्या हुंड्या या बँका वटवून देतात. त्यासाठी काही रक्कम कसर कापून घेतात. तसेच सभासदांचा प्रतिनिधी म्हणून या बँका हुंड्याची वसूली करतात.

### ४) सुरक्षित खणांची सोय :

व्यापारी बँकाप्रमाणे या बँकासुद्धा आपल्या सभासदांना सुरक्षित खणांची (Safe Deposit Locker) सोय उपलब्ध करून देतात. सभासदांच्या व इतरांच्या मौल्यवान वस्तू, कागदपत्रे, प्रमाणपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी सुरक्षित खणाची सोय उपलब्ध करून देतात.

### ५) प्रतिनिधी म्हणून कार्य :

नागरी सहकारी बँका सभासदांचा व ग्राहकांचा प्रतिनिधी म्हणून विविध कार्ये करतात. पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविणे, पैशाची वसुली करणे, चेक, ड्राफ्ट, हुंडी यांचे पैसे वसुल करणे यासारखी कामे बँका करतात.

### ६) सामान्य बँकिंग कार्ये :

या बँका व्यापारी बँकांप्रमाणे सभासदांना निरनिराळ्या बँकसुविधा उपलब्ध करून देतात. तसेच सभासदांमध्ये बचत व कटकसरीची प्रवृत्ती निर्माण करतात. ग्राहकांच्यावतीने विजेची बिले, टेलिफोन बिले, कर भरणे यासारखी सामान्य स्वरूपाची कार्ये या बँका करतात.

### नागरी सहकारी बँकांची प्रगती :

भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती पुढील कोष्टकाच्याद्वारे स्पष्ट करता येईल.

**कोष्टक क्रं. १**

**नागरी सहकारी बँक प्रगती**

| अं.क्र. | तपशील | १९८८–८९ | १९९१–९२ | २०१०–११ | २०१७–१८ |
|---|---|---|---|---|---|
| १. | बँकाची संख्या | १२८३ | १४०१ | १६४५ | १५५१ |
| २. | बँकाकडील ठेवी | ७२३२ | ११९०८ | २०९९४९२.८ | ४५६५ |
| ३. | कर्जे | ५८२० | ८७१३ | १३५१०३७.५ | २९०५ |

संदर्भ : Report on Trend and Progress of Banking India 1998, 2007, 2017.

वरील पत्रकावरून भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती लक्षात येते. स्वातंत्र्यत्तोर काळात भारतात या बँकांची प्रगती समाधानकारकपणे झाल्याचे दिसते. सन १९८८-८९ मध्ये बँकांची संख्या १,२८३ होती तर २०१७-१८ मध्ये ही संख्या वाढून १५५१ एवढी झाली. याचकाळात बँकांकडील ठेवीचे प्रमाण ७२३२ कोटी रूपयांच्या होत्या. त्या २०१७-१८ मध्ये ४५६५ कोटी एवढ्या वाढल्या. ही बाब नागरी बँकांच्या दुष्टीने समाधानकारक आहे. बँकांनी सभासदांना दिलेल्या कर्जाचे प्रमाणही सन १९८८-८९ मध्ये ५८२० कोटी रूपये होते ते २०१०-११ मध्ये १३,४१,०३७.५ कोटी पर्यंत वाढले.

**कोष्टक क्रं. ३**

**नागरी सहकारी बँका पतपुरवठा**

(रक्कम कोटी रूपये)

| **क्रं.** | **तपशील** | **मार्च २००२ अखेरीस कर्ज (%)** | **मार्च २००७ अखेरीस कर्ज (%)** |
|---|---|---|---|
| १. | शेती व पूरक क्षेत्र | ५ | ५ |
| २. | लघु आणि कुटीरद्योग | २० | २७ |
| ३. | रस्ते व जलवाहतूक | ३ | ५ |
| ४. | व्यावसायिक आणि स्वयंरोजगारातील व्यक्ती | ४ | ५ |
| ५. | छोटे व्यावसायिक | १८ | २३ |
| ६. | उपभोग | २ | ३ |
| ७. | इतर किरकोळ व्यापारी | ९ | १४ |
| ८. | खाजगी किरकोळ व्यापारी | ९ | १४ |
| ९. | शैक्षणिक कर्ज | ४ | १ |
| १०. | घरबांधणी व घरखेरदी | ३१ | ६ |
| | एकूण | १००% | १००% |

वरील कोष्टकावरून नागरी सहकारी बँकांनी विविध क्षेत्रासाठी केलेल्या पतपुरवठ्याची प्रगती लक्षात येते. मार्च २००२ अखेरीस लघु व कुटीरद्योगासाठी एकूण कर्जपुरवठ्यापैकी २०% कर्जपुरवठा केला होता. हे प्रमाण मार्च २००७ अखेरीस २७% एवढे वाढले. दरम्यानच्या काळात भारतातील नागरी बँकांनी शेती, छोटे व्यावसायिक, घरबांधणी, रस्ते व जलवहातूक, खाजगी, किरकोळ व्यापारी इत्यादीना हा कर्जपुरवठा केला होता.

**नागरी सहकारी बँकांच्या समस्या/दोष (Problems of Urban Co-operative Banks)**

भारतातील नागरी सहकारी बँकांचा विकास वेगाने होत असला तरी त्यांच्या कार्यप्रणालीत काही समस्या दिसून येतात ते पुढीलप्रमाणे –

**१) विषम प्रगती :**

भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती विषम प्रमाणात झाली आहे. काही राज्यात प्रगती समाधानकारक असून काही राज्यात ती असमाधानकारक आहे. देशातील एकूण नागरी सहकारी बँकांपैकी ७५% पेक्षा अधिक बँका महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यात आहेत. बिहार, आसाम, ओरीसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान येथे त्या अल्पप्रमाणात आहेत.

**२) पुरेसा निधीचा अभाव :**

नागरी सहकारी बँकांना प्राप्त होणारा निधी अल्प प्रमाणात असतो. त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित असल्याने त्यांच्या व्यवहारांचे प्रमाणही अल्प असते. ठेवींचे प्रमाण कमी असल्यामुळे कर्जे कमी दिली जातात. त्यामुळे नफ्याचे प्रमाण कमी राहाते. त्यामुळे या बँकांना पुरेसा निधी मिळत नाही. याचा विपरित परिणाम त्यांच्या विकासावर होतो.

**३) सदोष कर्ज धोरण :**

नागरी सहकारी बँकांच्या कर्ज धोरणामध्ये अनेक दोष आहेत. बहुतांशी वेळा संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार नातेवाईक, अपात्र व्यक्तींना कर्ज पुरवठा केला जातो. अशा प्रकारात कर्ज मंजूरीची पूर्तता केली जात नाही. ठराविक लोकांना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला जातो. कर्जे मंजूर करताना योग्य कागदपत्रांची तपासणी केली जात नाही. त्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढते व बँकाच्या विकासावर विपरित परिणाम होतो.

**४) अनुत्पादक कारणांसाठी कर्जपुरवठा :**

नागरी सहकारी बँकांची बहुतांशी कर्जे अनुत्पादक कारणासाठी दिली जातात. सभासदांना कर्ज वाटप केल्यानंतर त्याचा योग्य कारणासाठी वापर होतो की नाही यावर लक्ष दिले जात नाही.

तसेच मोठ्या उद्योगधंद्याना व व्यवसायांना मोठ्या प्रमाणात कर्ज दिली जातात. त्याच्याऐवजी बँकांनी लघुउद्योग, कुटीरउद्योग, हस्तोद्योग इत्यादींना कर्जे दिली पाहिजेत.

**५) प्रशासकीय समस्या :**

सध्या नागरी बँकांना अनेक प्रशासकीय समस्यांना तोंड द्यावे लागते. जसे मोठ्या बँकांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला अत्यंत कमी सभासद उपस्थित राहतात. सभासद जागृत नसतात. काही थोड्या सभासदांचे बँकेवर वर्चस्व राहते. आपल्या नातेवाईकांना कर्ज मंजूर केली जातात. यातून बँकेच्या पैशाचे अपहरण होते.

**६) इतर बँकांशी स्पर्धा :**

भारतातील शहरी भागातील व्यापारी व राष्ट्रीयीकृत बँकाच्या शाख्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे शहरी भागातील नागरी बँकांनी या बँकांशी तीव्र स्वरूपाची स्पर्धा करावी लागत आहे. इतर बँकाशी तुलना करता या बँकांच्या ठेवी कमी राहतात. तसेच त्याची भांडवल क्षमताही अल्प असते. परिणामी या बँका इतर बँकांच्या स्पर्धेत मागे पडतात.

**७) अधिक व्याजदर :**

नागरी बँका ग्राहकांकडून ठेवी गोळा करण्यासाठी जादा व्याजदारने ठेवी गोळा करतात. यामुळे या बँकांना कर्जावरसुद्धा जास्त दराने व्याजाची आकारणी करावी लागते. राष्ट्रीयीकृत बँका व इतर बँकाच्या तुलनेत या बँकाकडील व्याजाचे दर तुलनेने अधिक असतात. त्यामुळे या बँकाच्याकडील कर्जांना मागणी कमी राहाते.

**८) अर्थिकदृष्ट्या कमकुवत बँका :**

भारतातील अनेक नागरी सहकारी बँकापैकी काही बँका अर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याचे दिसते. कारण त्यांच्या ठेवी व भांडवलाचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे नफा कमी राहातो. यामुळे निधीची कमतरता भासते. परिणामी या बँका अर्थिकदृष्ट्या मजबूत व सुदृढ राहू शकत नाहीत.

**९) सभासदांचा उदासीनपणा :**

नागरी बँकांचे बहुतेक सभासद बँकेकडून कर्ज मिळविण्यासाठी सभासदत्व स्वीकारतात. परंतु ते बँकाच्या इतर कामकाजात सहभागी होत नाहीत. सर्वसाधारण सभा व इतर सभा की त्यामध्ये बँकेचे महत्त्वाचे निर्णय घेतले जातात अशा सभांना बहुतांशी सभासद उपस्थित राहात नाहीत. त्यामुळे काही निवडक सभासद बँकांचे प्रशासकीय काम चालविण्याचा प्रयत्न करतात.

### १०) थकबाकीची समस्या :

अलिकडे नागरी सहकारी बँकांपुढे कार्जाच्या थकबाकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. बँकेच्या सदोष कर्जधोरणामुळे चुकीच्या लोकांना वित्तपुरवठा झाल्याने थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी बँकांच्या अर्थिक प्रगतीला खीळ बसत आहे. संचालक मंडळाच्या हस्तक्षेपामुळे थकबाकीची समस्या अधिक गंभीर बनत चालली आहे.

**उपाययोजना :**

नागरी सहकारी बँकांच्या समस्या सोडविण्यासाठी खालील उपायांची अमंलबजावणी करावी.

१. नागरी सहकारी बँकांनी निधीची कमतरता सोडविण्यासाठी भागभांडवलाचे प्रमाण वाढवावे.

२. सरकारने आवश्यक व पुरेशा प्रमाणात या बँकांना मदत करावी.

३. दुर्बल नागरी बँकांचे सक्षम बँकेत एकत्रीकरण करावे.

४. नागरी बँकांनी आपल्या ठेवींचे प्रमाण वाढवावे.

५. नागरी बँकांनी अनुत्पादक कर्जे देण्याचे प्रमाण कमी करावे.

६. कर्मचाऱ्यांना योग्य स्वरूपाचे प्रशिक्षण द्यावे.

७. मागास भागातील बँकांना उत्तेजन द्यावे.

८. ग्राहकांना आवश्यक बँकिंग सुविधा देण्यासाटी प्रयत्न करावा.

९. उत्पादक स्वरूपाची कर्जे देण्याचा प्रयत्न करावा.

१०. कर्जवसुलीसाठी बँकांनी गंभीरपणे प्रयत्न करावेत.

## ४.२.२ बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था (Non-Agricultural Credit Co-operatives)

**प्रास्ताविक :**

सहकारी क्षेत्रात काही बँका किंवा संस्था या फक्त शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी स्थापन झालेल्या असतात. तर काही बँका व संस्था या शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रांना, व्यवसायकिंना व लोकांना बँकिंग सेवा देण्यासाठी स्थापन झालेल्या असतात. साधारणत: बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था या शहरी भागात जास्त प्रमाणात स्थापन झालेल्या दिसतात. कारण शहरी भागातच शेतीशिवाय

अनेक व्यवसाय चालतात. अशा व्यवसायांना सर्वप्रकारच्या बँकिंग सेवा-सुविधा देण्याच्या हेतूने यांची स्थापना झालेली असते. बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्थामध्ये प्रामुख्याने नागरी सहकारी बँका, पगारदार व्यक्तींच्या पतसंस्था, बहुउद्देशीय सहकारी पतपुरवठा संस्था इत्यादींचा समावेश होतो.

बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था प्रामुख्याने छोटे उद्योग, प्रक्रिया उद्योग, स्वंयरोजगारातील व्यक्ती, वाहातूकदार यांना बँकिंग सेवा उपलब्ध करून देतात. सहाजिकच अशा स्वरूपाचे घटक शहरी भागात जास्त प्रमाणात आढळतात म्हणून या संस्थांचे कार्यक्षेत्र नागरी किंवा शहरी भागात जास्त असते.

**बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था कार्ये :**

बिगर सहकारी पतपुरवठा संस्था आपल्या सभासदांसाठी व ग्राहकांसाठी पुढील महत्त्वाची कार्ये करतात.

**१) ठेवी स्वीकारणे :**

बँकिंग क्षेत्रातील ठेवी स्वीकारण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्ये या संस्थाकडून पार पाडले जाते. संस्थांचे सभासद तसेच बिगर सभासदांकडून चालू ठेवी, बचत ठेवी, आवर्ती ठेवी, मुदतबंद ठेवी या प्रमुख खात्यांवर ठेवी स्वीकारल्या जातात. सभासदांमध्ये बचतीची सवय लावून काटकसरीची वृत्ती निर्माण व्हावी म्हणून छोट्या स्वरूपाच्या बचती संकलित करण्याचे कार्य केले जाते.

**२) कर्ज देणे :**

या संस्था आपल्या सभासदांना व्यापारी व व्यावसायिक कारणांसाठी कर्जपुरवठा करतात. सभासदांना अनुत्पादक कर्जाचा लग्न कार्यासाठी व धार्मिक कार्यक्रमासाठी व इतर कारणांसाठी कर्जपुरवठा करतात. घरगुती वस्तूंची खरेदी करणे, वैद्यकीय खर्च भागवणे, गृहनिर्माण इत्यादी कारणांसाठीही या संस्था सभासदांना व इतर व्यक्तींना कर्जपुरवठा करतात.

**३) हुंड्या वटविणे :**

हुंड्या वटविण्याचे कार्य या संस्थाकडून केले जाते. व्यापार आणि व्यवसायातून म्हणजेच व्यवहारातून निर्माण झालेल्या हुंड्या वटविण्याचे कार्य या संस्था करतात. यासाठी म्हणजेच हुंड्या वटविण्याच्या कार्याबद्दल संबंधित व्यापाऱ्याकडून या संस्था काही कमिशन आकारतात. त्यातून या संस्थांना उत्पन्न प्राप्त होते.

**४) बचत व काटकसरीची सवय लावणे :**

बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्था या सभासदांकडून व इतर लोकांकडून अनेक खात्यावर ठेवी स्वीकारतात. याचा परिणाम म्हणून सभासदांमध्ये बचतीची व काटकसरीची प्रवृत्ती वाढण्यास मदत होते. बचतीचे व काटकसरीच्या प्रवृत्तीचे महत्त्व पटवून देण्याचे कार्यही या संस्था करतात.

### ५) वित्तीय व्यवस्थापन :

बँकामधील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे असते. तरल संपत्तीची गुंतवणूक करताना SLR मधील रक्कम बाजूला काढून रिझर्व्ह बँकेने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे लागते. यासाठी असे व्यवस्थापन महत्त्वाचे असते. यासाठी या संस्थांना रोखता, लाभता व सुरक्षितता व तत्त्वांचा अवलंब करावा लागतो.

### ६) बँकिंग सोई पुरविणे :

व्यापारी बँकाप्रमाणेच या संस्थादेखील आपल्या सभासदांना बहुतांशी सेवा बँकिंग सोई पुरवितात. ठेवी स्वीकारणे व कर्जे देणे या प्रमुख कार्याबरबरोच ग्राहकाचा प्रतिनिधी म्हणूनही कार्ये करतात. तसेच पतपैशाची निर्मिती करण्याचे कार्येही करतात.

### ७) नाविन्यपूर्ण बँकिंग सेवा :

अलिकडच्या काळात व्यापारी बँकाकडून अनेक नाविन्यपूर्ण सेवा दिल्या जातात. या अनुषंगाने बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्था अशा सेवा आपल्या सभासदांना देतात. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून ए.टी.एम., क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर, मोबाईल बँकिंग इत्यादी सेवा देतात.

### ८) सामाजिक सेवा पुरविणे :

बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था विविध प्रकारच्या सामाजिक सेवा पुरवतात. तसे सभासदांचे निवृत्ती वेतन जमा करणे, मुलांच्या शिक्षणासाठी मदत करणे, ग्राहकांसाठी वैद्यकिय सुविधा देणे व इतर अन्य स्वरूपाच्या सेवा पुरवितात. अशा संस्थांचे शहरी भागातील असित्तव या कार्यामुळे सामाजिक विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरते.

### ९) मानव संसाधनाचा विकास :

बँकामधील नोकरभरती, गुणवत्ता, संचालक मंडळाचे कर्मचारी व ग्राहक यांच्याशी संबंधीत या बाबी मानव संसाधन विकासात येतात. या अनुषंगाने संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. त्यासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करतात. मनुष्यबळ प्रशिक्षित व कौशल्यपूर्ण करण्याचे कार्य या संस्था करतात.

**बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांच्या समस्या**

**(Problems of Non-Agricultural Credit Co-operatives)**

बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्यपद्धतीत पुढील प्रकारच्या समस्या निर्माण होतात.

**१) अपुरा निधी :**

या संस्थांचे कार्यक्षेत्र अत्यंत मर्यादित स्वरूपाचे असते. त्यांची सभासद संख्या कमी असते. परिणामी संकलित होणाऱ्या ठेवींचे प्रमाणही कमी राहाते. परिणामी खेळते भांडवल अपुरे पडून त्यांच्या विकासावर परिणाम होतो. सहाजिकच त्यांच्या कार्यावरही मर्यादा पडतात. एकंदरीत अगदी काही मोजक्या स्वरूपाच्या संस्था सदृढ व भक्कम स्वरूपाच्या आहेत.

**२) इतर बँकांशी स्पर्धा :**

देशातील राष्ट्रीयीकृत बँका तसेच खाजगी बँका यांच्या मोठ्या व अर्थक्षम शाखा शहरी भागात कार्यरत आहे. यांच्याशी तुलना करता बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्था खूपच लहान आकाराच्या असतात. त्यामुळे व्यावसायिक दृष्टीने विचार करता या संस्थांना राष्ट्रीयीकृत व खाजगी बँकाशी व्यावसायिक स्पर्धा करावी लागते.

**३) सदोष कर्जधोरण :**

या बँकाच्या कर्जधोरणात अनेक त्रुटी आढळतात. बऱ्याच वेळा संचालक मंडळाच्या अतिरिक्त दबावामुळे अपात्र व्यक्तीना व जवळच्या नातेवाईकांना कर्जपुरवठा करावा लागतो. यांच्याकडून कर्ज तारणाबाबतचे योग्य पालन केले जात नाही. त्यामुळे या बँका अडचणीत येतात.

**४) अनुत्पादक कर्जावर भर :**

बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून आपल्या सभासदांना धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य व इतर अनुत्पादक कार्यासाठी कर्जपुरवठा केला जातो. वास्तविक या बँकानी उत्पादक स्वरूपाचा कर्जपुरवठा करावा अशी अपेक्षा आहे. पण तसे होताना दिसत नाही. त्याचा कर्जवसूलीवर अनिष्ट परिणाम होत आहे.

**५) थकबाकीची समस्या :**

सदोष कर्जधोरण, अनुत्पादक स्वरूपाचा कर्जपुरवठा, संचालक मंडळाच्या अतिरिक्त दबाव व त्यानुसार केलेला कर्जपुरवठा यामुळे या बँकाची थकबाकीची समस्या वाढत आहे. या बँकानी कर्ज देताना पुरेसी काळजी न घेतल्याने ही कर्जवसूलीची समस्या गंभीर बनत आहे. तसेच संचालक

मंडळाच्या प्रभावामुळे कर्जवसूलीच्या प्रक्रियेतही अडथळे निर्माण होतात. कर्जवसूलीसाठी खास यंत्रणा राबविली जात नाही. त्यामुळे कर्जाशी थकबाकीचे एकूण प्रमाण वाढत आहे.

**६) अंकेक्षणाची अपुरी व्यवस्था :**

या बँकाचे कार्य सुरळीतपणे व्यवस्थीत चालण्यासाठी अंकेक्षणाची पुरेशी व्यवस्था असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. साधारणत: ५०% पेक्षा जास्त बँकांचे अंकेक्षण वेळेत व व्यवस्थित होत नाही. अंकेक्षणामध्ये अनेक त्रुटी राहतात. त्यांची पूर्तता वेळेत केली जात नाही. त्यामुळे या बँका मुदतीत रिझर्व्ह बँकेला नफा-तोटा पत्रक, ताळेबंद यासारखे महत्त्वाचे दस्तऐवज पाठवू शकत नाहीत.

**७) खर्चाचे प्रमाण अधिक :**

या संस्थांचे खर्चाचे प्रमाण इतरांशी तुलना करता जास्त राहाते. स्वतंत्र इमारत व अन्य खर्च विचारात घेता या बँकांना मोठी रक्कम खर्च करावी लागते. व्यवस्थापकीय व इतर खर्चाचे प्रमाणही जास्त असल्याचे दिसते. तसेच ग्राहकांना व सभासदांना देण्यात येणाऱ्या सेवांचा खर्च जास्त येतो.

**८) असमतोल विकास :**

बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांचा महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यात अधिक विकास झालेला आहे. परंतु बिहार, ओरीसा, आसाम यासारख्या अप्रगत राज्यात फारसा विकास झालेला नाही. त्यामुळे या राज्यातील शहरी व नागरी लोकांना, व्यापाऱ्यांना, व्यावसायिकांना या संस्थांच्या सेवेपासून वंचित रहावे लागते.

**उपाययोजना :**

बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी खालील उपायांची अंमलबजावणी करावी.

१. ठेवींच्या संकलन प्रमाणात वाढ करावी.

२. संस्थांनी आपली सभासद संख्या वाढविण्याचा प्रयत्न करावा.

३. संस्थांनी अनुत्पादक कर्जाचे प्रमाण कमी करून उत्पादक कर्जाचे प्रमाण वाढवावे.

४. कर्जधोरणातील त्रुटी दूर करून चांगल्या पद्धतीचे कर्जधोरण राबवावे.

५. कर्मचाऱ्यांना, सभासदांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

६. थकबाकीचे प्रमाण कमी करण्याकडे लक्ष द्यावे.

७. बँकिंग सुविधामध्ये विविधता आणावी.

८. व्यवस्थापकीय कार्यक्षमता वाढवावी.

### ४.२.३ भारतातील ग्राहक सहकारी संस्था

### (Consumer Co-operative Societies in India)

**प्रस्तावना :**

सहकारी चलवळीचा जन्म हा मुळातच ग्राहक भांडारांच्या स्थापनेतून झालेला आहे. सन १८४४ मध्ये रॅश्डेल येथील २८ विणकरांनी एकत्र येवून जगातील पहिले ग्राहक भांडार स्थापन केले होते. ग्राहक भांडारांचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतरच इतर प्रकाराच्या सहकारी संस्था स्थापन होण्यास जगात सुरूवात झाली. त्यापैकीच एक म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय. व्यापारी व भांडवलदारामार्फत होणारी अर्थिक पिळवणूक व शोषण थांबवून ग्राहकांच्या गरजा अल्प खर्चात भागविल्या जाव्यात या हेतूने या संस्थांचा जन्म झाला आहे.

**अर्थ :**

''ग्राहकांना (उपभोकत्याना) त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू व सेवा योग्य प्रमाणात माफक किंमतीत, दर्जेदार व निर्भळ स्वरूपात उपलब्ध व्हाव्यात म्हणून स्वच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.'' ग्राहकांना दैनंदिन उपभोगासाठी लागणाऱ्या दैनंदिन वस्तू उत्पादकांकडून खरेदी करून त्या सभासदांना वाजवी किंमतीत उपलब्ध करून देणे हे प्रमुख कार्य या संस्था करतात. उत्तम प्रतीच्या ग्राहकोपयोगी वस्तू रास्त किंमतीला उपलब्ध करून देण्यासाठी ही संस्था प्रयत्नशील असते. याअनुषंगाने किरकोळ विक्री, घाऊक खरेदी-विक्री तसेच उत्पादन व प्रक्रिया इत्यादी स्वरूपाची कार्ये या संस्था करतात. रॅश्डेल पायोनिअर्स या संस्थेने घालून दिलेल्या तत्त्वांचे पालन बहुतेक ग्राहक सहकारी संस्था करतात. ही तत्त्वे म्हणजे खुले सभासदत्व, लोकशाही कारभार, रोखीचे व्यवहार, भांडवलावर मर्यादित व्याज इ. होय. विशेषत: खाजगी व्यापाऱ्यांच्याकडून होणाऱ्या पिळवणूकीमधून सभासद ग्राहकांची मुक्तात करणे, सभासदांना दर्जेदार वस्तू वाजवी किंमतीत उपलब्ध करून देण्यासाठी ग्राहक सहकारी संस्था नेहमी प्रयत्न करीत असतात.

**ग्राहक सहकारी संस्था उद्दिष्ट्ये आणि कार्ये :**

ग्राहक सहकारी संस्थांची काही प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली जातात.

१. सभासदांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा पुरवठा करणे.

२. दैनंदिन गरजेच्या वस्तू नियमित व वाजवी किंमतीत पुरविणे.

३. बाजारातील भाववाढ, काळाबाजार, टंचाई, फसवणूक, भेसळ यांसारख्या अनिष्ठ प्रवृत्तीपासून ग्राहक सभासदांचे रक्षण करणे.

४. योग्य वजनमापे वापरून निर्भळ व दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करणे.

५. वस्तूंच्या किंमतीत स्थिरता राखणे.

६. समाजातील नफेबाजी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवणे.

७. ग्राहक वर्गात बचतीची व काटकसरीची सवय लावणे.

८. ग्राहकाच्या आरोग्यता व राहाणीमानात सुधारणा घडवून आणणे.

**ग्राहक सहकारी संस्थाचे प्रकार किंवा रचना (Types of Structure of Consumer Co-operative Societies)**

भारतात ग्राहक सहकारी संस्थांची रचना बहुव्यापी स्वरूपाची आहे. म्हणजेच ग्राहक सहकारी संस्थाची रचना ही एकल स्वरूपाची किंवा संघीय स्वरूपाची आहे. ज्या ठिकाणी एकल स्वरूपाची रचना आहे तेथे व्यक्तीगत ग्राहक एकत्र येऊन मध्यवर्ती ग्राहक भांडाराची स्थापना करतात आणि त्याच्या शाखा त्यांच्या कार्यक्षेत्रात सुरू केल्या जातात. ज्या ठिकाणी संघीय स्वरूपाची रचना आहे तेथे स्थानिक, केंद्रीय आणि संघ पातळीवर ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना केली जाते. भारतात ग्राहक सहकारी संस्थांच्या रचनेबाबत समानता आढळत नाही. भारतात एकल, संघीय आणि मिश्र स्वरूपाची रचना आढळते. विशेषत: संघीय स्वरूपाची रचना जास्त प्रमाणात आढळते. पुढील प्रकाराच्या संस्थांचा समावेश या रचनेमध्ये होतो.

**१) राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ (National Co-operative Consumer Federation) :**

राष्ट्रीय पातळीवर कार्य करणारी ही भारतातील सर्व ग्राहक सहकारी संस्थांची शिखर संस्था आहे. या संघाची स्थापना भारतात सन १९६५ मध्ये करण्यात आली आहे. सर्व राज्यातील राज्य पातळीवरील राज्य ग्राहक सहकारी संघ हे या संस्थेचे सभासद असतात. संघाचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे असून मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, गोहत्ती या ठिकाणी प्रादेशिक कार्यालये आहेत. राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ हा प्रत्यक्ष उत्पादकांकडून मालाची खरेदी करून त्याचा पुरवठा राज्य घाऊक व प्राथमिक सहकारी संस्थांना कमी किंमतीत करतो.

**कार्ये :**

१. देशातील सहकारी चळवळ बळकट व सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे.

२. ग्राहकोपयोगी वस्तूंचा पुरवठा करणारे किंवा उत्पादन करणारे यांच्याशी व्यापारी संबंध निर्माण करणे व ग्राहक भांडाराना त्या वस्तूचा पुरवठा करणे.

३. वस्तूंची आयात-निर्यात करणे.

४. ग्राहक सहकारी संस्थांना पूरक सेवा उपलब्ध करून देणे.

५. ग्राहकोपयोगी वस्तूचे उत्पादन करणे किंवा प्रक्रिया करण्यासाठी कारखाने उभे करणे.

६. ग्राहक चळवळीचा प्रसार व प्रसिद्धी करणे.

७. ग्राहक सहकारी चळवळीविषयी चर्चा व परिसंवाद आयोजित करणे.

८. सहकारी ग्राहक संस्थांना मदत व मार्गदर्शन करणे.

**प्रगती :**

राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघाने सन १९८०-८१ मध्ये १३० कोटी रूपयांचा व्यवहार केला होता. २०१६-१७ मध्ये या संघाने ७९१९ कोटी रूपयांची उलाढाल केली होती. तसेच २०१६-१७ मध्ये ७७० कोटी रूपयांचा नफा झाला होता.

**२) राज्य सहकारी ग्राहक संघ (State Co-operative Consumer Federation) :**

सन १९६५-६६ मध्ये राज्य सहकारी संघाची स्थापना करण्यात आली. घाऊक विक्री भांडारांच्या धोरणात, व्यवहारात आणि कार्यात सुसुत्रता आणण्याच्या उद्देशाने या संघाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ आणि विभागीय ग्राहक भांडारे यांच्यात समन्वय साधण्याचे काम राज्य सहकारी ग्राहक संघाला करावे लागते. भारतात हे संघ राज्य पातळीवर स्थापन करण्यात आले आहेत.

**कार्ये :**

१. राज्यातील घाऊक विक्री भांडारांच्या कार्यात, व्यवहारात व धोरणात सुसूत्रता आणणे.

२. राज्यातील ग्राहक सहकारी संघाकडून वस्तू मिळवून त्या जिल्हा पातळीवरील सहकारी संस्थांना पुरविणे.

३. राज्यातील ग्राहक सहकारी संस्थांच्या कार्यात सुसूत्रता निर्माण करणे.

४. ग्राहकांच्या मागणीप्रमाणे घाऊक प्रमाणावर मालाची खरेदी करणे.

५. खरेदी केलेल्या मालाचा योग्यरितीने साठा करून ठेवणे.

६. सहकारी संस्थांना तांत्रिक मदत व मार्गदर्शन करणे.

७. घाऊक भांडारांना त्यांच्या हिशोबात सल्ला देणे, त्यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे.

८. ग्राहक सहकारी संस्थांचा विकास घडवून आणण्यासाठी चर्चासत्रे व सभा आयोजित करणे.

९. ग्राहक सहकारी संस्थामध्ये काम करणाऱ्या सेवक वर्गासाठी शिक्षण-प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे.

**प्रगती :**

सन १९८२ अखेर भारतातील आसाम, नागालँड व जम्मू काश्मिर ही तीन राज्ये वगळता इतर सर्व राज्यातून २० राज्य सहकारी संघ कार्य करीत होते. त्यांची सभासद संख्या १३,०८२ होती. एकूण भाग भांडवल १,७४६ लाख रूपये होते. एकूण उलाढाल २२४ कोटी रूपयांची होती. सन १९९५ मध्ये या संस्थांनी ६२७२ कोटी रूपयांची उलाढाल केली होती.

**३) घाऊक सहकारी भांडारे (Wholesale Co-operative Stores) :**

सन १९६२ मधील सहकारी धोरणानुसार ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठ्या शहारातून अशी घाऊक भांडारे सुरू करण्याचे धोरण सरकारने जाहीर केले. ही भांडारे घाऊक प्रमाणावर व्यापार करतात. या भांडाराचे सभासदत्व प्राथमिक सहकारी संस्था व व्यक्ती या दोहोंना असते. प्रत्यक्ष उत्पादकाशी संपर्क साधून या संख्या घाऊक प्रमाणात मालाची खरेदी करतात.

**कार्ये :**

१. प्राथमिक सहकारी संस्थांना मालाचा पुरवठा करणे.

२. मालाचा साठा करून ठेवणे.

३. प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व इतर व्यक्तीबरोबरच चर्चासत्रे, प्रदर्शने, परिसंवाद आयोजित करणे.

४. सभासदांच्या हिताच्या दृष्टीने अन्नधान्य व किराणामाल, कापड, शेतीविषयक वस्तू असे विभाग सुरू करणे.

५. कच्चा मालावर प्रक्रिया करणारे कारखाने उभारणे.

**प्रगती :**

घाऊक भांडाराची संख्या २००९-१० अखेर ७१८ ऐवढी होती. सभासदसंख्या २०,१५० द.ल. अशी होती. शाखांची संख्या १९३६ वरून ५१५४ एवढी वाढल्याचे दिसते. भागभांडवल सन १९६५-६६ मध्ये ६.२० कोटी होते ते २००९-१० मध्ये ९५८.५२ कोटी रूपये एवढ्या प्रमाणात वाढले.

### ४) प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था (Primary Co-operative Consumer Societies):

भारतातील सहकारी ग्राहक चळवळीतील सर्वात महत्त्वाचा दुवा म्हणजे प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था होय. एखाद्या गावातील किंवा शहारातील नागरिकांनी आपल्या हितासाठी स्वच्छेने लोकशाही व सहकारी तत्त्वाने स्थापन केलेली संख्या म्हणजे प्राथमिक सहकारी ग्राहक संख्या होय. या संख्या एकवयवी किंवा संघ पद्धतीने स्थापन करता येतात.

**कार्ये :**

१. ग्राहकांना आवश्यक वस्तूंची किरकोळ विक्री करणे.

२. ग्राहकांना निरनिराळ्या पूरक सेवा, निरनिराळ्या ठिकाणी पुरविणे.

३. प्रक्रिया संस्थांना मदत करणे.

४. साखर, रॉकेल यासारख्या जीवनावाश्यक वस्तूंचा पुरवठा करणे.

**प्रगती :**

प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांची संख्या १९६१-६२ मध्ये ७२६६ होती. यामध्ये वाढ होऊन सन २००९-१० मध्ये ती २१,०१४ झाली. याचकाळात शाखांची संख्या ६७८ वरून ८,६२२ एवढी झाली. तर सभासद संख्या १६.६ द.ल. वरून ६४५४ द.ल. झाली. भागभांडवलाचे या काळातील प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले.

वरील प्रकारच्या ग्राहक संस्थाखेरीज केंद्र सरकारने १९६२ नंतर पुढील प्रकारच्या ग्राहक संस्था सुरू केल्या.

### (अ) औद्योगिक कामगारांच्या ग्राहक संस्था :

सन १९६२ मध्ये केंद्र सहकारच्या मजूर व रोजगार मंत्रालयाने ३०० पेक्षा अधिक कामगार असणाऱ्या उद्योगात सहकारी तत्त्वावर अशा संस्था सुरू करण्याची योजना सुरू केली. या योजनेसाठी आवश्यक असणारा पैसा उद्योग मालकानी द्यावा असे ठरले होते. यातून उद्योगातील काम करणाऱ्या

कामगारांना जीवनावश्यक वस्तू योग्य दरात मिळण्याची सोय केली होती. अशी योजना रेल्वे व कोळसा खात्यातील कामगारांसाठी सन १९९६ अखेर या संस्थांची संख्या ६५३२ एवढी होती.

**ब) ग्रामीण जनतेसाठी ग्राहक भांडारे :**

ग्रामीण भागातील लोकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप योग्य व वाजवी प्रमाणात, वाजवी किंमतीला केले जावे म्हणून सरकारने ग्रामीण भागातील जनतेसाठी ही योजना राबविली. या योजनेप्रमाणे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा ग्रामीण भागातून सेवा सहकारी संस्था किंवा खरेदी-विक्री संस्थामार्फत केला जातो.

**क) विद्यापीठ व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सहकारी ग्राहक भांडारे :**

देशातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजेचे साहित्य पुरविण्यासाठी केंद्र सरकाराने ही योजना सुरू केली. वह्या, पुस्तके, विज्ञान साहित्य, उपकरणे व इतर शैक्षणिक साहित्य या भांडारातून विक्रीसाठी ठेवले जाते. अशा भांडारांना सरकारने भरपूर अर्थिक साहाय्य व अनुदान देऊ केले आहे. अशा ग्राहक भांडारांना विद्यापीठे व महाविद्यालयाच्या इमारतीत जागा देण्यात येते.

**५) विभागीय बाजार किंवा सुपर बाजार (Departmental Stores or Super Markets):**

विभागीय भांडारांची सुरूवात भारतात १५ जुलै १९६६ रोजी दिल्ली येते सुपर बाजाराच्या स्थापनेतून झाली. अगदी सुरूवातीच्या काळात विभागीय भांडारांची/बाजारांची स्थापना देशातील निवडक मोठमोठ्या शहरात करण्यात आली. नंतर निवडक अशा दोन लाखापेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या शहरात सुरूवात करण्यात आली. निरनिराळ्या वस्तू एकाच भव्य भांडारांत, विविध विभागातून ग्राहकांना उपलब्ध होतात. म्हणून त्यास विभागीय बाजार म्हटले जाते. विविध विभागीय बाजारात एकाच छताखाली किंवा भव्य इमारतीत अनेक प्रकाराच्या वस्तू विविध दालनांतून सजवून ठेवलेल्या असतात व त्या ग्राहकांना वाजवी किंमतीत विकल्या जातात.

**कार्ये :**

१. नित्योपयोगी वस्तू ग्राहकांना वाजवी दराने पुरविणे.

२. तुटवड्याच्या वस्तूंचे योग्य प्रकारे वाटप करणे.

३. समाजातील दुर्बल घटकांना कमी किंमतीत जीवनावश्यक वस्तू पुरविणे.

४. घाऊक ग्राहक भांडाराप्रमाणे काम करणे.

५. जीवनावश्यक वस्तूंप्रमाणे इतर जीवनोपयोगी वस्तू ग्राहकांना वाजवी किंमतीत उपलब्ध करून देणे.

**प्रगती :**

भारतात सन १९८० अखेर लहान व मोठ्या विभागीय भांडारांची संख्या २०० होती. त्यांनी ३६५ कोटी रूपयांची उलाढाल केली होती. सन १९९५-९६ मध्ये अशा विभागीय भांडारांची संख्या ३१० होती व त्यांनी एकूण ६७० कोटी रूपये मालाची विक्री केली होती. या विक्रीपैकी ५२% विक्री ही मुंबई, दिल्ली, कोलकत्ता आणि अहमदाबाद येथील विभागीय भांडारातून झाली होती.

**ग्राहक सहकारी संस्था भूमिका/आवश्यकता**

**(Role of Consumer Co-operative Societies)**

भारतातील ग्राहक सहकारी संस्थांची भूमिका पुढील काही महत्त्वाच्या मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**१) वस्तू व सेवांचा गरजेनुसार पुरवठा :**

ग्राहक सहकारी संस्था या ग्राहकवर्गाच्या वस्तू आणि सेवाविषयक गरजा मागणीनुसार पूर्ण करण्यासाठी स्थापन झालेल्या असतात. त्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष उत्पादकाशी संपर्क साधलेला असतो. त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या मागणीनुसार पुरवठा करता येतो. त्यामुळे व्यापारीवर्गाद्वारे केला जाणारा काळाबाजार, कृत्रिम टंचाई, साठेबाजी यासारख्या व्यापारी प्रवृत्तीना पायबंद बसतो. थोडक्यात व्यापारीवर्गाकडून ग्राहकांची होणारी लुबाडणूक थांबविली जाते.

**२) व्यापारी साखळीचे उच्चाटन :**

भांडवलशाहीतील वितरण व्यवस्थेत उत्पादन व व्यापार हे खाजगी व्यापाऱ्यांच्या हातात असतो. व्यापारी जास्तीत जास्त नफा मिळावा या हेतूने व्यापार करीत असतात. भांडवलशाहीत उत्पादकाकडील माल ग्राहकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य व्यापारी करतात. या व्यवहारात व्यापाऱ्यांची मोठी साखळी निर्माण होते. ग्राहकांपर्यंत माल पोहचेपर्यंत तो अनेक व्यापाऱ्यांच्या साखळीतून येत असतो. यामध्ये प्रत्येक व्यापारी आपल्या व्यवहारात नफा मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे मालाची किंमत वाढून व्यापाऱ्यांना नफा होतो. परंतु ग्राहक सहकारी संस्था प्रत्यक्ष उत्पादकांशी संपर्क साधून मालाची खरेदी करून हा माल प्रत्यक्ष ग्राहकांपर्यंत वाजवी किंमतीला पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य या संस्था करतात. त्यामुळे व्यापारातील या साखळीचे उच्चाटन ग्राहक सहकारी संस्थामार्फत होण्यास मदत होते.

### ३) अनिष्ठ व्यापारी प्रथांना पायबंद :

व्यापारीवर्गाकडून अनेक वेळा मालाची साठेबाजी करून मालाची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. त्यामुळे बाजारात वस्तूंची विक्री जास्त दराने केली जाते. मालात भेसळ केली जाते. खोटी वजन मापे वापरणे, स्थानिक कर भरमसाठ प्रमाणात लावणे, कमी दर्जाचा माल जास्त किंमतीला विकणे याशिवाय धर्मादाय, तोलाई, लिखाई इत्यादींचा आकार वसूल केला जातो. बाजारात अशा प्रकारच्या अनेक अनिष्ठ प्रथा असतात. ग्राहक या प्रथांना बळी पडतात. अशा अनिष्ठ प्रवृत्तीतून ग्रहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची गरज भासते.

### ४) इष्ट व्यापारी प्रथांची स्थापना :

ग्राहक सहकारी संस्था योग्य वजनमापे वापरून निर्भळ व दर्जेदार वस्तूंचा मागणीनुसार पुरवठा करतात. वस्तूंची साठेबाजी करून काळाबाजार करीत नाहीत. वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ देत नाहीत. ग्राहकांकडून इतर आकार घेतले जात नाहीत. म्हणून व्यापारी क्षेत्रात योग्य व्यापारी प्रथांची स्थापना करण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची आवश्यकता भासते.

### ५) उत्पादकांना योग्य मोबदला :

व्यापारी जेव्हा उत्पादकाकडून माल खरेदी करतात तेव्हा तो अगदी अल्प किंमतीला खरेदी केला जातो. ग्राहकाला ती वस्तू ज्या किंमतीला विकत द्यावी लागते त्यातील ५०% उत्पादकाला मिळतो. केवळ वितरणाच्या कार्याबद्दल इतका मोबदला देणे उचित ठरत नाही. परंतु हाच माल ग्राहक सहकारी संस्थांना विकल्यास उत्पादकास चांगला मोबदला मिळतो. त्यामुळे ग्राहकांनाही कमी किंमतीत माल पुरविता येतो. म्हणजेच या संस्थामुळे उत्पादक व ग्राहक या दोहोंचाही फायदा होतो.

### ६) ग्राहकांना शिक्षण :

ग्राहक वर्गात त्याच्या प्राप्तीच्या प्रमाणात आपल्या गरजांची पूर्तता करावी लागते. ग्राहक सहकारी संस्थामुळे ग्राहकांना प्राप्तीच्या प्रमाणातगरजा कशा भागवाव्यात याचे शिक्षण मिळते. यातून ग्राहकांना बचतीची व काटकसरीची सवय लावली जाते. त्यामुळे ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यात मदत होते.

### ७) नियोजित अर्थव्यवस्था व ग्राहक सहकारी संस्था :

देशाचा अर्थिक विकास जलद गतीने होण्यासाठी सरकारने नियोजन केले. पण राबविताना सरकारच्या असे लक्षात आले की, नियोजित अर्थव्यवस्थेत ग्राहक सहकारी संस्थांना कामगार व

सर्वसामान्य लोकांना जीवनावश्यक वस्तू वाजवी किंमतीत पुरविण्याच्या दृष्टीने या संस्था उत्तम पर्याय ठरतात. म्हणून सरकारने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून ग्राहक सहकारी संस्थांच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले.

वरील सर्व कारणांसाठी व त्यांचे निराकरण करणेसाठी ग्राहक सहकारी संस्थेची भूमिका महत्त्वाची ठरत आहे.

**ग्राहक सहकारी संस्था दोष/ समस्या (Problems of Consumer Co-operative Societies)**

ग्राहक सहकारी संस्थांना कार्य करताना त्यांच्या कार्यप्रणालीत पुढील काही दोष दिसून येतात.

**१) अपुरे भांडवल :**

ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना समाजातील दुर्बल घटकांनी केलेली असते त्यामुळे त्यांच्याकडील भांडवल अपुरे राहते. हे भांडवल त्यांच्या व्यवसायासाठी अपुरे ठरते. त्यामुळे या संस्थांचे नफ्याचे प्रमाण कमी राहून ग्राहकांचे हित साध्य होत नाही.

**२) लहान व अर्थक्षम नसलेला आकार :**

ग्राहक सहकारी संस्थांचा आकार लहान आहे. त्यामुळे त्यांची सभासदांच्या, भांडवल व निधी इत्यादीचे प्रमाणदेखील मर्यादित राहते. परिणामी या संस्थाकडून फारच कमी वस्तूंची विक्री केली जाते. त्यामुळे ग्राहक सहकारी संस्थांचे उत्पन्न मर्यादित राहते. या उत्पन्नातून त्या आपला खर्च देखील भागवू शकत नाहीत.

**३) मर्यादित व्यवहार :**

अपुरे भांडवल व लहान आकार यामुळे या संस्थांचे व्यवहार मर्यादित राहतात. ज्या वस्तूंच्या किंमतीवर सरकारने नियंत्रण घातलेली आहेत आणि ज्या वस्तू विक्रीसाठी सरकारने पुरविलेल्या आहेत. अशाच वस्तूंची विक्री या संस्थांकडून केली जाते. म्हणजेच या संस्था फक्त मर्यादित वस्तूंचीच विक्री करताना दिसतात. त्यामुळे ग्राहकांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यात या संस्था अयशस्वी झालेल्या आहेत.

**४) दुर्बल संघटन :**

भारतात कैंद्रीय मध्यवर्ती ग्राहक संस्थांचा अपुरा विकास झालेला असल्याने व त्यांची संख्या मर्यादित असल्याने या संस्था दुर्बल राहिल्या आहेत. तसेच सहकारी नियोजन समितीच्या शिफारशीनुसार ५० ग्राहक सहकारी संस्थामागे एक मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था असावी पण या शिफारशीकडे दुर्लक्ष केल्याने या संस्थांचा विकास झाला नाही.

### ५) अकार्यक्षम व्यवस्थापन :

ग्राहक सहकारी संस्था ग्रामीण भागात कार्य करतात. या सहकारी संस्थांच्या कार्यक्षम प्रशासनासाठी प्रशिक्षित सेवकवर्गाची आवश्यकता असते. पण ग्रामीण भागात असा प्रशिक्षित सेवकवर्ग उपलब्ध होत नाही. अपुऱ्या वेतनामुळे चांगला सेवकवर्ग मिळत नाही व मिळालेला टिकून राहत नाही. त्यामुळे कारभार व्यवस्थीत चालत नाही. तसेच तज्ज्ञ सेवकवर्ग, व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्यासाठी पुरेसे भांडवल नसते. याचा परिणाम या संस्थांच्या कार्यक्षमतेवर होत आहे.

### ६) हिशेब व व्यवस्थापन :

अनेक ग्राहक सहकारी संस्थेमध्ये हिशेब वेळच्या वेळी व नियमितपणे लिहिले जात नाहीत. लिहिलेल्या हिशेबात बऱ्याच चुका असतात. यातून संस्थेतील सेवक गैरव्यवहार करतात. म्हणजेच अफरातफर, लबाडी, फसवणूक यांचे प्रमाण वाढते. त्यामुळे ग्राहकांचे नुकसान होते. ग्राहक सहकारी संस्थाचे हिशेब व व्यवस्थापन योग्य नसल्याने त्यांच्या विकासावर परिणाम होत आहे.

### ७) सरकारची उदासीनता :

देशातील सरकार टंचाई, दुष्काळ, युद्ध इत्यादी सारख्या परिस्थितीत या संस्थांच्या विकासात उत्तेजन देते. पण सर्वसामान्य परिस्थितीत सरकार या संस्थांच्या बाबत उदासीन दिसते. सरकारच्या या उदासीन धोरणामुळे ग्राहक सहकारी संस्थांची प्रगती मंदावली आहे.

### ८) इतर संस्थांशी अपुरा संबंध :

ग्राहक सहकारी संस्थांनी इतर सहकारी संस्थांशी अपुरा संबंध प्रस्थापित केलेला असतो. उदा. प्रक्रिया सहकारी संस्था, शेतकरी खरेदी-विक्री संस्था, उत्पादक संस्था या संस्थाशी ग्राहक सहकारी संस्थांनी संबंध प्रस्थापित केले नसल्याने त्याचा परिणाम त्यांच्या विकासावर झाला आहे.

### ९) व्यवस्थापकीय खर्च :

सहकारी संस्था चालविण्याकरीता किमान प्रमाणात काही सेवकवर्ग नेमावा लागतो. त्यांच्या वेतनासाठी काही रक्कम खर्च करावी लागते. खाजगी व्यापाऱ्यांच्या तुलनेत हा खर्च जास्त राहतो. म्हणून अनेक ग्राहक सहकारी संस्था या खर्चाच्या ओझ्याखाली बुडण्याचा धोका निर्माण झाला आहे. याचा परिणाम म्हणून त्यांचा विकास मंद गतीने होत आहे.

### १०) सभासदांमध्ये निष्ठेचा अभाव :

ग्राहक सहकारी संस्थेशी व्यवहार न करता अनेक सभासद खाजगी व्यापाऱ्यांकडून माल खरेदी करतात. संस्थेशी निष्ठा असणारे, कोणत्याही परिस्थितीत संस्थेकडूनच वस्तू खरेदी करणारे

सभासद आढळत नाहीत. संस्थेशी रोखीने व्यवहार करण्याचे टाळतात व खाजगी व्यापाऱ्यांकडून उधारीवर व्यवहार करतात. त्यामुळे या संस्थाचे व्यवहार कमी होऊन संस्थेची प्रगती मंदावत आहे.

**उपाययोजना :**

ग्राहक सहकारी संस्थामधील वरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी पुढील स्वरूपाच्या उपाययोजना सांगता येतात.

१. सरकारने ग्राहक सहकारी संस्थांना अधिक भांडवल पुरवठा करावा.

२. बँकांनी ग्राहक सहकारी भांडारांना कमी व्याजदरात भांडवल उपलब्ध करून द्यावे.

३. ग्राहक सहकारी संस्थांनी विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री करावी.

४. ग्राहक सहकारी संस्थांनी आपली खरेदी मध्यवर्ती घाऊक सहकारी संस्थेमार्फत करावी.

५. सेवकवर्गाला चांगला पगार देऊन प्रशिक्षण द्यावे.

६. ग्राहक सहकारी संस्थांच्या हिशोबावर, व्यवहारावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याची यंत्रणा उभारावी.

७. व्यवस्थापकीय खर्च परवडेल अशा संस्था निर्माण कराव्या.

८. शासनाने या संस्थांना प्रोत्साहन व सवलती दिल्या पाहिजेत.

९. सभासदांमध्ये संस्थांशी एकनिष्ठ राहाण्यासाठी संस्थांनी प्रयत्न केले पाहिजेत.

१०. ग्राहक सहकारी संस्थांनी वस्तूंच्या दर्जाकडे, वजनाकडे लक्ष द्यावे.

## ४.२.४ भारतातील सहकारी साखर कारखाने

### (Sugar Co-operative Industries in India)

**प्रस्तावना :**

भारतातील सहकारी प्रक्रिया उद्योगापैकी अत्यंत महत्त्वाचा तसेच प्रथम क्रमांकाचा प्रक्रिया उद्योग म्हणून सहकारी साखर कारखान्याचा उल्लेख केला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी साखर कारखान्यांना विशेष महत्त्व आहे. साधारणतः ४५ द.ल. ऊस उत्पादक शेतकरी या उद्योगावरर अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील एकूण ७.५% लोकसंख्या ऊस उत्पादन व इतर संलग्न कामात सहभागी आहेत. ग्रामीण भागातील जवळपास ५ लाख कुशल आणि अकुशल कामगार या उद्योगात

कार्यरत आहेत. देशाच्या ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सहकारी साखर कारखान्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ज्या भागात सहकारी साखर कारखाने स्थापन झालेले आहेत. त्या भागात मोठ्या प्रमाणावर अर्थिक व सामाजिक परिवर्तन घडून आले आहे. साखर कारखान्यांनी रोजगाराबरोबरच शैक्षणिक व आरोग्यविषयक सुविधादेखील उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच अनेक नवीन पूरक व सहाय्यक उद्योगांची स्थापना केली आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी साखर कारखान्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

**भारतातील सहकारी साखर कारखान्यांची भूमिका (Role of Sugar Co-operatives in India)**

भारतातील सहकारी साखर कारखान्यांनी देशाच्या ग्रामीण भागात सामाजिक, अर्थिक, आरोग्यविषयक क्षेत्रात प्रचंड क्रांती घडवून आणली आहे. सहकारी साखर कारखान्यांची भूमिका पुढील काही मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**१) रोजगार उपलब्धता :**

सहकारी साखर कारखाने हे आपल्या कार्यक्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाचा स्त्रोत बनले आहेत. साधारणपणे कारखान्यामध्ये आवश्यक असलेले हंगामी व कायमस्वरूपाच्या कामगारांच्या नियुक्त्या करताना कार्यक्षेत्रातील लोकांना प्राधान्य दिले जाते. साधारणत: साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस तोडणी व वाहातूक यामध्ये सुमारे ४ हजार मजुरांना काम मिळू शकते. म्हणजेच एक साखर कारखाना त्या भागातील ५ ते ६ हजार मजुरांना रोजगार देतात. तसेच साखर कारखाना परिसरात अनेक छोटे, लघु उद्योग सुरू आहेत. त्यातून अनेक मजुरांना रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे सहकारी साखर कारखाने रोजगारनिर्मितीचे एक प्रमुख साधन बनले आहे.

**२) शिक्षणाचा प्रसार :**

भारतातील बहुतेक साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी ग्रामीण भागात शाळा, बालवाड्या, महाविद्यालये इत्यादी शिक्षण संस्था सुरू करून शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध होत आहेत. अलिकडच्या काळात काही साखर कारखान्यांनी ऊसतोड मजुरांच्या मुलांच्यासाठी शाळा सुरू केल्या आहेत.

**३) सोयी–सुविधेत वाढ :**

ग्रामीण भागात वाहातूक आणि दळणवळणाची सेवा–सुविधा आवश्यक त्याप्रमाणात उपलब्ध नसतात. त्यामुळे साखर कारखान्यापर्यंत ऊसाची वाहातूक करताना अडचणी निर्माण होतात. त्यासाठी ग्रामीण भागात पक्के रस्ते निर्माण करण्याचे काम साखर कारखान्यांकडून केले जाते. साखर कारखान्यांनी

ग्रामीण भागात ऊस वाहातूकीच्या अनुषंगाने लहान खेड्यापर्यंत रस्ते व जोडरस्ते सुरू केले आहेत. कारखाने उभारल्यानंतर त्या भागात बँका, पोस्ट ऑफिस, टेलिफोन, वीज केंद्रे इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे लोकांच्या राहाणीमानाचा दर्जा उंचावण्यासा मदत झाली आहे.

**४) शेती विकासाला चालना :**

सहकारी साखर कारखान्यांनी शेती विकासाला चालना देण्याचे काम केले आहे. देशातील बहुतांशी साखर कारखान्यांनी शेती विकासाला चालना देण्यासाठी शेतकी विकास स्वतंत्र खाते निर्माण केले आहे. या खात्यासाठी ऊस विकासाच्या अनेक योजना राबविल्या जातात.नवीन शेती तंत्रज्ञान, बि-बियाणे, माती परीक्षण, पाणी परीक्षण यासर्व बाबतीत सभासदांना शास्त्रशुद्ध मार्गदर्शन कारखान्यांमार्फत केले जाते. शेतकऱ्यांना कारखाने आपल्या हमीपत्रावर ऑइल इंजिन, इलेक्ट्रीक मोटार, ट्रॅक्टर, मालट्रक, आधुनिक अवजारे व यंत्रे शेतकरी सभासदांना खरेदी करता यावी म्हणून बँकाना हमीपत्र देतात. यानुसार बँका अशा सहित्याच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देतात. त्यामुळे शेती उत्पादनांची खरेदी वाढत आहे.

**५) शेतकऱ्यांच्या दृष्टीकोणात बदल :**

सहकारी साखर कारखान्यांमुळे लहान व श्रीमंत शेतकऱ्यांना सभासद होता आले आहे. त्यामुळे त्यांना कारखान्याच्या कामकाजात सहभागी होता आले आहे. तसेच सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापनही शेतकरी सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळाद्वारे व्यवस्थीतपणे केले जात आहे. कारखान्याच्या व्यवस्थापनामध्ये सभासदांना सहभागी होणे शक्य झाले आहे. एकंदरीत ग्रामीण भागातील अशिक्षित शेतकऱ्यांचे सहकारी साखर कारकान्यांच्या विकासात मोलाचे योगदान मिळत असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या दुष्टीकोणात बदल होत आहे. कारखान्यामार्फत आयोजित केली जाणारी व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्र यामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक समस्यांची चांगल्या पद्धतीने सोडवणूक करण्यास व त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली आहे.

**६) औद्योगिक व्यवसायाला उत्तेजन :**

सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागात औद्योगिक व व्यावसायिक उपक्रम सुरू होण्यास मदत झाली आहे. शेती व्यवसायासाठी उपयुक्त असणारी यंत्रे व हत्यारांची निर्मिती व्यवसाय, ट्रॅक्टर दुरूस्ती, स्पेअरपार्ट विक्री सुविधा, बि-बियाणे विक्री, पशुखाद्य विक्री व्यवसाय, खत प्रकल्प, रसायननिर्मिती, डिस्टलरी व्यवसाय, किराणा माल दुकाने, जनरल स्टोअर्स, डेअरीज, पेपर मिल

इत्यादी व्यवसाय कारखान्याच्या आसपास सुरू होऊन अनेक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. याशिवाय सहकारी साखर कारखान्यांमुळे बायोगॅस निर्मितीस उत्तेजन मिळत आहे.

**७) अर्थिक विकासात योगदान :**

सहकारी साखर कारखान्यांची निर्मिती ग्रामीण भागात झाल्याने त्यातून ग्रामीण विकास झाला आहे. ग्रामीण विकासातून राष्ट्रीय विकास साध्य झाला आहे. साखर कारखान्यामुळे ऊसाला निश्चित हमीभाव मिळाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. त्यामुळे राहाणीमानाचा दर्जा सुधारला आहे. वाढत्या उत्पन्नामुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये बचतीचे प्रमाण वाढले आहे. कारखाने उभे करण्यासाठी कोट्यावधी रूपये भागभांडवल्याच्या रूपाने गोळा करता आले आहेत. सहकारी साखर कारखान्यांनी सरकारच्या अनेक राष्ट्रीय बचत योजनेत पैसा गुंतवून देशाच्या अर्थिक विकासात मोलाचा हातभार लावला आहे.

**८) उप–उत्पादनांची निर्मिती :**

सहकारी साखर कारखान्यांनी ऊसावर प्रक्रिया करून साखर निर्माण करण्याच्या व्यवसायाबरोबरच अनेक उप–उत्पादनांची निर्मिती केल्याचे दिसते. अनेक वाया जाणाऱ्या किंवा टाकाऊ पदार्थांपासून वस्तूचे उत्पादन करता येते. देशातील अनेक साखर कारखान्यांनी ऊसाच्या मळीपासून अल्कोहोल निर्मिती, स्पिरीट उत्पादन, रसायने यांची निर्मिती करण्याचे उद्योग उभारले आहेत. काही साखर कारखान्यांनी ऊसाच्या चिपाडापासून कागद, पुठ्ठा, प्लायवूड इत्यादी उपपदार्थांची निर्मिती करणारे सहाय्यभूत उद्योग सुरू केले आहेत. तसेच काही कारखान्यांनी वीजनिर्मितीमध्येही योगदान दिले आहे. यातून ग्रामीण भागातील रोजगारात वाढ होऊन जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे.

**९) सामाजिक विकासातील भूमिका :**

अर्थिक विकासाबरोबरच कारखान्यांनी ग्रामीण जनतेच्या सामाजिक विकासातही मोलाची भर घातली आहे. कारखाना परिसरात वैद्यकीय सुविधा, क्रिडाविषयक सुविधा, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अनेक कारखाने महिला विकासासाठी कल्याणाचे अनेक उपक्रम राबवितात. तसेच सामाजिक जबाबदारी म्हणून कारखाने आपल्या परिसरात सामुदायिक विवाह सोहळ्यांचेही आयोजन करतात. सामाजिक व अर्थिक विकासाबरोबर साखर कारखाने आपल्या कार्यक्षेत्रातील सांस्कृतिक विकास करण्याचा प्रयत्न करतात.

वरील प्रकारची भूमिका सहकारी साखर कारखान्यांकडून ग्रामीण विकासासाठी पार पाडली जाते.

**भारतातील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती**

**(Progress of Sugar Co-operative Industries in India)**

भारतातील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती पुढील कोष्टाच्या आधारे स्पष्ट करता येते.

**कोष्टक क्रमांक १**

**सहकारी साखर कारखान्यांची प्रगती**

| अ.क्रं. | वर्ष | सहकारी साखर कारखान्यांची संख्या | साखरेचे एकूण उत्पदान (द.ल. टन) | सहकारी साखर कारखाना उत्पादन (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १. | १९६०-६१ | ३० | ०.४५ | १४.८ |
| २. | १९७६-७७ | ११९ | २.३२ | ४७.९ |
| ३. | २०११-१२ | २२६ | ९.०३ | ३९.७ |
| ४. | २०१५-१६ | २०१ | ८.३२१ | ३५.१ |
| ५. | २०१६-१७ | १८८ | ५.६५४ | ३०.६ |

संदर्भ : NCUI Report (2018)

वरील कोष्टकावरून भारतातील सहकारी कारखान्यांची प्रगती दिसून येते.

**१) संख्या :**

भारतात सन १९६०-६१ मध्ये सहकारी साखर कारखान्यांची संख्या फक्त ३० होती. सन २०११-१२ मध्ये यात वाढ होऊन ही संख्या २२६ एवढी वाढली. परंतु २०१५-१६ पासून भारतातील सहकारी साखर कारखान्यांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते. परंतु २०१६-१७ ला साखर कारखान्यांची संख्या १८८ एवढी असल्याचे दिसते. भारतात विविध कारणांनी २०१३ -१४ पासून सहकारी साखर कारखाने बंद पडल्यामुळे ही संख्या कमी झाल्याचे दिसते.

**२) साखर उत्पादन :**

भारतातील सहकारी साखर कारखान्यांनी सन १९६०-६१ मध्ये ०.४५ द.ल. टन साखरेचे उत्पादन केले होते. परंतु सन २०१६-१७ मध्ये यात प्रचंड वाढ होऊन हे प्रमाण ५.६५४ एवढे वाढल्याचे दिसते. याच काळात म्हणजे १९६०-६१ मध्ये साखर उत्पादनातील सहकारी साखर कारखान्यांचा हिस्सा १४.८% होता. हा हिस्सा सन २०१६-१७ मध्ये ३०.६% एवढा वाढला.

**भारतातील सहकारी साखर कारखान्यांच्या समस्या / दोष**

(**Problems of Sugar Co-operative Industies in India**)

भारतातील सहकारी साखर कारखान्यांनी देशाच्या ग्रामीण विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. परंतु तरीही सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यप्रणातील पुढील काही महत्त्वाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

**१) सदोष परवाना पद्धती :**

सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देताना सरकारकडून त्या क्षेत्रात पुरेसे ऊसाचे क्षेत्र, ऊस उत्पादन, पाणी पुरवठा व्यवस्था, नैसर्गिक अनुकुलता, वाहातुकीच्या सोयी आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध आहेत का याचा विचार होत नाही. केवळ राजकीय दृष्टीकोणातून साखर कारखान्यांना परवानगी दिल्याने कारखान्यांचे चुकीच्या ठिकाणी स्थानियिकरण होऊन त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्याचा परिणाम म्हणून कारखाना पूर्ण गाळप क्षमतेने चालविण्यासाठी लागणारा ऊस बाहेरून आणावा लागतो. त्यामुळे अनेक कारखाने आजारी पडून बंद पडले आहेत.

**२) ऊस पुरवठ्यातील अनियमितता :**

ऊसाच्या भरघोस उत्पादनासाठी पाण्याची भरपूर प्रमाणात आवश्यकता असते. त्यामुळे प्रत्येकवर्षी पुरेसा प्रमाणात ऊस कारखान्यांना उपलब्ध होत नाही. तसेच भारतात ऊसाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढते आहे पण दर एकरी ऊसाचे उत्पादन मात्र घटत आहे. याशिवाय ऊस उत्पादन शेतीसाठी शेतकऱ्यांकडून शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करणे, पाण्याचा व योग्य खतांचा वापर करणे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे यामुळे शेतकरी दुर्लक्ष करीत असल्यामुळे कारखान्यांना पुरेसा प्रमाणात ऊस उपलब्ध होत नाही.

**३) गाळप क्षमतेचा अपुरा वापर :**

साखर कारखान्यांना आपल्या गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर करण्यासाठी किमान १६० दिवस ऊस मिळाला पाहिजे. परंतु भारतात अजूनही ऊसाची शेती निसर्गत: पावसाच्या अनुकुलतेवर अवलंबून आहे. त्यामुळे ऊसाचा पुरवठा अनियमितपणे होतो. त्याचा अनिष्ठ परिणाम साखर कारखान्यांवर होतो. उदा. १९८३ ते १९८९ पर्यंत या कारणाने अनेक कारखाने बंद पडले. सध्या जवळपास ३५ साखर कारखाने आजारी आहेत.

**४) ऊस वाहातुकीची समस्या :**

ऊस तोड झाल्यानंतर त्यावर लगेच प्रक्रिया केली तर साखरेचा उतारा चांगला मिळतो. परंतु ग्रामीण भागातील खराब रस्ते, वाहातुकीची अपुरी साधने, अकार्यक्षम वाहातूक व्यवस्था, ऊस

तोडणी नियोजनाचा अभाव, यामुळे ऊसाची तोड झाल्यानंतर लगेच तो कारखान्यांपर्यंत पोहचत नाही. त्यामुळे ऊसाचे उन्हाने वजनात व साखर उतारात घट होते. परिणामी शेतकऱ्यांचे व कारखानदारांचे नुकसान होते.

**५) साखर कारखान्यांचे आजारपण :**

भारतातील सहकारी कारखान्यांचा वाढता उत्पादन खर्च, व्यवस्थापकीय अकार्यक्षमता, कारखान्यांचा तोटा इत्यादी कारणांमुळे काही कारखाने आजारी पडले आहेत. आतापर्यंत नेमलेल्या गुलाबराव पाटील, शिवाजीराव पाटील, माधव गोडबले या सर्व समित्यांनी आजारी सहकारी साखर कारखाने ही गंभीर बाब असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

**६) राजकीय गटांचा प्रभाव :**

भारतातील सहकारी साखर कारखाने राजकारणाचे अड्डे बनले आहेत. साखर कारखान्यांचा वापर राजकीय ताकद वाढविण्यासाठी केला जातो. याचा परिणाम म्हणून साखर कारखान्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष होऊन भ्रष्टाचार, काळाबाजार, वशिलेबाजी, नफेखोरी, सत्ता टिकविणे यासारख्या बाबींचे प्रमाण वाढले आहे. परिणामी ज्या गरीब व दुर्बल शेतकऱ्यांचया हितासाठी कारखाने सुरू झाले तो हेतूच बाजूला गेला आहे.

**७) वाढता उत्पादन खर्च :**

सहकारी साखर कारखान्यांचा वाढता वाहातूक खर्च, नवीन यंत्रसामग्री खरेदी, कामगारांचे पगार, व्याज, नवीन वाहन खरेदी, अतिथी गृह, समारंभ निवडणूक दौरे इत्यादीवर अनाठायी खर्च केला जातो. त्यामुळे भारतातील सहकारी साखर कारखान्यांच्या तोट्यात वाढ होत आहे.

**८) आप्रशिक्षित व अकार्यक्षम कामगारवर्ग :**

भारतातील सहकारी साखर कारखान्यात नियुक्त केलेले बहुतेक कामगार हे राजकारण व वशिलेबाजीने आलेले असतात. हे कामगार आवश्यक ते शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले नसतात. त्याचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो. कामगारांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक त्या प्रमाणात करता येत नाही. तसेच हे कामगार वशिलेबाजीने आलेले असल्याने कामात निष्काळजीपणा करतात. त्याचा परिणाम कारखान्यांच्या प्रगतीवर होतो.

**९) जुनी यंत्रसामग्री :**

भारतातील बहुतांशी सहकारी साखर कारखान्यातील वापरात असणारी यंत्रसामग्री जुनी व कालबाह्य झाली आहे. याचा परिणाम साखर उत्पादनावर होतो आहे. अशा कारखान्यांचा नफा व भांडवल कमी असल्याने नवीन व सुधारित यंत्रसामग्री खरेदी करता येत नाही.

**१०) इतर समस्या :**

वरील प्रमुख समस्यांशिवाय भारतातील सहकारी साखर कारखान्यांना अतिरिक्त कामगार, दर एकरी ऊसाची अल्प उत्पादकता, ऊस तोडणी, मजूरांचा प्रश्न, ऊस लागवडीबाबतचे नियोजन, लेव्ही साखर, उपउत्पादने इत्यादी समस्यांना नियमितपणे तोंड द्यावे लागत आहे.

**उपाययोजना :**

भारतातील सहकारी साखर कारखान्यांच्या विकासासाठी पुढील उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१. साखर कारखाना परवाना पद्धतीत बदल करावा.

२. सहकारी साखर कारखान्यातील राजकारणांचा वाढता प्रभाव कमी करावा.

३. ऊस उत्पादन वाढीसाठी व्यापक कार्यक्रम राबविणे.

४. कारखान्यांना पूर्ण गाळप क्षमतेने उत्पादन करण्यासाठी नवीन यंत्रसामग्री खरेदीसाठी भांडवल पुरवठा व्हावा.

५. उप-उत्पादनांना चालना द्यावी.

६. शिक्षित व प्रशिक्षित कामगारांची नियुक्ती करावी.

७. अवास्तव व व्यवस्थापकीय खर्चावर नियंत्रण असावे.

८. वाहातूक व्यवस्था कार्यक्षम असावी.

९. शेतकऱ्यांना ऊसाची किंमत चांगली व वेळेवर मिळावी.

१०. शेतकऱ्यांना मातीपरिक्षण, खत वापर, ऊस लागवड याबाबत मार्गदर्शन करावे.

## ४.३ स्वंय अध्ययनासाठी प्रश्न

**वस्तूनिष्ठ प्रश्न**

**अ) योय पर्याय निवडा.**

१. बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था प्रामुख्याने ......... भागात असतात.

अ) ग्रामीण ब) अर्ध-ग्रामीण क) शहरी ड) यापैकी नाही

२. बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था ......... कर्जपुरवठा करतात.

अ) छोटे उद्योग ब) स्वंय रोजगारातील व्यक्ती

क) कारागीर ड) वरील सर्व

३. बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाचे ........... प्रमुख कार्य आहे.

अ) ठेवी स्वीकारणे व कर्जे देणे ब) मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे

क) यापैकी नाही

४. नागरी सहकारी बँकांची सुरूवात जर्मनीत ...... यांनी केली.

अ) माल्थस ब) रॉश्देल क) हर्मन शुल्झ ड) यापैकी नाही

५. भारतात पहिली नागरी सहकारी बँका .......... साली स्थापन झाली.

अ) ५ मार्च, १८८१ ब) ५ फेब्रुवारी, १८८९

क) ५ नोव्हेंबर, १८८७ ड) यापैकी नाही

६. नागरी भागातील अर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना ...... कडून पतपुरवठा केला जातो.

अ) नागरी सहकारी बँका ब) भूविकास बँका

क) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ड) यापैकी नाही

७. नागरी सहकारी बँकाचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने ........ क्षेत्रात असते.

अ) ग्रामीण ब) नागरी क) अर्ध-ग्रामीण ड) यापैकी नाही

८. ग्राहक सहकारी संस्था ....... च्या हिताचे संरक्षण करण्यासाठी स्थापन झालेल्या असतात.

अ) ग्राहक ब) विक्रेता क) उत्पादक ड) मध्यस्थ

९. रॅश्डेल सहकारी ग्राहक भांडाराची स्थापना ..... साली झाली.

अ) १८५० ब) १८४४ क) १८५४ ड) १९४५

१०. भारतात सहकारी ग्राहक संस्थांची रचना ...... स्वरूपाची आहे.

अ) एकल ब) संघीय क) मिश्र ड) वरील सर्व

११. राज्य ग्राहक सहकारी संघाची स्थापना ....... साली झाली.

अ) १९८८-८९ ब) १९९०-९१ क) १९६५-६६ ड) १९७०-७१

१२. भारतातील सहकारी साखर कारखाने .......... बनले आहेत.

अ) विकास केंद्रे ब) मोठे उद्योग क) मूलभूत केंद्रे ड) यापैकी नाही

१३. सहकारी प्रक्रिया उद्योगापैकी प्रथम क्रमांकाचा उद्योग ........ आहे.

अ) दुग्ध सहकारी संस्था ब) कापूस प्रक्रिया संस्था

क) सहकारी साखर कारखाने ड) यापैकी नाही

१४. भारतातील सहकारी साखर कारखान्यांची ........ प्रमुख समस्या आहे.

अ) सदोष परवाना पद्धती ब) ऊस पुरवठ्यातील अनियमितता

क) गाळप क्षमतेचा अपुरा वापर ड) वरील सर्व

१५. सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेमुळे ....... उद्योगांची स्थापना होते.

अ) अवजड ब) पूरक व सहाय्यक क) दुर्मिळ ड) यापैकी नाही

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. नागरी सहकारी बँकाची कार्ये सांगून समस्या स्पष्ट करा.

२. बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या समस्या सांगा.

३. भारतातील ग्राहक सहकारी संस्थांची रचना विषद करा.

४. भारतातील ग्राहक सहकारी संस्थांची भूमिका सांगा.

५. भारतातील सहकारी साखर कारखान्यांची भूमिका विषद करा.

**क) टीपा लिहा :**

१. नागरी सहकारी बँका कार्ये

२. बिगर कृषी पतपुरवठा संस्था कार्ये

३. ग्राहक सहकारी संस्था समस्या

४. सहकारी साखर कारखान्यांच्या समस्या

५. नागरी बँकाची प्रगती

६. भारतातील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती.

## ४.५ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ) योग्य पर्याय निवडा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. (क) | २. (ड) | ३. (अ) | ४. (क) | ५. (ब) |
| ६. (अ) | ७. (ब) | ८. (अ) | ९. (ब) | १०. (ब) |
| ११. (क) | १२. (अ) | १३. (क) | १४. (ड) | १५. (ब) |

## ४.६ संदर्भ ग्रंथ


१. Bedy R. D. (1983). Theory, History and Practice of Co-operation, International Publishing House, Meerut.

२. Mathur B. S. (2001). Co-operation in India, Saithya Bhavan Publications, Agra.

३. Hajela T. N. (2015). Principles, Problems and Practice of Co-operation, Ane Books Pvt. Ltd.

४. Dighy (2016), World Co-operative Movement.

५. B. L. Mathur, Rural Development and Co-operation.

६. प्रा. रायखेलकर आणि डांगे (१९८९). सहकार तत्त्वे व्यवहार - मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.

७. प्रा. सी. जे. जोशी (१९८९). सहकार तत्त्वे आणि व्यवहार : फडके पब्लिशिंग.

८. डॉ. गो. एस. कामत, सहकारी तत्त्वे, व्यवहार आणि व्यवस्थापन.

९. डॉ. रूपा शहा, डॉ. बी. एच. दामगी (२०२०). फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०. भोसले, काटे (१९९७). फडके प्रकाशन, कोल्हापूर.

११. शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्र (२०१८-१९). सहकाराची तत्त्वे आणि व्यवहार.

# सत्र ६ : घटक १

# सहकार कायदे व नियम

## (Co-operative Laws and Legislation)

## अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय प्रवेश

१.३.१ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

१.३.२ बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२

१.३.३ परीसमापन प्रक्रिया

१.३.४ सहकारी संस्थेच्या मालमत्ता व निधी व्यवस्थापनाबाबत तरतुदी

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्द

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके व संदर्भ

## १.१ उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील बाबींची माहिती होईल

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील महत्त्वाच्या तरतुदी समजतील

२. बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२ मधील महत्त्वाच्या तरतुदी समजतील

३. सहकारी संस्थांच्या परिसमापनाची प्रक्रिया, परिसमाकाचे अधिकार व कार्य समजतील

४. सहकारी संस्थेच्या मालमत्ता व निधी व्यवस्थापनाबाबतच्या कायदेशीर तरतुदी समजतील

## १.२ प्रस्तावना

देशात विविध प्रकारच्या सहकारी संस्था व सहकारी बँका कार्यरत असून महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाकरिता व त्यांच्या संशोधनाकरिता महाराष्ट्र शासनाने विविध प्रकारचे कायदे हे अधिनियम व नियम केलेले आहेत तसेच भारतात ज्या सहकारी संस्था एकापेक्षा अधिक राज्यांमध्ये कार्यरत आहेत अशा सहकारी संस्था व सहकारी बँकांच्या संशोधनाकरिता स्वतंत्र कायदेशीर तरतूद केलेली असून या कायद्यातील तरतुदीनुसार संस्थांची स्थापना व्यवस्थापन व त्यांचे संचलनाचे कार्य चालत असते प्रस्तुत घटकांमध्ये आपण या कायद्यातील विविध प्रकारच्या तरतुदींचा अभ्यास करणार आहोत.

## १.३ विषय प्रवेश

महाराष्ट्रातील विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी संस्थांची नोंदणी संस्थाचे सदस्यत्व संस्थेचे व्यवस्थापन संस्थेची कार्यपद्धती तसेच संस्थेचे लेखापरीक्षण इत्यादी बाबींचे निर्धारण करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या कायदेशीर तरतुदीद्वारे सहकारी संस्थेची स्थापना व कार्यपद्धती निर्धारित केलेली आहे. तसेच देशातील वेगवेगळ्या राज्यात कार्यक्षेत्र असणाऱ्या सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीकरिता बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ हा एक महत्त्वपूर्ण कायदा करण्यात आलेला असून या कायद्यातील तरतुदीनुसार बहुराज्यीय सहकारी संस्था स्थापन होतात व त्यांची कार्यपद्धती करण्याच्या बाबी निर्धारीत करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये राज्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचे परीसमापन करण्याची पद्धती तसेच परिसमापकाचे कार्य व त्याचे अधिकार या बाबी निर्धारित करून देण्यात आलेले आहेत. याबरोबरच महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मध्ये सहकारी संस्थांच्याकडील मालमत्तांचे व्यवस्थापन त्यांचे वर्गीकरण सहकारी संस्थांच्याकडे विविध प्रकारचे निधी लाभांश वाटप निधीची गुंतवणूक याबाबत देखील कायदेशीर तरतुदी करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत घटकांमध्ये आपण या कायद्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करणार आहोत.

### १.३.१ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

(Maharashtra Co-operative Societies Act - 1960)

महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची स्थापना व्यवस्थापन व कार्यपद्धती या योग्य ती दिशा देण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे पारित करण्यात आलेले

आहेत. या कायद्यास दिनांक ४ मे १९६१ रोजी राष्ट्रपतीची मंजुरी मिळालेली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ९ मे १९६१ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आला. काळाच्या ओघात सहकारी चळवळीत झालेल्या वेगवेगळ्या बदलांच्या अनुषंगाने प्रस्तुत कायद्यामध्ये विविध प्रकारच्या सुधारणा देखील करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये विशेषत्वाने सन २०११ मध्ये ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार करण्यात आलेले बदल त्याचबरोबर सन २०१३ मध्ये या अधिनियमात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले देशातील विविध राज्यांमध्ये असणाऱ्या सहकार कायद्याबरोबरच महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची स्थापना त्यांचे संचालन व सहकार चळवळीस योग्य ती दिशा देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम हा एक महत्त्वपूर्ण व मार्गदर्शक कायदा असल्याचे दिसून येते प्रस्तुत सदरामध्ये आपण या कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदींचा अभ्यास करणार आहोत.

**१. कलम १– सहकार कायद्याची व्याप्ती :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील शैक्षणिक मध्ये विविध प्रकारचे शॉर्ट टायटल्स त्याचबरोबर या सहकार कायद्याची व्याप्ती यामध्ये समाविष्ट असणारे वेगवेगळे घटक या सारख्या प्राथमिक बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

**२. कलम २ – व्याख्या व संज्ञा :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २ मध्ये विविध प्रकारच्या व्याख्या व संज्ञा स्पष्ट करण्यात आलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने शेती सहकारी संस्था, बिगरशेती सहकारी संस्था, शिखर संस्था, बोनस मध्यवर्ती बँक समिती, कंपनी ग्राहक सहकारी संस्था, सहकारी न्यायालय लाभांश सर्वसाधारण संस्था, गृहनिर्माण संस्था, परिसर मापक इत्यादी विविध प्रकारच्या व्याख्या स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

**३. कलम ३ – निबंधकाची नियुक्ती :**

या कायद्यातील कलम ३ नुसार सहकारी संस्थांच्या नोंदणी करिता राज्य शासनाद्वारे निबंधकाची नियुक्ती करण्यात येते. निबंधकाला मदत करण्यासाठी स्थानिक क्षेत्रात किंवा संपूर्ण राज्यात एक किंवा एकापेक्षा अधिक व्यक्तीची नेमणूक करण्याचे अधिकार राज्य शासनास प्राप्त झालेल्या आहेत. सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे राज्य शासन निबंधकास मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करू शकते. निबंधकाद्वारे प्रामुख्याने संस्थेची नोंदणी करणे, संस्थेची लेखापरीक्षा करणे, चौकशी करणे, निरीक्षण करणे, संस्थेचे नोंदणी रद्द करणे, संस्थेवर सर्वसाधारण देखरेख ठेवणे, संस्थेच्या विकासाकरीता मार्गदर्शन करणे व सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवणे या जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेले आहेत.

## ४. कलम ४ – सहकारी संस्थेची उद्दिष्ट्ये :

आर्थिक व सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी दहा किंवा दहा पेक्षा अधिक व्यक्तीने एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करता येऊ शकते. या संस्थेची उद्दिष्टे सहकारी तत्त्वानुसार आपल्या सदस्यांचा किंवा जनतेच्या आर्थिक हित किंवा सर्वसाधारण कल्याणाचे संवर्धन करणे ही या संस्थेची मुख्य उद्दिष्टे असतील असे नमूद करण्यात आलेले आहे. संस्थेची नोंदणी करण्याकरिता किमान दहा सदस्य असणे आवश्यक असून प्रत्येक सदस्य हा वेगवेगळ्या कुटुंबातील व्यक्ती असणे आवश्यक असते. सहकारी संस्थेची नोंदणी ही सहकार निबंधकाकडे करणे आवश्यक आहे.

## ५. कलम ५ – मर्यादित किंवा व मर्यादित दायित्व सह नोंदणी :

या कायद्याच्या कलम ५ नुसार सहकारी संस्थेची नोंदणी मर्यादित किंवा मर्यादित दायित्व सहन करता येणे शक्य आहे. संस्थेची नोंदणी करताना तिची जबाबदारी मर्यादित स्वरूपाची असे किंवा अमर्यादित स्वरूपाची असेल हे नमूद करणे आवश्यक आहे. मर्यादित दायित्व असलेली संस्था म्हणजे या संस्थेच्या सदस्यांचे दायित्व त्यांच्या उपविधी अन्वये मर्यादित करण्यात आलेली आहे अशी संस्था होय. आणि अमर्यादित दायित्व असणारी संस्था म्हणजे या संस्थेचे सभासद हे बाहेरील कर्ज देण्यासाठी व्यक्तीच्या किंवा संयुक्तरीत्या प्रतिबंधित असतात किंवा बांधील असतात व संस्थेची संपत्ती ही बाहेरील कर्जासाठी संपूर्णपणे जबाबदार असते, तिला अमर्यादित दायित्वाची संस्था असे म्हटले जाते.

## ६. कलम ६ – नोंदणीच्या शर्ती :

मध्यवर्ती सहकारी संस्थेव्यतिरिक्त इतर कोणत्याही सहकारी संस्थेची या अधिनियमान्वये नोंदणी करण्यासाठी अशा संस्थेचे सदस्य होण्यास पात्र असणाऱ्या व्यक्ती दहा व्यक्ती असणे आवश्यक असते. तसेच या सर्व व्यक्ती सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणारे असणे अत्यंत आवश्यक असते .

## ७. कलम ७ – संस्थेच्या नोंदणी विषयक शर्तीमध्ये सूट देण्याचा अधिकार :

सहकारी संस्थेच्या नोंदणीकरीता किमान दहा व्यक्तींची आवश्यकता असली तरी या दहा व्यक्ती वेगवेगळ्या कुटुंबातील असणे अत्यंत आवश्यक असते. सहकारी चळवळीची उद्दिष्टे आणि तिच्या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबना करीता आणि विकासाकरिता या सर्व बाबींचे पालन करणे आवश्यक असते. तथापि उपसा जलसिंचन सहकारी संस्था तसेच आदिवासी सहकारी संस्था व इतर विशेष सहकारी संस्थान करिता किमान सदस्य संख्या पाच पर्यंत कमी करण्याचे अधिकार राज्य सरकारला देण्यात आलेले आहेत.

## ८. कलम ८ – नोंदणी अर्ज :

सहकारी संस्थेच्या नोंदणीच्या प्रयोजनाकडे संबंधित सहकारी संस्थेच्या प्रवर्तकाने निबंधकाकडे विहीत नमुन्यातील अर्ज करणे आवश्यक असते. नोंदणी अर्जासोबत संबंधित संस्थेच्या प्रस्तावित उपविधीच्या चार प्रती जोडणे, नोंदणी फी भरणे तसेच नोंदणीसाठी आलेल्या अर्जावर विहीत ठिकाणी सही करणे तसेच इतर आवश्यक कागदपत्रे जोडून योग्य तो प्रस्ताव सहकार निबंधकाकडे सादर करणे आवश्यक असते. सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी नियम क्रमांक ४ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे नमुना मधील अर्ज सादर करणे आवश्यक असते, तसेच किमान दहा सदस्यांच्या सह्या निशी अर्ज सादर करणे आवश्यक असते.

## ९. कलम ९ – सहकारी संस्थेची नोंदणी :

एखाद्या विशिष्ट संस्थेच्या नोंदणी करिता विहित नमुन्यातील प्रस्ताव सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील सर्व तरतुदीच्या अनुषंगाने योग्य तो प्रस्ताव सादर झालेला असल्यास अशा प्रस्तावानुसार संस्थेची उद्दिष्टे व उपविधी या सर्व मागील बाबींची तपासणी करून अर्ज प्राप्त झालेल्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत सदर संस्थेच्या नोंदणी बाबतचा दाखला देणे आवश्यक असते. सदर संस्थेची नोंदणी करून घेण्याची जबाबदारी निबंधकाची असते. एखाद्या सहकारी संस्थेच्या नोंदणी नाकारण्याचा अधिकार निबंधकास प्राप्त झालेला आहे. मात्र सदर सहकारी संस्थेची नोंदणी कोणत्या कारणास्तव नाकारण्यात येत आहे त्याबाबतची माहिती प्रवर्तकाच्या कळवणे बंधनकारक असते.

## १०. कलम १० – नोंदणी प्रमाणपत्र पुरावा :

सहकारी संस्थेची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सहकार निबंधकाने सही केलेले सहकारी संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ज्वारी करणे आवश्यक असते. सदर प्रमाणपत्रात संस्थेचे नाव, ठिकाण व प्रकार यासारख्या अत्यावश्यक बाबी या नोंदवलेले असणे व सहकार निबंधकाने सदर प्रमाणपत्र चिन्हांकित करून त्यावर आपली सही केलेली असणे आवश्यक असते हा संस्थेच्या नोंदणीचा महत्त्वपूर्ण पुरावा मानला जातो.

## ११. कलम ११ – निबंधकाचा चौकशी किंवा तपासणीचे अधिकार :

काही विशिष्ट कारणास्तव एखाद्या सहकारी संस्थेचे चौकशी किंवा तपासणी करण्याचा अधिकार सहकार निबंधकास प्राप्त झालेला आहे. जेव्हा कोणत्याही पक्षाने अर्ज केल्यानंतर किंवा एखाद्या विशिष्ट अधिकाऱ्याने किंवा कोणत्याही सक्षम व्यक्तीने दिलेल्या संदर्भानुसार किंवा संस्थेच्या सदस्यांनी केलेल्या अर्जानुसार आपल्या अधिकाराचा उपयोग करून निबंधक विशिष्ट सहकारी संस्थेची चौकशी किंवा तपासणी करू शकतो.

## १२. कलम १२ – सहकारी संस्थांचे वर्गीकरण :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १ व कलम २ मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे नोंदणीकृत सहकारी संस्थांचे योग्य ते वर्गीकरण करणे आवश्यक असते. हे वर्गीकरण वेगवेगळ्या उपवर्गामध्ये देखील करता येणे शक्य आहे. काही विशिष्ट कारणास्तव एखाद्या विशिष्ट सहकारी संस्थेस एका वर्गातून दुसऱ्या वर्गामध्ये समाविष्ट करावयाची असल्यास निबंधकाने लेखी सूचनेद्वारे असा बदल करणे आवश्यक असते. तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीने वर्गीकरण किंवा उपवर्गीकरणाची यादी प्रकाशित करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ कृषी संस्था, उपसा जलसिंचन संस्था, ग्राहक सहकारी संस्था, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, प्रक्रिया संस्था, उत्पादक सहकारी संस्था, सर्वसाधारण सहकारी संस्था, शिखर संस्था, मध्यवर्ती सहकारी संस्था इत्यादी.

## १३. कलम १३ – संस्थेच्या उपविधीमध्ये सुधारणा :

उपविधी म्हणजे संस्थेचे अंतर्गत यंत्रणा व्यवस्थितपणे चालवण्यासाठी केलेली नियमावली होय ही नियमावली संस्थेच्या कारभाराला लागू करण्यापूर्वी संस्थेच्या नोंदणी बरोबरची नोंदणी करणे आवश्यक असते. तथापि कालांतराने आवश्यकता वाटल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या परीक्षांमध्ये सहकारी संस्थेच्या उपविधीमध्ये दुरुस्ती करता येणे किंवा त्यामध्ये सुधारणा करता येणे शक्य असते. तथापि या सुधारणेकरिता किंवा दुरुस्तीकरिता निबंधकाची परवानगी घेणे आवश्यक असते.

## १४. कलम १४ – उपविधीत सुधारणा करण्याबाबतचे निर्देश देण्याचा अधिकार :

एखाद्या विशिष्ट सहकारी संस्थेच्या उपविधीमध्ये सुधारणा करणे संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असल्यास किंवा इस्ट वाटल्यास निबंधक अशा विशिष्ट सहकारी संस्थेस आपल्या उपविधीमध्ये सुधारणा करण्याबाबतचे निर्देश जारी करू शकतो. निर्देशित करण्यात आलेल्या अवधीत सुधारणा करण्यात आलेल्या संस्थेचे उपविधी मंजुरीकरिता निबंधकाकडे सादर करणे आवश्यक असते. एखाद्या सहकारी संस्थेची उपविधी सहकार अधिनियमातील तरतुदी अशी विसंगत असतील किंवा नियमांना बाधा आणणारे असतील तर अशा उपविधीमध्ये सुधारणा करणे आवश्यक असते अशा परिस्थितीत निबंधकाद्वारे स्वतंत्र निर्देश देऊन संबंधित सहकारी संस्थेच्या उपविधीमध्ये बदल करण्याचे सुचवले जाते. त्यानुसार निर्देशित कालावधीत सदर दुरुस्ती करून घेणे आवश्यक असते

**१५. कलम १५ – संस्थेच्या नावात बदल करणे :**

कायद्यातील कलम १५ मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेच्या नावात बदल करता येणे शक्य असते या सहकारी संस्थेच्या नावात बदल करणे हा उपविधी दुरुस्तीचा भाग समजला जातो. संस्थेच्या नावांमध्ये बदल करावयाचा असल्यास सहकारी संस्थेच्या सर्वसाधारणसभेत ठराव संमत करून त्यास निबंधकाची परवानगी घेणे आवश्यक असते संस्थेच्या नावात बदल केला असल्यास निबंधकाने नवे नाव सहकारी संस्थेच्या नोंदवहीत दाखल करून त्याबाबतचे सुधारित नवीन नोंदणी प्रमाणपत्र जारी करणे आवश्यक असते. संस्थेच्या नावात बदल केला असला तरी संस्थेची संपत्ती व देणी सभासद व इतर कायदेशीर तरतुदी यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होत नाही.

**१६. कलम १६ – दायित्वामध्ये बदल :**

सहकारी संस्थांमध्ये मर्यादित दायित्व व अमर्यादित दायित्व असणाऱ्या सहकारी संस्थांचा समावेश होतो. एखाद्या सहकारी संस्थेस आपल्या दायित्व अशा प्रकारांमध्ये बदल करावयाचा असल्यास संबंधित सहकारी संस्थेच्या सर्व सदस्यांच्या सहीनिशी अर्ज करून व संस्थेच्या सर्वसाधारण सभेला पुर्वकल्पना देऊन संस्थेच्या दायित्वाच्या प्रकारांमध्ये बदल करता येणे शक्य असते. त्यामधील बदल हा अधिनियम व नियम या मधील तरतुदी विसंगत असता कामा नये याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असते असा दायित्वामध्ये असा बदल केला असल्यास त्याची विशिष्ट नोंद सहकार निबंधकाने घेणे आवश्यक असते.

**१७. कलम १७ – संस्थेचे एकत्रीकरण हस्तांतरण विभागणी किंवा रूपांतर :**

सहकारी संस्थेची निबंधकाच्या पूर्वमान्यतेने व एकत्रीकरण हस्तांतरण किंवा विभाजनाच्या प्रयोजनासाठी भरविण्यात आलेल्या विशेष किंवा सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या सदस्यांपैकी २/३ सदस्यांनी सदर बाब मान्य केली असता एका संस्थेचे दुसऱ्या सहकारी संस्थेत एकत्रीकरण करणे एका सहकारी संस्थेची मालमत्ता व दायित्व पूर्णतः किंवा अंशतः इतर कोणत्याही सहकारी संस्थेकडे हस्तांतरित करणे दोन किंवा त्याहून अधिक सहकारी संस्थांमध्ये आपली विभागणी करणे अथवा एका विशिष्ट प्रकारच्या सहकारी संस्थेची इतर वर्गात रुपांतर करणे या बाबी शक्य असतात. तथापि या संपूर्ण प्रक्रियेसाठी सर्वसाधारण सभेत किंवा विशेष सर्वसाधारण सभेमध्ये २/३ सभासदांनी मंजुरी देणे व त्यास सहकार निबंधकाने परवानगी देणे आवश्यक असते.

**१८. कलम १८ – सार्वजनिक हितासाठी किंवा सदस्यांच्या हितासाठी संस्थेचे एकत्रीकरण विभागणी पुनर्रचना :**

सार्वजनिक हितासाठी किंवा सदस्यांच्या हितासाठी संस्थेचे एकत्रीकरण विभागणी पुनर्रचना करण्याचे अधिकार जेव्हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने किंवा सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीने कोणत्याही सहकारी संस्थेचे एकत्रीकरण, विभागणी किंवा पुनर्रचना करण्याची आवश्यकता असते

तेव्हा सहकारी निबंधक राज्य शासनाच्या शासकीय राजपत्रातील तरतुदीनुसार अधिसूचित करून संबंधित सहकारी संस्थेची विभागणी करण्याचे निर्देश देऊ शकतात.

### १९. कलम १९ – सहकारी संस्थांची पुनर्रचना :

एखाद्या सहकारी संस्थेने तिच्या सदस्यांमध्ये तडजोड किंवा व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने विशेष सर्वसाधारण सभा बोलवलेली असल्यास आणि या सभेमध्ये सहकारी संस्थेच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला असल्यास अथवा सहकारी संस्थेच्या परिसमापकाने सहकारी संस्थेच्या पुनर्रचना बाबतचा प्रस्ताव सादर केलेला असल्यास सहकारी संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देता येतो.

### २०. कलम २० – सहकारी संस्थांबरोबर भागीदारी करार :

एखाद्या सहकारी संस्थेस विशिष्ट व्यवसाय किंवा धंदा चालविण्यासाठी भागीदारी पद करण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. तथापि अशी भागीदारी करण्यासाठी संबंधित दोन किंवा अधिक सहकारी संस्थांच्या मतदानास पात्र असणाऱ्या सर्व सदस्यांपैकी तीन चतुर्थांश (३/४) सदस्यांनी बहुमताने भागीदारी विषयक करार संमत करणे आवश्यक असते. असा समज केलेला करार सहकार निबंधकांच्या परवानगीसाठी पाठवणे व त्यास मान्यता घेणे आवश्यक असते.

### २१. कलम २१– संस्थेची नोंदणी रद्द करणे :

एखाद्या विशिष्ट सहकारी संस्थेची आपली नोंदणी स्वच्छेने रद्द करावयाची असल्यास तसेच संस्थेचे हस्तांतरण एकत्रीकरण, विभागणी किंवा सहकारी संस्थेचे व्यवहार बंद करण्यात आलेले असल्यास अथवा कामकाज बंद झालेले असल्यास कलम ४ मध्ये निर्देशित केलेला आहे. आवश्यक निधी शिल्लक राहिलेला नसल्यास तसेच कलम १०९ अन्वये संस्थेचा व्यवहार समाप्त करण्यात आलेला असल्यास सहकार निबंधक संस्थेची नोंदणी रद्द करू शकतो तसेच कलम १०२ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सहकारी संस्थेचा कारभार गुंडाळण्यात सांगण्यात आलेले असल्यास सहकार निबंधक सहकारी संस्थेची नोंदणी रद्द करून सदर बाब राजपत्रात प्रसिद्ध करू शकतो.

### २२. कलम २२ – सदस्यत्वा बाबतच्या अटी :

भारतीय करार कायद्यातील कलम अकरा प्रमाणे करार करण्यास पात्र असलेली व्यक्ती सहकारी संस्थेची सभासद होऊ शकते तथापि सदर व्यक्ती ही सज्ञान असणे अत्यंत आवश्यक असते. व्यक्ती सदस्य बरोबरच भागीदारी संस्था किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेलाही सहकारी संस्थेचे सदस्यत्व धारण करता येते. तथापि याकरिता शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे आवश्यक असते एका विशिष्ट सहकारी संस्थेला ही

दुसऱ्या सहकारी संस्थेचा सदस्यत्व घेता येते, त्याबरोबरच राज्य सरकार व केंद्र सरकार तसेच स्थानिक प्राधिकरणाला ही विशिष्ट अटी व शर्तीच्या आधारे सहकारी संस्थेचे सदस्यत्व धारण करता येते.

### २३. कलम २३ – खुले सदस्यत्व :

सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार तसेच संबंधित सहकारी संस्थेच्या उपविधीमध्ये तरतूद करण्यात आलेल्या व्यक्तीला सहकारी संस्थेचे सदस्यत्व मिळू शकते. पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस सदस्यत्वापासून वंचित ठेवता येत नाही. तथापि सदस्यत्वाकरिता संबंधित व्यक्तीने लेखी अर्ज केलेला असणे आवश्यक आहे व त्यात सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेले असणे आवश्यक आहे. कोणतीही सहकारी संस्था पुरेशा कारणाशिवाय आहार धारण करणाऱ्या व्यक्तीला सभासदत्वापासून वंचित ठेवू शकत नाही.

### २४. कलम २४ – नाममात्र व सहयोगी सदस्य :

सहकारी संस्थेच्या उपविधीनुसार नोंदणी झालेल्या नाममात्र सदस्य म्हणून ज्याचे सदसत्व मान्य केलेले असते त्यास नाममात्र सदस्य असे म्हटले जाते. तर जो सदस्य इतर सदस्य बरोबर संयुक्तपणे संस्थेचा भाग धारण करतो पण त्याचे नाव प्रथम स्थानी नसते अशा सदस्या सहयोगी सदस्य असे म्हटले जाते. नाममात्र सदस्य व सहयोगी सदस्य मतदानाचा अधिकार नसतो. तसेच संस्थेच्या त्यामधून प्राप्त होणारा लाभांश देखील प्राप्त करण्यास पात्र नसतो नाममात्र सदस्याला सर्वसाधारण सदस्य सारखे सहकारी संस्थेचे विविध अधिकार व हक्क प्राप्त होत नाहीत तसेच संस्थेच्या जिंदगीत वाटा प्राप्त होत नाही.

### २५. कलम २४–A सदस्यांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २४ मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेच्या सदस्यांना सहकारी तत्वे, सहकारी संस्थेचे व्यवस्थापन, नेतृत्वगुण, सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाद्वारे व्यावसायिक कौशल्ये, मतदानाचा अधिकार, हक्क व कर्तव्य संस्थेची कार्यपद्धती इत्यादीबाबतचे शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक असते. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणासाठी राज्य सहकारी संघ, राज्य शिखर प्रशिक्षण संस्था यांनी विहित केलेल्या विविध प्रकारच्या सहकारी शिक्षण व प्रशिक्षण संस्थांद्वारे हे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाते.

### २६. कलम २५ – सदस्यत्व बंद होणे किंवा रद्द होणे :

सहकारी संस्थेच्या सदस्याने स्वतःहून राजीनामा दिल्यास किंवा संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाने विहित कारणासह एखाद्या सदस्याचे सदस्यत्व रद्द केल्यास अथवा सदस्याने आपले हितसंबंध दुसऱ्या सदस्याकडे हस्तांतरित केलेली असल्यास किंवा सदस्य मृत्यू पावलेला असल्यास सदस्याचे सहकारी

संस्थेमधील हक्क संपुष्टात येतात व त्याचे सदस्यत्व रद्द केले जाते. एखाद्या सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी संस्थेच्या व्यवस्थापनाने किंवा संचालक मंडळाने सदस्यत्व बंद करण्याबाबत किंवा रद्द करण्याबाबत कायदेशीर ठराव पारित करणे आवश्यक असते.

### २७. कलम २६ – सदस्याचे हक्क व कर्तव्य :

सहकारी संस्थेच्या सदस्यांनी पार पाडव्याची कर्तव्य व त्याचे हक्क सहकार कायद्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. यानुसार सहकारी संस्थेच्या सदस्याने सहकारी संस्थेच्या कार्यात सक्रिय सहभाग घेणे सर्वसाधारण सभेला हजर राहणे मतदान करणे, व्यवस्थापन समितीची निवड करताना मतदान करणे, निवडणुकीसाठी उभे राहणे, कर्ज मिळवण्याचा हक्क, उपविधी व नियम यांना अनुसरुन भाग वर्ग करणे वारस नेमणे कागदपत्रांची पाहणी करणे त्याची परत मिळवणे नफा व लाभांश मिळवण्याचा अधिकार चौकशी करण्याची मागणी करण्याचा अधिकार इत्यादी अधिकारांचा समावेश होतो. निर्देशित केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर करणे संस्थेच्या नियमाचे अनुपालन करणे संस्थेच्या हितासाठी व वृद्धीसाठी सक्रिय सहभाग नोंदवणे इत्यादी बाबींचा समावेश हक्क व कर्तव्य या मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

### २८. कलम २७ – सदस्याचा मतदानाचा अधिकार :

सहकारी संस्थेच्या सदस्याला निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झालेला असून सहकारी संस्थेमध्ये एक व्यक्ती एक मत या नियमानुसार मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. तथापि संबंधित सदस्यास कोणत्याही परिस्थितीत बदली व्यक्तीद्वारे मतदान करता येत नाही. सहकारी संस्थेच्या नाममात्र सदस्यास मात्र मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला नसतो. तथापि सर्वसाधारण सदस्यास संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेत मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे हे मतदान आवाजी मतदान, शिरगणती, हात वर करून मतदान, सभागृहातील सभासद वेगवेगळ्या विभागात विभागून व गुप्त मतदान यापैकी योग्य त्या पद्धतीने मतदान करता येते.

### २९. कलम २८ – भाग धारण करण्यावर निर्बंध :

सहकारी संस्थेमध्ये कार्पोरेट कंपन्याप्रमाणे भागधारक धारण करण्याचे अधिकार प्राप्त झालेले नाहीत सहकारी संस्थेच्या एका व्यक्तीस संस्थेच्या एकूण भाग भांडवलाच्या एक पंचमांश (१/५) रकमे इतके भाग धारण करता येऊ शकतात. यापेक्षा अधिक भाग धारण करण्याचे अधिकार सहकारी संस्थेच्या सदस्य नाहीत. सहकारी संस्थेच्या एकूण भाग भांडवलापैकी जास्तीत जास्त एक पंचमांश इतक्या रकमेचे शेअर्स किंवा भाग धारण करण्याचा अधिकार सहकारी संस्थेच्या सदस्य आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीत या रक्कमेपेक्षा अधिक रक्कमेचे भाग धारण करता येत नाहीत.

### ३०. कलम २९ ते ३१ – भाग किंवा हितसंबंध यांचे हस्तांतरण :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २९ नुसार भाग किंवा हितसंबंध यांचे हस्तांतरण किंवा त्यावरील भाग याबाबत निर्बंध घालण्याबाबत ची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच कलम ३ नुसार सदस्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याचे भाग व हितसंबंध इतर व्यक्तीस किंवा वारसास हस्तांतरित करण्याबाबतच्या तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. कलम ३१ मधील तरतुदीनुसार भाग किंवा हितसंबंध जगदीश पात्र नसल्याबाबतचे तरतूदी करण्यात आलेल्या असून एखाद्या विशिष्ट सदस्याच्या कर्जाच्या देण्यासाठी किंवा वसुलीसाठी संबंधित सदस्याचे भाग हे वसुलीस पात्र नसल्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे.

### ३१. कलम ३२ – पुस्तके व दस्तऐवज पाहण्याचे सदस्याचे हक्क :

सहकारी संस्थेच्या सदस्य नियम व उपविधी यास अनुसरून सहकारी संस्थेचे नियम उपविधी लेखापरीक्षण अहवाल वार्षिक ताळेबंद नफा-तोटा पत्रक समितीच्या सदस्यांची यादी सदस्यांची नोंद व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त तसेच त्याने संस्थेची केलेल्या व्यवहाराच्या नोंदी इतर पुस्तके व अभिलेख लेख इत्यादी बाबी तपासण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. संस्थेच्या सदस्यास लेखी स्वरूपात कागदपत्रे किंवा दस्तऐवजाचे हवी असल्यास सहकार कायद्यातील तरतुदीनुसार विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर व संबंधित लेखी देण्याबाबतची विनंती केल्यानंतर सहकारी संस्थेच्या सदस्यास गोपनीय बाबी वगळता लिखित स्वरूपात दस्तऐवज उपलब्ध होऊ शकतात.

### ३२. कलम ६४ ते ७१ – संस्थेची मालमत्ता व राखीव निधी :

सहकारी संस्थेचा संस्थेच्या मालमत्ता व राखीव निधीबाबत या कायद्यातील कलम ६४, कलम ६५ तसेच कलम ६६ मध्ये विहित तरतुदी करण्यात आलेले आहेत. या तरतुदीनुसार सहकारी संस्थेचे मालमत्तेचे विभाजन सहकारी संस्थेकडे विविध प्रकारचे राखीव निधी नफ्याचे विभाजन तसेच कलम ६७ मधील तरतुदीनुसार लाभांश वाटप यावरील निर्बंध लादण्यात आलेले आहेत. यानुसार कोणतीही सहकारी संस्था आपणास प्राप्त झालेल्या निवड नफ्यातून जास्तीत जास्त पंधरा टक्केपर्यंत लाभांश जाहीर करू शकते सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाने जाहीर केलेल्या लाभांशाच्या दरात बदल करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेत देखील प्राप्त झालेले नसतात. कलम ६८ नुसार राज्यातील संगीत शिक्षण व्यवस्थेत शिक्षण निधी म्हणून अंशदान देण्याची तरतूद देखील करण्यात आलेली आहे तर कलम ६८ नुसार सहकारी संस्थेस प्राप्त झालेल्या नफ्यातून सार्वजनिक प्रयोजनासाठी अंशदान म्हणजेच निधी देण्याची तरतूद देखील करण्यात आलेली आहे तर कलम ७० नुसार सहकारी संस्थेने आपल्याकडे निधी कोणकोण्या रोख्यांमध्ये तसेच ठेवींमध्ये गुंतवणूक करावा याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेले आहेत कलम ७१

नुसार सहकारी संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या करिता भविष्य निर्वाह निधीमध्ये गुंतवणूक करण्याबाबतची तरतूद देखील करण्यात आली आहे.

**३३. कलम ७२ ते कलम ८० सहकारी संस्थेचे व्यवस्थापन व्यवस्थापन :**

या कायद्याच्या विभाग सात मध्ये कलम ७२ ते कलम ८० यामध्ये सहकारी संस्थेचे व्यवस्थापन समितीचे सदस्य, व्यवस्थापन समितीचे अधिकार, कार्यपद्धती, सहकारी संस्थांच्या निवडणुका निवडणूकीस पात्र असणाऱ्या उमेदवारांची पात्रता, संचालक मंडळाची रचना, संचालक मंडळाची कार्य, वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेले आहेत या तरतुदीच्या अनुषंगाने सहकारी संस्थांचे व्यवस्थापन होत असते.

**३४. कलम ८१– संस्थेचे लेखापरीक्षण :**

नोंदणीकृत सहकारी संस्थेने प्रत्येक व्यक्ती वर्षातून किमान एकदा आपले लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण करण्याकरिता सहकार विभागाने निर्देशित केलेल्या नामतालिकेमधून योग्य त्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करून सनदी लेखापाल आखडून लेखापरीक्षण करून घेऊन लेखापरीक्षणबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक असते. लेखापरीक्षण यामध्ये सहकारी संस्थेच्या संपूर्ण आर्थिक व्यवहाराची तपासणी नियम व अधिनियमस धरुन झालेली आहे किंवा नाही याबाबतची तपासणी करून घेणे अत्यंत आवश्यक असते.

**३५. कलम ८१ ते कलम १०१ सहकारी संस्थांमधील विवाद व सहकारी न्यायालय :**

प्रस्तुत कायद्याच्या कलम १९१ ते १०१ पर्यांच्या कलमांमध्ये सहकारी संस्थांच्या मधील वाद-विवाद व सहकारी व्यवस्थेबद्दलची न्यायालयीन यंत्रणा याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सहकारी संस्थेच्या सभासदांचे वारसदार संस्थेतील कर्मचारी यांच्यातील विभाग तसेच सहकारी संस्थांबाबत निर्माण झालेले तंटे व वाद मिटवण्यासाठीची न्यायालयीन यंत्रणा तसेच सहकारी संस्थांमधील विविध प्रकारची विवादात्मक प्रकरणे सहकारी न्यायालयाकडून दुसऱ्या न्यायालयाकडे हस्तांतरण करण्याबाबतच्या तरतूदी कलम १०१ नुसार सहकारी संस्थेचे येणे वसूल करण्याबाबतचे वसुली अधिकार याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेले आहेत.

**३६. ९७ वी घटना दुरुस्तीनुसार सहकार कायद्यातील बदल :**

भारतीय संविधनातील ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार घटनेच्या अनुच्छेद १९ (१) (सी) मध्ये सुधारणा करुन सहकारी संस्था स्थापन करणे हा मूलभूत हक्क घोषीत करण्यात आला आहे. तसेच अनुच्छेद ४३ (बी) नुसार राज्य शासनाने सहकारी संस्थाचे स्वायत्त कामकाज, लोकशाही नियंत्रण व

व्यावसायिक व्यवस्थापनास चालना देण्याची तरतूद करण्यात आली आहे. संविधानातील वरील सुधारणांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन दिनांक १४.२.२०१३ रोजी अध्यादेश जारी करण्यात आला. त्यानंतर विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहानी या विधेयकास मान्यता दिल्यानंतर दिनांक १३.८.२०१३ रोजी सुधारित महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रसिध्द करण्यात आला आहे. वरील सुधारणांच्या अनुषंगाने सहकार कायदयात खालील महत्वाचे बदल करण्यात आले आहेत.

१. कलम २-तज्ञ संचालक, कार्यलक्षी संचालक व क्रियाशील सदस्य यांची व्याख्या समाविष्ट.

२. कलम २४-अ प्रत्येक सहकारी संस्थेने तिचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करणे बंधनकारक आहे.

३. कलम २७- अक्रियाशील सभासदास संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेत मतदान करता येणार नाही.

४. कलम ७३CA- कलम १४६ मधील गुन्हयाकरीता कलम १४७ नुसार शिक्षा/दंड झाल्यास अशा व्यक्तीस संचालकपदासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

५. कलम ७३CB- सहकारी संस्थांची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण घटीत करण्याची तरतूद.

६. कलम ७५- संस्थेने आर्थिक वर्ष संपल्यानंतर चार महिन्यात लेखापरिक्षण करुन घेणे व सहा महिन्यात संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करणे बंधनकारक आहे.

७. कलम ७९- संस्थेच्या कामकाजाशी संबधित विविध प्रकारची विवरणपत्रे सहा महिन्यात निबंधकास सादर करणे बंधनकारक.

८. कलम ८३- चौकशी पूर्ण करण्यासाठी कमाल मर्यादा ६ महिने (कमाल ३ महिने मुदत वाढ) निश्चित करण्यात आली आहे.

९. कलम ८८- चौकशी पूर्ण करण्यासाठी कमाल मर्यादा २ वर्षे (कमाल ६ महिने मुदत वाढ) निश्चित करण्यात आली आहे.

वरील विविध कलमांवर बरोबरच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सहकारी संस्थेचे व्यवस्थापन नियमन लेखापरीक्षण कायदेशीर कार्यवाही सहकारी संस्थेची समाप्ती इत्यादी बाबतच्या विविध प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व सहकारी संस्थांचे व्यवस्थापन व नियमन होत असल्याचे दिसून येते.

## १.३.२ बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२

**(Multi-State Co-operative Societies Act - 2020)**

एकापेक्षा अधिक राज्यांमध्ये कार्यक्षेत्र असणाऱ्या विविध प्रकारच्या सहकारी संस्था व सहकारी बँकांना त्यांची स्थापना व्यवस्थापन व कार्यपद्धती इत्यादी बाबी निर्धारित करण्याकरिता त्याच्या राज्यातील सहकार कायदे किंवा सहकार अधिनियम हे अपुरे असल्यामुळे व वेगवेगळ्या राज्यातील कायदे भिन्न असल्यामुळे त्यामध्ये विविधता असल्यामुळे अनेक सहकारी संस्थांना तसेच सहकारी बँकांना वेगवेगळ्या राज्यात कार्य करत असताना येणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी व त्यामध्ये सुसुत्रता व एकवाक्यता आणण्याकरिता बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ हा पास करण्यात आलेला असून या कायद्यातील तरतुदीनुसार या देशातील विविध प्रकारच्या वेगवेगळ्या राज्यात कार्यरत असणाऱ्या किंबहुना एकापेक्षा अधिक राज्याचे कार्यक्षेत्र असणाऱ्या सहकारी संस्थांचे व्यवस्थापन व कार्यचालन होत असल्याचे दिसून येत आहे.

### १. बहुराज्यीय सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज :

या कायद्यातील कलम ३ नुसार वेगवेगळ्या राज्यात कार्य करु इच्छिणाऱ्या सहकारी संस्थेची नोंदणी करण्याकरिता संबंधित संस्थेच्या प्रवर्तकाने विहित नमुन्यातील अर्ज केंद्रीय निबंधकाकडे सादर करणे आवश्यक असते. ज्यामध्ये संस्थेच्या उपविधीच्या चार प्रति, नोंदणीकरिताचा अर्ज, सर्व सदस्यांनी सह्या केलेला अर्ज, संबंधित संस्थेच्या भागभांडवलाकरिता भांडवल देऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींची यादी इत्यादी बाबीसह संस्थेच्या स्थापनेबाबत असा प्रवर्तकांनी केलेला ठराव केंद्रीय निबंधक कार्यालयाकडे सुपूर्द करणे आवश्यक असते.

### २. बहुराज्य सहकारी संस्थेची नोंदणी :

या कायद्यातील कलम ४ नुसार केंद्रीय निबंधकाकडे विहित नमुन्यात नोंदणी बाबतचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर केंद्रीय निबंधकास समाधानकारक कागदपत्रे व माहिती उपलब्ध झाल्यानंतर केंद्रीय रजिस्टार बहुराज्य सहकारी संस्थेची नोंदणी करून नोंदणीचे प्रमाणपत्र स्वतःच्या सहीनिशी जारी करत असतो तसेच बहुराज्यीय सहकारी संस्थेच्या उपविधीची नोंदणीकृत कॉपी किंवा प्रत आपल्या सहीनिशी संबंधित प्रवर्तकाकडे हस्तांतरित करत असतो.

### ३. बहुराज्य सहकारी संस्थेचे उपविधी :

कायद्यातील कलम ६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक बहुराज्य सहकारी संस्थेने आपले उपविधी तयार करणे आवश्यक असते हे उपविधी बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२ मधील सर्व

तरतुदी व उद्दिष्टांच्या अनुषंगाने संबंधित संस्थेच्या संशोधनाकरिता केलेले उपनियम असणे आवश्यक असते हे उपनियम मुख्य कायद्यास अनुसरून असल्याची खात्री झाल्यानंतर केंद्रीय निबंधक संबंधित सहकारी संस्थेच्या उपविधीत मान्यता देत असतो. या उपविधीमध्ये प्रामुख्याने भाग रद्द करणे, संस्थेचे पदाधिकारी, संस्थेची कार्यपद्धती, संस्थेच्या वेगवेगळ्या समित्या, लाभांश वाटपाची पद्धती व नियम संस्थेच्या वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्याबाबतची पद्धती, मतदान व मतदान प्रक्रिया बाबतच्या तरतुदी, नोकर भरती बाबतच्या तरतुदी व वेगवेगळ्या समित्यांचे अधिकार याबाबतच्या तरतुदी यामध्ये समाविष्ट असतात या कायद्यातील कलम ७ नुसार सहकारी संस्थेने केलेल्या उपविधी नाकारण्याचे अधिकार केंद्रीय निबंधकास प्राप्त झालेल्या आहेत. जेव्हा बहुराज्य सहकारी संस्थेने केलेले उपविधी मुख्य कायद्याच्या चौकटीमधील नाहीत असे निदर्शनास आल्यास संबंधित उपविधी नाकारण्याचे अधिकार केंद्रीय निबंधकास आहेत.

**४. संस्थेचे नोंदणीकृत मुख्य कार्यालय :**

या कायद्यातील कलम ८८ नुसार बहुराज्यीय सहकारी संस्थेने आपले एक नोंदणीकृत मुख्य कार्यालय निर्धारित करणे आवश्यक असते की ज्यास नोंदणीकृत मुख्य कार्यालय असे संबोधण्यात येते. काही कारणास्तव सहकारी संस्थेस आपले मुख्य कार्यालय व कार्यालयाचे ठिकाण बदलावयाची असल्यास संस्थेच्या उपविधीमध्ये त्याबाबतची तरतूद करून त्यास केंद्रीय निबंधकाची परवानगी घेणे आवश्यक असते. असा बदल करावयाचा असल्यास पंधरा दिवसाच्या आत मुख्य कार्यालयाचे ठिकाण बदलल्या बाबतची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता असते.

**५. संस्थेचे सदस्यत्व :**

कायद्यातील कलम ११ मधील तरतुदीनुसार बहुराज्य सहकारी संस्थेचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी संबंधित व्यक्तीने केंद्रीय निबंधकाने विहित केलेल्या नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक असते व हा अर्ज संस्थेच्या संचालक मंडळाने मान्य करणे व त्याबाबतचा ठराव पास करणे आवश्यक असते. तसेच अशा व्यक्तीने संस्थेकडून किमान भागभांडवल खरेदी करणे आवश्यक असते.

**६. वार्षिक सर्वसाधारण सभा :**

या कायद्यातील कलम १३ मधील तरतुदीनुसार देशातील प्रत्येक बहुराज्यीय सहकारी संस्थेने आपले सहकारी वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत आपल्या सर्व सदस्यांची मुख्य कार्यालयाच्या ठिकाणी वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावणे आवश्यक असते. वार्षिक सर्वसाधारण सभेत सहकारी संस्थेचे सर्व आर्थिक व्यवहार वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेणे अत्यंत आवश्यक असते. तसेच काही महत्त्वाच्या निर्णयास वार्षिक सर्वसाधारण सभेची परवानगी घेणे आवश्यक असते.

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस किमान १५ दिवस आधी लिखित स्वरूपात पाठवणे आवश्यक असते तर विशेष सर्वसाधारण सभा सात दिवसांची नोटीस देऊन बोलवता येणे शक्य असते जेव्हा संस्थेस काही विशेष कारणासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलावणे आवश्यक असते तेव्हा या कायद्यातील कलम १५ मधील तरतुदीनुसार विशेष सर्वसाधारण सभा बोलता येते.

## ७. वार्षिक सर्वसाधारण सभेतील मतदान :

कायद्यातील कलम १७ मधील तरतुदीनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी संस्थेच्या उपस्थित सदस्यांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. सर्व निर्णय वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असणाऱ्या सदस्यांच्या द्वारे बहुमताने निर्णय पारित करणे आवश्यक असते काही विशिष्ट परिस्थितीत समान मतदान झाल्यास संस्थेच्या चेअरमनचे मत निर्णायक मत मानले जाते.

## ८. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची निवड व अटी :

जेव्हा बहुराज्यीय सहकारी संस्थेचे अधिक भागभांडवल केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने धारण केलेले असते तेव्हा अशा सहकारी संस्थेचा चीफ एक्झिक्युटिव्ह किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्त करण्याचे संपूर्ण अधिकार या कायद्यातील कलम २१ नुसार केंद्र सरकार किंवा राज्य सरकारला असतात. यामध्ये प्रामुख्याने त्याची नेमणूक करणे, कमी करणे त्याची पेन्शन, पगार, ग्रॅच्युईटी, रिटायरमेंट बेनिफि इत्यादी बाबी केंद्र सरकारद्वारे ठरवले जातात.

## ९. सहकारी शिक्षणासाठी अंशदान :

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा कलम २५ नुसार या देशातील प्रत्येक बहुराज्य सहकारी संस्थेने आपल्या निव्वळ नफ्यातील १ टक्के रक्कम सहकारी शिक्षण व प्रशिक्षण निधीसाठी आंशदान म्हणून देणे आवश्यक असते याकरिता नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया नवी दिल्ली यांच्याकडून निर्माण करण्यात आलेला सहकार शिक्षण निधी संबंधित रक्कम वर्ग करणे आवश्यक असते.

## १०. सहाय्यक संस्थेची स्थापना करणे

या कायद्यातील कलम १९ मधील तरतुदीनुसार बहुराज्य सहकारी संस्था आपल्या सर्वसाधारण सभेत बहुमताने एखादी सहाय्यक संस्था स्थापन करण्याबाबतचा निर्णय पारित करू शकते या निर्णयानुसार अशी सहकारी संस्था आपणास उपयुक्त ठरेल अशा प्रकारची सहाय्यक संस्था म्हणजेच सहाय्यक संस्था स्थापन करू शकते व त्या संस्थेच्या स्थापनेकरिता आवश्यक असणारे भाग भांडवल उपलब्ध करून देऊ शकते तथापि याकरिता केंद्रीय निबंधकाची परवानगी घेणे आवश्यक असते.

## ११. शेअर्स धारण करण्याची मर्यादा :

इतर सर्वसाधारण सहकारी संस्थांप्रमाणेच बहुराज्य सहकारी संस्थांमध्ये देखील एका विशिष्ट सभासदाने किती भाग धारण करावेत यावरती निर्बंध घालण्यात आलेले आहेत. या कायद्यातील कलम ३३ मधील तरतुदीनुसार बहुराज्यीय सहकारी संस्थेच्या सदस्यास संबंधित सहकारी संस्थेच्या एकूण भांडवलामध्ये जास्तीत जास्त एक पंचमांश इतके भाग धारण करता येऊ शकतात.

## १२. संस्थेचे संचालक मंडळ :

बहुराज्यीय सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता संस्थेच्या सदस्यांनी निवडून दिलेले संचालक मंडळ महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असते या कायद्यातील कलम ४१ नुसार बहुराज्य सहकारी संस्थेचे संचालक मंडळ हे जास्तीत जास्त २१ सदस्यांचे संचालक मंडळ असते. हे सर्व संचालक मंडळ कायद्यातील तरतुदीनुसार निवडून आलेले सदस्य मधून निर्माण झालेले असते. संस्थेच्या उपविधी नुसार संचालक मंडळाचे अधिकार व त्यांची कार्य निर्धारित करून दिलेले असतात तथापि या कायद्यातील कलम ४९ मध्ये संचालक मंडळाची कार्य व त्यांचे अधिकार निर्धारित करून देण्यात आलेले आहेत.

## १३. लेखापरीक्षकांची नियुक्ती :

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ मधील कलम ७० मधील तरतुदीनुसार देशातील प्रत्येक बहुराज्य सहकारी संस्थेने आपले आर्थिक वर्ष संपल्यानंतर संस्थेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक असते याकरिता संचालक मंडळाच्या शिफारशीने लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यास सर्वसाधारण सभेचे सभेची संमती घेणे आवश्यक असते.

वरील विविध तरतुदी बरोबरच राज्य सहकारी संस्थेचे परीसमापन तसेच बहुराज्यीय सहकारी संस्थेची समाप्ती लेखापरीक्षकाची अधिकार व कर्तव्य संचालक मंडळाचे अधिकार व कर्तव्य तसेच इतर विविध प्रकारच्या कायदेशीर बाबींच्या तरतुदी उपरोक्त कायद्यामध्ये करण्यात आल्याचे दिसून येते.

## १.३.३ परीसमापन प्रक्रिया (Liquidation Process)

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०२ ते ११० मधील तरतुदीनुसार एखाद्या विशिष्ट सहकारी संस्थेचे परीसमापन करण्याबाबत कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे. जेव्हा एखादी संस्था स्वखुशीने किंवा सक्तीने तसेच निबंधकाच्या आदेशानुसार बंद करण्याची प्रक्रिया करावयाची असते. तेव्हा अशा प्रक्रिया परीसमापन प्रक्रिया असे म्हटले जाते. परीसमापन प्रक्रियेसाठी विविध प्रकारच्या कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाही केली जात असते. प्रस्तुत घटकांमध्ये आपण महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या परीसमापनाची पद्धती, परीसमापन प्रक्रियेकरीता परीमापकाची नियुक्ती या विविध प्रकारच्या बाबींचा विचार करणार आहोत.

## अ) परिसमापनाचा अर्थ (Meaning of Liquidation)

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८३ मधील तरतुदीनुसार निबंधकाने एखाद्या संस्थेची चौकशी केल्यानंतर किंवा कलम ८४ मधील तरतुदीनुसार एखाद्या संस्थेची लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर तसेच संबंधित संस्थेच्या सदस्यांपैकी तीन चतुर्थांश सदस्यांनी संस्था बंद करण्याचा ठराव पारित केलेला असल्यास अथवा संस्थेचे कामकाज बंद असल्यास किंवा पाचशे रुपये पेक्षा कमी किमतीची अनामत रक्कम संस्थेच्या ताब्यात असल्यास सदर संस्था बंद करण्याबाबतची जी प्रक्रिया राबवली जाते त्यास परीसमापन प्रक्रिया असे म्हटले जाते.

१. परीसमापन प्रक्रिया ही ऐच्छिक किंवा आदेशान्वये केली जाऊ शकते.

२. परीसमापन प्रक्रिया ही संस्था बंद करण्याची प्रक्रिया असते.

३. परीसमापन प्रक्रियेचा आदेश सहकार निबंधक किंवा न्यायालयाद्वारे दिला जाऊ शकतो.

४. ज्या संस्थेने आपले कामकाज सुरू केलेले नाही अशा संस्थेचे देखील परीसमापन केले जाते.

## ब) परिसमापनाचे प्रकार (Type of Liquidation)

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार परिसमापनाचे तीन प्रकार आहेत. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे परीसमापन करण्यासाठी या तीन पद्धतींचा उपयोग केला जात असतो. तीन पद्धतीपैकी कोणत्या पद्धतीने परीसमापन केले जाईल हे परिस्थितीवर अवलंबून असते. तसेच संबंधित संस्थेचे अस्तित्व कामकाज व कामकाजाची पद्धती या बाबीवर संस्थेच्या परिसमापनाचा प्रकार अवलंबून असतो.

### १. स्वखुषीने परीसमापन (Voluntary Liquidation) :

सहकारी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत किंवा विशेष सर्वसाधारण सभेत सहकारी संस्थेच्या मतदान पात्र असलेल्या सर्व सदस्यांमधील तीन चतुर्थांश सदस्यांनी बहुमताने संस्थेचे परिसमापन करण्यासंबंधीचा ठराव पारित करून तसा अर्ज संबंधित परिक्षेत्रातील सहकार निबंधकाकडे पाठवलेला असल्यास त्यास स्वखुषीने परीसमापन किंवा समाप्तीकरण असे म्हटले जाते थोडक्यात ज्या सदस्यांनी सहकारी संस्था स्थापन केलेली आहे त्या सदस्यांमधील तीन चतुर्थांश सदस्यांनी संस्था बंद करण्याचा वैधानिक निर्णय घेतलेला असल्यास त्यास स्वखुषीने परिसमापन करणे असे म्हटले जाते.

### २. सक्तीने परीसमापन (Compulsory Liquidation) :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८३ व कलम ८४ मधील तरतुदीनुसार चौकशी अधिकाऱ्याने संबंधित संस्थेची चौकशी करुन किंवा लेखापरीक्षकाने संबंधित

सहकारी संस्थेचे लेखापरीक्षण करून सादर केलेला अहवालात संबंधित संस्था योग्य पद्धतीने कार्य करत नसल्याचे नमूद केलेले असल्यास संबंधित परिक्षेत्रातील सहकार निबंधक सहकारी संस्थेच्या समापणाचा अंतरिम आदेश देऊ शकतो यालाच सक्तीने परिसमापन असे म्हटले जाते. थोडक्यात जेव्हा एखाद्या सहकारी संस्थेस संस्था बंद करण्याचा आदेश हा सहकार निबंधकाकडून जारी केला जातो. तेव्हा त्यास सक्तीने केले जाणारे परिसमापन असे म्हटले जाते.

**३. निबंधकाच्या आदेशावरून परिसमापन करणे (Liquidation by Order of Registrar):**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार परवानगी देण्यात आलेल्या सहकारी संस्थेने विशिष्ट मुदतीत आपले कामकाज सुरू केलेले नसल्यास म्हणजेच विहित मुदतीत संस्थेचे अस्तित्व निर्माण झालेले नसल्यास संस्थेने आपले कामकाज बंद केलेले असल्यास संस्थेचे जवळ भागाची रक्कम व सदस्यांची अनामत रक्कम मिळवून ५०० रूपये पेक्षा कमी रक्कम शिल्लक राहिलेली असल्यास किंवा संबंधित सहकारी संस्थेच्या नोंदणीबाबत व व्यवस्थापनाबाबत निर्धारित करण्यात आलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन झालेले असल्यास सहकार निबंधक संस्था बंद करण्याबाबतचा अंतरिम आदेश काढू शकतो यालाच निबंधकाच्या आदेशानुसार परिसमापन असे म्हटले जाते.

**क) परीसमापकाची नियुक्ती (Appointment of Liquidator) :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार अधिकार प्राप्त झालेल्या अधिकाऱ्याने एखादी विशिष्ट सहकारी संस्थाचे सक्तीने अथवा ऐच्छिक पद्धतीने किंवा सहकार निबंधकाच्या आदेशानुसार परिसमापन करण्याचा अंतरिम आदेश किंवा अंतिम आदेश जारी करण्यात आलेला असल्यास अशा संस्थेच्या परिसमापन प्रक्रियेकरीता परिसरमापक नियुक्त करण्याची प्रक्रिया संबंधित निबंधकाकडे पूर्ण केली जात असते या परिस्थितीत परीसमापकाची नियुक्ती करण्याचे अधिकार सहकार निबंधकास प्राप्त झालेले असतात. ही प्रक्रिया पुढील प्रमाणे केली जाते.

**१. अंतरिम किंवा अंतिम आदेश :**

संस्थेचे परीसमापन करण्याचा अंतरिम आदेश किंवा अंतिम आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १०२ अन्वये जारी करण्यात आलेला असल्यास याच कायद्यातील कलम १०३ नुसार परिसमापकाची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु केली जाते.

**२. राजपत्रात अधिसूचित करणे :**

सहकार अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नियम ८९ (एक) प्रमाणे निबंधकाने परिसमापकाची नेमणूक शासन राजपत्रात अधिसूचित करणे अत्यंत आवश्यक असते. त्याकरिता शासनाचे राजपत्र निर्गमित करण्याबाबत शिफारस करून ते निर्गमित करण्याची व्यवस्था करणे आवश्यक असते.

### ३. परिसमापकाची पात्रता :

सहकारी संस्थेवर परिसमापकाची नियुक्त करण्यासाठी सहकार कायद्यामध्ये पात्रते, बद्दल कोणत्याही प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या नाहीत म्हणजेच परिसमापक कोणाला नेमावे, त्याची शैक्षणिक पात्रता काय असावी, त्याच्या कारभाराची रूपरेषा काय असावी, व्यवहारांची व्याप्ती काय असावी याबाबत खुलासा करण्याचे अधिकार सहकार निबंधकास प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार सहकार निबंधक योग्य व्यक्तीस संबंधित सहकारी संस्थेचे परिसमापन करण्यासाठी परिसमापक म्हणून नियुक्ती करत असतो.

### ४. परिसमापकाचा कालावधी :

एखाद्या सहकारी संस्थेचे परिसमापन करण्याबाबतचा निर्णय झालेला असल्यास अशा सहकारी संस्थेचे परिसमापन करण्यासाठी परिसमापकाची नियुक्ती करण्यात येते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १०९ तरतुदीनुसार परिसमापकाची प्रक्रिया ही प्रामुख्याने ६ वर्षाच्या कालावधीत पूर्ण होणे आवश्यक असते मात्र विशिष्ट परिस्थितीत जास्तीत जास्त ४ वर्षापर्यंत मुदतवाढ दिली जाऊ शकते. म्हणजेच परिसमापनाचा आदेश जारी केलेल्या तारखेपासून १० वर्षाच्या आत परिसमापनाची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असते. तथापि सदर नियुक्तीचा कालावधी किती असावा हे ठरवण्याचे संपूर्ण अधिकार सहकार निबंधकाला असतात सहकार निबंधक आपल्या अकलनानुसार व सहकारी संस्थेच्या परिस्थितीनुसार परिसमापकाचा कालावधी निर्धारित करून देत असतो .

### ५. परिसमापकाच्या नियुक्तीत बदल :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १५४ नुसार एखाद्या सहकारी संस्थेच्या परीसमापन कार्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या परिसमापकाच्या आदेशात बदल करण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. म्हणजेच निबंधकाने आदेश देऊन नियुक्त केलेल्या परिसमापकास काढून टाकून त्याच्या जागी दुसरा परिसमापक नियुक्त करण्याचे अधिकार राज्य सरकारला प्राप्त झालेले आहे.

### ६. मालमत्ता व चीज वस्तू वरील हक्क स्वाधीन करणे :

जेव्हा एखाद्या सहकारी संस्थेच्या परिसमापनाच्या प्रक्रियाबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येतो. तेव्हा संबंधित सहकारी संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात असणारे कारवाई योग्य मालमत्ता हीच वस्तू सहकारी संस्थेच्या व्यवसायाबाबतची सर्व पुस्तके अभिलेख व इतर दस्तऐवज परिसमापकाच्या स्वाधीन करणे आवश्यक असते.

### ७. संस्था पदाधिकाऱ्यांचे हक्क संपुष्टात येतील :

जेव्हा एखाद्या सहकारी संस्थेच्या परिसमापनाची प्रक्रिया सुरू होते व त्याबाबत सहकार निबंधकाद्वारे आदेश जारी करण्यात येतो. तेव्हापासून संबंधित सहकारी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे

नियत हक्क संपुष्टात येतात म्हणजेच त्यांच्या निवडीमुळे त्यांना प्राप्त झालेले अधिकार वापरता येणार नाहीत.

**८. परिसमापकाद्वारे संस्थेच्या मालमत्तेचा वापर :**

सहकार अधिनियम १९६० मधील कलम १०६ नुसार एखाद्या व्यक्तीस संबंधित सहकारी संस्थेचा परिसमापक म्हणून नियुक्त केल्यानंतर ताबडतोब संबंधित संस्थेची सर्व मालमत्ता ताब्यात घेणे आवश्यक असते तथापि परिसमापकाबाबत अंतिम आदेश प्राप्त झालेल्या खेरीज संस्थेची मालमत्ता वापरता येत नाही.

**९. परिसमापनाच्या आदेशाविरुद्ध अपील :**

एखाद्या सहकारी संस्थेच्या परिसमापनाबाबतचा आदेश ज्वारी केलेला असल्यास संबंधित सहकारी संस्थेचे पदाधिकारी किंवा सदस्य सहकार अधिनियम १९६० मधील कलम १०२ नुसार संबंधित आदेशाविरुद्ध अपील दाखल करू शकतात. असे अपील दाखल करण्यासाठी आदेश जारी केलेल्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत अपील दाखल करणे आवश्यक असते.

**१०. परिसमापनाचा आदेश रद्द :**

जेव्हा एखाद्या सहकारी संस्थेच्या परिसमापनाबाबतचा आदेश निबंधकाद्वारे किंवा शासनाद्वारे रद्द केला जातो. तेव्हा आदेश रद्द केलेल्या तारखेपासून परिसमापकाने स्वतःकडे ताब्यात असलेली मालमत्ता व चीज वस्तू संबंधित सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या ताब्यात देणे आवश्यक असते.

**ड) परिसमापकाचे अधिकार (Rights of Liquidator) :**

सहकार कायद्यातील तरतुदीनुसार एखाद्या विशिष्ट सहकारी संस्थेच्या परीसमापन कार्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या परिसमापकाचे अधिकार कोण-कोणते आहेत. याबाबत कायदेशीर तरतुदी करण्यात आलेल्या असून त्याच्या अधिकारकक्षा निर्धारित करण्यात आलेल्या आहेत. त्यामधील काही महत्त्वाचे अधिकार पुढीलप्रमाणे आहेत.

**१. दावे दाखल करणे व प्रतिवाद करणे :**

सहकारी संस्थेबाबत विविध प्रकारचे दावे दाखल करणे तसेच दाखल झालेल्या दाव्याबाबत प्रतिवाद करण्याचे अधिकार संबंधित संस्थेस असतात. मात्र जेव्हा एखाद्या सहकारी संस्थेच्या परीसमापन कार्यासाठी परिसरमापकाची नियुक्ती करण्यात आलेली असते. तेव्हा संबंधित परिसमापक हा स्वतःच्या नावे संबंधित संस्थेकरिता दावे दाखल करु शकतो व दाखल केलेल्या दाव्याकरिता प्रतिवाद देखील करू शकतो.

## २. आवश्यकतेनुसार संस्थेचा व्यवसाय चालवणे :

संस्थेच्या परिसमापनाची प्रक्रिया विहित पद्धतीने पार पाडता यावी. याकरिता संबंधित संस्थेचा सुरू असलेला व्यवसाय किंवा धंदा पुढे चालू ठेवण्याचे अधिकार संबंधित संस्थेच्या परिसमापकास प्राप्त झालेले असतात. यामध्ये प्रामुख्याने संबंधित संस्थेसाठी खरेदी-विक्री करणे, सदर संस्थेसाठी करार करणे, पैसे काढणे, पैसे स्वीकारणे इत्यादी कार्य एका विशिष्ट मर्यादेत करता येतात.

## ३. संस्थेच्या मालमत्तेची लिलावाद्वारे विक्री :

संस्थेचे समाप्तीकरण करण्याकरिता संस्थेकडील मालमत्ता स्थावर व जंगम मालमत्ता विक्री करण्याचे अधिकार परिसमापकास आहेत. मात्र सदर मालमत्तेची विक्री करण्यासाठी लिलाव पद्धतीचा वापर करणे आवश्यक असते. म्हणजेच संस्थेच्या मालमत्ता तिची खाजगीरीत्या विक्री न करता सदर मालमत्तेची विक्री लिलावाद्वारे करणे आवश्यक असते यांचे अधिकार परिसरमापकास प्राप्त झालेले आहेत.

## ४. संस्थेच्या विरुद्ध असलेल्या दाव्यांची चौकशी करणे :

परीसमापन प्रक्रिया सुरू असलेल्या संस्थेविरुद्ध इतर व्यक्ती व संस्थांनी दाखल केलेल्या विविध प्रकारच्या न्यायालयीन दाव्यांची योग्य ती चौकशी करण्याचे अधिकार परिसमापकास प्राप्त झालेले आहेत. या अधिकारानुसार संबंधित परिसमापक हा संबंधित दाव्यासंबंधी कागदपत्रांची पाहणी करणे, त्यामधील तथ्य तपासणे व आवश्यकतेनुसार चौकशी करण्याचे कार्य पार पाडू शकतो तसे अधिकार त्यास प्राप्त झालेले आहेत.

## ५. धनकोची कर्ज रक्कम देणे :

परीसमापन प्रक्रिया सुरू असलेल्या संस्थेने यापूर्वी विविध प्रकारच्या व्यक्ती व संस्थांकडून कर्ज घेतलेली असल्यास अशा कर्जांचे मुद्दल व त्याच्या व्याजाची रक्कम देण्याचे अधिकार परिसमापकास प्राप्त झालेले आहेत. तथापि अशा कर्जावरील व्याजाची रक्कम देण्याकरिता संपण्याची तारीख ही अंतिम तारीख मानली जाते त्या तारखेपूर्वी कालावधीचे व्याज अदा करता येते तसेच पूर्वनिर्धारित दराने व्याजाची रक्कम अदा करणे आवश्यक असते पूर्वनिर्धारित व्याजदरापेक्षा अधिक व्याजदराने रक्कम आकारता येणार नाही.

## ६. धनकोबरोबर तडजोड करणे :

सहकारी संस्थेने घेतलेल्या कर्जदाराबरोबर म्हणजेच धनकोबरोबर तडजोड करून कमीत कमी रक्कम आधार करता येईल व कर्जाची परतफेड करता येईल. अशाप्रकारे तडजोड करण्याचे अधिकार सहकारी संस्थेच्या परिसमापकास प्राप्त झालेले आहेत. या अधिकाराचा वापर करून संस्थेवरील कर्ज व त्याच्या व्याजाचा भार कमीत कमी राहील यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित असते.

## ७. संस्थेचे सदस्य व पदाधिकाऱ्यांना अंशदान देणे :

परीसमापन कार्यामध्ये संस्थेची सर्व प्रकारची देणी भागवून शिल्लक राहिलेल्या रक्कमेमधून संस्थेच्या ज्या सदस्यांनी भागभांडवल खरेदी केलेले आहे. तसेच संस्थेचे सदस्य व पदाधिकाऱ्यांकडून येणे व देणे असणारी रक्कम विचारात घेऊन उर्वरित रक्कमेमधून संस्थेचे सदस्य व पदाधिकाऱ्यांना अंशदान देता येणे शक्य असल्यास असे अंशदान देण्याबाबतचा अधिकार परिसमापकास प्राप्त झालेला आहे.

## ८. परिसमापण खर्चाची वसुली रक्कम ठरविणे :

ज्या संस्थेचे परिसमापन केले जात आहे. अशा संस्थेच्या परिसमापन कार्यासाठी आलेल्या खर्चाची वसुली करण्याचे अधिकार, वसुली रक्कम ठरविण्याचा अधिकार, परिसमापकास प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार संस्थेच्या सर्व आजी व माजी सदस्यांना वेगवेगळ्या नोटीस पाठवून त्यांच्याकडून परिसमापन खर्चापोटी रक्कम वसूल करता येणे शक्य असते. तथापि अशी वसुली करण्यापूर्वी संस्थेच्या मालमत्ता व संस्थेच्या उत्पन्नातून या खर्चाची वसुली होत असल्यास ती करणे आवश्यक असते. परंतु अशी वसुली संबंधित उत्पन्नातून होणे शक्य नसल्यास संबंधित संस्थेच्या आजी-माजी सदस्यांकडून अशी रक्कम वसूल करता येऊ शकते.

## ९. साक्षीदारांना समन्स काढणे :

सहकारी संस्थेच्या परिसमापकास कलम १०५ अन्वये दिवाणी न्यायालयात प्रमाणे अधिकार प्राप्त झालेला असून या अधिकारानुसार परिसमापक हा संबंधित संस्थेच्या निर्णय प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या साक्षीदारांना समन्स काढून बोलू शकतो. किंबहुना त्यांना सुनावणी करिता हजर राहण्यास भाग पाडू शकतो हा अधिकार संबंधित परिसमापकास कायद्यानुसार प्राप्त झालेला आहे.

## १०. निबंधकाच्या पूर्वपरवानगीने संस्थेची पुनर्रचना :

जेव्हा एखाद्या सहकारी संस्थेच्या परीसमापन कार्यासाठी संस्थेची पुनर्रचना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास संबंधित परिसमापक हा सर्वसाधारण सभा बोलावून यामध्ये संस्थेची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव मांडू शकतो व या प्रस्तावास निबंधकाची पूर्वपरवानगी घेऊन संस्थेची पुनर्रचना करू शकतो तथापि पुनर्रचना करण्यासाठी कलम १९ अन्वये अर्ज करून निबंधकाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते.

## इ) परिसमापकाची कार्ये (Duties of Liquidator) :

महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेच्या परिसमापकाची विविध प्रकारचे अधिकार मिळालेले आहेत. तथापि या अधिकाऱ्यांबरोबरच परिसमापकाने करावयाची

विविध कार्ये देखील या कायद्यातील तरतुदीनुसार निर्धारीत करण्यात आलेली आहेत. जेव्हा सहकारी संस्थेचा निबंधक एखाद्या व्यक्तीस एखाद्या विशिष्ट संस्थेचा परिसमापक म्हणून नियुक्त करत असतो. परिसमापकाने पुढील कार्य पार पाडणे अपेक्षित असते.

**१. संस्थेच्या मालमत्तेचा ताबा घेणे :**

सहकार कायद्यातील तरतुदीनुसार जेव्हा परिसमापकाची नियुक्ती करण्यात आलेली असते. तेव्हा संबंधित परिसमापकाने तात्काळ संबंधित संस्थेच्या मालमत्तेचा विहित पद्धतीने ताबा घेणे आवश्यक असते यांची नियुक्ती करण्यात आल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी संबंधित सहकारी संस्थेची मालमत्ता ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक असते.

**२. कायदेशीर दावे दाखल करणे :**

परिसमापकाने सहकारी संस्थेचा ताबा घेतल्यानंतर संस्थेच्या हितासाठी आवश्यक असणाऱ्या विविध प्रकारच्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी परिसमापक आवश्यक असणारे विविध प्रकारचे दावे दाखल करू शकतो. यामध्ये प्रामुख्याने दिवाणी तसेच फौजदारी स्वरूपाच्या कायदेशीर कारवाई करण्यासाठी दावे दाखल करणे आवश्यक वाटत असल्यास अशा प्रकारचे दावे दाखल करण्याची जबाबदारी किंवा कार्य परिसमापकाचे असते.

**३. निबंधकाच्या वतीने संस्थेचे कामकाज चालविणे :**

जेव्हा एखाद्या सहकारी संस्थेवर परिसमापक नियुक्त करण्यात आलेला असतो. तेव्हा हा परिसमापक सहकारी संस्थेच्या निबंधकाच्या वतीने संस्थेच्या आवश्यक असणाऱ्या विविध प्रकारच्या कार्याची जबाबदारी स्वीकारून संस्थेचे कामकाज चालवत असतो. संस्थेच्या हितासाठी आवश्यक असणारे विहित स्वरूपाचे कामकाज चालवण्याची जबाबदारी किंवा कार्य परिसमापकावर सोपविण्यात आलेले असते.

**४. आवश्यकतेनुसार स्थावर व जंगम मालमत्तेची विक्री करणे :**

परिसमापनासाठी सुपूर्द करण्यात आलेल्या सहकारी संस्थेची येणी देणी भागविण्यासाठी आवश्यकता वाटल्यास संस्थेच्या विविध प्रकारच्या स्थावर व जंगम मालमत्ता विक्री करून प्राप्त झालेल्या उत्पन्नातून संबंधित सहकारी संस्थेची विविध प्रकारची देणी देण्याची व्यवस्था करण्याचे कार्य परिसमापकास करावे लागते तथापि संस्थेची स्थावर किंवा जंगम मालमत्ता विक्री करण्यासाठी कायद्यातील विहित तरतुदीनुसार लिलाव पद्धतीचा उपयोग करणे आवश्यक असते.

**५. संस्थेची मालमत्ता हस्तांतरित करणे :**

परीसमापाधिन असलेल्या सहकारी संस्थेचे सारखे सारखा व्यवसाय करणाऱ्या शासकीय उपक्रमाकडे वर्तमान बाजारभावानुसार परीसमापाधिन असलेल्या सहकारी संस्थेच्या मालमत्ता हस्तांतरित

करण्याचे कार्य परिसमाशाकावर सोपवण्यात आलेली असते. संस्थेचे हित लक्षात घेऊन संस्थेची देणी भागविण्यासाठी आवश्यकता वाटल्यास वरीलप्रमाणे कार्य पार पाडणे अपेक्षित असते.

**६. संस्थेच्या धनकोची देणी भागविणे :**

परीसमापनधीन असलेल्या सहकारी संस्थेने यापूर्वी काढलेल्या विविध प्रकारच्या कारणांची विहित पद्धतीने परतफेड करण्याची जबाबदारी परिसमापकावर सोपवण्यात आलेली असते संस्थेने घेतलेल्या विविध प्रकारच्या कर्जाची योग्य ती परतफेड करण्याची व्यवस्था करणे आवश्यक असते. तथापि अशी देणी भागवण्यात करिता निबंधकाची पूर्वपरवानगी घेऊन संबंधित कर्जाची रक्कम धनको देण्याची व्यवस्था करावी लागते.

**७. धनको बरोबर तडजोड करणे :**

परीसमापनधीन असलेल्या सहकारी संस्थेची येणी देणी भागविण्याच्या दृष्टीने हे कार्य अत्यंत महत्वाचे असते. संस्थेचे विद्यमान धनको किंवा धनको असल्याचा दावा करत असणाऱ्या व्यक्ती व संस्थांवर तडजोड करून त्यांची देणी भागवण्याची व्यवस्था करण्याचे कार्य परिसमापकाने करणे अपेक्षित असते. यासाठी दावा करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांना बरोबर विहित पद्धतीने व विधिग्राह्य मार्गाने तडजोड करून यांनी देणी मिटवणे आवश्यक असते.

**८. परीसमापन खर्चाची जबाबदारी निश्चित करणे :**

परीसमापन करावयाच्या सहकारी संस्थेची सर्व देणी भागविण्यासाठी देय असणाऱ्या खर्चास परीसमापन खर्च असे म्हटले जाते. हा खर्च ज्या व्यक्तीने देणे अपेक्षित आहे. अशा संबंधित संस्थेच्या आजी किंवा माजी सभासदास संबंधित रक्कम देण्याची जबाबदारी निर्धारित करून देण्याचे कार्य परिसमापकाने करणे आवश्यक असते. ज्या व्यक्तीमुळे संस्थेचा तोटा झालेला आहे किंवा नुकसान झालेले आहे. अशा व्यक्तींवर ही रक्कम बसवणे व त्यांच्याकडून वसूल करण्याची जबाबदारी परिसमापकाची असते.

**९. संस्थेचे हिशेब व पुस्तके तयार ठेवणे :**

परिसमापन करावयाच्या सहकारी संस्थेबाबतचे सर्व प्रकारचे हिशेब तसेच आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या पावत्या पुस्तके व विविध प्रकारचे दस्तऐवज तयार करून ठेवण्याचे कार्य परिसमापकाने करणे अपेक्षित असते. जेव्हा विविध प्रकारच्या वैधानिक कार्यासाठी हे दस्तऐवज आवश्यक असतात तेव्हा निबंधकाकडून या दस्तऐवजांची मागणी केली जाऊ शकते. त्याकरिता हे दस्तऐवज तयार करून ठेवणे आवश्यक असते.

## १०. परिसमापन कार्याची अहवाल सादर करणे :

ज्या सहकारी संस्थेच्या परिसमापनाची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे व त्याकरिता परिसमापकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अशा परिसमापकाने संबंधित सहकारी संस्थेच्या परीसमापन कार्याच्या प्रगतीचा अहवाल लिखित स्वरूपात संबंधित सहकार निबंधकास कळवणे आवश्यक असते. याकरिता सहकार निबंधकाने निर्धारित करून देण्यात आलेल्या नमुन्या प्रमाणे प्रगती अहवाल सादर करणे आवश्यक असते.

## ११. लेखापरीक्षणासाठी लेखी सादर करणे :

ज्या सहकारी संस्थेच्या परिसमापनाची प्रक्रिया सुरू आहे. अशा संस्थेचे लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक असते. तथापि हे लेखापरीक्षण करून घेण्याची जबाबदारी परिसमापकाची असते या लेखापरीक्षणासाठी आवश्यक असणारे संस्थेचे लेखे व्हाव्हचर व इतर माहिती सहकार कायद्यातील कलम १०८ अन्वये होणाऱ्या लेखापरीक्षणासाठी सादर करण्याचे कार्य परिसमापकास करावे लागते.

## १२. सर्वसाधारण सभा बोलावणे :

संस्थेच्या परिसमापकाचे कामकाज संपल्यानंतर संस्थेच्या सर्व सदस्यांची साधारण सभा बोलावून या सभेत आज अखेर झालेल्या कामकाजाचा घोषवारा सांगणे. संस्था अपयशी होण्यासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्तींची नावे सभासदास कळविणे. तसेच संस्था अपयशी होण्याची कारणे सभासदांच्या लक्षात आणून देणे संस्थेची शिल्लक यांनी देणे याबाबतची संपूर्ण माहिती सर्व सभासदांना उपलब्ध करून देणे हे कार्य संस्थेच्या परिसमापकास करावे लागते.

## १३. परिसमापन समाप्तीचा अहवाल सादर करणे :

सहकारी संस्थेच्या परिसमापनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थेच्या परीसमापन कार्याचा संपूर्ण अहवाल निबंधकास सादर करणे आवश्यक असते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये कलम १०९ (२) मधील तरतुदीनुसार या अहवालात संस्थेच्या संपूर्ण मिळकतीचा विषय निबंधकास सादर करणे आवश्यक असते. यामध्ये संस्थेची सर्व देणी भागवून शिल्लक राहिलेली अशी रक्कम की ज्या रकमेचा उपयोग निबंधक वाटणीसाठी करू शकतो. अशा रक्कमेचा हिशेब सादर करणे आवश्यक असते.

## १४. संस्थेची सर्व पुस्तके व विषय निबंधकास सादर करणे :

महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम १९६० मधील नियम ९२ (२) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेच्या परिसमापकाने संबंधित सहकारी संस्थेची नोंदणी रद्द झाल्यानंतर त्या संस्थेची सर्व पुस्तके, हिशोबाची कागदपत्रे, कामकाजाची कागदपत्रे व सहकारी निबंधकाकडे तात्काळ सादर करणे आवश्यक असते पुढील कार्यवाहीसाठी ही कागदपत्रे सहकारी निबंधकाकडे सादर करणे गरजेचे असते.

वरीलप्रमाणे सहकारी संस्थेच्या परिसमापनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सहकारी संस्थेचा परिसमापक संस्थेची सर्व कागदपत्रे व हिशेब पुस्तके निबंधकाच्या ताब्यात सुपूर्द करतो. तसेच सहकारी संस्थेकडे शिल्लक असलेली रक्कम पुढील कार्यासाठी सहकार निबंधकाकडे सुपूर्द करण्यात येते. अशी शिल्लक रक्कम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार सहकार निबंधक या कायद्यातील कलम ९० मधील तरतुदीनुसार संबंधित संस्थेच्या सदस्य विहित पद्धतीने वाटप करून देण्याचे कार्य करू शकतो. तथापि याकरिता शासनाची परवानगी घेणे आवश्यक असते. तसेच परिसमापनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थेची सर्व हिशेब पत्रके व कागदपत्रे नष्ट करण्याची परवानगी घेऊन संबंधित कागदपत्रे नष्ट करण्याची कार्यवाही सहकार निबंधकाद्वारे केली जात असते.

### १.३.४ मालमत्ता व निधी व्यवस्थापनाबाबत कायदेशीर तरतुदी

**(Legal Provisions regarding Assets and Fund Management)**

सहकारी संस्था या विशिष्ट सामाजिक व आर्थिक हेतूने एकत्रित आलेल्या विविध प्रकारच्या सभासदांची संस्था असल्यामुळे या सहकारी संस्थेकडे उपलब्ध असणाऱ्या विविध प्रकारच्या मालमत्ता व संस्थेकडील संकलित केलेला निधी कोणत्या पद्धतीने वापरला जावा त्यांची वर्गीकरण कोणकोणत्या पद्धतीने केले जाते व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शक सूचना व नियम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये करण्यात आलेले आहेत काळाच्या ओघात झालेल्या विविध बदलांचा विचार करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमामध्ये आवश्यकतेनुसार विविध प्रकारचे बदल देखील करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत घटकांमध्ये आपण या अधिनियमातील तरतुदीनुसार सहकारी संस्थेची मालमत्ता व त्यांच्याकडे निधीचे व्यवस्थापन करण्याबाबतच्या महत्त्वपूर्ण तरतुदींचा अभ्यास करणार आहोत.

**अ) सहकारी संस्थेचा नफा (Profit of Co-operative Organizations) :**

सहकारी संस्था या नफा मिळणाऱ्या व्यावसायिक संस्था नसल्या तरी संस्थेच्या व सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी सहकारी संस्था आपल्या व्यवसायातून किंवा धंद्यातून अतिरिक्त उत्पन्न किंवा वाढावा प्राप्त करत असतात. अकाउंटिंग च्या नियमानुसार सहकारी संस्थांनी खर्च केलेल्या रकमेपेक्षा त्यांना प्राप्त झालेले उत्पन्न अधिक असल्यास त्यास वाढावा किंवा तांत्रिक भाषेमध्ये सहकारी संस्थेचा नफा असे म्हटले जाते. सहकारी संस्थेस प्राप्त होणाऱ्या नफ्याचे वर्गीकरण दोन प्रकारांमध्ये करता येते. यामध्ये स्थूल नफा व निव्वळ नफा या दोन प्रकारच्या संकल्पनांचा समावेश होतो सहकारी संस्थेस प्राप्त झालेल्या एकूण उत्पन्नामधून एकूण खर्चाची रक्कम वजा केली असता जी रक्कम प्राप्त होते. त्यास सहकारी संस्थेचा स्थूल नफा असे म्हटले जाते. तर स्थूल नफ्यातून विविध प्रकारच्या तरतुदी वजा केल्यानंतर जो नफा शिल्लक राहतो त्यास निव्वळ नफा असे म्हटले जाते.

## ब) राखीव निधी (Reserve Fund) :

राखीव निधी म्हणजे संस्थेच्या मालमत्तेमधून जे देणे असेल ते दिल्यानंतर ही रक्कम शिल्लक राहते ती रक्कम म्हणजे राखीव निधी होय. ज्या सहकारी संस्थेस आपल्या व्यवसायापासून किंवा व्यवहारापासून नफा मिळू शकतो किंवा नफा मिळत आहे. अशा प्रत्येक सहकारी संस्थेने राखीव निधी ठेवणे आवश्यक असते. प्रत्येक संस्थेने प्रतिवर्षी आपल्या प्राप्त झालेल्या नफ्यातून एक चतुर्थांश भाग म्हणजेच २५ टक्के रक्कम ही राखीव निधी मध्ये वर्ग करणे आवश्यक असते. अशा राखीव निधीचा उपयोग सहकार कायद्यातील तरतुदीनुसार करणे अपेक्षित असते. सहकारी संस्थेच्या धंद्यासाठी तसेच राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७० मधील तरतुदीच्या अनुषंगाने संबंधित राखीव निधीतील रकमेचा अंशतः किंवा पूर्णतः वापर करता येणे शक्य असते. तथापि एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा राज्याच्या तसेच स्थानिक हिताच्या प्रयोजनासाठी राखीव निधी मधील रकमेचा उपयोग करता येणे शक्य असते. तथापि यासाठी विहित स्वरूपात परवानगी घेणे आवश्यक असते.

अमर्यादित दायित्व असणार्या संस्थांमध्ये नुकसान किंवा आर्थिक जबाबदारी निर्माण झाल्यास त्याचे दायित्व संबंधित संस्थेच्या सदस्यांवर असते. मात्र मर्यादित दायित्व असणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये नुकसानीची जबाबदारी सदस्यांवर सोपवणे शक्य नसल्यामुळे राखीव निधी हा एक प्रकारची संरक्षण झाला म्हणून उपयोगी पडत असतो. त्यामुळे सहकारी संस्थांना प्राप्त झालेल्या निव्वळ नफा मधून राखीव निधी वर्ग करणे आवश्यक असते. राखीव निधीत केवळ नफा अगर न वाटलेला नफ्याचा भाग जमा करता येतो असे नाही तर त्यामध्ये प्रवेश फी, दंड, व्याज, देणग्या, जप्त केलेल्या भागांची रक्कम, तीन वर्षापर्यंत सदस्याने लाभांशाची रक्कम न केल्यास ती रक्कम तसेच नफ्याची सर्व वाटणी झाल्यानंतर शिल्लक राहिलेली रक्कम देखील राखीव निधीमध्ये वर्ग करता येते. राखीव निधीमुळे संस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपयोग होत असतो. भविष्यात निर्माण होणाऱ्या विविध प्रकारच्या आर्थिक अडचणीसाठी अशा निधीचा वापर करता येणे शक्य असते. सहकारी संस्थेस विशिष्ट प्रकारचे आर्थिक स्थैर्य उपलब्ध करून देण्यासाठी राखीव निधी मध्ये सातत्याने वाढ करणे, अपेक्षित असते. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना स्वावलंबी करण्यासाठी राखीव निधी वृद्धिंगत होणे अत्यंत आवश्यक असते.

### सहकारी संस्थेकडील राखीव निधीचा वापर गुंतवणूक :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७० मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेकडील राखीव निधीचा वापर किंवा गुंतवणूक पुढील प्रकारे करता येते

१. राज्य कृषी आणि ग्रामीण विकास बँकेने काढलेल्या ऋणपत्रात किंवा सरकारी कर्ज रोख्यांमध्ये गुंतवणूक करता येते.

२. निबंधकाकडून पूर्वपरवानगीने कोणत्याही स्थावर मालमत्तेत गुंतवणूक करता येते.

३. निबंधकांच्या पूर्वपरवानगीने ५० टक्के राखीव निधीचा वापर इमारत दुरुस्ती, नुतनीकरण प्रक्रिया, यंत्रसामग्री संपादन, जमीन खरेदी, जमिनीवरील बांधकाम इत्यादी करिता या रक्कमेचा उपयोग करता येतो.

**क) लाभांश (Dividend) :**

सहकारी संस्था या व्यवसायिक किंवा व्यापारी संस्था नसल्या तरी सहकारी संस्थेतील सदस्यांना त्यांनी गुंतवलेल्या भांडवलावर ती काही अंशी परतावा प्राप्त व्हावा याकरिता महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या सदस्यांना लाभांश देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सहकारी संस्थेचा मुख्य हेतू सदस्यांची आर्थिक उन्नती करणे आहे. या सदस्यांना भांडवलदार बनवणे हा नाही. त्यामुळे सदस्यांमध्ये लोभाची व नफेखोरीची भावना वाढीस लागू नये याकरिता महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मध्ये लाभांश वाटपावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. विशिष्ट सदस्याच्या मोठ्या भांडवलामुळे संपत्तीचे केंद्रीकरण न होता त्याचे विकेंद्रीकरण व्हावे याकरिता या कायद्यातील तरतुदीनुसार संस्थेचे संस्थेस प्राप्त झालेल्या वार्षिक निव्वळ नफ्यातून जास्तीत जास्त १५ टक्के इतका लाभ देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

१. सहकारी संस्थेस विशिष्ट आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या निव्वळ नफ्यातून संबंधित संस्थेच्या सदस्यांना जास्तीत जास्त पंधरा टक्क्यांपर्यंत लाभांश देता येतो.

२. सहकारी संस्थेस आपल्या संस्थेची हिशेब तपासणी पूर्ण झाल्याशिवाय लाभांशाचे वाटप करता येत नाही.

**ड) लाभांश समाकरण निधी (Dividend Equalization Fund) :**

सहकारी संस्था आपणास प्राप्त झालेल्या निवड नफ्यातून आपल्या सदस्यांना लाभांश वाटप करत असतात परंतु सहकारी संस्थेस सर्वच वर्षांमध्ये निव्वळ नफा प्राप्त होईल असे नाही. काही विशिष्ट आर्थिक वर्षांमध्ये आर्थिक अडचणीमुळे किंवा काही नैसर्गिक आपत्तीमुळे सहकारी संस्थेचे उत्पन्न कमी झाले असता निव्वळ नफा कमी होऊ शकतो. अशा परिस्थितीत पूर्वीच्या वर्षी देण्यात आलेल्या दरानुसार लाभ देता येणे शक्य होत नाही अशा परिस्थितीत कमी पडणारी रक्कम विशिष्ट निधीतून वर्ग करता यावी याकरिता लाभांश समाकरण निधी निर्माण केला जात असतो. या निधीमध्ये पूर्वी ज्या वर्षी अधिक नफा प्राप्त झालेला आहे अशा वर्षीच्या नफ्यातून विशिष्ट रक्कम लाभांश समाकरण निधी मध्ये वर्ग करता येते. अशी वर्ग केलेली रक्कम ज्या वर्षी नफा कमी होतो त्या वर्षी अधिक दराने लाभ देण्यासाठी वापरता येते.

## इ) शिक्षण निधी अंशदान (Contribution to Education Fund) :

सहकारी चळवळीची निकोप वाढ व विकास होण्यासाठी सहकारी चळवळीत कार्य करणारे विविध प्रकारचे घटक शिक्षित व प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांच्या मधील सदस्य पदाधिकारी, संचालक व इतर कार्यकर्त्यांना सहकारी व्यवस्थेचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी जो खर्च येईल तो खर्च भागविण्यासाठी शिक्षण निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. हा शिक्षण निधी देशातील राज्य सरकार ज्या दराने ठरवून देईल त्या दराने राज्य संघीय संस्थेकडे प्रतिवर्षी संबंधित संस्थेने वर्ग करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मुंबई या संस्थेस महाराष्ट्र राज्य सरकारने राज्यसंघीय संस्था म्हणून मान्यता देण्यात आलेली दिलेली, असून त्यानुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांनी शिक्षण निधीची रक्कम प्रतिवर्षी राज्य सरकारने निर्धारित करून दिलेल्या दराप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई यांच्याकडे वर्ग करणे आवश्यक असते. कायद्यातील कलम ६८ मध्ये नवीन पोटकलम ३ नुसार संबंधित रक्कम देणे बंधनकारक असून ती रक्कम न दिल्यास संबंधित परिक्षेत्रातील सहकार निबंधक त्या सहकारी संस्थेकडून शिक्षण निधीची रक्कम वसूल करण्याचे आदेश देऊ शकतो.

## फ) सार्वजनिक प्रयोजनासाठी अंशदान (Contribution to Public Purposes) :

सहकारी संस्था या प्रामुख्याने आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या व्यक्तींच्या उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या संस्था आहेत. या संस्थांना प्राप्त झालेल्या नव्या मधून परिसरातील किंवा आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या उन्नतीकरिता त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता सहकारी संस्थेच्या नफ्यातील काही हिस्सा सार्वजनिक प्रयोजनासाठी अंशदान म्हणून देता येणे शक्य आहे. सहकारी संस्थांनी आपल्या नफ्यातून राखीव निधी तसेच शिक्षण व प्रशिक्षण खर्चाची तरतूद करून ठेवल्या नंतर त्यांच्याकडील उर्वरित नफ्याच्या निव्वळ नफ्याच्या २० टक्क्यांपर्यंतची रक्कम सार्वजनिक हितासाठी व सहकार चळवळीच्या उन्नतीसाठी बाजूला काढून ठेवता येणे शक्य असते.

सार्वजनिक प्रयोजनाची व्याख्या ही प्रामुख्याने धर्मादाय निधी अधिनियम ८९ च्या कलम २ मध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्यानुसार गरिबांना मदत करणे, त्यांचे शिक्षण, औषध उपचार यासारख्या बाबींबरोबरच समाजातील व्यक्तींना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सेवा-सुविधा, शाळेची इमारत, वाचनालय, पूरग्रस्तांसाठी मदत कार्य, रस्त्यांची निर्मिती यासारख्या सामाजिक कार्यांचा समावेश यामध्ये करण्यात आलेला आहे. या कार्यासाठी सहकारी संस्था आपल्या नफ्यातून सार्वजनिक प्रयोजनासाठीचे अंशदान म्हणून रक्कम वर्ग करू शकतात तथापि अशा प्रकारची रक्कम वर्ग करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक अंशदान देण्यासाठी ही परवानगी बंधनकारक करण्यात आलेली आहे.

### ग) निधीची गुंतवणूक (Investment of Funds) :

सहकारी बिगर वित्तीय संस्था तसेच सहकारी वित्तीय संस्थांनी आपल्याकडे संकलित केलेल्या निधी मधील अतिरिक्त निधी हा विविध प्रकारच्या वित्तीय व बिगर वित्तीय संस्थांमध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी सहकार कायद्यातील तरतुदीनुसार देण्यात आली आहे. सहकारी संस्थांकडे जो अतिरिक्त निधी शिल्लक आहे तो अतिरिक्त निधी योग्य व सुरक्षित पद्धतीने गुंतवणूक केला जावा. याकरिता मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेनुसार सहकारी संस्था आपल्याकडे निधी पुढील प्रमाणे गुंतवणूक करू शकतात;

१. लेखापरीक्षणात ऑडिट वर्ग 'अ' मिळालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ठेवी.

२. लेखापरीक्षणात ऑडिट वर्ग 'अ' मिळालेल्या राज्य सहकारी बँकांच्या मधील ठेवी.

३. भारतीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम ८८२ च्या कलम २० मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही रोख यांमधील गुंतवणूक.

४. देशातील राष्ट्रीयकृत व्यापारी बँक तसेच अनुसूचित खाजगी व सहकारी बँकांच्या मधील ठेवी व त्यांच्या रोख्यांमधील मधील गुंतवणूक.

५. ज्या सहकारी संस्थेच्या पाच मैलाच्या परिसरात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची कोणतीही शाखा नाही अशा सहकारी संस्थेस पोस्ट ऑफिस मधील ठेवी तसेच पोस्ट ऑफिस मधील विविध प्रकारच्या रोख्यांमध्ये गुंतवणूक करता येते तथापि याकरिता निबंधकाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते.

### ह) निवडणूक खर्च निधी (Election Fund) :

सहकार कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक सहकारी संस्थेस आपल्या संस्थेच्या सदस्यांमधून संचालक मंडळाची निवड करणे आवश्यक असते. अशी निवड करण्यासाठी विहित पद्धतीने निवडणुका घेणे आवश्यक असते या निवडणुका घेण्याकरिता सहकारी संस्थेस निवडणूक प्राधिकरणास विशिष्ट रक्कम निवडणूक खर्चापोटी देणे आवश्यक असते. अर्थात अशी रक्कम एकाच वर्षीच्या उत्पन्नातून खर्च करणे सहकारी संस्थेच्या दृष्टीने अडचणीचे ठरू शकते याकरिता प्रत्येक सहकारी संस्थेने प्रतिवर्षी आपणास प्राप्त झालेल्या नफ्यामधून विशिष्ट रक्कम निवडणूक खर्च निधीमध्ये वर्ग करून ठेवणे गरजेचे असते या निधीतून निवडणुकीसाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद करता येते.

**ई)     कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (Employee Provided Fund) :**

सहकारी संस्थेचा आपल्या कर्मचाऱ्यांसाठी एक भविष्यनिर्वाह निधी स्थापन करता येतो आणि त्यामध्ये संस्थेने आणि तिच्या कर्मचाऱ्यांनी दिलेली औषधाने जमा करता येतात. अशा भविष्य निर्वाह निधीचा संस्थेच्या व्यवसायासाठी उपयोग करता येत नाही किंवा तो संस्थेच्या मालमत्तेचा भाग राहत नाही परंतु तो पूर्ण निधी गुंतविण्यात येईल आणि विहित पद्धतीने त्याचे प्रशासन करता येईल असे पहावे.

वरील विविध प्रकारच्या निधी बरोबरच संस्थेच्या प्रकारानुसार वेगवेगळ्या प्रकारचे शासकीय निधी व ऐच्छिक निधी निर्माण करणे अपेक्षित असते. सर्वसाधारणपणे सहकारी वित्तीय संस्था व सहकारी बिगर वित्तीय संस्था या दोन प्रकारानुसार वेगवेगळ्या प्रकारच्या निधीमध्ये गुंतवणूक करणे अपेक्षित असते. सहकारी बँकांबाबत भारतीय रिझर्व बँकेने केलेल्या तरतुदीनुसार व मार्गदर्शक सुचनेनुसार इतर विवीध प्रकारचे निधी ठेवणे बंधनकारक असते तर बिगर वित्तीय सहकारी संस्थांना सहकार निबंधक व सहकार खात्याने दिलेल्या सूचनेनुसार वेगवेगळ्या प्रकारचे निधी ठेवणे बंधनकारक असते.

## ५.४ सारांश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० महाराष्ट्रातील सहकारी संस्थांसाठी मार्गदर्शक कायदा असून या कायद्यामध्ये सहकारी संस्थांची स्थापना, सहकारी संस्थांचे सदस्य, सहकारी संस्थांचे संचालक मंडळ, सहकारी संस्थांचे निधी व्यवस्थापन, सहकारी संस्थांच्या निधीची गुंतवणूक, सहकारी संस्थांची परिसमाप्ती बाबतचे नियम व कायद्यातील कायदेशीर तरतुदी तसेच इतर आवश्यक बाबींची तरतूद करण्यात आलेली आहे. भारतातील बहुराज्यीय सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अटी व शर्ती, सदस्यत्वबाबतचे नियम, सहकारी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक मंडळ, संचालक मंडळ मधील अटी व शर्ती संचालक मंडळाचे कार्यपद्धती याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची परिसमाप्ती करण्यासाठी सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार परिसमाप्ती त्यांची नियुक्ती करणे त्याचे अधिकार त्याचे कार्ये या बाबी निर्देशित करण्यात आलेल्या आहेत. तसेच सहकारी संस्थांच्या कडील मालमत्तेचे व्यवस्थापन करणे. सहकारी संस्थांच्या कडील निधीची गुंतवणूक करणे गुंतवणूक करण्यासाठी उपलब्ध असणारे विविध प्रकारचे पर्याय व वेगवेगळ्या प्रकारचे निधी याबाबतच्या कायदेशीर तरतुदी महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मध्ये करण्यात आलेल्या आहेत.

## ५.५ पारिभाषिक शब्द

| | | |
|---|---|---|
| १. | अंशदान | : एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेस प्राप्त झालेल्या नफ्यातून किंवा उत्पन्नातून विशिष्ट रक्कम एखाद्या व्यक्तीस किंवा संस्थेस विना परतीच्या अटीवर देण्याच्या पद्धतीस अंशदान असे म्हणतात. |
| २. | लाभांश | : सहकारी संस्थेस एका विशिष्ट आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या निव्वळ नफ्यातून सहकारी संस्थेच्या भागधारकास त्यांनी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात दिला जाणारा नफ्यातील हिस्सा म्हणजे लाभांश होय. |
| ३. | परीसमापन | : एखाद्या विशिष्ट संस्थेच्या संस्थेची समाप्ती करण्यासाठी कायद्यात निर्देशित करण्यात आलेली पद्धती होय. कि ज्यामध्ये संबंधित संस्था अनोंदणीकृत करून तिचे अस्तित्व संपुष्टात आणण्याची कार्यवाही केली जाते. |
| ४. | बहुराज्यीय सहकारी संस्था | : ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र दोन किंवा दोनपेक्षा अधिक राज्य आहे अशा सहकारी संस्थेत बहुराज्यीय सहकारी संस्था असे म्हटले जाते. |
| ५. | राखीव निधी | : एखाद्या विशिष्ट संस्थेने किंवा व्यक्तीने आपणास प्राप्त झालेल्या उत्पन्नातून किंवा नात्यातून विशिष्ट रक्कम विशिष्ट हेतूसाठी राखीव ठेवण्यासाठी निर्माण केलेला निधी होय |

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) बहुपर्यायी प्रश्न

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० ला ............. रोजी राष्ट्रपतीची मंजुरी मिळालेली आहे.

अ) ४ मे १९६१ ब) ४ मे १९६२ क) ४ मे १९६५ ड) ४ मे १९६३

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कायद्याच्या ............नुसार सहकारी संस्थेची नोंदणी मर्यादित किंवा मर्यादित दायित्वासह नोंदणी करता येणे शक्य आहे.

अ) कलम २ ब) कलम ३ क) कलम ४ ड) कलम ५

३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील सहकारी संस्थेची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सहकार निबंधकाने सही केलेले सहकारी संस्थेचे ......... जारी करणे आवश्यक असते.

अ) नोंदणी बाँण्ड ब) अस्तित्व प्रमाणपत्र

क) नोंदणी प्रमाणपत्र ड) संस्था उभारणी प्रमाणपत्र

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील........... नुसार काही विशिष्ट कारणास्तव एखाद्या सहकारी संस्थेचे चौकशी किंवा तपासणी करण्याचा अधिकार सहकार निबंधकास प्राप्त झालेला आहे.

अ) कलम १०१ ब) कलम ९१ क) कलम ३१ ड) कलम ११

५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील .............मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेच्या सदस्यांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक असते.

अ) कलम ३५ ब) कलम ०४ क) कलम २४ ड) कलम ३३

६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील .............नोंदणीकृत सहकारी संस्थेने प्रत्येक वर्षातून किमान एकदा आपले लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक आहे.

अ) कलम ८१ ब) कलम ०४ क) कलम २४ ड) कलम ३३

७. बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ कायद्यातील ............. मधील तरतुदीनुसार बहुराज्य सहकारी संस्थेचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी संबंधित व्यक्तीने केंद्रीय निबंधकाने विहित केलेल्या नमुन्यात संबंधित व्यक्तीने अर्ज सादर करणे आवश्यक असते.

अ) कलम ११ ब) कलम ०४ क) कलम २४ ड) कलम ३३

८. बहुराज्य सहकारी संस्थेचे संचालक मंडळ हे जास्तीत जास्त ............. असते.

अ) ७ सदस्यांचे ब) १५ सदस्यांचे क) २२ सदस्यांचे ड) २१ सदस्यांचे

९. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८३ व कलम ८४ मधील तरतुदीनुसार चौकशी अधिकाऱ्याने सादर केलेला अहवालानुसार सहकार निबंधक सहकारी संस्थेच्या समापणाचा अंतरिम आदेश देऊ शकतो यालाच .............असे म्हटले जाते.

अ) स्वखुषीने परीसमापन ब) खुषीने परीसमापन

क) सक्तीने समापन ड) अवैधानिक समापन

१०. सहकारी संस्थेने प्रतिवर्षी प्राप्त झालेल्या निवड नात्यातील एक चतुर्थांश भाग म्हणजेच ..............रक्कम ही राखीव निधी मध्ये वर्ग करणे आवश्यक असते.

अ) ४० टक्के ब) ४५ टक्के क) १५ टक्के ड) २५ टक्के

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कायद्यातील महत्वाच्या तरतुदी स्पष्ट करा.

२. बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ कायद्यातील महत्वाच्या तरतुदी स्पष्ट करा.

३. परीसामापन म्हणजे काय ? परीसमापकाचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

४. सहकरी संस्थेच्या निधी व मालमत्ता व्यवस्थापनाबाबतच्या तरतुदी स्पष्ट करा.

**क) थोडक्यात टिपा लिहा**

१. परीसमापकाची नियुक्ती

२. परीसमापकाचे अधिकार

३. सहकरी संस्थेचे निधी व्यवस्थापन

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

५. बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२

**बहुपर्यायी प्रश्नानाची उत्तरे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ४ मे १९६१ | २. | ड) कलम ५ |
| ३. | नोंदणी प्रमाणपत्र | ४. | ड) कलम ११ |
| ५. | कलम २४ | ६. | कलम ८१ |
| ७. | कलम ११ | ८. | ड) २१ सदस्यांचे |
| ९. | सक्तीने समापन | १०. | ड) २५ टक्के |

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके व संदर्भ


१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

२. मल्टीस्टेट सहकारी संस्था नियम, २००२.

३. Manhar N. Trivedi (2017). Practical Guide to Co-operative Housing Society in Maharashtra, Arti and Company.

४. Saroj Kumar Singh (2016). Future of Co-operative Movement in India and Abroad, RED'SHINE Publication. Inc, 14 Sep. 2016.

५. G. R. Madan (2007). Co-operative Movement in India, Mittal Publications, 2007.

६. डॉ. विजय कुंभार व प्रकाश टोणे (२०२०). भारतातील बँकिंग विषयक कायदे, स्कायलाईट पब्लिकेशन, पुणे.

## सत्र ६ : घटक २

# भारतातील सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण

### अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज व महत्त्व

२.२.२ राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद - संस्थात्मक रचना आणि कार्ये

२.२.३ वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था : उद्दिष्ट्ये, केंद्रे, प्रशिक्षण कार्यक्रम

२.२.४ सहकार क्षेत्रात व्यावसायिक संधी - GDC & A प्रमाणपत्र

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ सरावासाठी स्वाध्याय / प्रश्न

२.६ अभ्यासासाठी अधिक पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाचा अभ्यास करताना खालील गोष्टी समजतील -

१. सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज व त्याचे महत्त्व समजेल.

२. राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेची संस्थात्मक संरचना आणि तिच्या कार्याबाबत अवलोकन.

३. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थेची उद्दिष्ट्ये प्रशिक्षण केंद्रे प्रशिक्षण कार्यक्रमाबाबतची माहिती मिळेल.

४. सहकारक्षेत्रात रोजगाराची संधी : याबाबत जीडीसी आणि ए प्रमाणपत्राबाबत माहिती मिळेल.

## २.२ प्रस्तावना

सहकार शिक्षण आणि सहकार चळवळ या दोहोंचा अत्यंत जवळचा संबंध आहे. सहकार चळवळीच्या भावनेची जागृती ही मुळात शिक्षणामुळे झाली. त्या निमित्ताने सहकार चळवळ ही आर्थिक आणि शैक्षणिक चळवळ ठरते.

सहकार चळवळ ही मुलत: लोकशाही, चरित्र्य बंधुभाव शांतता आणि प्रगती या बाबींवर आधारलेली एक आदर्श समाजव्यवस्था आहे. सहकार व्यवस्था यशस्वी करण्यासाठी त्याची तत्त्वे, उद्दिष्ट्ये, पद्धती आणि व्यवहार यांची जाणीव सभासद इतर निगडीत घटकांना जाणीव व ज्ञान देण्याचे महत्त्वाचे काम सहकार शिक्षण व प्रशिक्षण याद्वारे होते. रॉशडेल प्रणेत्यांनी सहकाराची तत्त्वे सांगत असताना सहकार शिक्षणावर अधिकच भर दिला होता. सन १८५३ मध्ये त्यांनी सहकार संस्थांच्या अधिलयातील २.५० टक्के रक्कम सहकार शिक्षणावर करण्याची कायदेशीर तरतूद केली.

## २.२ विषय विवेचन

या घटकातील विविध उपघटकावरील विषय विवेचन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

### २.२.१ सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज व महत्त्व

कृष्णस्वामी यांच्या मतानुसार ''सहकारी शिक्षण म्हणजे सहकाराशी संबंधित व्यक्तींना सहकाराची तत्त्वे, पद्धती, उद्दिष्ट्ये आणि एकत्रितपणे कार्य करण्याची योग्यता किंवा कुवत व ध्यास या गुणांचा विकास करणे.'' (Education in relation to cooperation means imparting of knowledge about the principles, methods, aims and practice of cooperating among people and developing in them cooperative spirit to work together).

वरील व्याख्येनुसार सहकार शिक्षणाची व्याप्ती ही सहकारी संस्थांच्या सभासदाबरोबर संस्थेचे पदाधिकारी, नोकरवर्ग आणि सर्वसामान्य जनतेला सहकाराचे शिक्षण मिळणे आवश्यक असते. अशाप्रकारे सहकार प्रणाली विकसित करणे शक्य होईल.

सहकार प्रशिक्षण, सहकार शिक्षण हे दोन्ही शब्दांचा अर्थ भिन्न आहे. सहकार शिक्षण औपचारिक शिक्षण किंवा सूत्रबद्ध सहकार शिक्षण देणे. या सहकार शिक्षणामध्ये अभ्यासक्रम व त्यांबाबत सर्व यंत्रणा विकसित करणे किंवा त्याची माहिती देणे म्हणजे सहकार शिक्षण. मात्र या शिक्षणाच्या माध्यमातून प्रात्यक्षिक किंवा व्यवसायाभिमूख शिक्षण देणे म्हणजे सहकार प्रशिक्षण होय. थोडक्यात प्रशिक्षण म्हणजे

सहकार शिक्षणाच्या माध्यमातून कला कौशल्य विकसित करणे किंवा त्यामध्ये वृद्धि करणे म्हणजे सहकार प्रशिक्षण होय.

**सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता व महत्त्व**

मॅडीसन यांच्या मते सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण न देता सहकारी संस्थेचा कारभार लोकांच्या हाती सोपावल्यास ते हस्यास्पद किंवा शोकांतिक ठरेल. अनेक तज्ज्ञाचे असे मत आहे की सहकार चळवळीतील सभासद हे सुजाण व शिक्षित असावेत आणि सहकाराची तत्त्वे, उद्दिष्ट्ये व त्या संबंधी कायदे आणि पद्धती यांचे शिक्षण घेतलेल्या व्यक्तीच्या हाती सहकारी संस्थांचा कारभार असावा. भारतात १९१५ साली नेमलेल्या मॅक्लेगन समितीने देखील सहकारी संस्थेच्या सभासदांना सहकार शिक्षण देण्याबद्दलचे महत्त्व व्यक्त केले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने सहकार तत्त्वाचा अभ्यास करण्यासाठी डॉ. डी. डी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने देखील सहकारी चळवळीचा अस्तित्वासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षणे देणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. सन १९६५ मध्ये मिर्धा समितीनेही सहकारी शिक्षण हे मूलभूत तत्त्व म्हणून मान्य केले आणि ते देण्यासाठी आर्थिक तरतूद करावी व त्यात सहभागी होऊन लोकांपर्यंत पोहचवावा अशी शिफारस केली.

**सहकार शिक्षणाचे महत्त्व पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल**

**१) सहकारातील घटकांचे अज्ञान दूर करणेस मदत होते :**

सहकार संस्थेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना माफक दरात वस्तू व सेवांचा उपभोग घेता येतो. या सर्व बाबींचा लाभ मिळण्यासाठी सहकारातील प्रत्येक घटकांना त्यांच्या हिताची जाणीव सहकार शिक्षणातून होते. तसेच सभासद व अधिकारी वर्गांना सहकारातील लाभ निर्माण करून देण्यासाठी योग्य त्या प्रशिक्षणाची गरज असते.

**२) सहकार क्षेत्राचे बळकटीकरण व विकास :**

सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता सहकार क्षेत्रास बळकट करणे व त्याचा विकास घडवून आणण्यासाठी असते. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात सहकार क्षेत्राची सुरूवात झाली. भविष्यकाळात विकास हा सभासदावर अवलंबून असतो. सहकार क्षेत्राचा विकास हा प्रामुख्याने सहकार शिक्षित व प्रशिक्षित लोकांच्या सहकार्याने होऊ शकते. याप्रमाणे सहकार क्षेत्राचे बळकटीकरण व त्याचा विकास हा सहकार शिक्षण व प्रशिक्षणामुळे शक्य आहे.

### ३) पारदर्शकता :

सहकार संस्थांच्या व्यवहारात पारदर्शकता निर्माण करण्यासाठी या क्षेत्रातील सर्व घटकांना शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून अद्यावत करणे महत्त्वाचे ठरते. संस्थांच्या व्यवहारातील पारदर्शकतेमुळे संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित होऊ शकतात व ते सर्व सहकार क्षेत्राच्या हिताचे ठरते.

### ४) कार्यक्षमतेत वाढ :

सहकारी संस्थांची कार्यक्षमता त्यातील घटकांच्या पारदर्शक वृत्ती व जबाबदारीची दायित्व यावर अधिकाधिक अवलंबून असते. यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षण फार महत्त्वाचे आहे.

### ५) कर्तव्यभिमुख व्यवस्थापन :

सहकारी संस्थांचे व्यवस्थापन हे कर्तव्यभिमुख असणे गरजेचे असते. सहकारी प्रथा, कायदे, व्यवहार, व्यवहार पद्धती, सभा घेणे, सहकारी तत्त्वांचे पालन करणे, सहकार उद्दिष्ट सफल करणे, संस्थेचा विकास साधणे या सर्व बाबींवर लक्ष देणे इत्यादी बाबतींचे शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन व्यवस्थापन कर्तव्यभिमुख बनविणे हे महत्त्वाचे असते.

## २.२.२ राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद (रा.स.प्र.प.) : संस्थात्मक रचना आणि कार्ये

राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण परिषद ही संस्था नोंदणी कायदा १९६० अंतर्गत स्वायत्त नोंदणीकृत परिषद आहे. या परिषदेची महत्त्वाचे उद्दिष्टे म्हणजे सहकार प्रशिक्षण व्यवस्था राबविणे, सहकारमध्ये संशोधनास चालना देणे इत्यादी.

या परिषदे मार्फत स्वत:चे प्रशिक्षण केंद्रे पुढील प्रमाणे आहेत. १) राष्ट्रीय स्तरावर पुणे वै. मे. राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था. २) प्रांतीय सहकार व्यवस्थापन संस्था एकूण पाच आहेत. ते कल्याण, बैंगलोर, चंदीगड, गांधीनगर व पटणा येथे आहेत. ३) सहकार व्यवस्थापन संस्था स्थानिक स्तरावर एकूण १४ केंद्रे आहेत. भोपाळ, भुवनेश्वर, चेन्नई, डेहराडून, गोहत्ती, हैद्राबाद, इम्फाळ, जयपूर, कन्नूर, लखनौ, नागपूर, पुणे आणि त्रिवेन्द्रम येथे आहेत.

**संस्थात्मक संरचना (रा.स.प्र.प.)**

१) **मुख्यालय स्तरावर**

- कॅबिनेट मंत्री, कृषी आणि किसान कल्याण मंत्रालय विभाग, भारत सरकार हा रा.स.प्र.प. आणि नियामक परिषद रा.स.प्र.प. चा अध्यक्ष असतो.
- राज्यामंत्री, कृषी आणि किसान कल्याण मंत्रालय (सहकार), भारत सरकार तसेच सचिव कृषी आणि किसान कल्याण मंत्रालय, (भारत सरकार) हे दोघे रा.स.प्र.प. आणि नियामक परिषद रा.स.प्र.प. चे उपाध्यक्ष असतात.
- अतिरिक्त सचिव (सहकार) कृषी आणि किसान कल्याण, मंत्रालय विभाग, भारत सरकार कार्यकारणी परिषद, रा.स.प्र.प. चे चेअरमन असतात. त्यांच्याकडे रा.स.प्र.प. च्या प्रशासकीय व वित्तीय कामकाज पाहण्याची जबाबदारी असते.
- रा.स.प्र.प. चे सचिव हे नियामक परिषद रा.स.प्र.प. व कार्यकारणी परिषद रा.स.प्र.प. चे सदस्य सचिव असतात.

२) **संस्थात्मक स्तरावरील**

रा.स.प्र.प. च्या प्रत्येक संस्थेस एक व्यवस्थापन समिती स्थापन करणेत आली आहे. ही समिती त्या त्या संस्थांच्या कार्य क्षेत्रातील व्यवस्थापनास जबाबदार असते.

कृषी मंत्रालय, भारत सरकार रा.स.प्र.प. साठी व्यवस्थापन समितीची स्थापना अतिरिक्त सचिव कृषी मंत्रालय, शेती व सहकार विभाग यांच्या चेअरमनपदाच्या अधिकाराखाली करण्यात येते. मात्र ते सलगपणे ३ वर्षाच्या कार्य कालासाठी दोन वेळा पेक्षा अधिक कालावधीसाठी चेअरमन पदावर राहू शकत नाहीत.

प्रत्येक सहकार व्यवस्थापन संस्था प्रकल्प सल्लागार समितीच्या चेअरमनपदी रजिस्ट्रार असतो. प्रत्येक संस्थेचा वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम सल्लागार समितीच्या सुचनेनुसार वै.मे. राष्ट्रीय सहकार व व्यवस्थापन पुणे, वरीष्ठ कार्यकरणीद्वारे आयोजित करण्यात येते.

## रा.स.प्र.प.ची कार्ये

राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण परिषदेची कार्ये खालील मुद्याप्रमाणे स्पष्ट करता येते.

१) **प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन :**

रा.स.प्र.प. ही विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचे धोरण संलग्न संस्थाच्या गरजेप्रमाणे ठरविते. प्रशिक्षण कार्यक्रमाचे वार्षिक दिनदर्शकाप्रमाणे प्रांतिय व संस्थात्मक मार्फत याचे आयोजन करते.

साधारणपणे वैकुंठ मेहता सहकार प्रबंधक संस्थेमार्फत PGDM, DCBM, व्यवस्थापन विकास कार्यक्रम, संशोधन व सल्लामसलत, HDCM या प्रशिक्षण कोर्सेस सुरू करण्यात येते, ही सर्व कोर्सेस अल्पमुदतीचे असतात.

**२) औद्योगिक सहकार व्यवस्थापन प्रशिक्षण :**

उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून व्यवस्थापन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी वित्तीय मदत करते. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्दिष्ट म्हणजे औद्योगिक सहकारी संस्थांना प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम बनविणे होय. सद्यस्थितीत, उद्योग मंत्रालयाने वित्तीय मदत देणे बंद केले आहे. तथापि वैकुंठ मेहता प्रशिक्षण संस्थेमार्फत गरजेनुसार प्रशिक्षणाची सोय केली जाते.

**३. हातमाग सहकारी व्यवस्थापन प्रशिक्षण :**

सन १९७९ सालापासून हातमाग सहकारी संस्थांच्या प्रशासकिय व व्यवस्थापन पदावर कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना प्रशिक्षण देण्याच्या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या प्रशिक्षणाअंतर्गत प्राथमिक हातमाग सहकारी संस्था यांच्या सदस्यांना व अधिकारी वर्गास १२ आठवड्याचा प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येते. पूर्वी या योजनेस वस्त्रोद्याग मंत्रालयाकडून आर्थिक साह्य दिले जात होते, पण आता ही आर्थिक मदत स्थगित करण्यात आली आहे. अशाप्रकारे सर्व स्तरावरच्या प्रशिक्षण केंद्रातर्फे गरजू संस्थांना प्रशिक्षण दिले जाते.

**४. संगणक केंद्रे :**

प्रत्येक प्रांतिय व स्थानिक प्रशिक्षण केंद्रे ही संगणक युक्त आहेत. अनेक अभ्यासक्रम संगणकाच्या साह्याने शिकविले जातात. सर्व सहकारी क्षेत्रातील प्रशासकिय व अधिकारी वर्गांना आवश्यक असणारे संगणकीय ज्ञान देण्याची कार्यवाही या केंद्राच्या माध्यमातून केली जाते.

**५. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संघाशी सहयोग :**

उच्च प्रतीचे प्रशिक्षण व शिक्षण सहकारी संस्थांना उपलब्ध करून देण्यासाठी रा.स.प्र.प. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्व संस्थांशी सहयोग साधला जातो. या प्रशिक्षण केंद्राकडून ILO, NICD, Polhola (Sri Lanka), SHDI Addis Ababa (Ithopia), IFCO, KRIBCO, NCCE, NCUI, NDDB, FISHCOEED इत्यादी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्व संघांशी सहयोग साधून. योग्य तो सहकाराचा विस्तार वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

**६. ईशान्य राज्ये व सिक्कीमसाठी अनेक योजना :**

भारत सरकार प्रामुख्याने ईशान्य राज्ये व सिक्कीम राज्य यांच्या सामाजिक-आर्थिक वेगवान विकासासाठी विशेष प्राधान्य दिले जाते. यासाठी वित्त मंत्रालय भारत सरकारकडून आर्थिक मदत

दिली जाते. सदरची संपूर्ण रक्कम केंद्राकडे परत न पाठवता खर्च करावी अशी अट असते. त्याचप्रमाणे प्रत्येक मंत्रालयाच्या विभागाने त्यांना दिल्या जाणाऱ्या वार्षिक अदांजपत्रकातील १०% रक्कम ही ईशान्य राज्ये व सिक्कीम या राज्यांच्या विशेष कार्यक्रमासाठी राखीव ठेवण्याची तरतूद सन २००१ पासून करण्यात आली आहे. विभागीय उपसंचालकाच्या अधिपत्याखाली रा.स.प्र.प. च्या मुख्यालयातून या सर्व घडामोडी आणि कार्यक्रमावर नियंत्रण ठेवण्याचे काम करते. आरोग्या संबंधी उदा. सकस आहार, फळे व भाज्या याचे संवर्धन, नेतृत्त्व विकास कार्यक्रम इत्यादीवर अल्पकालीन अभ्यासक्रम राबवून त्या भागाचा विकास करण्याचे प्रयत्न करण्यात येते.

**वै. मे. राष्ट्रीय सहकार व व्यवस्थापन संस्था व इतर संस्थांत्मक प्रशिक्षण कार्यक्रमाचा दृष्टीक्षेप**

| तपशील | कालावधी व स्थळ |
|---|---|
| 1. Diploma Course in Cooperative Business Management (DCBM) | 36 Months, VAMNICOM Pune<br>36 Months, VAMNICOM Pune |
| 2. Post Graduate Diploma in Management (PGDM) | 2 years in Vamnicom, Pune, RICM, Chandigrah and RICM, Gandhinagar. |
| 3. Master in Business Administration | RICM / ICM Bangaloe, Bhuneshwar, Bhopal, Dehradun, Lucknow, Kannur, Thiruvananthapuram, Madurai and Chennai. |
| 4. Master in Computer Application | RICM, Banglaore |
| 5. Higher Diploma in Cooperative Management (HDCM) | 26/36/52 Weeks - All RICMs / ICMs |
| 6. Sectrol Diploma Programmes | 10-12 weeks RICMs / ICMs |
| 7. Management Development Programme (MDP) | 3-5 days Vamnicom / RICMs / ICMs |

### ७. सेमिनार कार्यशाळा व सल्ला सेवा :

या सर्व प्रशिक्षण केंद्रातर्फे वर्तमान विषयावर मोठ्या प्रमाणात कार्यशाळा, सेमिनार व सल्ला-सेवाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. त्याशिवाय एखाद्या सहकारी संस्थेच्या गरजेनुसार मार्गदर्शक कार्यक्रमाचेही नियोजन केले जाते. RICMs / ICMs च्या माध्यमातून संशोधनास चालना व सल्ला / मार्गदर्शन मोठ्याप्रमाणात दिले जाते.

### ८. पायाभूत सुविधांची तरतूद :

रा.स.प्र. परिषदेने पुणे, येथे राष्ट्रीय पातळीवरील स्वबळावर वैकूंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था स्थापना केली. राज्य / प्रांतीय पातळीवर बेंगलौर, चंदीगड, गांधीनगर, कल्याणी आणि पटना अशा पाच ठिकाणी सहकार व्यवस्थापन संस्था स्थापन केल्या आहेत. विविध शहरी स्तरावर १४ ठिकाणी सहकार व्यवस्थापन संस्था स्थापन केल्या आहेत. भारतातील राज्य सहकार संघातर्फे १०९ ज्युनिअर सहकार प्रशिक्षण केंद्रे चालवल्या जात आहेत. त्यांना परिषदेकडून शैक्षणिक सुविधा व शैक्षणिक तरतूदीचे पाठबळ दिले जाते.

## २.२.३ वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था (रा.स.प्र.स.) (VAMNICOM)

**प्रास्ताविक :**

अनेकवेळा सहकार तत्त्वेच्या माध्यमातून सहकार शिक्षण आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले व त्याप्रमाणे अनेक तज्ज्ञांनी त्याला लागणाऱ्या आर्थिक व कायदेशीर तरतूदीही केल्या आहेत. भारतात सन १९४५ साली सरैया समितीने सहकार क्षेत्राचे नियोजन करण्यासाठी राज्य व केंद्र पातळीवर सहकार प्रशिक्षण कॉलेजेस स्थापना करण्याची शिफारस केली होती. त्या अनुषंगाने १९४७ साली तत्कालीन दिवंगत वैकुंठ मेहका, वित्त, सहकार आणि ग्रामीण उद्योग सहकार क्षेत्रास प्रशिक्षण देण्यासाठी सहकार प्रशिक्षण महाविद्यालय स्थापन केले. सन १९६४ साली मुंबई येथे ग्राहक व्यापार व्यवस्थापनाची केंद्रिय संस्था स्थापना करण्यात आली (Central Institute of Management for Consumer's Business (CIMCOB)). या संस्थेचे राष्ट्रीय सहकार महाविद्यालय आणि संशोधन संस्थेमध्ये (National Cooperative College and Research Institute (NCCRI)) विलीनीकरण करण्यात आले आणि आजची ही राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण संस्था स्थापन झाली. त्याचे नामकरण सन १९६७ साली वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था असे करण्यात आले.

**वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेची वैशिष्ट्ये : (वै.मे.रा.स.व्य.स.) (VAMNICOM)** यास इंग्रजीमध्ये अल्परूपाने व्हॅमनिकोम असे संभोदले जाते.

व्हॅमनिकोम संस्थेची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. सहकारी क्षेत्रात व्यवस्थापकीय योग्यता व निर्णय क्षमता वाढविण्यासाठी मदत करणे.

२. तरूणांना सहकारी क्षेत्रात व्यवस्थापनामध्ये जीवीका निर्माण करण्यासाठी PGDM व PGDCBM शैक्षणिक कार्यक्रम उपलब्ध करून देणे.

३. संशोधन, उपयोजित संशोधन व इतर सहकाराशी निगडीत आवश्यक माहिती संबंधित घटकांना पुरविणे.

४. सहकार संस्थांनमध्ये निर्माण होणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करणे. अथवा/विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सहकार्य करणे.

५. सहकार क्षेत्रासाठी उपयुक्त धोरण निश्चिती व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सहभागी दर्शविणे.

६. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकाराची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सामंज्सस्य वाढविणे.

**वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेची प्रशिक्षण केंद्रे**

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेची महत्त्वाची केंद्रे पुढीलप्रमाणे -

**१. सहकार व्यवस्थापन (PGDCBM)**

वैकुंठ मेहता संस्थेच्या सहकार व्यवस्थापन केंद्राकडून भारत आणि सार्क देशातील सहकार संस्थाचा गुणात्मक विकास साधण्यासाठी PGDCBM अभ्यासक्रमाच्या माध्यमातून कार्यकारणीस व्यवस्थापनाचे शिक्षण आणि प्रशिक्षण दिले जाते. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या १० विद्यार्थ्यांना NCDC, NAFED, NCARDF, Sugal Federation, NCUI तर्फे शिष्यवृत्ती (Fellowship) देण्यात येते.

**२. प्रशिक्षण आणि माहिती सेवा केंद्र :**

वैकुंठ मेहता संस्थेकडून प्रशिक्षण आणि माहिती सेवा केंद्रातर्फे उच्च पदस्त अधिकारी व कार्यालयीन अधिकारी नसलेल्या सहकार क्षेत्रातील व्यक्तींना जवळपास १०० पेक्षा अधिक प्रमाणात अल्पकालीन व्यवस्थापन प्रशिक्षण दिले जाते. प्रायोजित आय.ए.एस. अधिकाऱ्यांसाठी उद्भोदन वर्ग आयोजित करण्यात येते. इतर शेती व सहकार क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावर असणाऱ्या संघटना, संस्था यांच्यासाठी त्यांच्या गरजेनुसार, मागणी आणि सुचनेनुसार प्रशिक्षण, कार्यशाळा, सेमिनार आयोजित करण्याचा पुढाकार घेतला जातो.

### ३. व्यवस्थापन शिक्षण केंद्र :

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेतर्फे सन १९९३ पासून दोन वर्षाचा PGDM (Post Graduate Diploma in Management) हा अभ्यासक्रम शिकविला जातो. विविध विद्याशाखेतील पदवी धारकांमध्ये व्यवसायिक क्षमता निर्माण करण्यासाठी विविध कौशल्यपूर्ण प्रशिक्षण दिले जाते. या विद्यार्थ्यांना समाजातील विविध क्षेत्रात व्यवस्थापनाच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण योगदान देणे आणि ते कार्यरत असलेल्या क्षेत्रातील सामाजिक, आर्थिक व्यवस्थेत तांत्रिक कौशल्याची जोड देऊन नेतृत्व संपन्नत्ता निर्माण करण्याचे कार्य करते. आज शेती, बँकिंग आणि विमा क्षेत्रात व्यावसायिक तज्ज्ञांची गरज वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर हा कोर्स उपयोजित कौशल्यांचा वापर करत आहे. आखिल भारतीय तंत्र शिक्षण PGDM डिप्लोमास मान्यता दिलेली आहे. भारतीय विद्यापीठातील एम.बी.ए.च्या अभ्यासक्रमास समकक्षता म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

या केंद्रामध्ये विविध अभ्यासक्रम शिकविले जातात तसेच प्रात्याक्षिक प्रशिक्षणही दिले जाते.

### ४. माहिती तंत्रज्ञान केंद्र :

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेचा अज्ञावत आय.टी. विभाग आहे. संस्थेने सन २०१० सालापासून डिप्लोमा इन मॅनेजमेंट ऑफ कॉम्प्युटर ऑपरेशन (DMCO) सुरू केला आहे. आजपर्यंत ८ बॅचेस बाहेर पडलेल्या आहेत. देशपातळीवर अशा प्रकारचा डिप्लोमा हा पहिल्यांदा सुरू करण्यात आला आहे. या डिप्लोमास राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली ने मान्यता दिली आहे.

### ५. संशोधन, मार्गदर्शन आणि प्रकाशन केंद्र :

या केंद्रातर्फे अनेक संशोधन प्रकल्प राबविले जातात. साधारणपणे अर्थशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन विषयासंबंधी संशोधन प्रकल्प व विद्यावाचस्पती पदवी दिली जाते. मानव संसाधन विकास मंत्रालयाने या केंद्रास महिला दुग्ध व्यवसाय प्रकल्पांना मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. कोऑपरेटीव्ह परस्पेक्टीव (Cooperative Perspective) हे नियतकालीक (जर्नल) सन २००२-२००३ मध्ये देशातील उत्तम जर्नल म्हणून NCUI तर्फे गौरविण्यात आले आहे.

## वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेचे प्रशिक्षण कार्यक्रम :

सहकार क्षेत्रातील सर्व घटकांची कार्यक्षमतेमध्ये वाढ व सुधारणा करण्यासाठी वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था खालील प्रशिक्षण कार्यक्रम राबविते. त्याची सखोल माहिती पुढील प्रमाणे दिली आहे.

## १. पोस्ट ग्रॅज्युअेट डिप्लोमा इन कोऑपरेटीव्ह बिझनेस मॅनेजमेंट (PGDBM) :

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेचा हा महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम आहे. सहकार संस्था आणि व्यावसायिकतेचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक ते कौशल्य ज्ञान, व्यावसायिक वर्तन वृद्धिकरण्याचे मुख्य उद्दिष्ट असते.

हा अभ्यासक्रम सेवाक्षेत्र व सहकार क्षेत्रातील सर्व तरूण अधिकारी वर्गांना, राज्य सरकारमधील विविध विभागातील अधिकारी वर्गांना, तसेच प्रशासनामधील विविध अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येते.

या अभ्यासक्रमास प्रवेश अशा उमेदवारास दिला जातो जे सहकारी बँक/संस्था/सरकार पातळीवरील विभागात तीन वर्षाच्या कामाचा अनुभव असणारे आणि कोणत्याही विद्याशाखेची पदवीधारण करणारा असतो, त्याला दिला जातो त्यांची वयोमर्यादा ५० वर्षापेक्षा कमी असावी लागते. मात्र महिला एस.सी./एस.टी./ओ.बी.सी. या प्रवर्गातील उमेदवारांना ५५ वर्षापर्यंत वाढीची शिथीलता देण्यात येते.

## २. पोस्ट ग्रॅज्युअेट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (ABM) (PGDM (ABM))

वैकुंठ मेहता संस्थेने सन १९९३ पासून वरील दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. या कोर्सला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदने मान्यता दिली आहे. भारतीय विद्यापीठे संघाचा एम.बी.ए. समकक्ष म्हणून या अभ्यासक्रमाला मान्यता दिली आहे. या अभ्यासक्रमास राष्ट्रीय मानांकन मंडळाने (NBA) सन जून २०१५ ते जून २०१९ या कालावधीसाठी मानांकित केले आहे.

हा अभ्यासक्रम दोन विभागामध्ये विभागलेला आहे. एक वर्गामध्ये शिकविणे, दुसरे, प्रात्याक्षिके व कार्यानुभव देणे. दोन्हीबाबत गुणांकन केले जाते.

साधारणपणे सहा सत्रामध्ये ४१ क्रेडीट पैकी २६ क्रेडिट मुख्य विषयासाठी, विशेषीकरण विषयासाठी १२ क्रेडीट आणि उर्वरीत ३ क्रेडीट हे आव्हानात्मक प्रश्न जे शेती विषयाशी निगडीत असतात त्यासाठी प्रदान करण्यात येते.

### समर इंटरनशिप :

प्रत्येक विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षासाठी एप्रिल व मे महिन्यामध्ये चार आठवड्याचा इंटरनशीपचा कोर्स करावा लागेल. यासाठी विशेष शिष्यवृत्ती दिली जाते. भारत राष्ट्रीय सहकार संघातर्फे प्रतिवर्ष सहा विद्यार्थ्यांना रू. ४०,०००/- शिष्यवृत्ती दिली जाते. इफको तर्फे एस.सी./एस.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यास अनुक्रमे २ व १ विद्यार्थ्यास गुणवत्तेनुसार प्रतिवर्ष रू. १५,०००/- शिष्यवृत्ती दिली जाते. CICTAB मेरोटीयर्स ही दोन पारितोषके भारतीय व परदेशी विद्यार्थ्यांना देण्यात येतात.

### ३. डिप्लोमा इन मॅनेजमेंट ऑफ कम्प्युटर ऑपरेशन :

देशात अशा प्रकारचा पहिला कोर्स वैकुंठ मेहता संस्थेने सुरू केला आहे. डिप्लोमा मधील शिक्षण हे बँका, सहकारी साखर कारखाने, डेअरी संस्थामध्ये संगणकीय सेवा याबाबतीत ज्ञान दिले जाते. या विद्यार्थ्यांना NCC घेण्यास मान्यता दिली आहे. या कोर्सचा कालावधी तीन वर्षाचा आहे. यापैकी २ महिने वैकुंठ मेहता संस्थेमध्ये आणि १ महिना प्रायोजित संस्थेकडे प्रशिक्षण दिले जाते.

### ४. PGDM - Executive

- हा कोर्स १५ महिन्याचा असून यातील १२ महिने वर्गात शिकवले जाते. राहिलेले ३ महिने प्रात्यक्षिक दिले जाते (नियमित).
- या कोर्समध्ये ७०० तास अध्यापन कार्य असते. वेळ स. ७.१५ ते ९.१५ आणि शनिवारी सकाळ १० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत विद्यार्थ्यास हजर राहावे लागते.

## २.४.१ सहकार क्षेत्रामधील व्यावसायिक संधी प्रास्ताविक

भारतात कृषी व औद्योगिक विकास साधण्यासाठी सहकार तत्त्वावरील अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. विविध सहकारी संस्थांमध्ये प्रशासन कामकाज पाहण्यासाठी अनेक पदे उपलब्ध आहेत. या क्षेत्रामधील व्यावसायिक संधी उपलब्ध असतात.

## २.४.२ सहकार क्षेत्रामध्ये व्यावसायिक संधी (जी.डी.सी. अँन्ड ए)

**प्रास्ताविक :**

जी. डी.सी.अँन्ड ए. (Government Diploma in Cooperation and Accountancy (GDC & A)) हा विशेष डिप्लोमा महाराष्ट्र सरकारने सहकार क्षेत्रामध्ये व्यावसायिकांची उपलब्धता निर्माण करण्यासाठी निर्माण केला आहे. याची परिक्षा GDC & A बोर्डातर्फे आयोजित घेतली जाते. हा अभ्यासक्रम यशस्वीपणे संपादन केल्यास पुढीलप्रमाणे नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

- सोसायटीमध्ये पूर्ण/अर्धवेळी व्यवस्थापक म्हणून नेमणूक केली जाते.
- सहकार गृहनिर्माण संस्थेसाठी मार्गदर्शक/सल्लागाराची नोकरी मिळू शकते.
- अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून संधी उपलब्ध होते.

- ऑडिटरच्या नोंदणीकृत यादीवर संधी मिळू शकते.
- सहकारी बँका, सहकारी विकास संस्था वा पतसंस्था इत्यादी ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा लाभ मिळू शकते.

**जी.डी.सी. अँन्ड ए अभ्यासक्रम :**

या अभ्यासक्रमात १०० गुणांचे सहा विषय.

१. गृहनिर्माण सहकारी संस्था व्यवस्थापन
२. अकाँन्ट
३. इतिहास
४. सहकारातील तत्त्वे आणि व्यवस्थापन, इतिहास
५. सहकार व इतर कायदे
६. सहकारी बँका आणि पत संस्था

## २.३ सारांश

जागतिक स्तरावर असे दिसते की सहकार तत्त्वांच्या माध्यमातून सहकार शिक्षण आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे. ICA-1937, ICA-1966 आणि ICA-1995 सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण यावर भर दिला आहे. आज काही देशांमध्ये सहकार शिक्षण व प्रशिक्षण महत्त्वाचे आहे असे दिसून येते.

भारतात सहकार क्षेत्रामध्ये सहकार शिक्षण व परिक्षण महत्त्व ओळखून राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली. या परिषदेच्या अनुषंगाने वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थेची मुख्य प्रशिक्षण केंद्र कामगीरी अत्यंत महत्त्वाची आहे. वैकुंठ मेहता प्रशिक्षण केंद्राद्वारे अनेक अभ्यासक्रम जे सहकार क्षेत्रास पुरक आहेत असे शिकविले जातात. या प्रशिक्षण केंद्रामार्फत केंद्र व राज्य सरकारातील प्रशासनातील कर्मचाऱ्यांना आवश्यक अशा अभ्यासक्रमाचा आराखडा निर्माण केला जातो. त्याप्रमाणे प्रशिक्षण दिले जाते.

सहकार क्षेत्रात रोजगाराची संधी याबाबतीत राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद, वैकुंठ मेहता संस्था आणि जी.डी.सी. अँन्ड ए. यांच्याकडून महत्त्वाची भूमिका स्पष्ट होते. आज अनेक लोक जी.डी.सी. अँन्ड ए. च्या माध्यमातून रोजगार प्राप्त केलेले आहेत.

## २.४ पारिभाषिक शब्द

१. VAMNICOM - वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधंन संस्था
(Vaikunth Mehta National Institute of Cooperative)

२. NCCT - राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण परिषद
(National Council for Cooperative Training)

३. RCM - प्रांतिय सहकार प्रबंधंन संस्था
(Regional Institutes of Cooperative Management)

४. ICM - सहकार व्यवस्थापन संस्था
(Institute of Cooperative Management )

## २.५ सरावासाठी स्वाध्याय / प्रश्न

**प्र.१ वस्तूनिष्ठ प्रश्न.**

१. सन ....... साली मुंबई येथे ग्राहक व्यापार व्यवस्थानाची केंद्रिय संस्था स्थापन केली.

२. सन .......... साली राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण संस्थेचे नामकरण वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था असे नामकरण करण्यात आले.

३. सन .......... सालापासून डिप्लोमा इन मॅनेजमेंट ऑफ कॉम्प्युटर ऑपरेशन (DMCO) अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.

४. वैकुंठ मेहता संस्थेने सन .......... पासून पोस्ट ग्रॅज्युऐट डिप्लोमा इन मॅनेजमेंटP(GDMCAB) दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे.

**प्र.१ चे उत्तरे :** १) १९६४ २) १९६७ ३) २०१० ४) १९९३

**प्र. २ खालील प्रश्नांचे थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज स्पष्ट करा.

२. सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाचे महत्त्व सांगा.

३. राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेची संस्थात्मक संरचना स्पष्ट करा.

४. राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेची कार्ये सांगा.

५. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थेची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

६. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थेतील प्रशिक्षण केंद्रांची माहिती द्या.

७. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थेमधील प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती सांगा.

**प्र. ३ टीपा लिहा.**

१. सहकार क्षेत्रातील रोजगारांची संधी.

२. जी.डी.सी. अँन्ड ए. प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

## २.६ अभ्यासासाठी अधिक पुस्तके


१. Dr. R. G. Korabu and D. A.S. Banne (2021). "Cooperative Development" B.Com. III, Semester VI, Phadke Prakashan, Kolhapur.


□□□

# सत्र ६ : घटक ३

# भारतातील सहकारी गृहनिर्माण संस्था

## (Co-operative Housing Societies in India)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ भारतातील सहकारी गृहनिर्माण संस्था

३.३.१ अर्थ व व्याख्या

३.३.२ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रकार

३.३.३ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीचे निकष

३.३.४ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नोंदणीची कार्यपद्धती

३.४ महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्थांचे उपविधी / पोटनियम

३.४.१ महत्त्वाचे उपविधी

३.४.२ प्रमुख तरतुदी

३.५ सहकारी गृहनिर्माण संस्थेची आवश्यकता

३.५.१. गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या समस्या

३.६ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे लेखापरीक्षण

३.६.१. लेखापरीक्षणाचे स्वरूप

३.६.२. लेखापरीक्षणाचे घटक

३.७. सारांश

३.८ पारिभाषिक शब्द

३.९ स्वयंअध्ययन प्रश्न

३.१०. संदर्भसूची

## ३.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटक क्रमांक ३ च्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

- सहकार गृहनिर्माण संस्थाचा अर्थ लक्षात येईल.
- सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रकार ध्यानात येतील.
- सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीची प्रक्रिया लक्षात येईल.
- महाराष्ट्र गृहनिर्माण संस्थांचे उपविधीचे आकलन होईल.
- गृहनिर्माण संस्थांची आवश्यकता का आहे हे समजून येण्यास मदत होईल.
- गृहनिर्माण संस्थांच्या समस्या कोणत्या आहेत याचे आकलन होईल.
- गृहनिर्माण संस्थांचे लेखापरीक्षण कसे केले जाते हे समजण्यास मदत होईल.

## ३.१ प्रस्तावना

अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. या तीन मुलभूत गरजापैकी निवारा सुद्धा अतिशय महत्वाची गरज आहे. दिवसेंदिवस वाढत चालेली लोकसंख्या आणि उदरनिर्वाहासाठी अपरिहार्य स्थलांतर या कारणामुळे नागरीकरणाची प्रक्रिया खूप वेगाने होऊ लागली आहे. नगरातील या झपाट्याने वाढत चालेलेल्या लोकसंख्येमुळे लोकांची निवाऱ्याची गरज अथवा मागणी सुद्धा वेगाने वाढत आहे. वाढत चाललेल्या मागणीमुळे सामान्य लोकांना सहज घर खरेदी करणे हे जवळजवळ अशक्यप्राय होत चालले आहे. तसेच नगरातील आधुनिक घरांच्या संकल्पनेत केवळ निवारा एवढीच अपेक्षा राहिलेली नाही तर त्यामध्ये आरामदायी, सुविधादायी आणि आनंददायी, सुसंस्कृत आणि स्वतंत्र अशा निवाऱ्याच्या संकल्पना बनत चालली आहे. म्हणजेच समाज हा फक्त चार भितींचे घर एवढीच अपेक्षा न बाळगता पूर्ण सुविधापूर्ण निवाऱ्याची अपेक्षा बाळगत आहे. नागरी भागात होत चालेल्या लोकसंख्या केंद्रीकरणामुळे घरांच्या मागणीत आणि घरांच्या पुरवठ्यामध्ये असमतोल निर्माण झाला आहे. सध्या वाढत चालेल्या जागेच्या किंमती, घर बांधणीच्या साहित्यामध्ये झपाट्याने होत चालली वाढ, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरांच्या मागणीत वाढ यामुळे घरांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणत वाढ होत चालेली आहे. त्यामुळे अल्प व मध्यम वर्गीय उत्पन्न गटातील लोकांना घर बांधणे अशक्य होत चालले आहे. यातूनच घर बांधण्याची समस्या निर्माण होत आहे.

## ३.२ भारतातील सहकारी गृहनिर्माण संस्था

भारतामध्ये सहकाराची चळवळ ही सन १९०४ मध्ये सुरु झाली. परंतु सहकार क्षेत्राचा विकास हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच झपाट्याने झालेला आहे. कारण १९४० आणि १९५० च्या दशकात युद्ध, दुष्काळ, फाळणी, अन्नधान्याचा तुटवडा यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक तसेच सामाजिक घडी विस्कटलेली होती ती घडी व्यवस्थित बसवण्याचे काम हे सहकार क्षेत्राने केले आहे. सहकार क्षेत्राने वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणत नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. भारतामध्ये महाराष्ट्र राज्य हे सहकार चळवळीतील अत्यंत प्रगत असलेले राज्य आहे. भारतामध्ये सहकारी चळवळीची सुरुवात ही शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज देण्यापासून झाली. त्यानंतर या चळवळीचा विकास आणि विस्तार हा मोठ्या प्रमाणामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात झाला आहे. आणि याचा संबंध प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष्यरित्या वेगवेगळ्या क्षेत्रात अनुभवास येतात.

जेव्हा सहकारी सोसायट्यांचा दुसरा कायदा १९१२ मध्ये पास झाला त्यानंतर गृहपुरवठा सोसायट्या स्थापन करण्यासंबंधी प्रयत्न सुरु झाले. पहिल्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापनचे आद्यप्रवर्तक श्री. एस. एस. तलमाखी यांना मानतात. कारण त्यांनी सन १९१५ मध्ये पहिली सहकारी गृहनिर्माण संस्था दि. सारस्वत को ऑप हौसिंग सोसायटी लि. या नावाने गांवदेवी, मुंबई येथे नोंदवली. ही संस्था इतर गृहनिर्माण संस्थांसाठी रचना आणि कामकाज या दोन्ही दृष्टीने मॉडेल म्हणून प्रेरक ठरली. त्यामुळे ही संस्था सहकारी प्रयत्नाचे उत्तम उदाहरण म्हणून अद्यापही उल्लेखली जाते. जर आपणास सहकारी गृहनिर्माण संस्थेचा इतिहास विचारात घ्यायचा म्हटले तर त्यामध्ये प्रोड्युसर्स हौसिंग सोसायटी ही अग्रगण्य सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. या संस्थेत प्रामुख्याने घराचे बांधकाम हे संस्थेच्या सभासदासाठी केले जाते. या संस्थेचा यशस्वी प्रयोग हा भारतातील भडोज जिल्ह्यात झाला आहे. त्याचप्रमाणे रिसोर्स हौसिंग सोसायटी, टेनंट को-पार्टनरशिप सोसायटी आणि टेनंट ओनरशिप सोसायटी यांच्या द्वारे भारतात सहकारी गृहनिर्माण संस्थांचे जाळे हे विस्तृत होत गेले. भारतामध्ये ३१ मार्च २०१८ अखेर जवळपास २.६ लाख इतक्या सहकारी संस्था अस्तित्वात होत्या त्यातील जवळपास ५२ टक्के संस्था ह्या सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या.

गृहनिर्माण चळवळ ही सहकार चळवळीचाच एक भाग आहे. जर आपण सहकारी संस्था आणि सहकारी गृहनिर्माण संस्था यांचा विचार करायचे म्हटले तर यात थोडा फरक आहे. कारण सहकारी संस्था या त्यांच्या सभासदांच्या संघटना असतात आणि त्या सहकार कायद्यानुसार त्यांची नोंदणी करावी लागते. मात्र सहकारी गृहनिर्माण संस्था या इतर आर्थिक उलाढालीच्या व्यवसायिक संघटनेपेक्षा वेगळ्या असतात. कारण या गृहनिर्माण संस्थांचा उद्देश हा इतर सहकारी संस्थाप्रमाणे आर्थिक किफायतशीर चालवून आर्थिक

प्रगती करणे हा नसतो. तर संस्थेचे व्यवस्थापन सहकारी तत्वांना अनुसरून एकदिलाने, निष्ठेने आणि कर्तव्यतत्परतेने चालवणे हे असते.

### ३.३.१ अर्थ व व्याख्या (Meaning and Definition) :

**अर्थ (Meaning) :**

निवाऱ्याची समान गरज असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन गृहनिर्माण सहकारी संस्थेची स्थापना करतात. घरासाठी आवश्यक असलेली जागा किंवा जमीन सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत खरेदी केली जाते किंवा सरकारकडून सवलतीच्या दरात मिळवली जाते. घरांचे आराखडे, बांधकाम साहित्य, मजुरी, दुरुस्ती, देखभाल असे सर्व व्यवहार संस्थेमार्फत केले जातात. अशा सहकारी संस्थांना गृहनिर्माण सहकारी संस्था असे म्हणतात.

**व्याख्या (Definition) :**

मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन आपल्या राहण्यासाठीच्या घराची गरज पूर्ण करण्यासाठी सहकारी तत्वानुसार स्थापन केलेल्या संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार, आपल्या सभासदांना राहण्यासाठी घरे किंवा सदनिका बांधून देणे, तसेच सभासदांना समान सुखायोगी आणि सेवा पुरविणे या उद्देशाने सहकारी तत्तावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय.

### ३.३.२ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रकार

**(Types of Co-operative Housing Societies)**

सहकारी गृहनिर्माण संस्था छोटे समूह म्हणून कार्य करतात. आपल्या सभासदांसाठी सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रम तयार करतात आणि त्यांना उच्च सामाजिक मूल्यांसारख्या इतर संधी उपलब्ध करून देतात. सभासदांना निवाऱ्याची सोय करणे, त्यांना नियमित बचतीची सवय लावणे. तसेच निवाऱ्याची सोय कमी खर्चात करणे, सामुहिक सहजीवन जगण्याची प्रेरणा देणे, घराची रचना, बांधकाम यामध्ये सारखेपणा राखणे यासारखी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून सहकारी गृहनिर्माण संस्था कार्य करत असतात. अलीकडच्या काळामध्ये लोकांना निवाऱ्यासाठी घरे उपलब्ध करून देण्यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील नियम १० मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रकार स्पष्ट केले आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रकार खालीलप्रमाणे सांगता येतील.

## १. भाडेकरू मालकी हक्क गृहनिर्माण संस्था

**(Tenant Ownership Housing Society)**

भाडेकरू मालकी हक्क गृहनिर्माण संस्था म्हणजे ज्या संस्थांनी जमीन भाडे पट्ट्यावर किंवा पूर्ण मालकीच्या तत्त्वावर धारण केली असेल व ज्यामध्ये घरे सदस्यांच्या मालकीची असतील किंवा होतील अशा संस्था होय. अशा जमिनीवर बांधलेली घरे किंवा इमारती ज्यांनी धारण केल्या आहेत ते भाडेपट्टा धारण करणारे ठरतील. या भाडेपट्ट्यामध्ये अटी, उपभाडे पट्ट्याला प्रतिबंध, हस्तांतरण इत्यादी संदर्भातील तरतुदी असतात. त्याचप्रमाणे या प्रकारामध्ये सभासदांनी प्लॉटची सर्व रक्कम अदा केली असली तरी जागेचा दीर्घ-मुदतीचा भाडेपट्टा त्यांना सोसायटीच्या नावाने करून द्यावा लागतो आणि नाममात्र जमीनभाडे द्यावे लागते. या संस्थामधील महत्त्वाची बाब म्हणजे इमारती विकण्याच्या वा इतरांना वर्ग करण्याचा हक्क सभासदांना नसतो. मात्र यातून एक मार्ग आहे तो म्हणजे सोसायटीच्या मंजुरीने ही गोष्ट केली जाते.

## २. भाडेकरू सहभागीदार गृहनिर्माण संस्था

**(Tenant Co-operative Partnership Society)**

भाडेकरू सहभागीदार गृहनिर्माण संस्था म्हणजे घरे बांधण्याची एक विशिष्ट योजना आखून त्याप्रमाणे सभासदांना घरे पुरविली जातात. या प्रकारात सोसायटीत सर्व मालमत्ता सोसायटीच्या मालकीची असते. प्रथमतः सभासद काही भाग धारण करतो. त्याला राहण्यासाठी सोसायटीकडून घर किंवा जागा दिली जाते. परंतु जागेचे दरमहा भाडे देताना सभासद भाड्याच्या रकमेबरोबर इमारत बांधण्यासाठी जो खर्च झाला आहे त्या झालेल्या खर्चापोटी देखील काही रक्कम देत असतो. यामुळे काही कालावधीनंतर सोसायटीला त्यानंतर सर्व कर्ज फेडता येते आणि सर्व मालमत्ता संपूर्णपणे सोसायटीच्या मालकीची होते. यामधील सर्वात महत्वाची बाब म्हणजे सभासदांना आपल्या ताब्यात असलेली घर किंवा जागा विकता येत नाही किंवा दुसऱ्याला ती वर्ग करता येत नाही. सुरुवातीस सभासदाने केलेल्या करारानुसार ठराविक कालावधीपर्यंत सभासदाला घरभाडे द्यावे लागते. या घरभाड्याबरोबर त्याने इमारत खर्चासाठी देलेल्या रकमेचे पुढे भागामध्ये रुपांतर करण्यात येते. या भागाच्या रकमेइतके त्याला जवळ-जवळ त्याने दिलेल्या भाड्याइतके व्याज (लाभांश) मिळते. तसेच शेवटी त्याच्या राहण्याचा हक्क कायम होतो आणि नंतर त्याला भाडे द्यावे लागत नाही किंवा फार तर नाममात्र द्यावे लागते.

## ३. इतर गृहनिर्माण संस्था (Other Housing Society)

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे इतर काही प्रकार पडतात ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) घर तारण संस्था :**

ज्या संस्था आपल्या सभासदाला व संस्थांना जमिनीच्या तारणावर व घराच्या तारणावर घर बांधण्यासाठी कर्ज देतात त्या संस्थांना घर तारण संस्था असे म्हणतात. या संस्था आपल्या सभासदांना महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्त संस्थेकडून घरबांधणीसाठी कर्ज घेण्यास मदत करते. अशा संस्था या संस्थेच्या संलग्न संस्था असू शकतात. या संस्थांच्या सदस्यांना इतर गृहनिर्माण संस्थांच्या सदस्यांना देण्यात येणाऱ्या अटी व नियमानुसार कर्जपुरवठा करण्यात येतो.

**ब) घरबांधणी संस्था :**

ज्या संस्था सभासदांना बांधलेली घरे विकत देतात किंवा विकत घेतात त्या घरबांधणी संस्था असे म्हणतात.

**क) फ्लॅट ओनरशिप सोसायटी :**

फ्लॅट ओनरशिप सोसायटी म्हणजे महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅटस (नियमन आणि घरबांधणी, विक्री, व्यवस्थापन आणि हस्तांतरण) कायदा, १९६३ अन्वये स्थापन झालेल्या संस्था होय.

**ड) अपार्टमेंट :**

अपार्टमेंटस म्हणजे अपार्टमेंट कट मधील तरतुदी अन्वये स्थापन झालेल्या संस्था होत.

## ३.३.३ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीचे निकष :

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीचे निकष आणि आवश्यक असणारी कागदपत्रे संस्थांच्या प्रकारानुसार काही प्रमाणात वेगवेगळे असतात. गृहनिर्माण संस्थांचे भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था, भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था आणि इतर गृहनिर्माण संस्था असे तीन प्रकार पडतात. त्यासाठी लागणारी महत्त्वाची कागदपत्रे खालीलप्रमाणे आहेत.

**अ) भाडेकरू मालकी हक्क गृहनिर्माण संस्था नोंदणी करीता आवश्यक असणारी महत्त्वाची कागदपत्रे:**

१. जागा खरेदी कराराची नक्कल, जागेबाबतचा ७/१२ चा उतारा किंवा मालमत्ता पत्रक.

२. जागा बिगरशेती असलेबाबत सक्षम अधिकाऱ्याचा दाखला.

३. कमाल जमिन धारणा कायदा लागू असलेला/ नसलेला बाबतचा आदेश.

४. जागा विकसित करणेस घेतली असल्यास विकसन करारनामा.

५. जागेचे कुलमुखत्यारपत्र.

६. जागा निर्वेध असल्याबाबत टायटल सर्च रिपोर्ट.

७. सक्षम अधिकारी यांचा जागा कोणत्या क्षेत्रात येते याबाबतचा झोनदाखला.

८. लेआऊट प्लॅन.

९. सभासदांची यादी.

१०. संस्थेची योजना.

११. नाव आरक्षणाबाबतचा अर्ज.

१२. संस्था नोंदणीसाठी कमीत कमी १० सभासद आवश्यक राहतील.

१३. संस्था नोंदणी (अ नमुना) बाबतचा अर्ज.

१४. संस्थेची माहिती (ब नमुना) चा तक्ता.

१५. सभासदांची माहिती (क नमुना) तक्ता.

१६. सभासदांचे हिशोबाचे पत्रक (ड नमुना)

१७. संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र (एक्स नमुना)

१८. संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र (वाय नमुना)

१९. संस्थेचे बिल्डर प्रमोटर्स यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र (झेड नमुना)

२०. सभासदांचे प्रतिज्ञापत्र (कमीत कमी १० प्रवर्तक यांचे प्रतिज्ञापत्रक असावे.)

२१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मान्यता दिलेल्या उपविधी दोन प्रती.

२२. संस्था नोंदणी झाल्यावर बालकामगार कामाला ठेवणार नसले बाबतचे मुख्य प्रवर्तक यांचे हमीपत्र.

२३. प्रवर्तक सभासदांचे भाग प्रत्येकी रुपये ५००/- व प्रवेश फी रुपये १००/- नाव आरक्षणास मंजुरी दिलेनंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्कम भरले बाबतचा बँक शिल्लकेचा दाखला.

२४. शासकीय कोषागारात संस्था नोंदणी फी रुपये २५००/- भरले बाबतचे चलन.

**ब) भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था करीता आवश्यक असणारी महत्त्वाची कागदपत्रे**

१. जागेबाबतचा ७/१२ चा उतारा किंवा मालमत्ता पत्रक.

२. जागा बिगरशेती असलेबाबत सक्षम अधिकाऱ्याचा दाखला.

३. कमाल जमिन धारणा कायदा लागू असलेला/ नसलेला बाबतचा आदेश.

४. सक्षम अधिकाऱ्याने मंजूर केलेल्या बांधकामाचा नकाशा.

५. बांधकाम करणेस परवानगी दिले बाबतचे पत्र.

६. बांधकाम पूर्णत्वाचा दाखला.

७. जागा विकसित करणेस घेतली असल्यास विकसन करारनामा.

८. जागेचे कुलमुखत्यारपत्र.

९. जागा निर्वेध असल्याबाबत टायटल सर्च रिपोर्ट.

१०. फ्लॅट खरेदीचा करारनामा.

११. रचनाकार (आर्किटेक्ट) यांचा बांधकामा बाबतचा दाखला.

१२. सभासदांची यादी.

१३. संस्थेची योजना.

१४. नाव आरक्षणाबाबतचा अर्ज.

१५. संस्था नोंदणीसाठी कमीत कमी १० सभासद आवश्यक राहतील.

१६. संस्था नोंदणी (अ नमुना) बाबतचा अर्ज.

१७. संस्थेची माहिती (ब नमुना) चा तक्ता.

१८. सभासदांची माहिती (क नमुना) तक्ता.

१९. सभासदांचे हिशोबाचे पत्रक (ड नमुना)

२०. संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र.

२१. संस्थेचे बिल्डर प्रमोटर्स यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र.

२२. सभासदांचे प्रतिज्ञापत्र (कमीत कमी १० प्रवर्तक यांचे प्रतिज्ञापत्रक असावे.)

२३. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मान्यता दिलेल्या उपविधी दोन प्रती.

२४. संस्था नोंदणी झाल्यावर बालकामगार कामाला ठेवणार नसले बाबतचे मुख्य प्रवर्तक यांचे हमीपत्र.

२५. प्रवर्तक सभासदांचे भाग प्रत्येकी रुपये ५००/- व प्रवेश फी रुपये १००/- नाव आरक्षणास मंजुरी दिलेनंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्कम भरले बाबतचा बँक शिल्लकेचा दाखला.

२६. शासकीय कोषागारात संस्था नोंदणी फी रुपये २५००/- भरले बाबतचे चलन.

**क) इतर गृहनिर्माण संस्था करीता आवश्यक असणारी महत्त्वाची कागदपत्रे :**

इतर गृहनिर्माण संस्थेमध्ये गृहतारण व गृहदुरुस्ती करीता संस्था नोंदणीसाठी खालीलप्रमाणे महत्त्वाची कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. जागा संबंधी साठेखत/ खरेदीखत/ जागा मालकी दाखला.

२. ७/१२ अथवा मालमत्ता रजिस्टर कार्डाचा दाखला.

३. नागरी कमाल जमीन धारणा कायद्यान्वये जागा मुक्त केली असल्यास त्याबाबतचा सक्षम अधिकाऱ्याचा आदेश.

४. जागा शासनाने किंवा निमसरकारी संस्थेने देऊ केली असल्यास त्याचे हमीपत्र.

५. जागा ट्रस्टची असल्यास धर्मादाय आयुक्त यांचा नाहरकत दाखला.

६. प्लॉट बिगरशेती केलेला सक्षम अधिकाऱ्याचा दाखला.

७. सभासंदांची यादी.

८. संस्थेची योजना.

९. नाव आरक्षणाबाबतचा अर्ज.

१०. संस्था नोंदणीसाठी कमीत कमी १० सभासद आवश्यक राहतील.

११. संस्था नोंदणी (अ नमुना) बाबतचा अर्ज.

१२. संस्थेची माहिती (ब नमुना) चा तक्ता.

१३. सभासदांची माहिती (क नमुना) तक्ता.

१४. सभासदांचे हिशोबाचे पत्रक (ड नमुना).

१५. संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र (एक्स नमुना).

१६. सभासदांचे प्रतिज्ञापत्रक (कमीत कमी १० प्रवर्तक यांचे प्रतिज्ञापत्रक).

१७. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मान्यता दिलेल्या उपविधी दोन प्रती.

१८. संस्था नोंदणी झाल्यावर बालकामगार कामाला ठेवणार नसले बाबतचे मुख्य प्रवर्तक यांचे हमीपत्र.

१९. प्रवर्तक सभासदांचे भाग प्रत्येकी रुपये ५००/- व प्रवेश फी रुपये १००/- नाव आरक्षणास मंजुरी दिलेनंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्कम भरले बाबतचा बँक शिल्लकेचा दाखला.

२०. शासकीय कोषागारात संस्था नोंदणी फी रुपये २५००/- भरले बाबतचे चलन (मागासवर्गीयच्या गृहनिर्माण संस्थासाठी नोंदणी फी रुपये ५० एवढी आहे.).

२१. एसआरए/ एसआरडी व म्हाडा प्रणित सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी करताना वरील निकषांची पुर्ततेबरोबरच त्या त्या प्राधिकरणाअंतर्गत दिलेल्या परिपत्रकीय सूचनेनुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करण्यास किंवा त्याबाबतची कार्यवाही करण्यास बिल्डर प्रमोटर्स टाळाटाळ करीत असल्यास महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम सन १९६३ च्या कलम १० (१) अन्वये अधिकार दिलेले प्राधिकृत अधिकारी (त्या-त्या जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक) यांच्याकडे संस्था नोंदणी करण्याबाबत नमुना ६ (नियम १२) प्रमाणे अर्ज दाखल करता येईल.

सदर प्रस्ताव दाखल करताना खालील प्रमाणांची आवश्यकता राहील.

१. जागेबाबतचा ७/१२ चा उतारा किंवा मालमत्ता पत्रक.

२. जागा बिगर-शेती असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचा दाखला.

३. कमाल जमीनधारणा कायदा लागू असलेल्या / नसलेल्या बाबतचा आदेश.

४. सक्षम अधिकाऱ्याने मंजूर केलेल्या बांधकामाचा नकाशा.

५. बांधकाम करण्यास परवानगी दिल्याबाबतचे पत्र.

६. बांधकाम पूर्णत्वाचा दाखला.

७. जागा विकसित करण्यास घेतली असल्यास विकसन करारनामा.

८. जागेचे कुलमुख्यात्यारपत्र.

९. प्लॅट खरेदीचा करारनामा.

१०. रचनाकार (आर्क्टिटेक) यांचा बांधकामाबाबतचा दाखला.

११. सभासंदांची यादी.

१२. संस्थेची योजना.

१३. नाव आरक्षणाबाबतचा अर्ज.

१४. संस्था नोंदणीसाठी कमीत कमी १० सभासद आवश्यक राहतील.

१५. संस्था नोंदणी (अ नमुना) बाबतचा अर्ज.

१६. संस्थेची माहिती (ब नमुना) चा तक्ता.

१७. सभासदांची माहिती (क नमुना) तक्ता.

१८. सभासदांचे हिशोबाचे पत्रक (ड नमुना).

१९. संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र (एक्स नमुना).

२०. संस्था नोंदणीकरिता अर्ज केलेल्या सभासदांची रुपये २०० च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले हमीपत्र (इन्डीमिनिटी बाँड).

२१. सभासदांचे प्रतिज्ञापत्रक (कमीत कमी १० प्रवर्तक यांचे प्रतिज्ञापत्रक).

२२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मान्यता दिलेल्या उपविधी दोन प्रती.

२३. संस्था नोंदणी झाल्यावर बालकामगार कामाला ठेवणार नसले बाबतचे मुख्य प्रवर्तक यांचे हमीपत्र.

२४. प्रवर्तक सभासदांचे भाग प्रत्येकी रुपये ५००/- व प्रवेश फी रुपये १००/- नाव आरक्षणास मंजुरी दिलेनंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्कम भरले बाबतचा बँक शिल्लकेचा दाखला.

२५. शासकीय कोषागारात संस्था नोंदणी फी रुपये २५००/- भरले बाबतचे चलन.

उपरोक्त कागदपत्रांची पूर्तता करून दाखल झालेल्या प्रस्तावावर सक्षम अधिकारी सुनावणी घेऊन संस्था नोंदणी करण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यास आदेश देऊ शकतात.

### ३.३.४ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नोंदणीची कार्यपद्धती

**(Registration Process of Co-operative Housing Societies)**

सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करीता उपरोक्त कागदपत्राची पूर्तता होऊन दाखल झालेल्या प्रस्तावाची संबधित नोंदणी अधिकारी छाननी करून संस्था नोंदणी केलेबाबत (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये चे प्रमाणपत्र, नोंदणी केलेल्या उपविधीची प्रत, संस्था नोंदणी बाबत ज्ञापन संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांना देणेची व्यवस्था करतील. सदरची संस्था नोंदणी केलेबाबतचा आदेश राजपत्रात करणेबाबत शासकीय मुद्रणालय यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीला पाहिजे.

सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी झाल्यानंतर मुख्य प्रवर्तक यांनी संस्था नोंदणी झाल्याचा दिनांकापासून ३ महिन्याच्या आत प्रवर्तक सभासदांची पहिली सर्वसाधारण सभा (महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ५९ अन्वये) आयोजित केली पाहिजे व त्यात आवश्यक ते ठराव पारित केले पाहिजे. अशी सभा मुख्य प्रवर्तकांनी मुदतीत घेतली नाहीतर त्या संदर्भात संबंधीत नोंदणी अधिकाऱ्याकडे तक्रार प्राप्त झाल्यास प्राधिकृत अधिकारी नेमून अशी सभा प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली घेता येईल.

पहिल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजापासून सुरु होते. या सभेत प्रामुख्याने मुख्य प्रवर्तकांची निवड केली जाते तसेच नियोजित संस्थेच्या नावाने बँकेत खाते उघडण्याची आणि संस्थेचे नाव राखून ठेवण्याची परवानगी मिळवण्यासाठी आवश्यक ते ठराव मंजूर केले जातात. संबंधीत निबंधकानी नियोजित संस्थेत एकूण किती सदनिका / गाळे आहेत आणि त्यापैकी किती सदनिका धारक / गाळेधारकांनी नियोजित संस्थेच्या पहिल्या सभेस हजर राहून विविध ठरावांना मजुरी दिली आहे हे तपासून पाहणे, त्याची खात्री करणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा अल्पमताने प्रस्ताव/ ठराव मंजूर होऊन एक गट नोंदणीची प्रक्रिया सुरु करतो. त्यानंतर दुसरा गट स्वतंत्र सभा घेऊन वेगळ्या नावाने संस्थेच्या नोंदणीची दुसरी प्रक्रिया सुरु करतो. नोंदणीपूर्वी निर्माण होणारे वाद टाळण्यासाठी नोंदणीपूर्वीच्या पहिल्या सभेची संपूर्ण प्रक्रिया मूळ कागदपत्रे तपासून बहुसंख्य सभासदांच्या उपस्थितीत पार पडलेली आहे याची खात्री केल्याशिवाय संस्थेचे नाव राखून ठेवण्यास आणि त्या नावाने बँकेत खाते उघडण्यास निबंधकाने परवानगी देऊ नये.

विशेषत: एसआरए / एसआरडी, म्हाडा प्रणित गृहनिर्माण संस्थांच्या संदर्भात पहिल्या सभेत होणाऱ्या कामकाजास अत्यंत महत्व असते. म्हणून एसआरए / एसआरडी, म्हाडा प्रणित संस्थांच्या नोंदणी पूर्वीच्या पहिल्या सभेत संबंधित निबंधकाच्या कार्यालयातील प्रतिनिधी उपस्थित असणे त्या प्राधिकरणानी बंधनकारक केलेले आहे. या सभेचे संपूर्ण कामकाजाचे चित्रफितीवर (व्हिडीओ शुटींग)

चित्रीकरण उपलब्ध असणे बंधनकारक केलेले आहे. तरीसुद्धा या संदर्भात वाद निर्माण झाल्यास संस्थेच्या नोंदणी होण्यापूर्वीचा वाद म्हणून सक्षम न्यायालयात दाद मागता येते.

संस्थेची नोंदणी करण्याचे नाकारल्यास तसा बोलका आदेश नोंदणी अधिकाऱ्यांने पारित करून संबधितांना त्यांची प्रत देणे आवश्यक आहे. या निर्णयाविरुद्ध लगतच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कलम १५२ नुसार अपीलदाखल करता येईल.

संस्थेच्या नोंदणीबाबत विहित मुदतीत संस्थेचा नोंदणी प्रस्ताव निबंधाकाकडे दाखल केल्यापासून दोन महिन्याच्या मुदतीत त्या संदर्भातील निर्णय घेणे आवश्यक आहे. असा निर्णय दोन महिन्याचा मुदतीत न घेतल्यास तो प्रस्ताव लगतच्या वरिष्ठाकडे पाठवणे आवश्यक आहे.

## ३.४ महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्थांचे उपविधी / पोटनियम

**(Maharashtra Co-operative Housing Society Model Bye Laws)**

सहकार खात्याने गृहनिर्माण संस्थेचे नियम, नमुना उपविधी, पोटकायदे स्वरुपात विहित करून ठेवले आहेत. सहकार कायद्यात उपविधींबाबत असे म्हटले आहे की, उपविधी म्हणजे पोटकायदेच असून सहकारी न्यायाधिकरण १९६३, अपील क्र. १०५, निकाल दि. १०/०८/१९६३ नुसार, उपविधी हे सभासद आणि गृहसंस्था यांच्यामधील कराराचे प्रतीक होय. जणू ही संस्थेची घटनाच असून, या घटनेच्या चौकटीत संस्थेचा कारभार चालला पाहजे. या स्पष्टीकरणावरून आपल्याला गृहनिर्माण संस्थांच्या कारभारामध्ये उपविधीचे किती महत्व आहे हे दिसून येते.

९७ वी घटना दुरुस्ती आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम (दुरुस्ती) अध्यादेश २०१३, ३(२) नुसार उपविधी याचा अर्थ, अधिनियमाशी सुसंगत असलेले आणि, त्यावेळी अंमलात असलेल्या अधिनियमान्वये नोंदलेले आणि तीत अशा उपविधीच्या नोंदलेल्या सुधारांचा समावेश असतो. किंवा उपविधी म्हणजे संस्थेचे अधिनियमान्वये नोंदलेले उपविधी होत. या उपविधीलाच पोटनियम असेही म्हणतात. ज्यावेळी सहकारी संस्थेची नोंदणी केली जाते. त्यावेळी हे उपविधी / पोटनियम नोंदविले जातात. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६० च्या नियम ८(२) मध्ये सहकारी संस्थेच्या उपविधीत कोणकोणत्या तरतुदी असणे गरजेचे असते त्याबाबतचे मार्गदर्शन केले आहे. त्या उपविधीत खालील तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

अ) ज्या परिस्थितीत सभासदाला आपले सभासदत्व मागे घेण्याची परवानगी संस्थेला देता येईल, ती परिस्थिती;

ब) सदस्यांनी आपले सदस्यत्व मागे घेणे, त्यांची अपात्रता, त्यांचा मृत्यू या संबंधात अनुसरायची कार्यपद्धती;

क) ज्या अटींवर (असतील तर) सभासदांना आपल्या हिश्श्याचे किंवा हितसंबंधाचे हस्तांतरण करण्यास परवानगी देण्यात येईल, त्या अटी;

ड) ज्या सभासदांकडून पैसे येणे असेल, त्या सभासदांनी दिलेल्या रक्कमांचा विनियोग करण्याची पद्धत;

इ) संस्थेच्या वतीने दस्तऐवजावर सही करण्यासाठी आणि तिच्या वतीने दावे व इतर वैध कार्यवाही चालविण्यासाठी आणि त्यास प्रतिवाद करण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना अधिकृत करणे;

फ) अधिनियम, नियम व उपविधी यांच्या उपबंधानुसार ठेवणे आवश्यक असलेल्या निरनिराळ्या निधींची स्थापना व ते निधी सुस्थितीत ठेवणे; आणि

ग) सभासदांना सर्वसाधारण सभेचे अधिकार चालविण्यासाठी रचना, आणि त्या प्रतिनिधींची निवडणूक करण्याची पद्धत, आणि अशा मंडळाला विशिष्ट अधिकार निर्विष्ट करणे.

त्याचप्रमाणे उपविधींमध्ये/ पोटकायद्यांमध्ये खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.

अ) उद्देश व कार्यक्षेत्र

ब) कामकाजबंधने व मर्यादा

क) सभासदत्व देणे व रद्द करणे

ड) व्यवस्थापनरचना व कार्य

इ) निधी-व्यवस्थापन, नफ्याचा विनियोग

फ) सेवकनियुक्त्या

ग) सभा, वार्षिक सभा, पद्धती, गणपूर्ती इत्यादी

ह) न्यायालयीन दाव्याबाबताचे अधिकार इत्यादी.

सहकारी संस्थांना अधिनियम कलम १६(१) नुसार गृहसंस्थांना जबाबदारीत/ दायित्वाचे स्वरूप किंवा व्याप्तीत बदल करता येतात. कलम १६(२) नुसार जेव्हा संस्थेने तिच्या दायीत्वाचे स्वरूप किंवा व्याप्ती यात बदल करण्याबद्दल ठराव समंत केला असेल तेव्हा, ती अशा ठरावाची लेखी नोटीस तिचे सर्व सदस्यांना दिली पाहिजे. तसेच कोणताही उपविधी किंवा कोणतीही संविदा यात तद्विरुद्ध काहीही असेले तरी, कोणत्याही सदस्यास त्याजवर नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या

मुदतीत त्यांचे भाग, ठेवी किंवा कर्ज काढून घेण्याचा विकल्प असेल. कलम १६(३) अन्वये, कोणत्याही सदस्यांनी पोट कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आपल्या विकल्पाचा वापर केला नाही तर, त्याने बदल करण्यास समंती दिली आहे, असे समजण्यास येईल. गृहसंस्थेच्या जबाबदारीचे/ दायीत्वाचे स्वरूप किंवा व्याप्ती यात बदल करणारी उपविधीतील सुधारणा १६(४), सर्व सभासदांची त्यांना संमती देईपर्यंत १६(४) (अ); किंवा, जे सदस्य त्यांना दिलेल्या अधिकार (पोटकलम २) अन्वये, त्यांचे दावे पूर्णत: निकालात निघेपर्यंत किंवा त्यांची मागणी अन्यथा पूर्ण होईपर्यंत,नोंदविता येणार नाही किंवा अंमलातही आणता येणार नाही. १६ (४) (ब)

### ३.४.१ महत्त्वाचे उपविधी

सहकारी गृहनिर्माण संस्थातील उपविधी मध्ये १७५ उपविधी, ३ जोडपत्रे आणि १ ते ३० परिशिष्टे खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **उपविधी क्र. १ ते ६** | : | प्रारंभिक, अर्थ, कार्यक्षेत्र, उद्दिष्टे, आणि संलग्नता |
| **उपविधी क्र. ७ ते १५** | : | निधी त्याचा उपयोग आणि गुंतवणूक |
| **उपविधी क्र. १६ ते ४४** | : | सभासद त्यांचे हक्क, जबाबदाऱ्या व दायित्वे |
| **उपविधी क्र. ४५ ते ६४** | : | सभासदांच्या जबाबदाऱ्या व दायित्वे |
| **उपविधी क्र. ६५ ते ७१** | : | संस्थेची शुल्क आकारणी |
| **उपविधी क्र. ७२ ते ८४** | : | संस्थेचे विधीसंस्थापन कर्तव्ये व अधिकार |
| **उपविधी क्र. ८५ ते १०९** | : | सर्वसाधारण सभा |
| **उपविधी क्र. ११० ते १४०** | : | संस्थेचे कामकाजाचे व्यवस्थापन |
| **उपविधी क्र. १४१ ते १४७** | : | लेखापुस्तके व नोंदवह्या ठेवणे |
| **उपविधी क्र. १४८** | : | नफ्याचे विनियोजन |
| **उपविधी क्र. १४९ ते १५०** | : | बुडीत देय रकमा निर्लेखित करणे |
| **उपविधी क्र. १५१ ते १५३** | : | संस्थेच्या लेख्यांची लेखापरीक्षा |
| **उपविधी क्र. १५४ ते १६१** | : | मालमत्तेचे अभिहस्तांतरण /मानवी अभिहस्तांतरण/ मालमत्ता विकास/ मालमत्तेची दुरुस्ती आणि देखभाल |

| | | |
|---|---|---|
| **उपविधी क्र. १६२ ते १७१** | : | इतर संकीर्ण बाबी |
| **उपविधी क्र. १७२ ते १७४** | : | सदस्यांच्या तक्रारीचे निवारण करणे |
| **उपविधी क्र. १७५** | : | सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीच्या पुनर्विकासासंबंधी |
| **जोडपत्र १** | : | एक व्यक्तीभूत मंडळी (कार्पोरेट बॉडी) ला गृहसंस्थेचे सभासदत्व घेण्यासंबंधीच्या अटी |
| **जोडपत्र २** | : | गृहसंस्थेने व त्यांच्या सभासदांनी निरनिराळ्या कारणांसाठी वापरावयाच्या फॉर्म्सची यादी |
| **जोडपत्र ३** | : | निवडणुकीसंबंधीचे नियम, जोडून परिशिष्ट (ए) (बी) (सी). |
| **परिशिष्ट १ ते ३०** | : | गृहसंस्थेने व तिच्या सभासदांनी निरनिराळ्या कारणांसाठी वापरावयाचे नमूना फॉर्म्स |

### ३.४.२ प्रमुख तरतुदी (Major Provisions)

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे उपविधीतील (पोटनियम) महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

**१. संस्थेच्या नावात बदल करण्याची कार्यपद्धती (१-ब) :**

संस्थेला आपल्या नावात बदल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १५ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ यांच्या नियम १४ अन्वये निर्धारित केलेली कार्यपद्धती अनुसरावी लागते. नियम १४ मध्ये असे सांगितले आहे की, कलम १५ अन्वये संस्थेच्या नावात बदल करता येईल. मात्र अशा रीतीने नावात बदल केल्यामुळे कोणत्याही जातीचा किंवा धार्मिक पंथाचा उल्लेख होता कामा नये किंवा ते संस्थेच्या उद्देशास विसंगत असता कामा नये. तसेच नियम १४(२) नुसार, प्रत्येक बाबतीत संस्थेच्या उपविधींत सुधारणा करून संस्थेच्या नावात बदल केला पाहिजे आणि तो राजपत्रात अधिसूचित केला पाहिजे. पुढे नियम १४ (३) अन्वये, संस्थेच्या नावात करण्यात आलेला बदल निबंधकाने समंत केल्यानंतर संस्थेने आपले मूळ नोंदणी प्रमाणपत्र निबंधाकाकडे पाठवले पाहिजे आणि अशा नोंदणी प्रमाणपत्रात योग्य रीतीने सुधारणा केल्यानंतर निबंधकाने ते संस्थेकडे परत पाठवले पाहिजे. तसेच नियम १४(४) नुसार, निबंधकाने त्याजकडून ठेवण्यात आलेल्या संस्थेच्या नोंदणी पुस्तकात अशा रीतीने नावाची नोंद केली पाहिजे.

२. **संस्थेचे वर्गीकरण :**

उपविधी क्र. १ (क) नुसार, संस्थचे गृहनिर्माण संस्था या प्रमुख वर्गाखाली व भाडेकरू मालकी/ भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था/ इतर गृहनिर्माण संस्था या उपवर्गाखाली वर्गीकरण करण्यात आले आहे.

३. **निधीची उभारणी (Raising of Funds) :**

सहकारी गृहनिर्माण संस्था उपविधी ७ (अ) नुसार संस्थेचा निधी हा खाली उल्लखिलेल्या एका अगर एकाहून अधिक पद्धतींचा अवलंब करून उभा करता येतो.

१) प्रवेश फी च्या रूपाने.

२) भाग पत्र (शेअर्स) विक्रीस काढणे.

३) कर्जे व अर्थसहाय्य घेऊन.

४) ठेवी स्वीकारून.

५) ऐच्छिक देणगीचे रूपाने (परंतु अशी देणगी हस्तांतरिती किंवा हस्तांतरक यांच्याकडून आलेली नसावी.)

६) इमारत / इमारतींच्या किंमतीपोटी अंशदानाद्वारे.

७) भोगवट्याचा हक्क, अभिहस्तांकन यांसह भागपत्रांच्या हस्तांतरणावरील फीच्या रूपाने.

८) सदनिकेच्या भोगवट्याचा राहण्याचा हक्क हस्तांतरित करते वेळी हस्तांतरकाकडून घ्यावयाच्या अधिमुल्याच्या रूपाने.

९) प्रवर्तक वा बांधकाम व्यावसायी यांच्याकडून जागा मूळ निधी (कॉपर्स फंड) उभारून (परंतु असा निधी भूखंड / घरे, भाग व संस्थांच्या भांडवलातील हक्क हस्तांतरण करताना घेता येणार नाही.

१०) या उपविधीन्वये परवानगी दिलेल्या अन्य कोणत्याही पद्धतीने.

११) वैधानिक आवश्यकांद्वारे.

१२) मोकळ्या जागा भाडेपट्टीने किंवा भाड्याने देऊन भोगवटेतर आकार आकारून.

१३) पुनर्विकासाच्या बाबतीत मूळ निधी उभारून.

## ४. भागभांडवल (Share Capital) :

संस्थेचा भाग किती रुपयाचा असेल, असे एकूण किती भाग संस्था उभारेल म्हणजे भागभांडवलाच्या उभारणीची कमाल मर्यादा किती असेल याला अधिकृत भागभांडवल असे म्हणतात. जे भाग सभासद खरेदी करतील त्यांची एकूण रक्कम व शासनाने दिलेले भागभांडवल मिळून वसूल भागभांडवल होते. (सहकारी गृहनिर्माण संस्था उपविधी, क्र. ८)

## ५. राखीव निधी उभारणे (Constitution of the Reserve Fund) :

सहकारी गृहनिर्माण संस्था उपविधी क्र. १२ (अ) नुसार संस्थेच्या राखीव निधीमध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१) संस्थेला तिच्या सदस्यांकडून मिळालेली सर्व प्रकारची प्रवेश फी.

२) सभासदांनी भोगवटा हक्का समवेत आपल्या भागपत्राचे हस्तांतरण केल्यावर संस्थेला तिच्या सदस्यांकडून मिळालेली हस्तांतरण फी.

३) संस्थेचे भागभांडवलात किवा मालमत्तेत सदस्यांनी आपले हितसंबंध हस्तांतरित केल्यावर संस्थेला मिळालेले हस्तांतरण अधिमुल्य.

४) अधिनियमाच्या कलम ६६ (१) आणि (२) च्या तरतुदिंस अधीन राहून प्रत्येक वर्षी मिळालेल्या निव्वळ नफ्यातून उक्त विधीत जमा केलेल्या रकमा; आणि

५) संस्थेला विशिष्ट कारणांसाठी मिळालेल्या देणग्याखेरीज तिला मिळालेल्या सर्व देणग्या.

## ६. इतर निधीची उभारणी (Creation of Other Funds) :

संस्था उपविधी क्र. १३ (इ) अन्वये, संस्था या खाली नमूद केलेल्या दरांनी तिच्या सदस्यांकडून अंशदाने घेऊन पुढे उल्लेखिलेले निधी उभारू शकते व प्रस्थापित करू शकते.

अ) संस्थेच्या इमारतीच्या/ मालमत्तेच्या नेहमीच्या वारंवार दुरुस्तीवर होणारा खर्च भागविण्यांसाठी सर्वसाधारण सभेत संस्थेच्या इमारतीच्या बांधकामदरम्यान झालेल्या आणि वास्तुशास्त्रज्ञाने प्रमाणित केलेल्या प्रत्येक सदनिकेच्या बांधकाम खर्चाच्या कमीत कमी दरसाल ०.७५ टक्क्याच्या अधीन निश्चित केलेल्या दराने दुरुस्ती व देखभाल खर्च असेल.

ब) जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा आणि सदनिकेच्या क्षेत्रफळाच्या आधारे निश्चित केलेल्या दराने निर्णय घेण्यात आल्याप्रमाणे प्रमुख दुरुस्ती निधी असेल. मोठ्या/असामान्य/ महत्त्वाच्या

दुरुस्तीवर होणारा खर्च भागविण्यासाठी सर्वसाधारण सभा आवश्यकतेनुसार गाळ्याच्या क्षेत्रफळाप्रमाणे प्रत्येक सभासदांकडून गोळा करावयाची रक्कम निश्चित करेल.

क) सर्वसाधारण सभेत ठरविण्यात येईल त्या दराने सभासदांकडून रकमा गोळा करून कर्जनिवारण निधी (सिंकिंग फंड) उभारण्यात येईल. संस्थेच्या इमारतीच्या बांधकामादरम्यान झालेल्या आणि वास्तुशास्त्रज्ञाने प्रमाणित केलेल्या सदनिकेच्या बांधकाम खर्चाच्या ०.२५ टक्क्याच्या अधीन तो उभारण्यात येऊ शकतो. मात्र, त्यामध्ये जमिनीची प्रमाणबद्ध किंमत अंतर्भूत असणार नाही.

ड) सदस्यांकडून प्रत्येक सदनिकेमागे दरमहा रुपये १०/- एवढी किंवा सर्वसाधारण सभा ठरवील त्याप्रमाणे वर्गणी गोळा करून शिक्षण व प्रशिक्षण निधी उभारण्यात येईल.

## ७. सदस्यत्व (Membership) :

संस्था उपविधी क्र. १६ (अ) मध्ये संस्थेच्या सभासदाची वर्गवारी सहयोगी सभासद आणि नाममात्र सभासद अशी केली जाते.

### अ) सहयोगी सभासद (Associate / Joint Member) :

ज्या वेळी एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीबरोबर संयुक्तपणे संस्थेचा भाग धारण करते व ज्या व्यक्तीचे नाव मूळ सभासदाबरोबरच परंतु दुसऱ्या क्रमांकावर येते अशा व्यक्तीला सहयोगी/संयुक्त सभासद असे म्हणतात.

### ब) नाममात्र सभासद (Nominal Member) :

नोंदणीनंतर भाग न देता दिलेले सभासदत्व होय. असे सभासदत्व कलम ९१ अन्वये किंवा इतर कलमाखाली कायदेशीर कारवाई सहकार कायद्यानुसार करणे शक्य व्हावे म्हणून देण्यात येते. गृहनिर्माण संस्था भाडेकरू किंवा केअर टेकर यांना असे नाममात्र सभासदत्व देऊ शकते.

## ८. संस्थेच्या सभासदांची पात्रता :

गृहनिर्माण संस्थेच्या सभासद पात्रतामध्ये संस्थेच्या सदस्यत्वाची, अज्ञान किंवा मनोविकाल व्यक्तींची कंपनी कायद्याखाली नोंदलेली संस्था, भागीदारपेढीइत्यादींची सदस्यत्वासाठी पात्रता उपविधी क्रमांक १७ (अ) (ब) आणि १८ यामध्ये नमूद केलेले आहेत. त्याप्रमाणे त्यांच्या पात्रता खालील प्रमाणे आहेत.

**अ) संस्थेच्या सदस्यत्वाची पात्रता :**

उपविधी क्र. १७ (अ) नुसार खालील व्यक्तीस संस्थेच्या सदस्यत्वासाठीची मान्यता देण्यात येते.

१) भारतीय संविदा अधिनियम १८७२ अन्वये संविदा करण्यास सक्षम असलेली अशी व्यक्ती अथवा;

२) संस्था नोंदणी अधिनियम १८६० खालील नोंदणीकृत संस्था, भागीदारी संस्था,कंपनी किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली प्रस्थापित कोणताही इतर निगम निकाय;

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत केलेली किंवा नोंदणीकृत करावयासाठी मानण्यात येणारी सहकारी संस्था;

४) राज्य शासन किंवा केंद्र सरकार, स्थानिक प्राधिकरण आणि

५) सार्वजनिक विश्वस्त मंडळाच्या नोंदणीसाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली नोंदणीकृत केलेले असे विश्वस्त मंडळ.

**ब) अज्ञान किंवा मनोविकाल व्यक्तींची पात्रता (उपविधी १७ ब) :**

मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/ मालमत्तेतील वारसाप्राप्त भाग आणि/ किंवा हितसंबंध त्याच्या अज्ञान वा मनोविकाल वारसदाराने अथवा त्याच्या पालकांमार्फत वा कायदेशीर प्रतिनिधीमार्फत अथवा नामनिर्देशित व्यक्तीमार्फत विहित नमुन्यांत अर्ज व त्यात नमूद केल्यानुसार विहित नमुन्यातील हमीपत्र अधिकथन (Undertaking/ Declaration) दिल्यास तो वारसदार संस्थेच्या सदस्य वर्गात दाखल होण्यास पात्र होऊ शकते.

**क) कंपनी कायद्याखाली नोंदलेली संस्था, भागीदारीपेढी इत्यादींची संस्थेच्या सदस्यत्वासाठी पात्रता (उपविधी क्र. १८):**

भारतीय भागीदारी अधिनियम १९३२ खालील नोंदणीकृत भागीदारी संस्था, कंपनी अधिनियम १९४९ खालील नोंदणीकृत कंपनी, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदलेली भारतीयसंस्था किंवा महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० खाली नोंदलेली सहकारी संस्था, स्थानिक प्राधिकरण/ राज्य/ केंद्र शासन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २२ (१) (ब), (क), (ड), (इ) आणि (फ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सार्वजनिक विश्वस्त मंडळ, किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली नोंदली गेलेली निगम-निकाय संस्थेचे सदस्यत्व म्हणून दाखल करून घेण्यास

पात्र होतात. तथापि भागीदारी संस्था व कंपन्या यांना सदस्य म्हणून दाखल करून घेता येते व त्यांनी सदनिका धारण करणे याबाबत शासनाने अधिनियमाच्या कलम २२ मधील दुसऱ्या परंतुका अन्वये वेळोवेळी काढलेल्या अधिसूचनांद्वारे नियमन केले जाते.

**९. सदस्यत्वासाठी शर्ती (Conditions for Membership) :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सदस्यत्वासाठीच्या शर्ती ह्या उपविधी क्र. १९ (अ), (ब), (क) आणि २० मध्ये दिलेल्या आहेत. त्या शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

**अ) संस्थेचे सदस्य होण्यासाठी व्यक्तींनी पूर्ण करावयाच्याशर्ती (उपविधी १९ अ) :**

सदस्य होण्यास पात्र असलेल्या व विहित नमुन्यात सदस्यत्वासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीस खालील शर्तींची पूर्तता केल्यास समितीकडून तिला सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात येते.

१) सदस्यत्वासाठी करावयाच्या अर्जासोबत कमीत कमी १० भागांची रक्कम पुर्णपणे भरली पाहिजे.

२) सभासदत्वासाठी विहित अर्जासोबत रुपये १००/- प्रवेश फी भरली पाहिजे.

३) संस्थेच्या कार्यकारी क्षेत्रामध्ये अन्यत्र कोठेही त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचे मालकीचे घर, भूखंड अथवा सदनिका असल्यास त्या बाबतचा तपशील विहित नमुन्यातील अर्जात व प्रतिज्ञापत्रात त्याने दिलेला आहे.

४) ज्या कारणासाठी सदनिका खरेदी केली आहे त्याच कारणासाठी ती वापरण्यात येईल.

५) स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नसेल तर, त्याने त्याबाबत नमुन्यात हमीपत्र सादर केले आहे.

६) संस्थेच्या सदस्यत्वासाठी त्याने सादर केलेल्या अर्जासोबत त्याने महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत अधिनियम यांच्या कलम ४ अन्वये प्रवर्तका (बांधकाम व्यावसायी) बरोबर किंवा हस्तांतरकाबरोबर केलेल्या करारपत्राचे योग्य मुद्रांक शुल्क भरल्याची प्रमाणित प्रत सादर केली आहे.

७) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे विहित नमुन्यात हमीपत्रे, घोषणापत्रे आणि संस्थेच्या उपविधीनुसार आवश्यक असलेली अन्य माहिती सदस्यत्वाच्या अर्जासोबत त्याने सादर केली आहे.

८) सिडको/म्हाडा/एसआरए /एमएमआरडीए या विशिष्ट नियोजन प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्राखाली नोंदविण्यात आलेल्या संस्थांच्या बाबतीत अर्जदार हा संबंधीत कायद्यातील तरतुदीनुसार आणि शासन/ नियोजन प्राधिकरण यांच्या निदेशक तत्त्वाखाली पात्र असला पाहिजे.

**ब) संस्थेचे सहयोगी सदस्य व्हावयासाठी इच्छुक असणाऱ्या व्यक्ती, भागीदारी संस्था, कंपनी किंवा निगम निकाय यांसाठी शर्ती (उपविधी क्र. १९–ब) :**

सहयोगी सदस्य होण्यास पात्र असेलेल्या आणि अशा सदस्यत्वासाठी ज्यांनी १००/– रुपयांच्या प्रवेश फी सह विहित नमुन्यांत सदस्यत्वासाठी अर्ज केलेला आहे अशा व्यक्ती, भागीदारी संस्था, कंपनी किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये नोंदणीकृत निगम निकाय यांना समितीचा सहयोगी सदस्य म्हणून दाखल करून घेता येते.

**क) संस्थेचे सभासद होवू इच्छिणाऱ्या निगम निकाय यानी (कार्पोरेट बॉडीज) पूर्तता करावयाच्या शर्ती (उपविधी क्र. १९–क)**

संस्थेचे सदस्य होण्यास पात्र असलेले, आणि संस्थेच्या सदस्यत्वासाठी ज्यांनी विहित नमुन्यात अर्ज केलेला आहे अशा भागीदारी संस्था, कंपनी किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये नोंदणीकृत अन्य कोणत्याही निगम–निकाय, यांना त्यांनी खाली नमूद केलेल्या शर्ती पूर्ण केल्यावर त्यांना या संस्थेच्या संचालक मंडळ सभेच्या समंतीने सदस्य करून घेता येते. त्यासाठीच्या शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) अर्जदाराने संस्थेच्या सदस्यत्वासाठी केलेल्या अर्जासमवेत महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकाबाबत अधिनियम १९६३ च्या कलम ४ खाली, बांधकाम व्यावसायी किंवा सदनिका हस्तांतरकाबरोबर केलेल्या करारपत्राची यथोचित मुद्रांकित प्रमाणित प्रत व त्या सोबत भागीदारी संस्थांची किंवा यथास्थिती कंपनीची, अर्जावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकार देणाऱ्या ठरावाची प्रत जोडली पाहिजे.

२) सदस्यत्वाच्या अर्जासमवेत अर्जदाराने किमान १० भागपत्रे खरेदी केलेली असावीत तसेच १०० रुपये प्रवेश फी भरलेली असावी.

३) अधिनियमाच्या कलम २२ च्या दुसऱ्या परंतुकाखाली राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचनांत उल्लेखिलेल्या शर्तीचे पालन केलेले आहे.

**ड) संस्थेच्या नाममात्र सदस्यत्वाबाबत शर्ती (उपविधी क्र. २०)**

नाममात्र सदस्य होण्यास पात्र असलेल्या व ज्याने अशा सदस्यत्वासाठी रु. १००/– प्रवेश फी भरून त्यास लागू असलेल्या विहित नमुन्यात आपल्या मूळ सदस्याच्या मार्फत अर्ज केला आहे. अशा पोट भाडेकरूस, परवानाधारकास (Licensee) किंवा काळजी वाहकास (Caretaker) किंवा भोगवटादारास (Occupant) समिती संस्थेचा नाममात्र सदस्य म्हणून दाखल करून घेता येते.

## १०. सदस्यास काढून टाकणे :

संस्थेच्या सदस्यास कोणत्या कारणांच्या आधारे सदस्य वर्गातून काढून टाकले जाऊ शकते ती कारणे उपविधी क्र. ४९ मध्ये दिलेली आहेत. ती कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) सदस्याने संस्थेच्या देणे रकमा सतत चुकत्या करण्यात कसूर केली असेल.

२) सदस्याने संस्थेस खोटी माहिती देऊन जाणूनबुजून फसविले असेल.

३) सदस्याने अनैतिक कामासाठी किंवा बेकायदेशीर कृत्यांसाठी आपल्या सदनिकेचा वापर केला असेल.

४) संस्थेच्या उपविधीतील तरतुदीचा भंग करण्याची त्याला सवय असून समितीच्या मते ती कृत्ये गंभीर स्वरुपाची असतील.

५) संस्थेच्या नोंदणीच्या वेळी नोंदणी प्राधिकाऱ्यास, त्याने खोटी माहिती दिली असेल किंवा महत्त्वाची माहिती देण्यास कसूर केली असेल.

६) जो सदस्य अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात आलेल्या दिनांकापासून पुढील पाच वर्षातील सर्वसाधारण सभेपैकी किमान एकाही सभेस उपस्थित राहिला नसेल.

## ११. सदस्यत्व समाप्त होणे :

सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व उपविधी क्र. ५५, ५६, ५७ आणि ५८ अन्वये खालील बाबींमुळे समाप्त होते.

### अ) व्यक्तीचे संस्थेचे सदस्यत्व (उपविधी क्र.५५) :

एखाद्या व्यक्तीचे संस्थेचे सदस्यत्व खालील परिस्थितीत समाप्त होईल.

१) सदस्याने आपल्या सदस्यत्वाचा दिलेला राजीनाम्याचा समितीने स्वीकार केला असेल.

२) संस्थेच्या भांडवलातील/ मालमत्तेतील सर्व भाग व त्याचे हितसंबंध हस्तांतरित झाले असेल.

३) सदस्याचा मृत्यू झाला असेल.

४) संस्थेच्या सदस्य वर्गातून सदस्यास काढून टाकले असेल.

५) सदस्य म्हणून चालू राहण्यासाठी नादार अगर कायदेशीररित्या नि:समर्थ ठरविला असेल.

६) सदस्याचा ठावठिकाणा सतत सात वर्षे प्राप्त न झाल्यास आणि संस्थेच्या भांडवलातील/ मालमत्तेतील सर्व भाग व त्याचे हितसंबंध या बाबतीत कोणीही दावा केला नसेल.

७) संस्थेच्या मालमत्तेतील सदस्याचे हक्क/मालकी हक्क/ व हितसंबंध कायदेशीररीत्या जप्ती आणून किंवा विक्रीमुळे समाप्त (Cessation) झाले असेल.

**ब) सहयोगी सदस्यत्व (उपविधी क्र. ५६) :**

मूळ सदस्याचे सदस्यत्व समाप्त झाल्यास किंवा सहयोगी सदस्याचा मृत्यू झाल्यास किंवा समितीने सहयोगी सदस्याचा राजीनामा स्वीकारल्यास सहयोगी सदस्य असल्याचे समाप्त होते. तथापि सहयोगी सदस्याने मूळ सदस्याबरोबर संयुक्तरीत्या संस्थेच्या मालमत्तेमध्ये मालकी हक्क व हितसंबंध धारण केला असेल तर मूळ सदस्याचे सदस्यत्व समाप्त झाल्यावर अशा प्रकारे सहयोगी सदस्य असण्याचे समाप्त होणार नाही.

**क) भागीदारी पेढी, कंपनी यांचे वतीने सदनिकेत राहणाऱ्या व्यक्तीचे नाममात्र सदस्यत्व (उपविधी क्र. ५७) :**

भागीदारी पेढी, कंपनी किंवा अन्य कोणताही निगम-निकाय यांच्या वतीने सदनिकेत राहणारा नाममात्र सदस्य असल्यास त्याचे सदस्यत्व खालील परिस्थितीत समाप्त होईल.

१) सदस्याचा मृत्यू झाला असेल.

२) समितीने त्याचा नाममात्र सदस्यत्वाचा राजीनामा स्वीकार केला असेल.

३) ज्यांच्या वतीने तो संस्थेच्या सदनिकेत राहात असेल त्या मूळ सदस्याचे संस्थेचे सदस्यत्व समाप्त झाले असेल.

४) मूळ सदस्यास सदस्यवर्गातून काढून टाकल्यामुळे त्याचे नाममात्र सदस्यत्व समाप्त झाले असेल.

५) मूळ सदस्याकडून भोगवटादाराचे नामनिर्देशन रद्द केल्याची सूचना मिळाली असेल.

**ड) पोटभाडेकरू, परवानेदार काळजीवाहक इ. चे नाममात्र सदस्यत्व (उपविधी क्र. ५८) :**

पोटभाडेकरू, परवानेदार, किंवा काळजीवाहक किंवा कोणत्याही अन्य मार्गाने सदनिकेचा वा त्याच्या भागाचा कब्जेदार असलेला नाममात्र सदस्य खालील परिस्थितीत असा सदस्य होण्याचे समाप्त होईल.

१) सदस्याचा मृत्यू झाला असेल.

२) सदस्याचा राजीनामा समिनीने स्वीकार केला असेल.

३) मूळ सदस्याचे सदस्यत्व समाप्त झाले असेल.

४) सदनिका किंवा त्याचा भाग ज्या कालावधीसाठी पोटभाड्याने किंवा लिव्ह लायसन्स पद्धतीवर किंवा काळजीवाहू तत्त्वार किंवा तऱ्हेने ताब्यात ठेवण्यासाठी परवानगी दिली होती तो कालावधी समाप्त झाल्यानंतर सदस्यत्व समाप्त होते.

## १२. संस्थेची शुल्क-आकारणी (उपविधी क्र. ६५)

आकार-म्हणून निर्दिष्ट केलेल्या संस्थेचा खर्च व तिचा निधी उभारण्यासाठी सदस्यांकडून गोळा करावयाची वर्गणी यात मालमत्ता कर, पाणीपट्टी, सामाईक वीज आकार, दुरुस्ती व देखभाल निधीतील वर्गणी, संस्थेच्या उद्वाहनाची (लिफ्टची) देखभाल व दुरुस्ती आणि उद्ववाहन (लिफ्ट) चालविण्यासाठी येणारा खर्च, कर्जनिवारण (सिकिंग फंडासाठी) वर्गणी, सेवा आकार, पार्किंग आकार (वाहन उभे करण्याच्या जागेचे भाडे), थकविलेल्या पैशावरील व्याज, कर्जाच्या हफ्त्याची परतफेड व व्याज, भोगवटेतर शुल्क, विमा हप्ता, भाडेपट्टी भाडे, कृषीतर कर, शिक्षण व प्रशिक्षण निधी, निवडणूक निधी, आणि कोणतेही अन्य आकार इत्यादी बाबींचा समावेश होतो.

## १३. संस्थेच्या सेवा खर्चाची विभागणी उपविधी क्र. ६५ (७) :

संस्थेच्या सेवा-खर्चात पुढील बाबींचा समावेश होतो.

१) कार्यालयीन कर्मचारी, उद्वाहक (लिफ्टवाला), पहारेकरी, माळी, तसेच इतर अन्य कर्मचारी यांचे वेतन;

२) संस्थेस स्वतंत्र कार्यालय अथवा इमारत असल्यास, त्याबाबत मालमत्ता कर, वीज खर्च, पाणीपट्टी इ.;

३) छपाई, लेखासामग्री व टपाल खर्च;

४) संस्थेचे कर्मचारी व समितीतील सदस्य यांचा प्रवास भत्ता व वाहन खर्च;

५) संस्थेच्या समिती सदस्यांना द्यावयाचे बैठक भत्ते;

६) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित कलम २४ अ शिक्षण निधी पोटी द्यावयाची वर्गणी;

७) गृहनिर्माण संस्था महासंघ (हौसिंग फेडेरेशन) व जिच्याशी संस्था संलग्न आहे अशी अन्य कोणतीही सहकारी संस्था यांची वार्षिक वर्गणी;

८) गृहनिर्माण संस्था महासंघ व अन्य कोणतीही सहकारी संस्था यांच्याशी संलग्न होण्याकरीता द्यावयाची प्रवेश फी;

९) अंतर्गत लेखापरीक्षा फी, सांविधिक लेखापरीक्षा फी, व पुर्नलेखापरीक्षा फी, कोणतीही असल्यास;

१०) सर्वसाधारण सभेच्या तसेच समितीच्या व एखादी उपसमिती असल्यास तिच्या सभांच्या वेळी झालेला खर्च;

११) प्रतिधारण शुल्क, कोर्टकचेरी, कायदेशीर चौकशी या बाबींवरील खर्च;

१२) सामाईक वीज खर्च; आणि

१३) सर्वसदस्य मंडळाने सर्वसाधारण सभेत मान्य केलेल्या इतर खर्चाच्या बाबी. तथापि, असा खर्च संस्था, अधिनियम, नियम उपविधी आणि संस्थेचे पोटनियम यांच्या विरोधाभासात राहणार नाहीत.

## १४. बांधकामाचे लेखापरीक्षण (Structural Audit) (उपविधी क्र.७६ (अ)) :

संस्थेकडून इमारतींचे बांधकाम लेखापरीक्षण खालील प्रमाणे करून घ्यावे.

१) १५ ते ३० वर्षे जुन्या इमारतीसाठी: ५ वर्षातून एकदा

२) ३० वर्षापेक्षा जास्त जुन्या इमारतीसाठी: ३ वर्षातून एकदा

अशा प्रकाराचे बांधकाम लेखापरीक्षण उपविधी क्र. ७६ (ब) अन्वये हे महानगरपालिका हद्दीमध्ये महापालिकेच्या नामिकेतील मान्यताप्राप्त अभियंत्याकडून करून घेतले जाते आणि इतर संस्थांच्या बाबतीत शासनाने मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियंत्याकडून / वास्तुशास्त्रज्ञाकडून करून केले जाते आणि त्याची नोंद ठेवली जाते. त्याचप्रमाणे उपविधी क्र. ७६ (क) नुसार, राज्य शासनाच्या आगप्रतिबंधक धोरणाप्रमाणे संस्था ठराविक कालावधीने आगसुरक्षा परीक्षण (Fire Audit) करते आणि त्याची नोंद ठेवते. व संस्था उद्वाहने/ उद्वाहके यांची नियतकालिक तपासणी करतात आणि त्याची नोंद उपविधी क्र. ७७(ड) नुसार ठेवतात.

## १५. सर्वसाधारण सभा (General Meetings) :

सहकारी गृहनिर्माण संस्थेला तीच्या अगदी स्थापणेपासून वेगवेगळ्या सभेचे आयोजन करणे अत्यंत आवश्यक असते. त्या सभा ह्या पहिली सर्वसाधारण सभा, वार्षिक सभा आणि विशेष सर्वसाधारण सभा अशा असतात. या सभांचे आयोजन हे सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या उपविधी मध्ये नमूद केल्याप्रमाणे होत असते. त्या सभा आणि त्या सभेत करावयाची कामे ही खालीलप्रमाणे आहेत.

**अ)  पहिली सर्वसाधारण सभा (उपविधी क्र. ८५, ८६ आणि ८७) :**

पहिली सर्वसाधारण सभा नियम ५९ खाली तरतूद करण्यात आल्याप्रमाणे संस्थेची नोंदणी करण्यात आल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत घेतली जाते. ठरलेल्या मर्यादित संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा बोलाविण्याची जबाबदारी मुख्य प्रवर्तकाची राहते. पहिली सर्वसाधारण सभा बोलविण्यात मुख्य प्रवर्तकाकडून कसूर झाल्यास नोंदणी अधिकारी ती बोलविण्याची व्यवस्था करतो.

संस्थेचा मुख्य प्रवर्तक किंवा यथास्थिती नोंदणी प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, नोंदणी अर्जावर सह्या करणाऱ्या सर्व प्रवर्तकांना पहिल्या सवर्साधारण सभेसाठी १४ पूर्ण दिवसापूर्वी नोटीस देणे.

**पहिल्या सर्वसाधारण सभेत करावयाची कामे :**

पहिल्या सर्वसाधारण सभेत उपविधी क्र. ८८ (अ) अन्वये, संस्थेने खाली नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१. सभेसाठी अध्यक्षाची निवड करणे.

२. प्रवर्तकांव्यतिरिक्त ज्यांनी संस्थेच्या सदस्यत्वासाठी अर्ज केले आहेत अशा नवीन सदस्यांना दाखल करून घेणे.

३. संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाने, पहिल्या सर्वसाधारण सभेच्या दिनांकापूर्वी १४ दिवसांपर्यंतच्या कालावधीसाठी म्हणजे नोटिशीच्या दिनांकास असल्याप्रमाणे तयार केलेल्या लेख्यांचे विवरणपत्र स्वीकारणे व त्यास मंजुरी देणे.

४. संस्थेच्या उपविधीअधीन संस्थेची नियमित निवडणूक होईपर्यंतच्या कालावधीसाठी हंगामी समिती स्थापन करणे. समितीस अधिनियम, नियम व उपविधी यांनुसार निवडण्यात आलेल्या समितीस आलेल्या समितीस जे अधिकार व कार्याधिकार असतील तेच सर्व अधिकार व कार्याधिकार राहतील.

५. बाहेरून उभारावयाच्या निधीची निश्चित करणे.

६. मुख्य प्रवर्तकाकडून (बांधकाम व्यावसायी) संस्थेच्या नांवे मालमत्तेतील हक्क, मालकी हक्क व हितसंबंध हस्तांतरित करून घेण्याकरीता समितीकडे अधिकार सुपूर्द करणे.

७. गरज असल्यास त्या वर्षाकरिता अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्याच पारिश्रमिक ठरविणे.

८. हंगामी समितीच्या कोणत्याही एका सदस्यास हंगामी समितीची पहिली सभा बोलविण्याचे अधिकार देणे.

९. जिल्ह्याच्या असलेल्या गृहनिर्माण संघाचा व उपविधी क्र.६ मध्ये नमूद केलेल्या इतर संस्थांच्या सदस्य म्हणून संलग्न होण्याबद्दल विचार करणे.

१०. जे विषय कार्यक्रम पत्रिकेवर घेण्यासाठी योग्य नोटीस देणे आवश्यक आहे ते खेरीज करून अध्यक्षांचे परवानगीने अन्य कोणतेही विषय सभेसमोर ठेवणे.

(खालील तरतुदी वरील १ ते १० तरतुदिंसह सदनिका (प्लॉट) धारकास संस्थांना लागू राहतील.)

११. बांधकाम प्रकल्पाच्या अंतिम योजनेच्या आर्थिक व प्रत्यक्ष विविध बाजूच्या संदर्भात किती बांधकाम झाले आणि किती व्हावयाचे आहे यासंबंधात आढावा घेणे आणि सोसायटीच्या मुख्य प्रवर्तकाचा अहवाल मंजूर करणे.

१२. संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाने विक्रेत्या बरोबर संस्थेसाठी भूखंड / इमारत खरेदी करण्याबाबत केलेल्या कराराला मान्यता देणे.

१३. बांधकामाच्या जागेचे नियोजन आणि बांधकामाची योजना मंजूर करणे.

१४. संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाने, वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती केलेल्या त्या नियुक्तीला मान्यता देणे किंवा अशी नियुक्ती झालेली नसेल तर वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती करणे किंवा अगोदर नियुक्त करण्यात आलेल्या वास्तुशास्त्रज्ञाच्या जागी नवीन वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती करणे.

**ब) वार्षिक सर्वसाधारण सभा उपविधी क्र. ९४ (अ), (ब) :**

**वार्षिक सर्वसाधारण सभा भरविणे :**

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दर वर्षी ३० सप्टेंबर रोजी किंवा तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७५ (१) खाली तरतूद केल्याप्रमाणे भरवली पाहिजे. वार्षिक सर्वसाधारण सभा भरवण्यासाठी मुदतवाढ देणेची तरतूद नाही. जर ठरवलेल्य मुदतीत वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यात कसूर करण्यात आली तर अधिनियमाच्या कलम ७५ (५) खाली, तरतूद करण्यात आल्याप्रमाणे ती निरर्ह ठरविण्यात येईल व कारवाई होऊ शकते.

**संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करावयाची कामे :**

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपविधी क्र. ९५ अन्वये खालील कामे केली जातात.

१. मागील वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या व विशेष सर्वसाधारण सभा भरली असल्यास तिच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद करणे.

२. समितीकडून मागील सहकारी वर्षाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल, तसेच नियम ६२(१) अन्वये विहित केलेल्या एन नमुन्यांत तयार केलेले मागील सहकारी वर्षाचे उत्पन्न खर्चाचे व मागील सहकारी वर्षाच्या अखेरच्या दिवशीचा ताळेबंद दर्शविणारे हिशेबपत्रक स्वीकारणे.

३. अधिनियमातील कलम ७५(२) (अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाकडून मागील सहकारी वर्षाचा लेखापरीक्षा अहवाल विचारात घेणे.

४. समितीकडून दुरुस्ती अहवाल स्वीकारणे व त्यावर कारवाई करणे.

५. पुढील आर्थिक वर्षासाठी विचारार्थ म्हणून वार्षिक अर्थसंकल्प सभेसमोर ठेवणे.

६. चालू वर्षाची वैधानिक लेखापरीक्षा करून घेण्यासाठी राज्यशासनाने मान्यता दिलेल्या अधिकृत यादीमधील लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.

७. कलम ७५(२) खाली विहित वार्षिक अहवाल समितीकडून स्वीकारणे.

८. सहकार अधिनियम, नियम आणि संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी, सहमती आवश्यक असलेली अन्य कोणतेही विषय विशेषकरून निर्णय घेण्याची आवश्यकता असलेली प्रकरणे सभेसमोर ठेवणे.

९. नोंदणी प्राधिकारी, वैधानिक लेखापरीक्षक, शासन, जिल्हाधिकारी, स्थानिक प्राधिकरण किंवा कोणताही अन्य सक्षम प्राधिकारी यांचकडून आलेल्या महत्त्वाच्या पत्रव्यवहारांवर विचार करणे.

१०. निवडणुकीची योग्य वेळ नजीक आल्यावर त्या घोषित करणे व पार पाडणे.

११. नियमित कार्यसूची समाप्त झाल्यानंतर ज्या विषयांना ठराविक मुदतीची नोटीस देणे गरजेचे असते, असे विषय सोडून अधिनियम, नियम व उपविधी यांच्या तरतुदीअधीन परवानगी दिलेली आहे असे विषय अध्यक्षांच्या परवानगीने सभेसमोर मांडणे.

**क) विशेष सर्वसाधारण सभा (उपविधी क्र. ९६) :**

अध्यक्षांच्या परवानगीने किंवा समिती सदस्यांच्या मताधिक्याने संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा केव्हांही बोलविता येईल. अशी सभा संस्थेच्या किमान एक पंचमांश सदस्यांनी स्वाक्षऱ्या केलेले लेखी मागणी पत्र किंवा ती संस्था ज्या जिल्हा सहकारी महासंघास संलग्न आहे, त्या जिल्हा सहकारी महासंघाकडून तशी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत बोलाविली पाहिजे. अशा प्रकारे बोलाविण्यात आलेल्या सभेमध्ये मागणी करण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी तारीख, वेळ व ठिकाण निश्चित करण्यासाठी काढण्यात आलेल्या नोटिशीत नमूद करण्यांत आलेल्या विषयांव्यतिरिक्त कोणताही विषय चर्चेस घेण्यात येणार नाही.

## १६. संस्थेच्या कामकाजाचे व्यवस्थापन :

गृहनिर्माण संस्थेचे व्यवस्थापन हे उपविधी क्र. ११०, १११, ११२ आणि ११३ नुसार चालते.

**संस्थेचे अंतिम प्राधिकार सर्वसाधारण सभेकडे अधिकार :**

अधिनियम, नियमावली व संस्थेचे उपविधी यातील तरतुदींच्या अधिनतेने, या उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा पद्धतीने बोलविण्यांत आलेल्या सर्वसाधारण सभेकडे संस्थेचे अंतिम प्राधिकार राहतील.

**संस्थेच्या व्यवस्थापनाचा अधिकार समितीकडे असणे :**

संस्थेच्या कारभाराच्या व्यवस्थापनाचा अधिकार हा अधिनियम, नियमावली व संस्थेचे उपविधी यातील तरतुदीनुसार रीतसर रचना केलेल्या समितीकडे राहील. (उपविधी क्र.१११)

**समितीने अधिकारांचा वापर करणे :**

संस्थेच्या सर्वसाधारण सभेने दिलेल्या निदेशानुसार अथवा तिने तयार केलेल्या विनिमयानुसार समिती उपविधी क्र. १३८ द्वारे तिला स्पष्टपणे दिलेले सर्व अधिकार वापरील व त्याद्वारे व उपविधीद्वारे तिच्यावर सोपविण्यांत आलेली सर्व कार्ये पार पाडील.

**बँकेत खाते उघडणे :**

बँक व्यवहारासाठी बँक खाते संस्थेने जवळच्या राज्य अगर मागील सलग तीन वर्ष अ लेखापरीक्षा श्रेणी मिळालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अथवा त्यांच्या शाखामध्ये अथवा राष्ट्रीयकृत बँकेत आणि अधिनियमातील कलम ७० खाली तरतूद केल्याप्रमाणे शासनाने सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे, मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही पद्धतीने उघडले पाहिजे आणि या खात्याचे भरणा करणे आणि पैसे काढणे ह्याबाबतचे सर्व व्यवहार सचिव आणि अध्यक्ष अथवा कोषाध्यक्ष यांच्या संयुक्त सह्यांनी झाले पाहिजेत.

**समितीतील सदस्यांची संख्या :**

उपविधी क्र. ११४ मध्ये, समितीतील सदस्यांची संस्था ११/१३/१५/१७ आणि १९ अशा प्रकारे असेल व या संस्येमध्ये अधिनियमातील कलम ७३ ब व ७३ क अन्वये तरतूद केल्याप्रमाणे आरक्षित सदस्य संस्येचा समावेश असेल.

## व्यवस्थान समितीतील सदस्यांची संख्या

| संस्थेच्या सदस्यांची संख्या | सर्वसाधारण | राखीव जागा | | | | एकूण | समितीच्या सभेकरिता गणपूर्ती संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | अ.जा. /अ.ज. | ई.मा.व. | वि.जा./ भ.ज./ वि.मा.प्र. | | |
| १०० सदस्यापर्यंत | ६ | २ | १ | १ | १ | ११ | ६ |
| १०१ ते २०० | ८ | २ | १ | १ | १ | १३ | ७ |
| २०१ ते ३०० | १० | २ | १ | १ | १ | १३ | ७ |
| ३०१ ते ५०० | १२ | २ | १ | १ | १ | १७ | ९ |
| ५०१ आणि अधिक | १४ | २ | १ | १ | १ | १९ | १० |

(संदर्भ : सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी आदर्श उपविधी (टेनंट को- पार्टनरशिप हाउसिंग सोसायटी) ९७ वी घटना दुरुस्ती आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम (दुरुस्ती) अध्यादेश २०१३.)

समितीतील सदस्यांची संख्या आणि सभा घेण्यासाठी आवश्यक गणपूर्ती वरीलप्रमाणे आवश्यक असते. तसेच गणपूर्तीसाठी विद्यमान समिती सदस्यांचे सरळ बहुमत आवश्यक असेल.

**समितीचे सदस्यत्व समाप्त होणे (पोटविधी क्र. ११९ अ) :**

समितीवरील कोणात्याही व्यक्तीचे समिती सदस्यस्त्व पोटविधी क्र. १९९ (अ) नुसार खालील कारणास्तव समाप्त होते.

१. समिती सदस्याने उपविधी क्र. ११७ मध्ये उल्लेखलेल्यापैकी कोणतेही निरर्हता धारण केली असेल तर;

२. सदस्याने परवानगी न घेता, समितीच्या सलग ३ मासिक सभांना गैरहजर राहिला असेल तर त्याचे सदस्यत्व समाप्त होते.

**समितीवरील सदस्यत्व समाप्त झालेली सूचना (पोटविधी क्र ११७ ब) :**

समितीच्या कोणत्याही सदस्याने उपविधी क्र.११९ (अ) (१) मधील निरर्हतेपैकी कोणतीही निरर्हता धारण केल्यास समिती सदर बाबींची तिच्या इतिवृत्तांत नोंद घेईल व संस्थेचा सचिव समितीच्या संबंधीत सदस्यास आणि मा. निबंधकास तसे कळवील. निबंधकाच्या आदेशा नंतर अशा सदस्याचे सदस्यत्व समाप्त होईल.

**समितीने घ्यावयाच्या सभांची संख्या पोटविधी क्र. १२७ (अ) (ब) :**

समितीची सभा आवश्यक असेल तर पोटविधी क्र. १२७ (अ) नुसार घेता येते. परंतु महिन्यांतून ती किमान एकदा घेतलीच पाहिजे. तसेच पोटविधी क्र. १२७ (ब) अन्वये,आणीबाणीचे प्रसंगी समिती ठराव मांडेल व तो समिती सदस्यांकडून पारित करून घेईल. तथापि असा पारित झालेला ठराव लगतनंतर होणाऱ्या समितीच्या सभेत ठेवला पाहिजे.

**समितीच्या सदस्यांची जबाबदारी (पोटविधी क्र. १३७) :**

संस्थेच्या कामकाजासंबंधात समितीच्या सदस्यांनी त्यांच्या मुदतीत घेतलेल्या निर्णयासाठी ते संयुक्तपणे व पृथकपणे (Jointly & Severally) जबाबदार असतील. समितीचे सदस्य त्यांच्या कृतीमुळे संस्थेला जी हानी सोसावी लागेल त्यासाठी संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार राहतील.

**समितीचे अधिकार, कर्तव्ये व कामकाज :**

उपविधी क्र. १३८ नुसार, उपविधी क्र. ११२ स अधीन राहून समिती आपल्या अधिकारांचा वापर करील आणि खाली नमूद केल्याप्रमाणे आपले कामकाज व कर्तव्ये पार पाडतील.

१. सदस्यांकडून अनामत रक्कम स्वीकारण्याबाबत आणि निधी उभारण्याबाबत विचार करणे.

२. सर्वसाधारण सभेला वर्गणीचे दर ठरवून त्यांची शिफारस करण्याबद्दल विचार करणे.

३. गुंतवणूक आणि दुरुस्ती व देखभाल निधी, तसेच राखीव आणि कर्जनिवारण निधी उभारणे, गुंतवणे व उपयोजित करणे या सर्व बाबीसंबंधात विचार करणे.

४. सदस्य, सहयोगी सदस्य आणि नाममात्र सदस्य यांचकडून आलेल्या राजीनाम्यांबाबत विचार करणे आणि निर्णय घेणे.

५. समितीच्या इतिवृत्तात नामनिर्देशन सादर करणे आणि ती मागे घेणे या बाबतच्या माहितीची नोंद होते याची खातरजमा करणे.

६. सदनिकांची तपासणी केल्यावर सचिवाच्या अहवालावर कारवाई करणे.

७. सहयोगी आणि नाममात्र सदस्यत्वासह सदस्यत्व समाप्त झाल्यास प्रकरणांवर कारवाई करणे.

८. विविध कारणांसाठी संस्थेकडे आलेल्या अर्जांचा विचार करणे आणि त्यावर कारवाई करणे.

९. ज्या प्रकरणी संस्थेने भांडवल/मालमत्ता यांमधील भाग आणि व्याज संस्थेने संपादन केले आहेत, ते भाग आणि व्याज यांचा परतावा करण्याबाबत कारवाई करणे.

१०. सदनिकांच्या वाणिज्यिक उपयोगासंबंधात विम्याचा हप्ता ठरविणे.

११. उपविधी क्र. ६७ (अ) खाली निर्धारित केलेल्या प्रमाणाच्या आधारे प्रत्येक सदनिकेबाबत संस्थेचे दर ठरविणे.

१२. सदस्यांकडून संस्थेला येणे असलेली थकबाकी वसूल करण्याच्या परिस्थितीचा आणि संस्थेची थकबाकी वसूल करण्यासाठी करावयाच्या कारवाईची आढावा घेणे.

१३. संस्थेच्या थकबाकीवर व्याज आकारण्याबाबत तरतुदी केल्या आहेत, त्याची खातरजमा करून घेणे.

१४. समितीच्या एका सदस्याला, ज्यावर संस्थेचा शिक्का उमटविलेला आहे, असे अभिहस्तांतरण पत्र, भागपत्र किंवा अन्य कोणताही दस्तऐवज यांवर साक्षांकन करण्यासाठी प्राधिकृत करणे.

१५. प्रवर्तकाकडून (बांधकाम व्यावसायीकडून) ज्यांनी सदनिका खरेदी केल्या आहेत, त्यांना सदनिकांचे वाटप करण्यात झाल्याबद्दलचे पत्र देणे.

१६. सदस्यांनी मागणी केल्यास त्यांच्या अवलोकनासाठी संस्थेचा दस्तऐवज उपलब्ध करणे.

१७. सर्वसाधारण सभेच्या प्रत्येक वार्षिक सभेसमोर विषय पत्रिका ठेवली जाईल याची खातरजमा करणे.

१८. सर्वसाधारण सभेच्या वार्षिक सभेसमोर चर्चिले जाणारे सर्व विषय बैठकीच्या विषय पत्रिकेवर ठेवले जातील याची खबरदारी घेणे.

१९. आवश्यकता असेल तेव्हा सर्वसाधारण सभेची विशेष सभा बोलविणे.

२०. विद्यमान समितीची मुदत संपण्याअगोदर नवीन कार्यकारी समिती निवडण्यासाठी निवडणूक घेणे.

२१. निवडणुकीनंतर नवीन समिती योग्य प्रकारे स्थापन झाली आहे याची खातरजमा करून घेणे.

२२. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करणे.

२३. प्रत्येक महिन्यात समितीची एक सभा घेतली जाईल याची खातरजमा करणे.

२४. समितीवरील रिक्त झालेल्या जागा भरणे.

२५. समितीच्या एखाद्या सदस्याच्या राजीनाम्याचा विचार करणे.

२६. समितीच्या एखाद्या पदाधिकाऱ्याच्या राजीनामा स्वीकृत करण्याचा विचार करणे.

२७. संस्थेच्या पगारी सेवकांकडून तारण घेणे.

२८. वैधानिक आणि अंतर्गत लेखापरीक्षांचे लेखापरीक्षा दुरुस्ती अहवालांस मंजुरी देणे आणि ते संबंधीत प्राधिकरणाकडे अग्रेषित करणे.

२९. इमारत/ इमारतींचे तसेच त्या इमारती ज्या भूखंडावर उभ्या आहेत, त्या भूखंडाचे आणि इमारतींचे अभिहस्तांतरण पत्र निष्पादित करणे.

३०. संस्थेची मालमत्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आणि इमारतीची दुरुस्ती, नूतनीकरण करणे.

३१. संस्थेच्या मालमत्तेचा विमा उतरविणे.

३२. उपविधींचा भंग झाल्यास त्यासाठी करावयाच्या दंडाचा दर सर्वसाधारण सभेत सुचविणे आणि कारणे दाखवा नोटीसा जारी करणे.

३३. संस्थेच्या उद्वाहनाची कार्यप्रणाली विनियमित करणे.

३४. संस्थेच्या आवारात कोणकोणते खेळ खेळण्यास परवानगी दिली जावी याबाबतची सूचना सर्वसाधारण सभेस देणे.

३५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि संस्थेचे उपविधी (जे वर निर्देशित केलेले नाहीत) याखालील बाबींचा विचार करणे व त्यावर निर्णय घेणे.

३६. संस्थेच्या आवारातील वाहने ठेवण्याच्या जागा नियमित करणे.

३७. सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या जिल्हा महासंघाशी संस्था संलग्न आहेत आणि त्या महासंघाची वर्गणी नियमितपणे भरली जात आहे याची खातरजमा करणे.

३८. संस्थेकडे आलेल्या तक्रार अर्जावर कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घेणे आणि जो निर्णय संबंधीत सदस्यांना कळविणे.

३९. संस्थेच्या वास्तुविशारदा बरोबर करार करणे.

४०. बांधकामासाठी आलेल्या निविदांची छाननी करणे आणि त्या निविदा समितीच्या अहवालासोबत सर्वसाधारण सभेत बैठकीला सादर करणे आणि कंत्राटदाराबरोबर करार करणे.

## १७. पदाधिकाऱ्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या :

सहकारी गृहनिर्माण संस्थेत वेगवेगळे अधिकारी तसेच पदाधिकारी कार्यरत असतात. व या अधिकाऱ्यांना उपविधीनुसार अधिकार प्राप्त झालेले असतात. त्याला अनुसरून हे अधिकारी आपले कामकाज करत असतात. यातील महत्त्वाचे अधिकारी म्हणजे अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार हे होय. यांचे अधिकार आणि कामे खालीलप्रमाणे आहेत.

**अध्यक्ष :**

सहकारी संस्थेच्या अध्यक्षांस व्यापक स्वरूपाचे अधिकार असतात. कारण तो गृहसंस्थेचा प्रमुख शासक, किंवा चीफ एक्झिक्युटिव्हच असतो. जेव्हा संस्थेच्या दैनंदिन कारभारामध्ये जेव्हा धोरणात्मक स्वरूपाचे समस्या किंवा प्रश्न उद्‌भवतात, तेव्हा तातडीचे निर्णय घेण्याची जबाबदारी हि अध्यक्षांवर येते. तसेच तो संस्थेच्या सर्व सभेचे अध्यक्ष पद भूषवित असतो. त्यामुळे अध्यक्षास सभेचा अध्यक्ष या नात्याने त्यास अनेक अधिकार असतात. तसेच त्याला संस्थेच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करावे लागते. जेव्हा पदसिद्ध अध्यक्ष सभेस अनुपस्थित असतो, त्यावेळी उपस्थित सदस्यांपैकी एक सभासद त्या सभेचा अध्यक्ष म्हणून निवडला जातो. सभेच्या अध्यक्षांना सभेच्या वेळी जे अधिकार असतात. ते खालील प्रमाणे आहेत.

१) सभेच्या कामाजावर नियंत्रण ठेवणे.

२) सर्व सभासदांना विचार मांडण्याची संधी देणे; व त्याचे संरक्षण देणे.

३) विषय सोडून चाललेल्या चर्चेला बंदी करणे.

४) शांततेने सभेचे काम चालणे अशक्य वाटल्यास सभा तहकूब करणे.

५) तातडीच्या प्रश्नावर निर्णय देणे/ मात्र तो तर्कशुद्ध व न्यायी असावा.

६) सभेच्या चर्चेत नि:पक्षपातीपणे भाग घेणे.

७) सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील नियम ६०(३) नुसार सभेच्या अध्यक्षांना जादा मत देण्याचा अधिकार आहे. हे मत सभासद या नात्याने दिलेला मतापेक्षा अतिरिक्त म्हणजे निर्णायक मत असते.

८) मतदानाचा निकाल जाहीर करणे.

९) अनधिकृत व्यक्तींना सभेस उपस्थित राहू न देणे, आणि

१०) सभेची कार्यपद्धती ठरविणे.

**सचिव :**

गृहनिर्माण संस्थांच्या व्यवस्थापक समितीमधून सचिवाची निवड केली जाते. सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये व्यवस्थापक आणि सचिव हे दोन वेगवेगळी पदे नसतात. त्यामुळे सचिव हाच व्यवस्थापक म्हणून कार्य करीत असतो. तसेच तो मानद (ऑनररी सेक्रेटरी) असतो, त्यामुळे त्याचे स्थान अत्यंत महत्वाचे असते. त्याचप्रमाणे सचिव हा व्यवस्थापक समितीचा सदस्य या नात्याने तो संस्थेचे धोरणही ठरवू शकतो. सचिवाने कोण-कोणती कामे करावीत हे उपविधी क्र. १४० मध्ये नमूद केले आहे. ती कामे खालील प्रमाणे आहेत.

१) विहित कालावधीत आणि विहित पद्धतीनुसार सदस्यांना भागपत्रे देणे.

२) सहयोगी सदस्य,नाममात्र सदस्य यांसह सदस्यांच्या राजीनाम्याबाबत कार्यवाही करणे.

३) नामनिर्देशन नोंदवहीमध्ये नामनिर्देशने आणि ती मागे घेतल्याबाद्दलची नोंद करणे.

४) संस्थेच्या मालमत्तेची तपासणी करणे.

५) सदनिकांमध्ये करावयाच्या दुरुस्ती संदर्भात नोटीस पाठवणे.

६) सदस्यांच्या हकालपट्टी बाबतची प्रकरणे हाताळणे.

७) सहयोगी व नाममात्र सदस्यत्वासहीत सदस्यत्व समाप्त झाल्याची प्रकरणे हाताळणे.

८) विविध कारणांसाठी संस्थेकडे आलेल्या अर्जांवर कार्यवाही करणे.

९) संस्थेची देयके देण्याबाबत मागणी नोटीसा / बिले तयार करणे आणि पाठविणे.

१०) समितीच्या निदर्शनास आलेली संस्थेची थकबाकी प्रकरणे हाताळणे.

११) सदनिकांचे वाटप करण्याचे पत्र देणे.

१२) सर्वसाधारण सभेच्या सर्व सभांच्या नोटीसा आणि विषयपत्रिका पाठविणे.

१३) सर्वसाधारण सभेच्या सर्व सभांच्या इतिवृत्ताची नोंद ठेवणे.

१४) नव्याने स्थापन झालेल्या समितीची पहिली सभा बोलविणे.

१५) समितीच्या सर्व सभांच्या नोटीसा पाठविणे.

१६) समितीच्या सभांना उपस्थित राहणे आणि त्यांचे इतिवृत नोंदणे.

१७) समितीने अन्यथा निर्णय नसेल ते खेरीज करून गेल्यास हिशेबाची पुस्तके, नोंदवही आणि अन्य अभिलेख पाहणे.

१८) आवश्यक त्या पद्धतीत संस्थेचे हिशेब अंतिम स्वरुपात तयार करणे.

१९) अध्यक्षांच्या मान्यतेने संस्थेच्या संबंधीत कामासंदर्भात निरनिराळ्या प्राधिकरणाकडे संस्थेचा अभिलेख सादर करणे.

२०) वैधानिक आणि अंतर्गत लेखापरीक्षकांकडून आलेल्या लेखापरीक्षा ज्ञापना संदर्भात दुरुस्ती करून लेखापरीक्षण अहवाल तयार करणे.

२१) सदस्यांकडून झालेल्या उपविधी भंगांची प्रकरणे आणि त्यामुळे त्यांना भरावयाच्या दंडाची प्रकरणे समितीच्या सूचनांप्रमाणे संबंधित सदस्यांच्या नजरेस आणणे.

२२) जेथे त्यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही, अशा सर्वसाधारण सभेच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि उपविधी याखालील जबाबदाऱ्या पार पाडणे.

२३) आगामी सभेसमोर वस्तुस्थितीसह तक्रार अर्ज ठेवणे.

२४) संस्थेच्या सेवकांवर/ कर्मचाऱ्यांवर देखरेख ठेवणे व त्यांना कामाच्या बाबतीती मार्गदर्शन करणे.

२५) संस्थेच्या विकासकामासाठी व संस्थेचे व्यवहार चोख तसेच पारदर्शक राहतील, यासाठी प्रयत्न करणे.

२६) संस्थेचा संपर्क अधिकारी (पी.आर.ओ.) म्हणून काम करणे.

**खजिनदार :**

भविष्यकाळात होणारे आर्थिक व्यवहार नियंत्रण ठेवणे हे अतिशय महत्वाची जबाबदारी हि खजिनदार वरती असते. तसेच संस्थेच्ये जे व्यवहार होत असतात त्या व्यवहाराच्या नोंदी वेगवेगळ्या हिशोबाची पुस्तके म्हणजे नोंदवह्या ठेवाव्या लागतात त्या सहकारी कायदा, नियम आणि संस्थेचे उपविधी याला अनुसरून ठेवल्या पाहिजेत. कारण अशा प्रकारच्या नोंदवह्या नियमितपणे लिहून ठेवणे हे कोणत्याही गृहनिर्माण संस्थेत महत्वाचे काम समजले जाते. परंतु उपविधींच्या पुस्तिकेत गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष, समिती व सचिव यांचे अधिकार व कर्तव्ये दिली आहेत. परंतु खजिनदार, जो संस्थेची आर्थिक बाजू सांभाळतो, त्याचे कामे व जबाबदारी विहित केलेली नाही.

## १८. लेखापुस्तके व नोंदवह्या ठेवणे (उपविधी क्र.१४१) :

गृहनिर्माण संस्थेस पुढील लेखापुस्तके, अभेलेख व नोंदवह्या ठेवाव्या लागतात.

- महाराष्ट्र सहकारी संस्था नियमावलीत नियम ३२ अन्वये विहित केलेले आय नमुन्यातील सदस्य नोंदवही.

- महाराष्ट्र सहकारी संस्था नियमावलीतील नियम ३३ अन्वये विहित केलेली ''जे'' नमुन्यातील सदस्यांची यादी.
- रोकड वही, सर्वसाधारण खतावणी, वैयक्तिक खतावणी, मालमत्ता नोंदपुस्तक, कर्जनिवारण निधी नोंदपुस्तक, गुंतवणूक नोंदवही, नामनिर्देशन नोंदवही, संस्था/सदस्य कर्ज नोंदवही/ गहाण ठेवल्यासंबंधी नोंदवही
- महाराष्ट्र सहकारी संस्था नियमावली १९६१ अन्वये विहित केलेली ''ओ'' नमुन्यातील लेखापरीक्षा दुरुस्ती नोंदवही.
- समिती सभांचे इतिवृत, आणि संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत
- फर्निचर, पक्के खिळववलेले सामान व कार्यालयीन सामग्री यांची नोंदवही
- संरचनात्मक (Structural Audit) आणि आग प्रतिबंधक लेखापरीक्षण (फायर ऑडिट) नोंदवही
- नाममात्र सदस्यांची नोंदवही (टेनंट ऑक्युपंट), क्रियाशील सदस्य नोंदवही

उपविधी क्र. १४२ नुसार गृहनिर्माण संस्थेला पुढील काही स्वतंत्र फाईल्स ठेवाव्या लागतात.

१. सदस्यात्वासाठीचे अर्ज; नाममात्र सहयोगी सदस्यात्वासाठीचे अर्ज; सदस्य, सहयोगी सदस्य व नाममात्र सदस्य यांची राजीनामापत्रे; संस्थेच्या सदस्यत्व काढून टाकल्याची प्रकरणे; नामनिर्देशन पत्रे व ती नामनिर्देशने रद्द करण्यासंबंधीची पत्रे; आणि प्रत्येक सदस्याबरोबरच्या पत्रव्यवहाराची स्वतंत्र फाईल;

२. संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व/ किंवा हितसंबंध हस्तांतरित कार्यासंबंधीचे अर्ज;

३. सहकारी निबंधाकाबरोबर झालेला पत्रव्यवहार; बिगरशेती करारासह मालमत्ता कराराबाबततचा पत्रव्यवहार; सामाईक विज वितराणा बाबतचा पत्रव्यवहार; मालमत्तेच्या अभिह्स्तांतरणाबाबतच्या प्रकरणावरील पत्रव्यवहार; सर्व प्रकारचे करार व त्याच्याशी संबंधीत कागदपत्रे;

४. बांधकामबाबतच्या मंजूर योजना व त्याच्याशी संबंधीत कागदपत्रे; वाहने उभी करण्याच्या जागेचे वाटप करण्यासाठी अर्ज; सामाईक जागेत वाहने उभी करण्यासाठी जागेचे वाटप मिळण्यासाठी आलेले अर्ज;

५. ज्या ज्या तारखांना बँकात रकमांचा भरणा केला असेल त्या क्रमाने लावलेल्या चलनांच्या स्थळप्रती; देनादेश दिलेल्या स्थळप्रती;

६. भागपत्रांच्या नकला मिळविण्यासाठी आलेले अर्ज; संस्थेचा नोंदणी अर्ज, उपविधी त्यात झालेल्या दुरुस्त्यांसह प्रत; नोंदणी प्रमाणपत्र;

७. संस्थेन दिलेल्या पावत्यांच्या स्थळप्रती किंवा मूळ पावत्यांच्या कार्बन प्रती; संस्थेच्या बिलांच्या आकारणीच्या स्थळप्रती;

८. मिळालेल्या कर्जाबाबतचा व मालमत्ता गहाण ठेवल्याबाबाताचा पत्रव्यवहार;

९. संस्थेने तयार केलेली नियतकालिक हिशोबपत्रके; समितीने संस्थेच्या कामकाजबाबत तयार केलेले वार्षिक अहवाल; सांविधिक लेखा परिक्षकाकडून आलेले लेखापरीक्षा अहवाल व तदनुषंगिक दोष दुरुस्ती अहवाल; अंतर्गत लेखापरिक्षकांकडून आलेले अहवाल व तदनुषंगिक दोष दुरुस्ती अहवाल;

१०. समितीच्या निवडणुकीबाबतचे कागदपत्रे;

११. सदस्यांकडून आलेल्या तक्रारी व त्याबाबतचा पत्रव्यवहार.

१२. तसेच वर नमूद केलेल्या विषयाव्यतिरिक्त अन्य विषयांकरीत संस्थेला स्वतंत्र फाईल ठेवाव्या लागतात.

## १९. नफ्याचे विनियोजन :

उपविधी क्र. १४८ (अ) मध्ये संस्थेच्या वैधानिक सांविधिक राखीव निधीत करावयाचे अंशदान आणि शिल्लक नफ्याची वाटणीबाबत तरतुदी दिलेल्या आहेत.

**संस्थेच्या वैधानिक सांविधिक राखीव निधीत करावयाचे अंशदान :**

अ) कोणतीही कर्जे व ठेवी यांवरील व्याजाची तरतूद केल्यावर व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ६५ (१) व ६६ आणि नियम ४९ (अ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अन्य वजावटी केल्यावर संस्थेने स्वत: अगर तिच्या नावावर केल्या जाणाऱ्या सर्व व्यवहारातून लाभलेल्या निव्वळ नफ्याच्या २५ टक्के नफा, संस्थेच्या राखीव निधीकडे जमा केला पाहिजे.

ब) निव्वळ नफ्यापैकी उर्वरित ७५ टक्के रकमेचा विनियोग महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ५०, ५१, ५२, ५३ प्रमाणे खालील प्रमाणे करण्यात येतो.

१) भरणा झालेल्या भागभांडवलावर समितीच्या शिफारशीवरून व वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार दरसाल दरशेकडा जास्तीत जास्त १५ टक्के इतक्या दराने लाभांश देता येईल. लाभांश देण्यासाठी मागील सहकारी वर्षाच्या अखेरच्या दिवशी संस्थेच्या दप्तरातील नोंदीप्रमाणे भागांचे जे नोंदीधारक असतील त्यांना अशा भागांवर लाभांश देता येतो.

२) संस्थेच्या कामकाजासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी खर्च केलेल्या त्यांच्या बहुमोल वेळेच्या मोबदल्यात त्यांना निव्वळ नफ्यापैकी जास्तीत जास्त १५ टक्केपर्यंत एवढ्या मर्यादेत किंवा सर्वसाधारण सभेद्वारे ठरविण्यात येते व त्याप्रमाणे मानधन देण्यात येते.

३) उपविधी क्र. ५ (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वार्षिक सर्वसाधारण सभा निश्चित करील इतकी रक्कम सामाईक कल्याण निधीच्या खाती वर्ग करण्यासाठी वितरीत करण्यात येते.

४) काही नफा शिल्लक राहिल्यास तो पुढे ओढला जाईल अगर समितीच्या शिफारशीवरून वार्षिक सर्वसाधारण सभा ठरवील त्या पद्धतीने वापरला जातो.

## ३.५ सहकारी गृहनिर्माण संस्थेची आवश्यकता:

सहकारी गृहनिर्माण संस्थेची आवश्यकता का भासत गेली हे आपण खालील मुद्द्याचा आधारे समजून घेऊया.

**१. मुलभूत गरज :**

मानवाच्या अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीन मुलभूत गरजा आहेत. अगदी पूर्वीच्या काळापासून ते आजतागायत निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी मानवाला मोठे प्रयत्न करावे लागतात. कारण ही गरज सहजपणे पूर्ण होणे सामान्य माणसांना शक्य नसते. अशा वेळी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून व्यक्ती आपल्या निवाऱ्याची गरज पूर्ण करू शकतात.

**२. वाढती लोकासंख्या आणि स्थलांतर :**

आपल्या देशात लोकसंख्या अतिशय झपाट्याने वाढत आहे तसेच या वाढीचा दर ही जास्त आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे निवाऱ्याची समस्या ही लोकांच्या समोर आ वासून उभा राहते. त्याचप्रमाणे लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत असतात. नेहमीच हे स्थलांतर हे ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होत असते. कारण शहरी भागात रोजगारीच्या आणि शिक्षणाच्या संधी ह्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे शहराचे नागरीकरण हे होते आणि नागरीकरणाची प्रक्रिया ही झपाट्याने होऊ लागते. साहजिकच वाढत्या नागरीकरणामुळे निवाऱ्यासाठी घरांची गरजसुद्धा झपाट्याने वाढत आहे. अशा वाढलेल्या लोकसंख्येला आणि स्थलांतरित कुटुंबाना सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत वाजवी दरात घर उपलब्ध होऊ शकते.

**३. घराविषयींच्या अपेक्षेमध्ये बदल :**

सुरुवातीच्या काळात ग्रामीण भागामध्ये तसेच शहरीभागात ही सामान्य लोकांना साधे घर जरी असले तरी पुरेसे होते. परंतु सध्या नगरातील आधुनिक घरांच्या संकल्पनेत केवळ निवारा एवढीच मर्यादित अपेक्षा राहिलेली नाही. तर निवाऱ्या या संकल्पनेत आरामदायी, सुविधादायी आणि आनंदादायी निवारा अशा अनेक अपेक्षा समाविष्ट झाल्या आहेत. या स्वप्नाची पूर्तता करायची म्हटले तर वैयक्तिक व्यक्तीला कर्ज घेऊन शक्य करणे होत नाही कारण कर्ज मिळण्यास बऱ्याच अडचणी येतात. परंतु सहकारी गृहनिर्माण संस्था अंतर्गत सहजपणे कर्जपुरवठा उपलब्ध होऊ शकतो.

**४. जागेच्या व बांधकामाच्या वाढत्या किंमती :**

साठ एक वर्षापूर्वी सामान्य माणसाला स्वत:चे घरकुल बांधणे शक्य होते परंतु सध्या ते अशक्यप्राय बनत चालले आहे. कारण जागेचे दर इतके वाढत चालले आहेत की सामान्य माणसाला कल्पना करणेही शक्य होत नाही. त्याचप्रमाणे दिवसेंदिवस वाढत चालेली महागाई यामुळे बांधकाम साहित्याच्या किमंतीतही भरमसाठ वाढ होत आहे. त्यामुळे स्वत: एखादी जागा घेणे व त्यावर छोटेसे घर बांधणे हे सुद्धा कठीण बनत चालले आहे. त्यामुळे जर व्यक्ती ही गृहनिर्माण संस्थांचा सभासद असेल तर त्या गृहनिर्माण संस्थेस शासन अल्प मोबदल्यास जमीन उपलब्ध करून देते तसेच त्यांना बांधकाम साहित्य सुद्धा वाजवी दरात मिळू शकते.

**५. वाढते घर भाड्याचे दर :**

ज्या लोकांना स्वत: घर नाही अशा लोकांच्या समोर घर भाड्याने घेणे व त्यामध्ये वास्तव्य करणे हा पर्याय असतो. परंतु घरांच्या भाड्यामध्येही मोठ्या प्रमाणात वर्षानुवर्षे वाढ होत आहे. त्यामुळे भाड्याने घर घेणेही न परवडण्यासारखे झाले आहे. शासनाने वाढत चाललेल्या घर भाड्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा केला. परंतु त्या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही काही मोठी शहरे अपवाद सोडले तर इतर ठिकाणी झालीच नाही. या वाढत्या भाडेवाढीतून सुटका करून घेण्यासाठी आणि स्वत:चे घर मिळवण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासद होणे आणि त्याअंतर्गत आपले घर मिळवणे यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांची आवश्यकता असते.

**६. घरबांधणीसाठी वेगवेगळ्या परवानग्या :**

घर बांधणी करायची असेल तर घर बांधणीच्या आराखड्याला वेगवेगळ्या खात्यांची परवानगी घ्यावी लागते. उदा. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी. म्हणजेच एक प्रकारे घर

बांधणाऱ्या व्यक्तीस एक अग्निदिव्य परीक्षेतूनच जावे लागते. पण जर तो व्यक्ती गृहनिर्माण संस्थांचा सभासद असेल तर तर ह्या परवानग्या संस्थेमार्फत पार पडल्या जातात.

वरील बाबीं पासून सुटका मिळवण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थाची आवश्यकता आहे.

### ३.५.१ गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या समस्या

गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या समोरील समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१. अपुरा वित्तपुरवठा (Inadequacy of Finance) :**

गृहनिर्माण सहकारी मार्गातील अर्थसहाय्य अभाव हे मुख्य ठरत आहे. त्यांच्या वित्तपुरवठ्याचे मुख्य स्रोत एलआयसी आणि सरकार होते. काही राज्यांमध्ये प्राथमिक संस्थांना अर्थसहाय्य देण्यासाठी कोणतीही सर्वोच्च संस्था नाही. सरकार आर्थिक मदतीची आश्वासने देत आहे जे दुर्दैवाने वास्तविक परिस्थितीत अनुभवास येत नाहीत.

**२. योग्य यंत्रणा व कार्यक्रमांची कमतरता**

**(Lack of suitable machinery and programmes):**

राज्यातील काही ठिकाणी गृहनिर्माण चळवळ यशस्वी होऊ शकली नाही ही एक महत्त्वाची समस्या आहे. याचे गृहनिर्माण सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी महासंघासारखी योग्य यंत्रणा नाही. प्राथमिक गृहनिर्माण संस्थांना प्रशासकीय, कायदेशीर, तांत्रिक आणि आर्थिक बाबतीत मार्गदर्शन व सल्ला मिळत नाही.

**३. जमीन व बांधकाम साहित्याची कमतरता**

**(Scarcity of land and building material) :**

गृहनिर्माण सहकारी संस्थांना समोरील आणखी एक समस्या म्हणजे वाजवी दराने जमीन उपलब्ध न होणे. राज्य शासनाने जागा देण्याच्या बाबतीत या संस्थांना महत्त्व दिले नाही. या सोसायट्यांची आर्थिक स्थिती अशी नाही की जेव्हा लिलावात बोली लावली जाते तेव्हा ते लिलावात बोली लावतील. या सोसायट्यांनाही सिमेंट, बांधकाम साहित्य योग्य दरात मिळण्यास अडचणी येत आहेत.

**४. गृहनिर्माण सहकारी संस्थांमधील गैरप्रकार**

**(Malpractices in Housing Co-operatives):**

गृहनिर्माण सहकारी चळवळीलाही मोठा धक्का बसला आहे कारण काही राज्यात सोसायट्यामध्ये गैरप्रकारांना सुरुवात केली आहे. सहकारांकडून मोठ्या प्रमाणात पैसे मिळविण्यात कित्येक लोकयशस्वी

झाले आहेत आणि पॉश भागात त्यांनी फ्लॅट बांधले आहेत. सहकारावरील मिर्धा समितीच्या शब्दात, कोट्यवधी रुपये बुडविलेल्या योजनांनी सहकारी संस्थांची प्रतिमा डागाळण्यासाठी बरेच काही केले आहे. या समितीने हाऊसिंग सोसायट्यांमध्ये खालील प्रकारचे गैरप्रकार निदर्शनास आणून दिले आहेत.

अ. काही उद्योजक स्वतःच्या फायद्यासाठी गृहनिर्माण व्यवस्था करतात आणि सामान्य सदस्यांना उच्च दराने गृहनिर्माण युनिट्सची विक्री करतात.

ब. काही सभासद गृहनिर्माण युनिट्सची खरेदी करतात आणि त्यांना मोठ्या नफ्यावर इतरांना पुन्हा विकण्यासाठी विकत घेतात.

क. एकाच ठिकाणी दोन व्यक्तींना एकाच प्लॉटची विक्री करणे किंवा सब-लेटिंगच्या व्यवहारात अवैध स्वरुपाचे किंवा फसवणूकीचे विविध प्रकार केले जातात.

ड. आयोजकांना बहुसंख्य पुरवण्यासाठी सदनिका नसलेल्या सदस्यांची नावनोंदणी केली जाते.

या गृहनिर्माण संस्था बर्याच अस्वास्थ्यकर प्रॅक्टिसने ग्रस्त असल्याचेही बँकिंग कमिशनने निदर्शनास आणून दिले. असे म्हटले जाते की तेथे नफा हेतू प्रवर्तक आहेत ज्यांनी कमी किंमतीत जमीन खरेदी केली आणि संस्था स्थापन केल्यावर ते उच्च दराने विकतात.

अशा प्रकारच्या समस्या ह्या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या समोर आहेत.

## ३.६ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे लेखापरीक्षण

### (Audit of Co-operative Housing Society)

ऑडिट या शब्दाचे मूळ हे लॅटीन शब्दात सापडते. ते म्हणजे ऑडिटर असे होय. व याचा अर्थ ऐकणे असा होतो. ऑडिटरची नेमणूक हि जेव्हा व्यवसायचालकांना किंवा संस्थांना आपल्या नोंकरानी/ अधिकाऱ्याने ठेवलेल्या व्यावहारिक नोंदी, आर्थिक हिशेब अचूक आहेत की नाहीत याविषयी शंका वाटते तेव्हा व्यवहाराची पुस्तके तपासण्यासाठी केली जाते. ही तपासणी करणाऱ्या व्यक्तिंना लेखापरीक्षक असे म्हणतात.

लेखापरीक्षण म्हणजे व्यवहारांच्या नोंदीच्या संदर्भात अचूकतेविषयी खातरजमा करून घेण्यासाठी हिशेबलेखन कामावर, पैशाच्या वापरावर नियंत्रण ठेवणारी अंतर्गत किंवा त्रयस्थ संस्था होय.

एल.आर. डिक्सी यांच्या मते, व्यवसायामध्ये उद्भवणाऱ्या देण्या-घेण्याच्या नोंदी पूर्णपणे व योग्य प्रकारे केलेल्या आहेत तसेच त्या व्यवहारांमध्ये बिनचूक व परिपूर्ण प्रतिबिंब हिशेबांच्या

पुस्तकांमध्ये असल्याची खातरजमा करण्याच्या हेतूने हिशेबांचे परीक्षण किंवा तपासणी करणे म्हणजे हिशेब तपासणी होय.

हिशेब तपासणी म्हणजे एखाद्या व्यवसायातील सत्यता व त्याचे परिणाम तपासून व पडताळून पाहण्याच्या उद्दिष्टाने त्या व्यवसायातील हिशेबपुस्तकांचे तसेच मूळ कागदपत्रांचे परीक्षण करणे व त्याबाबत अहवाल अथवा योग्य माहिती देणे होय

कोणत्याही व्यावसायिक संस्थेच्या लेखापरीक्षण केले जात असेल तर त्याचा फायदा हा संस्थेला होतोच त्याचबरोबर सभासद, गुंतवणूकदार, इतर अभ्यासक इत्यादींनाही होतो. कारण लेखापरीक्षण हे त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थेकडून केले जात असल्यामुळे संस्थेविषयी एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होतो. विविध नोंदणी पुस्तकातून नोंदविलेले व्यवहार तपासून पाहण्याचा मुख्य उद्देश हाच असतो की, व्यावहारिक नोंदी जास्तीत जास्त अचूक असल्याची खात्री त्रयस्थ व्यक्ती किंवा यंत्रणेमार्फत करून घेणे. या हिशोबपुस्तकांच्या आधारे संस्थेचे वार्षिक अहवाल, हिशेबपत्रके तयार केली जातात. ही हिशेबपत्रके संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे याचे निदान करण्यास मदत करतात. त्याचप्रमाणे हिशेबातील चुका शोधून काढता येतात, हिशेबातील कसर किंवा लबाडी शोधून काढता येते, वस्तू व मालाच्या संदर्भातील घोटाळा समजू शकतो व भविष्यकाळात संस्थेची प्रगती कशी असेल हेही समजून येण्यास मदत होते.

### ३.६.१. लेखापरीक्षणाचे स्वरूप (Nature of Audit) :

सहकारी गृहनिर्माण संस्थेचे लेखापरीक्षण महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा, १९६० च्या कलम ८१(२) प्रमाणे केले जाते. त्याचप्रमाणे गृहनिर्माण संस्थांचे उपविधींमधील क्रमांक १५१ ते १५३ हे गृहनिर्माण संस्थांच्या लेखापरीक्षणबाबत आहेत.

**१) लेखापरीक्षकाची नियुक्ती (उपविधी क्र. १५१ अ, ब, क) :**

गृहनिर्माण संस्थेस आवश्यकता वाटत असेल तर आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये अंतर्गत लेखापरीक्षकाची नियुक्ती करतात आणि राज्य शासनाने मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांच्या नामिकेमधून संस्था तिच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संवीधीमान्य लेखापरीक्षकाची नियुक्ती करतात. मात्र त्याच लेखापरीक्षकाची नियुक्ती लागोपाठ दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी अधिक कालावधीसाठी करण्यात येत नाही. संवीधीमान्य लेखापरीक्षक आपला लेखापरीक्षा अहवाल महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सादर करतो. वित्तीय वर्ष समाप्त झाल्यावर सहा महिन्यांच्या आत व कोणत्याही प्रकरणी वार्षिक सर्वसाधारण सभा भरवण्याची नोटीस जारी करण्यापूर्वी लेखापरीक्षण करून घेण्याची जबाबदारी समितीची राहते. नियुक्त करण्यात आलेल्या लेखापरीक्षकाचे पारिश्रमिक संस्थेची सर्वसाधारण सभा ठरविते.

## २) लेखापरीक्षेसाठी पुस्तके व अभिलेख सादर करणे :

उपविधी क्र.१५२ अन्वये, गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयात किंवा संस्थेचा अभिलेख नेहमी जेथे ठेवला जातो तेथे, सचिव अंतर्गत लेखापरीक्षकाकडे आणि संवीधीमान्य लेखापरीक्षकाकडे हिशेबाची सर्व पुस्तके, नोंदवह्या, अभिलेख सादर करतात किंवा सादर करण्याची व्यवस्था करतात व संस्थेच्या लेखापरीक्षकडे त्यांच्याकडून मागविण्यात येईल तशी माहिति त्यांना पुरवली जाते.

सहकार नियम मधील कलम ६९ (१) अन्वये, लेखापरीक्षण अहवाला सोबत काही जोडपत्रे निबंधाकडे पाठवावी लागतात ती खालीलप्रमाणे आहेत.

१. गृहसंस्थेने कायदाकानून आणि उपविधी यांविरुद्ध केलेले व्यवहार.

२. हिशोबपुस्तकात येणे जरूर आहे, पण आणल्या नाहीत अशा रकमा.

३. संस्थेची येणी रक्कम, वसुलीसाठी केलेले प्रयत्न, अगर गैरप्रकार.

४. लेखापरीक्षकांच्या मते बुडीत व संशयित रकमा.

५. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होत नाही परंतु कायद्याच्या दृष्टीने ते दोष असतात. उदाहरणार्थ : वार्षिक सभा मुदतीत न घेणे, निबंधकाने मागणी केलेली माहिति सादर न करणे, ठराविक प्रमाणत तशी जिंदगी न ठेवणे.

## ३) वर्गवारी :

लेखापरिक्षकाने सहकारी गृहनिर्माण संस्थेचे लेखापरिक्षण केल्यानंतर त्याच्या निष्कर्षाच्या आधारावर गुणानुक्रम म्हणजेच वर्गवारी ठरवली जाते. त्याची वर्गवारी अ- अत्यंत चांगले, ब-बरे, क- दुर्बल आणि ड- अत्यंत वाईट अशी केली जाते. ही करण्यासाठी सहकारी तत्वाचे पालन, प्रशासकीय व्यवस्था, व्यवहारातील सचोटी, आर्थिक क्षमता, सेवकवर्ग, अंतर्गत तपासणी, हिशोब व रेकॉर्ड, लेखापरिक्षण अहवालातील दोषांची पूर्तता, आणि थकबाकीवसुली हे निकष लावले जातात. या वर्गीकरणाविरुद्ध अपील करता येते.

## ४) लेखापरीक्षका दुरुस्ती अहवाल तयार करणे (उपविधी १५३ अ, ब) :

संविधिमान्य लेखापरीक्षक व संस्थेचा अंतर्गत लेखापरीक्षक यांच्याकडून लेखापरीक्षा अहवाल आल्यानंतर संस्थेचा सचिव, सदर अहवालात उपस्थित केलेले आक्षेप व करण्यांत आलेल्या सूचना यांस अनुलक्षून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ च्या नियमावलीतील नियम ७३ खाली विहित केलेल्या ओ नमुन्यांत दोष-दुरुस्ती अहवालाचा मसुदा तयार करतात व तो मसुदा लेखापरीक्षका

अहवाल प्राप्त झाल्याच्या तारखेला लगत नंतर भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर करतात. समिती लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल निबंधाकडे आणि संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर करतात.

तसेच निबंधक आणि संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल सादर करण्यास समिती कसूर करेल तर समितीच्या सर्व सदस्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १४६ खाली अपराध केला असल्याचे मानण्यात येते व कलम १४७ खाली ते दंडासाठी पात्र ठरतात.

### ३.६.२. लेखापरीक्षणाचे घटक (Elements of Audits) :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(२) अन्वये खालील घटकांचा/ बाबींचा लेखापरीक्षण अहवालात समावेश असणे बंधनकारक आहे.

१) रोख शिल्लक आणि गुंतवणुकीची व संस्थेचे व मालमत्तेचे मुल्यांकन.

२) संस्थेच्या स्तरावर अवाजवी पेनल्टी, अन्यायकारक आकारणी, हस्तांतरणशुल्क/ नॉन ऑक्यूपन्सी चार्जेस याबाबत निर्देशांपेक्षा अधिक आकारणी अशा स्वरूपाचे निर्णय होऊन त्याची अंमलबजावणी होत असल्यास त्याबाबतचे शेरे आणि कार्यवाहीच्या सूचना लेखापरीक्षण अहवालात असणे बंधनकारक आहे. अन्यथा संस्थेच्या कारभारात असलेल्या दोषांची दुरुस्ती करण्याचा मूळ उद्देश साध्य होणार नाही.

३) संस्थेच्या आर्थिक व्यवहारांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करताना संस्थेने गुंताविलेला निधी योग्य ठिकाणी गुंताविलेला आहे का, ठेवीचे नुतनीकरण केले आहे का, मोठा दुरुस्ती खर्च करताना विहित कार्यपद्धतीचा अवलंब केला आहे का याबाबी/घटक तपासून त्याबाबत स्पष्ट शेरे व सूचना लेखापरीक्षण अवहालात नमूद करणे गरजेचे आहे.

४) याशिवाय गृहनिर्माण संस्थांच्या संदर्भात लेखापरीक्षकांकडून दुर्लक्षित केल्या जाणाऱ्या खालील बाबी तपासून त्याबाबत शेरे लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करणे संस्थेच्या हितासाठी बंधनकारक आहे.

- व्यक्तिगत खर्च नफा तोट्यास नावे टाकलेला आहे काय ?
- संस्थेने उद्देशपुर्तीसाठीच खर्च केलेला आहे किंवा कसे ?
- पुस्तकी नोंदीने केलेल्या व्यवहारामुळे संस्थेच्या हितास बाधा पोहचते काय ?
- सभासदांप्रती संस्था आपले दायित्व पूर्ण करीत आहे किंवा नाही ?

- थकबाकीदार सभासदांवर वेळीच कायदेशीर कारवाई सुरु केली आहे काय ?
- हाउसिंग फेडरेशनचे सभासदत्व घेतलेले आहे काय ?
- कलम ७३(१) (अब) नुसार केलेले बॉन्ड वैधानिकदृष्ट्या योग्य आहेत काय ?
- शिक्षण निधीचा भरणा केलेला आहे काय ?
- तपासणी तारखेअखेरच्या ताळेबंद व आर्थिक पत्रके तपासली आहेत काय ?
- आर्थिक वर्षातील नफा तोटा पत्रके तपासणी आहेत काय? आणि त्याबाबत शेरे व सूचना नमूद केली आहेत काय ?
- लेखापरिक्षकास आवश्यक ते सर्व दप्तर लेखापरिक्षणासाठी उपबल्ध झाले आहे आणि ते त्याच्या ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे लेखापरिक्षणासाठी पुरेसे आहे काय ?
- कायदा, नियम व पोटनियमानुसार आवश्यक पुस्तके संस्थेने ठेवलेली आहे. ताळेबंद व नफातोटापत्रक संस्थेच्या पुस्तकांशी जुळतात का ?
- जर ह्या बाबीचे उत्तर नकारार्थी असल्यास नियम ६९ (५) नुसार ती कमतरता लेखापरीक्षण अहवालात सकारण नमूद केली पाहिजे.
- जिल्हा हाऊसिंग फेडरेशन सभासदत्व घेतले आहे काय? व सदर फेडरेशनची वार्षिक वर्गणी भरली आहे काय ?

या व्यतिरिक्त लेखापरिक्षण अहवालात खालील मुद्यांना अनुसरून गंभीर नोंद घेण्यासारख्या बाबी/घटक असल्यास त्या स्वतंत्रपणे लेखापरिक्षकांच्या अभिप्रायासह नमूद करणे आवश्यक आहे.

१) कायदा, कानुन व पोटनियम याचे उल्लंघन करून झालेले व्यवहार.

२) ज्या रक्कमा हिशोबात घेणे आवश्यक असतांना घेतल्या नाहीत अशा रक्कमांचा तपशील

३) अयोग्य व अनियमित केलेला खर्च

४) संशयित व बुडीत वाटणाऱ्या रक्कमा, आणि

५) निबंधकानी विहित केलेल्या बाबी.

**लेखापरीक्षण अहवालाची रचना :**

दिनांक १२/३/१९७४ चे मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रकामधील सूचनानुसार लेखापरिक्षण अहवालाची खालील वैशिष्टे आहेत.

१) लेखापरिक्षण अहवाल स्पष्ट असावा त्यात मोघम सूचना नसाव्यात तसेच तो अत्यंत त्रोटक नसावा.

२) अहवालात व्यक्तिगत शेरे नसावेत.

३) दोषाची दुरुस्ती कशी करावी याचे स्पष्ट दिग्दर्शन/ मार्गदर्शन असावे.

४) मुद्देसूद व विभागावर रचना करून विषयावर देणेत यावी व कायद्यातील तरतुदीशी बांधील असावे.

५) आर्थिक पत्रके सहकार नियमांत नमूद असलेल्या ''न'' नमुन्यात असावेत.

ङ लेखापरीक्षण अहवालाची रचना खालील तीन भागामध्ये केली जाते:

**विभाग – अ :**

यामध्ये खालील बाबींचा समावेश असावा.

१) आर्थिक गैरव्यवहार

२) अफरातफर

३) निधींचा अयोग्य विनियोग

४) धोरणात्मक निर्णयामुळे संस्थेवर होणारे परिणांचे व्यवहार

५) अयोग्य व अनियमित कर्ज व्यवहार

६) अयोग्य गुंतवणुका

**विभाग – ब :**

या विभागात खालील मुद्द्यांवर विवेचन करावे.

**अ) व्यवस्थापन विभाग :**

या विभागात परिच्छेद निहाय सूचना व शेरे नमूद करतांना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

**१. प्रास्ताविक :** यामध्ये लेखापरीक्षण कालावधी लेखापरीक्षण अधिकाऱ्याचा तपशील, लेखापरिक्षणाचा प्रकार, खुलासे व माहित्या असाव्यात.

**२. सभासदत्व :** सभासदत्वाच्या अटींची पूर्तता, पद्धत, आवश्यकता कायदेशीर बाबींची पूर्तता, हस्तांतरणाची प्रक्रिया व त्यासंबंधीच्या नोंदवह्या बाबतचा तपशील.

३.	**कमर्चारी व्यवस्थापन :** कर्मचारी वर्गाची आवश्यकता याचा आराखडा अनुशेषाची परिस्थिती व त्यांच्यावरील खर्चाचे प्रमाण इत्यादी तपशील असावा.

४.	**सभावृतांत :** यामध्ये व्यवस्थापन समिती सभा, वार्षिक सर्वसाधारण सभा बाबतचे सभेचे कामकाज त्यामधील निर्णय त्याची अंमलबजावणी, त्याची कायदेशीरता व त्यामुळे होणारे आर्थिक परिणाम याबाबतचा तपशील.

५.	**वित्त संस्थांच्या तपासण्या :** वित्तीय संस्थांनी तपासणी घेतली असल्यास त्यातील दोषांची पूर्तता केली किंवा कसे याबाबतचे विवेचन.

६.	**वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल :** मागील वर्षीच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेल्या महत्त्वांच्या दोषांची पूर्तता संस्थेने केली नसल्यास त्याचा समावेश करावा.

७.	**वैधानिक नियंत्रणाचे पालन :** ज्या कायदेशीर तरतुदीचे पालन संस्थेने केले नाही ते नमूद करावे.

**ब)	अर्थ व्यवस्थापन विभाग :**

या विभागात खालील घटकांचा समावेश होतो.

१)	निधींचा विनियोग व उपलब्धता

२)	ताळेबंदातील बाबींचे मुल्यांकन व तपासणी.

३)	नफा तोटा व तालेबंदाची सत्य व रास्तस्थिती, लेखीधोरण व त्यातील बदल.

४)	अंदाजपत्रक.

५)	विश्लेषणात्मक नफातोटा व ताळेबंद.

६)	रोखता व तरलता.

७)	तरतुदी.

**क)	कर्जव्यवहार :**

या विभागात खालील घटकांचा समावेश होतो.

१)	धोरण

२)	कर्जवाटप

३)  थकबाकी

४)  वसुली

५)  अनुत्पादक जिंदगी व संशयित बुडीत निधी

**विभाग – क : सामान्य सूचना व शेरे**

यामध्ये वाहने, खर्च पावत्या, बांधकामे, फर्निचर इतर खरेदी प्रवास खर्च, स्टेशनरी, व इतर आर्थिक बाबींचा समावेश असावा तसेच लेखापरिक्षण वर्गवारी व इतर संकीर्ण परिच्छेदाचा समावेश असावा.

संस्थेत गंभीर स्वरूपाच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत लेखापरिक्षकांनी विशेष अहवाल देणे ही त्यांची जबाबदारी आहे.

## ३.७. सारांश :

भारत देशामध्ये वेगवेगळ्या राज्यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था ह्या दिवसेंदिवस वाढत आहे त्याचप्रमाणे त्यांच्या सभासदांची संख्याही वाढत आहे. एकूण सहकारी सोसायट्यांमध्ये ५२ टक्के सहकारी संस्था ह्या गृहनिर्माण संस्था आहेत. समाजातील सामान्य लोकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असतो तो म्हणजे स्वत:चे छोटेसे घर मिळवणे होय. ते घर मिळवण्यासाठी सध्याच्या परिस्थिती त्याला अनेक दिव्यसमस्यांना सामोरे जावे लागते. त्याला उत्तम पर्याय म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय.

गृहनिर्माण चळवळ जरी सहकारी चळवळीचा एक भाग दिसत असला, तरी गृहनिर्माण संस्थांसाठी शासनाने वेगळा कायदा केला आहे. तसेच त्याचे व्यवस्थापनही वेगळे आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था या विषयाशी संबंधीत अनेक कायदे आहेत आणि ते क्लिष्टही आहेत. परंतु त्या कायद्याचा अभ्यास करणे आणि ते जाणून घेणेही महत्त्वाचे आहे. मूळ कायद्यातील तरतुदींप्रमाणे सहकारी संस्था स्थापण्यासाठी कमीत कमी १० सभासदांची नोंदणी आवश्यक होती; परंतु महाराष्ट्र शासनाने आदेश क्र. सी.एच. एस. १०५४/ सीआर २७७/१४ सी दि. १०/०३/१९९५ अन्वये ही अट शिथिल करून प्रत्येक सदनिकेचे चटई क्षेत्रफळ ७०० चौ. फुटांपेक्षा जास्त असेल तर, आणि सर्व सदनिका बांधून झाल्यावर चटईक्षेत्र निर्देशांक शिल्लक राहिला नसेल तर, सदस्यांची गृहसंस्था बनवता येते असे जाहीर केले. त्यामुळे गृहनिर्माण संस्था वाढीस जोर मिळाला.

सहकारी गृहनिर्माण संस्था अधिनियम, २०१२ तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या उपविधी मध्ये गृहनिर्माण संस्था, गृहनिर्माण संस्थांचे प्रकार, सहकारी गृहनिर्माण संस्थाची नोंदणी प्रक्रिया

आणि त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, भागभांडवल, सभासद, सर्वसाधारण सभा, समित्या, ऑडीट, निबंधकाची कामे आणि निबंधकाने तयार केलेला अहवाल याची माहिती असणे गरजेचे आहे.

## ३.८ पारिभाषिक शब्द :

१. सहकारी गृहनिर्माण संस्था : आपल्या सभासदांना राहण्यासाठी घरे किंवा सदनिका बांधून देणे तसेच सभासदांना समान सुखायोगी आणि सेवा पुरविणे या उद्देशाने सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय.

२. अधिनियम : अधिनियम याचा अर्थ, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० असा आहे.

३. उपविधी : उपविधी यांचा अर्थ अधिनियमाशी सुसंगत असलेले आणि, त्यावेळी अंमलात असलेल्या अधिनियमान्वये नोंदलेले आणि तीत अशा उपविधीच्या नोंदलेल्या सुधारणांचा समावेश होतो.

४. मुख्य प्रवर्तक : मुख्य प्रवर्तक याचा अर्थ, प्रवर्तकांनी त्यांच्या पहिल्या बैठकीत किंवा मुख्य प्रवर्तकाचे पद रिक्त राहिले असेल त्याबाबतीत त्यानंतरच्या बैठकीमध्ये पहिली सर्वसाधारण सभा होईपर्यंत जिला निवडून दिलेले असेल ती व्यक्ती, असा आहे.

५. समिती : समिती याचा अर्थ या अधिनियमातील कलम ७३ अन्वये संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था ज्या व्यवस्थापन समितीकडे किंवा संचालक मंडळाकडे किंवा नियामक संस्थेकडे किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इतर निदेशक संस्थेकडे- मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात आलेली असो- सोपवण्यात आली आहे व निहित करण्यात आली आहे ती समिती असा आहे.

६. विहित नमुना : विहित नमुना याचा अर्थ नमुना ज्या उपविधी क्रमांकाखाली विहित करण्यात आला आहे तो क्रमांक आणि ज्या परिशिष्टाला जोडण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| ७. | प्रवर्तक | : प्रवर्तक याचा अर्थ ज्या व्यक्तीने संस्थेच्या नोंदणीसाठी करावयाच्या अर्जावर सही केली आहे ती व्यक्ती असा आहे. |
| ८. | नियम | : नियम याचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ असा आहे. |
| ९. | सदस्य | : सदस्य या संज्ञेचा अर्थ, ज्या संस्थेची नंतर नोंदणी करण्यात आली आहे त्या सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठीच्या अर्जात सहभागी असलेली व्यक्ती किंवा संस्थेच्या नोंदणीनंतर संस्थेची सदस्य म्हणून यथोचितरीत्या दाखल करून घेतलेली व्यक्ती आणि जिने मालमत्तेचे हक्क, मालकी हक्क व हितसंबंध व्यक्तिश: किंवा संयुक्तरीत्या धारण केले आहेत ती व्यक्ती असा आहे. |
| १०. | सहयोगी सभासद | : ज्या वेळी एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीबरोबर संयुक्तपणे संस्थेचा भाग धारण करते व ज्या व्यक्तीचे नाव मुळ सभासदाबरोबरच परंतु दुसऱ्या क्रमांकावर येते अशा व्यक्तीला सहयोगी/ संयुक्त सभासद असे म्हणतात. |
| ११. | नाममात्र सभासद | : नाममात्र सभासद याचा अर्थ नोंदणी झाल्यावर अशा सदस्यत्वासाठी व्यक्तिश: किंवा संयुक्तपणे दाखल केलेल्या मालमत्तेमध्ये हक्क, मालकी हक्क व हितसंबंध धारण करीत नाही अशी व्यक्ती असा होतो. |

## ३.९ स्वयंअध्ययन प्रश्न :

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० मधील नियम ......... मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रकार स्पष्ट केले आहेत.

अ) ५ ब) ६ क) १० ड) १५

२. खालीलपैकी ............. हे गृहनिर्माण सहकारी संस्थांचे प्रकार आहेत.

अ) भाडेकरू मालकी हक्क गृहनिर्माण संस्था ब) भाडेकरू सहभागीदार गृहनिर्माण संस्था

क) इतर गृहनिर्माण संस्था ड) वरील सर्व

३. सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी झाल्यानंतर मुख्य प्रवर्तक यांनी संस्था नोंदणी झाल्याचा दिनांकापासून ............ महिन्याच्या आत प्रवर्तक सभासदांची पहिली सर्वसाधारण सभा आयोजित केली पाहिजे.

अ) १ ब) २ क) ३ ड) ५

४. उपविधीलाच ......... असेही म्हणतात.

अ) नियम ब) अधिनियम क) कलम ड) पोटविधी

५. सहकारी गृहनिर्माण संस्थातील उपविधीमध्ये ........... उपविधींचा समावेश आहे.

अ) १५१ ब) १७५ क) १९३ ड) २०४

६. नोंदणीनंतर भाग न देता दिलेले सभासदत्व म्हणजे ...................... सभासदत्व होय.

अ) सहयोगी ब) नाममात्र क) अज्ञान ड) कार्पोरेट

७. गृहनिर्माण संस्थेने ३० वर्षापेक्षा जास्त जुन्या इमारतींच्या बांधकामाचे लेखापरीक्षण ......... वर्षातून एकदा करून घ्यावे.

अ) ३ ब) ५ क) ७ ड) १०

८. ................ परवानगीने किंवा समिती सदस्यांच्या मताधिक्याने संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा केव्हाही बोलविता येईल.

अ) अध्यक्षांच्या ब) सचिवांच्या

क) खजिनदाराच्या ड) निबंधकाच्या

९. ........... हा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा प्रमुख शासक किंवा चीफ एक्झिक्युटिव्ह असतो.

अ) अध्यक्ष ब) सचिव

क) खजिनदार ड) सभासद

१०. ........... हा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा व्यवस्थापक म्हणून कार्य करत असतो.

अ) अध्यक्ष ब) सचिव

क) खजिनदार ड) निबंधक

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सहकारी गृहनिर्माण संस्था म्हणजे काय ?

२. भागभांडवल म्हणजे काय ?

३. उपविधी म्हणजे काय ?

४. लेखापरीक्षक म्हणजे काय ?

५. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कोणकोणते प्रकार आहेत ?

**क) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. गृहनिर्माण संस्थांचे प्रकार स्पष्ट करा.

२. सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणीची कार्यपद्धती स्पष्ट करा.

३. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांची पात्रता स्पष्ट करा.

४. सहकारी गृहनिर्माण संस्था राखीव निधी व इतर निधीची उभारणी कशी करतात.

५. सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या सभासदाचे प्रकार स्पष्ट करा.

**ड) दिर्घोतरी प्रश्न.**

१. सहकारी गृहनिर्माण संस्था म्हणजे काय सांगून गृहनिर्माण संस्थाची नोंदणीची कार्यपद्धती स्पष्ट करा.

२. महाराष्ट्र गृहनिर्माण संस्थेच्या उपविधीतील महत्त्वाच्या तरतुदी स्पष्ट करा.

३. गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेत करावयाची कामे स्पष्ट करा.

४. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कामकाजाचे व्यवस्थापन स्पष्ट करा.

५. गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांची कामे स्पष्ट करा.

६. गृहनिर्माण संस्थेची आवश्यकता आणि समस्या स्पष्ट करा.

७. लेखापरीक्षणाचे स्वरूप आणि घटक स्पष्ट करा.

## ३.१०. संदर्भसूची


१. Dr. B. S. Mathur (2000), Co-operation in India, Sahitya Bhawan Publishers Distributors (P) Ltd. Agra.

२. मो. त्र्यं. भोपटकर (२०११), सहकारी गृहनिर्माण संस्था, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे.

३. श्रीनिवास घैसास (२०१५), हाउसिंग सोसायट्यांच्या समस्या व त्यावरील उपाय, मनोरमा प्रकाशन, मुंबई.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (दिनांक २० जुलै २०१६ पर्यंत सुधारित).

५. महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२ (३० ऑक्टोबर २०१५ पर्यंत सुधारित).

६. सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी आदर्श उपविधी (टेनंट को- पार्टनरशिप हाऊसिंग सोसायटी), ९७ वी घटना दुरुस्ती आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम (दुरुस्ती) अध्यादेश २०१३.

७. सहकारी गृहनिर्माण संस्था कामकाज संहिता.

# सत्र ६ : घटक ४

# सहकार निबंधक व भारतातील सहकारी हिशेब तपासणी

## (Co-op. Registrar and Co-op. Audit in India)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ सहकार निबंधक - अधिकार व जबाबदाऱ्या

    ४.२.२ सहकारी हिशेब तपासणी- संकल्पना- व्याप्ती- सह. हिशोबाचे प्रकार

    ४.२.३ अंतर्गत हिशेब तपासणीचे स्वरुप - अंतर्गत हिशेब तपासणीसांची कर्तव्ये

    ४.२.४ सहकारी हिशेब तपासणीसाची जबाबदारी व त्यांचे अधिकार

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

४.५ स्वयंअध्ययन प्रश्न

४.६ संदर्भ ग्रंथ यादी


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासामुळे आपणास

* सहकारी प्रशासनातील निबंधकाचे स्थान समजून घेता येईल.
* भारतातील सहकारी निबंधकाचे अधिकार व जबाबदाऱ्या समजावून घेण्यास मदत होईल.
* भारतातील सहकारी हिशेब तपासणी व्यवस्था लक्षात येईल.

- ✼ सहकारी हिशोब तपासणीचे प्रकार समजावून घेणे शक्य होईल.
- ✼ भारतातील सहकार हिशोब तपासनीस किंवा ऑडिटर यांच्या कार्याचे स्वरुप लक्षात घेता येईल.
- ✼ सहकारी हिशोब तपासनीसाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, अधिकार इ.चा सविस्तरपणे आढावा घेणे सोपे होईल.

## ४.१ प्रास्ताविक

भारतात सहकारी चळवळीची सुरुवात स्वातंत्र्यापूर्वी म्हणजे ब्रिटिश राजवटीत १९०४ पासून झाल्याचे दिसून येते. देशात प्रथम सरकारने सहकार कायदा १९०४ पास केला आणि सहकारी संस्था स्थापन करण्याविषयी तरतुदी करुन सहकारी संस्थेची स्थापना करणेबाबत प्रयत्न करणेत आले. सन १९११-१२ साली हा कायदा सहकारी पतपुरवठा संस्थेबरोबर सर्व प्रकारच्या संस्थाकरिता लागू केला. पुढे १९१९ मध्ये सहकार कायदा करुन सहकार हा विषय केंद्र स्तरावरुन राज्य स्तरावर सोपविला. यामुळे सहकारी चळवळीच्या विकासाला प्रादेशिक स्तरावर चालना मिळाली आहे. शासनाने आपआपल्या राज्यात सहकार मंत्रालये स्थापन करुन राज्य स्तरावर सहकारी निबंधक, विभागीय स्तरावर विभागीय निबंधक, जिल्हास्तरावर जिल्हा उपनिबंधक इ. अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यामुळे सहकारी चळवळीची व्याप्ती व विकास होण्यास खूप मदत झाली आहे. सहकारी चळवळीतील दोष दूर करणेसाठी व सहकारी चळवळीची गुणवत्ता वाढीसाठी सरकारने तज्ञ समित्यांची स्थापना करुन त्यांचा अहवाल मागविला. त्यांच्या शिफारशी बाबत सखोल अभ्यास करुन आपआपल्या राज्यात तज्ज्ञ समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी करणेत आली. म्हणून भारतीय सहकारी चळवळीबाबत तज्ज्ञांनी असे मत व्यक्त केले आहे की, भारतीय सहकारी चळवळ नैसर्गिकपणे जन्माला आलेली नसून कृत्रिमरित्या जन्माला घातलेली चळवळ आहे.

भारतातील प्रत्येक राज्य स्तरावर सहकारी चळवळीचा विकास, नियमन, नियंत्रण इ. कार्ये करणारा प्रमुख अधिकारी या नात्याने सहकारी निबंधक कार्यरत असतात. म्हणून ब्रिटिश रॉयल कमिशनने निबंधकांना सहकारी चळवळीचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्वचिंतक असतो असे म्हटले आहे. (Friend, Guide and Philosopher) म्हटले आहे.

### ४.२.१ सहकारी निबंधक व्याख्या

सहकारी संस्था अधिनियम कलम २(२४) नुसार राज्यातील संपूर्ण सह संस्थांची नोंदणी पासून नियंत्रण व नियमन करणारा राज्यपातळीवरील अधिकारी म्हणजे सहकारी निबंधक होय.

आज भारतातील विविध राज्यात निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्था आहेत. उदा. सह. विपणन संस्था, सहकारी साखर कारखाने, कृषीपतपुरवठा, बिगर शेती पतपुरवठा, सह. दुग्ध व्यवसाय, सूतगिरण्या इ. प्रशासन व हिशोब तपासणी इ. कार्ये करणेसाठी स्वतंत्र सहकारी सह. निबंधकाची नियुक्ती करणेत येते. जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी उपनिबंधक, तालुका स्तरावर स्वतंत्र सहाय्यक निबंधक (Assistant Registrar) इ. अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या शासनाकडून करण्यात येतात. प्रशासनाच्या सोयीसाठी प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांना निबंधकाचे अधिकार देण्यात आलेले आहेत. यामुळे सहकारी निबंधकाचे स्थान व महत्व अधोरेखित होते.

थोडक्यात, सहकारी संस्थेच्या नोंदणीपासून म्हणजे सहकारी संस्थेला जन्म देण्यापासून त्यांच्या व्यवस्थापनाचे नियंत्रण, देखरेख ठेवणे म्हणजे तिचे पालनपोषण करणे आणि तिचे कामकाज अव्यवस्थित असेल तर तिची नोंदणी रद्द करणे किंवा तिच्या कार्याची समाप्ती करण्याचे अधिकार व कार्ये निबंधक पार पाडतात म्हणून सहकारी निबंधकांना ब्रम्हा (जन्म देणारा) विष्णु (पालनपोषण करणारा) आणि महेश (मृत्युदंड शिक्षा देणारा) असे म्हटले जाते.

**सहकारी संस्थांचे प्रशासन**

**राज्यस्तरावरील निबंधक/आयुक्त**

| विभागीय सह-निबंधक (नोंदणी व देखरेख) | विभागीय सह-निबंधक (लेखा परिक्षण) | सह-निबंधक पाच शिखर संस्था |
|---|---|---|
| १) पुणे | १) पुणे | |
| २) मुंबई | २) मुंबई | |
| ३) नाशिक | ३) नाशिक | |
| ४) औरंगाबाद | ४) औरंगाबाद | |
| ५) अमरावती | ५) अमरावती | |
| ६) नागपूर | ६) नागपूर | |
| ♦ जिल्हा उपनिबंधक | जिल्हा विशेष लेखापरिक्षक | जिल्हा लेखापरिक्षक |
| ♦ तालुका सहाय्यक निबंधक | | |
| ♦ तालुका सहाय्यक अधिकारी | | |

सहकारी संस्थेच्या प्रशासकीय रचनेत विभागीय पातळीवरील कार्यालयामध्ये विपणण संस्था, प्रक्रियासंस्था उदा.साखर उद्योग, कापड उद्योग, रेशीम इ. ग्राहक संस्था, इ. प्रमाणे वर्गीकरण असून संयुक्त निबंधक नेमण्यात आलेले आहेत. राज्य सरकारचे सहकार खाते त्या सर्व कार्यालयावर नियंत्रण ठेवते.

**सहकार निबंधकांची कार्ये**

| वैधानिक कार्ये Statutory Function | नियंत्रण कार्ये Controlling Function | विकास कार्ये Development Function |
|---|---|---|
| १) संस्थांची नोंदणी | १) सह. संस्थांचे ऑडिट | १) संस्थांचे संवर्धन |
| २) पोटनियम नोंदणी | २) हिशेबातील चुकांची दुरुस्ती | २) विकासाला चालना |
| ३) पोटनियम दुरुस्तीस मान्यता | ३) सह.संस्थेवर नियंत्रण | ३) मार्गदर्शन |
| ४) नोंदणी दाखला वितरण | ४) आर्थिक व्यवहारावर देखरेख | ४) व्यवस्थापना करिता तांत्रिक सल्ला |
| ५) संस्थांचे वर्गवारी ठरविणे | ५) कायद्याची अंमलबजावणी करणे. | ५) सभासद शिक्षण, प्रशिक्षण, तांत्रिक सल्ला |
| ६) वादाबाबतचे निवाडे | ६) बेशिस्त संस्थांवर कारवाई | ६) प्रबोधन व नेतृत्व |
| ७) संदिग्ध नियमाचा अर्थ लावणे | | |

वरीलप्रमाणे सहकारी निबंधकांना विविध कार्ये पार पाडावी लागतात. या कार्यांना कायदेशीर नियमांचा आधार असतो. सदरची कार्ये किंवा कर्तव्ये पार पाडण्याची कायदेशीर तसेच नैतिक जबाबदारी असते.

**सहकार निबंधकाचे अधिकार (Powers of Registrar)**

भारतात सहकारी विकासाची जबाबदारी प्रत्येक राज्य सरकारकडे १९१९ पासून सोपवलेली आहे. राज्य सरकारकडून स्पर्धा परिक्षातून निवडलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती जिल्हा उपनिबंधकपदी

केली जाते. राज्याच्या निबंधक पदी राज्याकडील वरील I.A.S. अधिकाऱ्यांना नियुक्त केले जाते. निबंधकाचे अधिकार खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) सहकारी संस्थांचे नोंदणी विषयक अर्ज स्विकारणे.

२) नोंदणी विषयक निर्णय घेणे.

३) नियम व पोटनियमास मान्यता देणे.

४) पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.

५) बेशिस्त संस्थांवर कारवाई करणे.

६) सहकार विषयक अपिल स्विकारुन त्यांचा निवाडा करणे.

७) सहकारी संस्थांचे हिशेब पत्रके मागविणे.

८) हिशेब पत्रकांची तपासणी, तज्ज्ञ ऑडिटर कडून करुन घेणे.

९) सरकारच्या सहकारी संस्था विषयीच्या सूचना व आदेशाची अंमलबजावणी करणे.

१०) मोठ्या आकाराच्या सहकारी संस्थांवर सरकारी प्रतिनिधीची नियुक्ती करणे.

११) बेशिस्त सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाची बरखास्ती करणे व प्रशासकांची नियुक्ती करणे.

१२) संस्थेच्या निधीची गुंतवणूक करणे.

१३) सहकारी संस्था भागभांडवल वृद्धी व कर्ज उभारणीस मान्यता देणे.

१४) दर पाच वर्षांनी सहकारी संस्थाच्या निवडणुका घेणे.

१५) अपरिहार्य परिस्थितीत संस्थेच्या संचालकांच्या सभा भरविणे व निर्णय घेणे, निर्णयांची अंमलबजावणी इ. करणे.

१६) सहकारी संस्थांचे प्रवर्तक, अध्यक्ष, संचालक मंडळ इ. दंड करणे व त्याची वसुली करणे.

१७) सहकारी संस्थांची कर्ज वसुली करणे.

१८) सहकारी बँका स्पष्टीकरण मागविणे, त्यांच्या कार्याची पहाणी करणे.

१९) कमकुवतसहकारी संस्थाचे एकत्रीकरण किंवा विलीनीकरण करण्याबाबत संमती व निर्णय घेणे.

२०) सहकारी बँकाना ठेवी विमा महामंडळाच्या सवलतीचा लाभ मिळवून देणे.

**सहकारी निबंधकांच्या जबाबदाऱ्या (Responsibilities of Registrar)**

सहकार कायद्यानुसार सहकारी निबंधकांना विविध अधिकार देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे कायद्याने निबंधकावर काही जबाबदाऱ्या देखील सोपविल्या आहेत. त्यांच्याकडील जबाबदारीला नैतिक अधिष्ठान असते. थोडक्यात निबंधक हे सहकारी संस्थांचे मित्र, तत्वचिंतक, मार्गदर्शक, सहाय्यक इ. स्वरुपात भूमिका बजावतात.

निबंधकांच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) राज्यातील सहकारी संस्थांना व्यवस्थापन, आर्थिक व्यवहार इ. बाबत मार्गदर्शन करणे.

२) सहकारी बॅकांनी निधीची गुंतवणूक योग्य त्या स्वरुपात केली आहे काय ? त्याची खात्री करुन घेणे.

३) सहकारी संस्थेच्या सभासद शिक्षणाबाबत सोई व सुविधा उपलब्ध करुन देणे.

४) संस्थेतील कर्मचारी व अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

५) सहकारी संस्थेतील अल्पसंख्यांक गटाचे हित सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी.

६) सहकारी संस्थेच्या निवडणुका नि:पक्षपातीपणे घेणे, संस्थेचे आर्थिक व्यवहार प्रामाणिकपणे पार पाडणे.

७) सहकारी संस्थेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत लवादाची नियुक्ती करणे.

८) सहकारी संस्थेतील भ्रष्टाचार, अपहार इ. बाबत तपास अधिकाऱ्यांच्या नेमणुका करुन, त्याचा अहवाल मागवून घेणे.

९) सहकारी संस्थेतील अपराधी व्यक्तिवर कडक कारवाई करणे.

१०) राज्यातील सहकार चळवळीला योग्य दिशा देऊन त्यांचे नेतृत्व करणे.

वरीलप्रमाणे सहकार निबंधकांना नियमित जबाबदाऱ्यांचे पालन करावे लागते, निबंधकांची कर्तव्ये अधिकार इ. मध्ये कसूर झाल्यास त्यांना पदच्युत करण्याचे अधिकार सहकार खाते आणि राज्य शासनाला असतात.

## २.२ सहकारी हिशेबतपासणी (Co-operative Auditing)

कोणत्याही खासगी, सार्वजनिक, सहकारी इ. संस्थांच्या दृष्टीने हिशेब व जमाखर्च लिहीणे, व्यवहाराच्या बिनचूक नोंदी ठेवणे इ. ची अत्यंत आवश्यकता असते. नफा मिळविणाऱ्या सर्व संस्थांना हिशेब तपासणी अथवा ऑडिटची गरज असते; त्याप्रमाणे सहकारी संस्थांना देखील आर्थिक व्यवहाराचा हिशेब लिहीणे, हिशेबातील चुका, त्रुटी शोधून काढणे, हिशेबातील दोष दुरुस्त करुन त्यांची पुनर्मांडणी करणे इ. ची आवश्यकता असते. १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यानुसार सहकारी हिशेब तपासणीची खूप गरज असते.

**व्याख्या :**

व्यापारी संस्थांच्या बाबतीत हिशेब तपासणी याचा अर्थ एक वर्ष कालावधीत संस्थेने केलेल्या खर्च पावती, जमा पावती, हिशेबाच्या नोंदी योग्य त्या पुस्तकातून व खात्यातून केली जाते काय इ. ची तपासणी करण्यापुरती मर्यादीत असते. मात्र सहकारी संस्थेच्या हिशेब तपासणी मध्ये केवळ वरील कार्याचा अंतर्भाव होत नाही तर यामध्ये अनेक अनुषंगिक बाबींचा समावेश असतो.

मॅक्लगन समितीच्या मते, सहकारी हिशोब तपासणी मध्ये संस्थेच्या, मालमत्ता व देणी इ. चे मुल्यमापन करणे, नोंदणी अधिकार्यांनी वरचेवर केलेल्या नियमाप्रमाणे संस्थेचे कामकाज चालले आहे काय ? संस्थेच्या रोख रकमेची तपासणी करणे, संस्थेने घेतलेली कर्जे, कर्जाची परतफेड सहकारी कायद्याला अनुसरुन केली आहे काय? हे पहाणे, संस्था सभासदांचे हित जपते काय ? संस्थेची थकबाकी, त्याबाबतची कारणे, संस्थेवरील जबाबदाऱ्या मालमत्ता यांचे मुल्यमापन ऑडिटरने करावे ही अपेक्षा असते.

महाराष्ट्र राज्यात सरकारच्या आर्थिक वर्षाप्रमाणे १ एप्रिल ते ३१ मार्च याप्रमाणे सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष गृहित धरण्यात येते. सहकारी संस्थांना आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३ महिन्याच्या आत हिशेब पत्रके पूर्ण करणे व सहकारी कायद्याने ठरवून दिलेल्या नमुना न प्रमाणे सादर करावा लागतो.

**व्याप्ती :**

**अ) सहकारी संस्थांची हिशेब पुस्तके**

१) रोजकिर्द

२) सामान्य खाते वही

३) वैयक्तिक खाते वही

४) मालसाठ्याचे रजिस्टर

५) मालमत्ता नोंदणी पुस्तक

**ब) नोंदवह्या**

१) सभासद नोंदणी पुस्तक

२) भाग नोंदणी पुस्तक

३) भाग खतावणी

४) कर्जरोखे नोंदणी पुस्तक

५) वार्षिक साधारण सभा वृत्तांत पुस्तक

६) व्यवस्थापक समिती सभा वृत्तांत पुस्तक

७) निबंधकाने मागविलेली माहिती पुस्तके

**क) वार्षिक हिशेब पत्रके व ऑडिट**

१) जमा व खर्च रक्कमांचे पुस्तक

२) नफा-तोटा पत्रक

३) ताळेबंद व आढावा पत्रक

४) व्यवस्थापक समितीचा वार्षिक अहवाल

५) ऑडिट हरकती व त्यावरील उपाय इ. ची नोंद वही

६) कॉस्ट ऑडिट संबंधीच्या नोंद वह्या

७) राज्य सरकारने निर्देशित केलेल्या नोंद वह्या इ.

वरीलप्रमाणे सहकारी हिशेब तपासणी यंत्रणेकरिता कागदपत्राची तरतूद, जपणूक, सादरीकरण इ. करावे लागते. सहकारी हिशेब तपासणीचे कार्य मान्यता प्राप्त चार्टर्ड अकौंटन्ट, सर्टिफाइड ऑडिटर इ. कडून करुन घ्यावे लागते.

**हिशेबाचे प्रकार :**

भारतात सहकारी संस्था आपल्या आर्थिक व्यवहारांचे हिशेब लिहीण्याकरिता खालील पद्धतीचा अवलंब करताना दिसून येतात.

**१) देशी हिशेब पद्धती (Indian Book Keeping System)**

सदरची पद्धती सर्वात जुनी आहे. या पद्धतीत वर्ष अखेरी नंतर संस्थेच्या देणी व येणी व्यवहाराचा आढावा घ्यावा लागतो. आजही नागरी व ग्रामीण भागात सहकारी ऑडिट करिता ही

पद्धती वापरण्यात येते. या पद्धतीला मारवाडी पद्धती असेही म्हणतात. या पद्धतीवरुन संस्थेचे ऑडिट सदोष होत असल्याने ही पद्धती खूप मागे पडल्याचे दिसून येते.

### २) एक नोंदी हिशेब पद्धती (Single Entry Book-Keeping System)

सहकारी संस्थेकडून ही एक पद्धती ऑडिट करिता वापरण्यात येते. या पद्धतीत संस्थेच्या व्यवहाराची एकाच ठिकाणी नोंद केली जाते. येथे व्यवहाराचे दोन परिणाम न नोंदविता केवळ एक परिणाम नोंदविण्यात येतो. सदर पद्धतीत सर्वच व्यवहाराची नोंद होत नाही. यामुळे ही पद्धती सदोष मानण्यात येते.

### ३) द्विनोंदी हिशेब पद्धती (Double Entry Book-Keeping System)

सहकारी हिशेबाची ही एक अत्यंत परिपूर्ण व शास्त्रीय पद्धती म्हणून ओळखली जाते. सध्या खासगी संस्थांच्या हिशेब तपासणीकरिता देखील ही पद्धती वापरली जात आहे. या पद्धतीमुळे व्यवसायाच्या आर्थिक स्थितीचे चित्र स्पष्ट होते. येथे प्रत्येक व्यवहाराचे दोन्ही परिणाम नोंदविण्यात येतात.

### ४) सतत हिशेब तपासणी (Continuous Audit System)

या पद्धतीत सहकारी संस्थांची तपासणी आठवडा, पंधरवडा, मासिक याप्रमाणे करणेत येते. या पद्धतीने संपूर्ण वर्षभर हिशेब तपासणीचे कार्य करण्यात येते. सामान्यत: मोठ्या आकाराच्या सहकारी संस्थांमध्ये उदा.राज्य सह.बँका, इ. मधून सहकारी ऑडिटकरिता सदरची पद्धती वापरणेत येते.

## ४.२.३ अंतर्गत हिशेब तपासणीचे स्वरुप

सहकारी संस्थेच्या हिशोब तपासणी बाबत सहकार कायदा १९६० मध्ये विभाग ८ मध्ये ८१ व ८२ ही कलमे दिलेली आहेत; यामध्ये ऑडिटरला संस्थेने मागेल ती पुस्तके, नोंदवह्या सादर करण्याची कायदेशीर जबाबदारी असते. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१) कीर्द, खतावणी, रोख पुस्तक, जिंदगी रजिस्टर, डेडस्टॉक रजिस्टर, गुंतवणूक रजिस्टर, कर्ज पुस्तक, ठेव पुस्तक, माल जावक पुस्तक इ. चा समावेश होतो.

२) संस्थेकडील जमा व खर्च पावत्या

३) बँक पासबुक, चेकबुक इ.

४) व्यवहाराच्या बेरजा, वजाबाक्या, स्थानांतर रक्कम, तेरीज खात्याच्या बाबी इ.

५) वार्षिक सभेपुढे ठेवायची नफा तोटा पत्रके, अंदाज पत्रके

६) माल साठा पुस्तक व शिल्लक मालाची खात्री करणे.

७) संस्थेने केलेले खर्च किफायतशीर व योग्य आहेत काय ? याची खात्री करणे.

८) संस्थेकरिता दैनंदिन व्यवहारासाठी काही रोकड रकमेची गरज असते, त्यासाठी आवश्यक तेवढीच रोख रक्कम ठेवली आहे काय ? त्याची तपासणी करणे.

९) हिशेब तपासणीबाबत रोखपाल, लेखापाल, चिटणीस, संचालक मंडळ इ. कडून स्पष्टीकरणे मागविणे.

१०) संस्थेची मालमत्ता, जिंदगी, दायित्व इ. चे मुल्यनिर्धारण करणे.

११) संस्थेच्या सर्वसाधारण कारभाराची पाहणी करणे.

वरीलप्रमाणे अंतर्गत हिशेब तपासनीस किंवा ऑडिटरने सहकारी संस्थेच्या हिशेबामध्ये काही चुका, नियम बाह्यता असेल तर त्याची नोंद ऑडिट मेमोत केलीजाते. सदरच्या हिशोबातील चुका, त्रुटी, निष्काळजीपणा, नियमबाह्यता नजिकच्या तीन महिन्यात दुरुस्त करण्याची सूचना देतात. चुकांची दुरुस्ती केल्यानंतर त्याचा अहवाल सहकारी निबंधकाकडे पाठवावा लागतो. पुढे निबंधक सहकारी संस्थेची हिशेब पत्रके पाहून त्यातील चुका, आर्थिक अपहार, खर्चाबाबतच्या लबाडया गंभीर स्वरुपाच्या असल्या तर निबंधक सहकारी संस्थेच्या चौकशीचा सुद्धा आदेश देऊ शकतात.

**हिशेब तपासणीची वर्गवारी**

सहकारी संस्थांच्या हिशेब तपासणीनंतर लेखा परिक्षक संस्थेला तपासणी वर्ग देत असतात. याकरिता १०० पैकी गुणदान करण्यात येते. सध्या वर्गवारी खालीलप्रमाणे करण्यात येते.

'अ' वर्ग संस्था- अत्यंत चांगली व उत्तम दर्जाची संस्था

'ब' वर्ग संस्था- मध्यम किंवा बरी सहकारी संस्था

थकबाकीचे प्रमाण २५% पर्यंत, अशा संस्था अ वर्ग मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात.

'क' वर्ग संस्था- सर्वसाधारण कार्यरत सहकारी संस्था, याची थकबाकी ४०% पर्यंत गेलेली असते. संस्था सहकारी कायदा व पोटनियमाचे उ'घन करताना आढळतात. संस्थेची सांपत्तिक स्थिती असमाधानकारक असते.

'ड' वर्ग संस्था- अत्यंत निकृष्ठ दर्जाची व डबघाईला आलेल्या संस्थेला ड वर्ग देण्यात येतो. अशा संस्थांची थकबाकी ६०% पर्यंत असते. संस्थेच्या कारभार व व्यवस्थापनात बेशिस्तपणा आढळतो. या संस्था तोट्यात असतात. या संस्था दुरुस्ती पलिकडे गेलेल्या असतात. त्यामुळे त्यांना निष्क्रीय संस्था असे संबोधले जाते.

**अंतर्गत हिशेब तपासणीसाची कर्तव्ये (Functions of Internal Auditor)**

भारतातील सर्व राज्यातील सहकारी संस्थांची हिशेब तपासणीची जबाबदारी सहकार निबंधकाची असते. बहुतेक राज्यातून सहकार खात्यातून विशेष तज्ज्ञाची नेमणूक करण्यात येते. तामिळनाडू, ओडिसा, पश्चिम बंगाल मध्ये सहकारी हिशेब तपासणीकरिता स्वतंत्र सेवक वर्गाची नियुक्ती करण्यात आली आहे. मध्य प्रदेश राज्यास विभागीय हिशोब तपासणीस मार्फत ऑडिट केले जाते. तर पंजाबमध्ये सहकारी बँकाची हिशेब तपासणी सहकारी खात्यामार्फत होते. महाराष्ट्र राज्यात सहकारी संस्थेच्या हिशेब तपासणीसाठी विशेष ऑडिटर व सहाय्यक ऑडिटर मार्फत करण्यात येते. भारतातील अंतर्गत हिशेब तपासणीसाची कर्तव्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) सहकारी संस्थेचे हिशेब सहकारी कायद्यानुसार ठेवले आहेत काय? ते तपासणे.

२) सहकारी संस्थेच्या व्यवहाराबाबत गुप्तता ठेवणे.

३) सहकारी संस्थेत गैरव्यवहार आढळल्यास तसा अहवाल निबंधक व सभासदांना देणे.

४) ऑडिट झालेल्या संस्थेला योग्य वर्ग देणे.

५) संस्थेच्या पावत्या व दस्तऐवज तपासणे.

६) आवश्यकता वाटल्यास सहकारी संस्थेकडून खुलासा मागवून घेणे.

७) संस्थेची रोकड वही व प्रत्यक्ष रोख रक्कम यांची तपासणी करणे.

८) संस्थेचा खर्च उपविधीतील तरतुदीप्रमाणे आहे काय ? याची तपासणी करणे.

९) सहकारी संस्थेच्या ऑडिट बद्दल योग्य मानधन मिळविणे.

१०) सहकारी संस्थेच्या हिशोबात पारदर्शकता आणणे.

११) संस्थेच्या सांपत्तीक स्थितीचे सत्य कथन करणे.

१२) सहकारी संस्थेच्या कर्जाची छाननी करणे, बुडीत कर्जेवसुली बाबत मदत करणे.

१३) विशिष्ठ परिस्थितीतील सहकारी संस्थेचे दप्तर जप्त करणे.

१४) ऑडिटर सहकारी संस्थेचे ऑडिट करुन एका विशिष्ट नमुन्यात सहकारी निबंधकाकडे हिशेब व अहवालाची प्रत पाठवून देणे इ.

**सहकारी हिशेबनिस किंवा ऑडिटरच्या जबाबदाऱ्या**

सामान्यत: लेखा परिक्षक हा सहकार खात्यामार्फत नेमलेला असला तरी खऱ्या अर्थाने तो सभासदांचा हितरक्षक असतो. सहकारी संस्थेचा कारभार कार्यक्षमतेने व आर्थिक व्यवहार नियमितपणे होतात काय ? त्यांची तपासणी करणे, दोष काढून टाकण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याची त्यांची नैतिकच नव्हे तर कायदेशीर जबाबदारी असते, त्यांचे विवेचन खालीलप्रमाणे करता येईल.

१) संस्थेचे हिशेब पत्रक, तेरीज पत्रक व नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकांची काळजीपूर्वक तपासणी करणे.

२) हिशेबातील नियम बाह्यता शोधून त्या दुरुस्त करण्यास सांगणे.

३) संस्थेचे व्यवस्थापन संस्थेच्या पोटनियमानुसार होते काय ते पाहणे.

४) सहकारी संस्था नियमानुसार कर्जाची देवघेव करतात काय त्याची पाहणी करणे.

५) संस्थेच्या सर्व नोंदी बिनचूक असल्याची खात्री करुन घेणे.

६) संस्थेची गुंतवणूक सुरक्षित आहे काय ते पाहणे.

७) संस्थेचे कॅशबुक व लेजर यातील नोंदीला मेळ बसतो आहे काय ते पाहणे.

८) संस्थेने दैनंदिन व्यवहारासाठी योग्य व पुरेशी रोकड ठेवली आहे काय ते पाहणे.

९) संस्थेच्या आर्थिक स्थितीबद्दलचा वस्तुनिष्ठ अहवाल तयार करणे व तो निबंधकाकडे पाठविणे.

१०) संस्थेतील अपहार शोधून काढणे.

११) अपहाराची निबंधकांना माहिती देणे.

१२) सहकारी संस्था उद्दिष्टनिहाय काम करते काय याची खात्री करणे व त्याबाबत दुरुस्त्या सुचविणे.

१३) संस्थेच्या हिशेबाबत गुप्तता पाळणे.

१४) ऑडिटरने सहकारी संस्थेबाबतची माहिती दडवून ठेवू नये.

१५) सहकारी संस्था आणि त्याचे सभासद इ.यांचे हित जोपासले जाते काय, याबाबत दक्ष असणे.

वरील सर्व जबाबदाऱ्यांचे पालन सहकारी हिशोबनिस किंवा ऑडिटरना करावे लागते.

**लेखापरिक्षकाचे अधिकार (Co-op. Auditor's Rights)**

ऑडिटर या नात्याने लेखा परिक्षकास खालील अधिकार कायद्याने बहाल केल्याचे दिसून येते.

१) संस्थेकडून आवश्यक ती हिशेब पुस्तके, नोंदवह्या, कागदपत्रे इ. मागणी करणे.

२) आर्थिक व्यवहाराच्या पावत्या, देयके, दस्तऐवज इ. माहिती घेणे.

३) हिशेबाबाबत तोंडी व लेखी माहिती, स्पष्टीकरण मागविणे.

४) संस्थेतील रोकड शिल्लक व प्रत्यक्ष तिजोरीतील रक्कम यांची पडताळणी करणे.

५) माल साठा पुस्तकाप्रमाणे गोदामातील मालसाठ्याची तपासणी करणे.

६) संस्थेची मालमत्ता व जिंदगीची तपासणी करणे.

७) पोटनियमातील तरतुदीपेक्षा जास्त खर्च नामंजूर करणे.

८) संस्थेतील गैरव्यवहार, अपहार शोधून त्याची निबंधकांना माहिती देणे.

९) संस्थेच्या तांत्रिक बाजूबद्दल तज्ज्ञाकडून माहिती घेणे.

१०) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे निमंत्रण मिळविणे व सभेकरिता उपस्थित राहण्याचा अधिकार असतो.

११) संस्थेच्या हिशेब तपासणीवरुन संस्थेला वर्ग देणे, संस्थेचे मुल्यमापन करणे इ.

१२) संस्थेचे ऑडिट करुन त्याबद्दलचे मानधन किंवा मोबदला घेण्याचा ऑडिटरना अधिकार असतो.

१३) संस्थेला हेतू पुरस्सर त्रास देण्यासाठी व पदाधिकाऱ्यांची बदनामी करण्यासाठी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करु नये.

## ४.३ सारांश

सहकारी चळवळीला प्रारंभ १९०४ च्या सहकारी कायद्याच्या आधारे भारतात झाल्याचे दिसून येते. पुढे या कायद्यातील उणिवा दूर करण्यासाठी १९१२ साली नविन सहकारी कायदा पास झाला. सदरच्या कायद्यात सहकार अंतर्गत प्रशासकीय यंत्रणा निश्चित करण्यात आली. पुढे १९१९ मध्ये सहकार विभाग राज्य शासनाकडे सोपविला. त्यानंतर देखील सहकारी प्रशासकीय रचनेमध्ये निबंधक, संयुक्त निबंधक, उपनिबंधक, दुय्यम निबंधक अशी पदे निर्माण करण्यात आली. यापैकी

निबंधक हे पद राज्य पातळीवरील प्रमुख प्रशासकीय पद असते. त्यांना खूप अधिकार आलेले आहेत. निबंधक हा सहकारी चळवळीचा मित्र, तत्वज्ञ, हितचिंतक असतो. यामुळे निबंधकाला सहकारी चळवळीचा ब्रम्हा, विष्णू, महेश म्हणूनही ओळखले जाते.

सहकारी चळवळीतील दुसरा महत्वाचा घटक या नात्याने सहकारी हिशेबनीस किंवा ऑडिटरचा उल्लेख करण्यात येतो. निबंधक सहकारी संस्थेच्या संख्यात्मक वाढीसाठी प्रयत्न करतात तर सहकारी ऑडिटर किंवा हिशोबनिस सहकारी संस्थेच्या गुणात्मक वाढीसाठी सर्वतोपरी सहाय्य करतात, हे केवळ कर्तव्य म्हणून नव्हे तर नैतिक व कायदेशीर जबाबदारी म्हणून ऑडिटर आपले कार्य करतात. थोडक्यात सहकारी निबंधक व ऑडिटर हे एका नाण्याच्या दोन बाजू असल्याचे दिसून येते.

## ४.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | निबंधक (Registrar) | : | प्रत्येक राज्यातील सहकारी चळवळीचा प्रमुख |
| २) | सह-निबंधक | : | राज्यातील सहकारी निबंधकांना प्रकारानुसार विकासासाठी सहाय्य करणारे अधिकारी |
| ३) | विभागीय निबंधक | : | राज्यातील प्रदेशनिहाय सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी झटणारे अधिकारी |
| ४) | जिल्हा उपनिबंधक | : | भारतात सर्व राज्यातून जिल्हानिहाय सहकारी चळवळ विकसीत करणारे जिल्हा स्तरीय प्रमुख अधिकारी |
| ५) | तालुका सहाय्यक निबंधक | : | तहसीलनिहाय ग्रामीण भागात सहकारी चळवळीचा विकास करणारे, संस्थेची नोंदणी करणारे अधिकारी |
| ६) | सहकारी हिशेबनिस किंवाऑडिटर | : | सहकारी संस्थेचे हिशेबाची तपासणी करणारे चार्टर्ड अकौंटन्ट |
| ७) | सर्टिफाईड ऑडिटर | : | सहकारी संस्थेच्या अंतर्गत हिशेब तपासणीकरीता सहकार खात्याने नोंदणी केलेले G.D.C. & A अर्हता धारण करणारे हिशेबनिस. |

## ४.५ स्वाध्याय/स्वयंअध्ययन प्रश्न

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून लिहा.**

१) भारतात पहिला सह. कायदा .................... साली पास झाला.

अ) १८८९ ब) १९०४ क) १९१९ ड) १९१२

२) ....................... हे सहकारी संस्थेचे राज्य पातळीवरील प्रमुख असतात.

अ) निबंधक ब) सह.निबंधक क) उप-निबंधक ड) ऑडिटर

३) सहकारी संस्था संस्थेचे सभासदत्व देताना सभासदांना .................. शुल्क आकारतात.

अ) सीमा शुल्क ब) प्रवेश शुल्क क) बाजार शुल्क ड) यापैकी नाही

४) सहकारी संस्थेला शासनाकडून दिल्या जाणार्या अर्थसहाय्यास ..................... म्हणतात.

अ) मदत ब) देणगी क) अनुदान ड) यापैकी नाही.

५) नफा-तोटा पत्रक सहकारी संस्थेची ...................... दर्शविते.

अ) दायीत्व ब) जबाबदाऱ्या क) सांपत्तीक स्थिती ड) यापैकी नाही.

६) महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र सहकारी कायदा ...................... मध्ये पास झाला.

अ) १९४७ ब) १९६० क) १९६९ ड) १९७७

**ब) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) सहकारी निबंधकाला सहकारी संस्थेचा ब्रम्हा, विष्णू, महेश असे म्हणतात.

२) नोंदणी प्रमाणपत्र नोंदणीचा अधिकृत पुरावा समजण्यात येत नाही.

३) सहकारी संस्थांची हिशोब तपासणी फक्त एकदाच होते.

४) निबंधक कोणत्याही संस्थेची विनासूचना तपासणी करु शकतो.

५) सहकारी संस्थेची नोंदणी नाकारता येत नाही.

**उत्तर :**

**अ)** १) - ब २) अ ३) ब ४) क ५) क ६) ब

**ब)** १)- बरोबर २) चूक ३) चूक ४) बरोबर ५) चूक

**क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकारी निबंधकाचे अधिकार व जबाबदाऱ्या सविस्तरपणे स्पष्ट करा.

२) सहकारी हिशोबतपासणीची व्याप्ती विशद करा.

३) भारतातील सहकारी ऑडिटरचे अधिकार व जबादाऱ्यांचे विवेचन करा.

## ४.६ संदर्भ ग्रंथ यादी


1. Bedi R.D., Theory, History and Practice of Co-operation.
2. Hajela T. N., Principles, Problems and Practice of Co-operation.
3. Co-operative Movement at a Glance in Maharashtra - 2008.
4. Indian Co-operative Movement : A Profile 2008 NCVI Publication, New delhi.
5. Sriniwas (1990). Organization and Management of Co-operative Banks in India. Printwell, Jaipur.
6. सहकार तत्त्वे व व्यवहार – रायखेलकर व डांगे.
7. सहकाराचा विकास – डॉ. सी. जे. जोशी.
8. Goel B.B., Co-operative Management and Administration.
9. Iyangar - A Study in the Co-operation in India.